सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.**

# महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७

(दिनांक ३० जून २०१७ पर्यंत सुधारित)

# Maharashtra Act No. XLIII of 2017.

# THE MAHARASHTRA GOODS AND SERVICES TAX ACT, 2017.

(*As modified upto the 30th June 2017*)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री व प्रकाशने संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रकाशित केले.

**२०१७**

[**किंमत :** रुपये १६८.०० ]

# महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७

**(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.)**

---

**अनुक्रमणिका**

**उद्देशिका**

**कलमे**

प्रकरण एक

**प्रारंभिक**


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | १ |
| २. | व्याख्या. | १ |


प्रकरण दोन

**प्रशासन**


| | | |
|---|---|---|
| ३. | या अधिनियमाखालील अधिकारी. | १८ |
| ४. | अधिकाऱ्यांची नियुक्ती. | १९ |
| ५. | अधिकाऱ्यांचे अधिकार. | १९ |
| ६. | विवक्षित परिस्थितीत केंद्रीय कर अधिकाऱ्यांना समुचित अधिकारी म्हणून प्राधिकृत करणे. | १९ |


प्रकरण तीन

**कर आकारणे व त्याचे संकलन करणे**


| | | |
|---|---|---|
| ७. | पुरवठ्याची व्याप्ती. | २० |
| ८. | संयुक्त आणि मिश्र पुरवठ्यांवरील कर दायित्व. | २१ |
| ९. | कर आकारणे व संकलन करणे. | २१ |
| १०. | आपसमेळ कर आकारणी. | २२ |
| ११. | करातून सूट देण्याचा अधिकार. | २३ |


प्रकरण चार

**पुरवठ्याची वेळ आणि मूल्य**


| | | |
|---|---|---|
| १२. | वस्तूंच्या पुरठ्याची वेळ. | २४ |
| १३. | सेवेच्या पुरवठ्याची वेळ. | २६ |
| १४. | वस्तूंच्या किंवा सेवांच्या पुरवठ्याच्या संबंधातील कराच्या दरातील बदल. | २७ |
| १५. | करपात्र पुरवठ्याचे मूल्य. | २८ |

**कलमे.** **पृष्ठे**

प्रकरण पाच

**निविष्टी कराची जमा रक्कम**


१६. निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यासाठीच्या पात्रता व शर्ती. . . . . ३०
१७. जमा रक्कम व रोखलेली जमा रक्कम यांचे संविभाजन. . . . . . . ३२
१८. विशेष परिस्थितीतील जमा रकमेची उपलब्धता. . . . . . . ३४
१९. उक्त्या कामासाठी पाठविलेल्या निविष्टीच्या आणि भांडवली वस्तूंच्या बाबतीत निविष्टी कराची जमा रक्कम घेणे. . . . . . . . . . . ३६
२०. निविष्टी सेवा वितरकाने जमा रकमेचे वितरण करण्याची रीत. . . . . ३७
२१. अधिक रकमेने वितरित करण्यात आलेल्या जमा रकमेच्या वसुलीची रीत. . . . . ३८


प्रकरण सहा

**नोंदणी.**


२२. नोंदणीसाठी पात्र व्यक्ती. . . . . . . . . ३८
२३. नोंदणीसाठी पात्र नसणाऱ्या व्यक्ती. . . . . . . . . ३९
२४. विवक्षित प्रकरणांमध्ये सक्तीची नोंदणी. . . . . . . ४०
२५. नोंदणीची कार्यपद्धती. . . . . . . . . ४०
२६. मानीव नोंदणी. . . . . . . . . ४२
२७. नैमित्तिक करपात्र व्यक्ती व अनिवासी करपात्र व्यक्ती यांच्या संबंधात विशेष तरतुदी. . . ४२
२८. नोंदणीमधील सुधारणा. . . . . . . . . ४३
२९. नोंदणी रद्द करणे. . . . . . . . . ४३
३०. नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेणे.. . . . . . . . ४५


प्रकरण सात

**कराचे बीजक, जमापत्र व नावेपत्र**


३१. कराचे बीजक. . . . . . . . . . . ४५
३२. अनधिकृतरीत्या कर गोळा करण्यास प्रतिबंध. . . . . . . ४८
३३. कराचे बीजक आणि इतर कागदपत्रे यांमध्ये कराची रक्कम दर्शवणे. . . . . ४८
३४. जमापत्र आणि नावेपत्र. . . . . . . . . ४८


प्रकरण आठ

**विवरणे**


३५. लेखे व इतर अभिलेख. . . . . . . . . ४९
३६. लेखे जतन करून ठेवण्याचा कालावधी. . . . . . . ५०

**कलमे.** **पृष्ठे**

प्रकरण नऊ

**विवरणे**

| | | |
|---|---|---|
| ३७. | जावक पुरवठ्याचा तपशील दाखल करणे . . . . . . | ५० |
| ३८. | आवक पुरवठ्याचा तपशील दाखल करणे . . . . . . | ५१ |
| ३९. | विवरणे दाखल करणे. . . . . . . . . . | ५३ |
| ४०. | पहिले विवरण . . . . . . . . . . | ५४ |
| ४१. | निविष्टी कराच्या जमा रकमेचा दावा करणे आणि त्याचा तात्पुरता स्वीकार करणे . . | ५४ |
| ४२. | निविष्टी कराच्या जमा रकमेचा दावा ताडून पाहणे, ती प्रत्यावर्तित करणे आणि तिची पुनर्मागणी करणे | ५५ |
| ४३. | उद्दिष्टी कर दायित्वातून कपातीचा मेळ बसविणे, ती प्रत्यावर्तित करणे आणि तिची पुनर्मागणी करणे | ५६ |
| ४४. | वार्षिक विवरण . . . . . . . . . . | ५८ |
| ४५. | अंतिम विवरण . . . . . . . . . . | ५८ |
| ४६. | विवरण कसूरदार व्यक्तींना नोटीस . . . . . . . . | ५८ |
| ४७. | विलंब फी आकारणे. . . . . . . . . . | ५८ |
| ४८. | वस्तू व सेवा कर व्यवसायी . . . . . . . . | ५९ |

प्रकरण दहा

**कराचे प्रदान**

| | | |
|---|---|---|
| ४९. | कर, व्याज, शास्ती व इतर रकमा यांचे प्रदान. . . . . . | ५९ |
| ५०. | कराच्या विलंबित प्रदानावरील व्याज. . . . . . . . | ६१ |
| ५१. | मूळ स्त्रोतातून कराची वजात. . . . . . . . . | ६२ |
| ५२. | मूळ स्त्रोतातून कर गोळा करणे. . . . . . . . . | ६३ |
| ५३. | निविष्टी कराच्या जमा रकमेचे हस्तांतरण . . . . . . | ६६ |

प्रकरण अकरा

**परतावा**

| | | |
|---|---|---|
| ५४. | कराचा परतावा. . . . . . . . . . . . | ६६ |
| ५५. | विवक्षित प्रकरणातील परतावा. . . . . . . . . | ७१ |
| ५६. | विलंबाने केलेल्या परताव्यांवर व्याज. . . . . . . . | ७१ |
| ५७. | ग्राहक कल्याण निधी. . . . . . . . . . | ७२ |
| ५८. | निधीचा विनियोग . . . . . . . . . . | ७२ |

**कलमे.** **पृष्ठे**

प्रकरण बारा

## निर्धारण


| | | |
|---|---|---|
| ५९. | स्वयंनिर्धारण .. .. .. .. .. | ७२ |
| ६०. | तात्पुरते निर्धारण. .. .. .. .. .. | ७२ |
| ६१. | विवरणांची छाननी. .. .. .. .. | ७३ |
| ६२. | विवरण दाखल न करणाऱ्या व्यक्तींचे निर्धारण. .. .. .. | ७४ |
| ६३. | नोंदणी न केलेल्या व्यक्तींचे निर्धारण. .. .. .. | ७४ |
| ६४. | विवक्षित विशेष प्रकरणांत विनासोपस्कार निर्धारण करणे. .. .. | ७४ |


प्रकरण तेरा

## लेखापरीक्षा


| | | |
|---|---|---|
| ६५. | कर प्राधिकाऱ्यांनी लेखापरीक्षा करणे.. . .. .. .. | ७५ |
| ६६. | विशेष लेखापरीक्षा. .. .. .. .. | ७६ |


प्रकरण चौदा

## तपासणी, झडती, जप्ती व अटक.


| | | |
|---|---|---|
| ६७. | तपासणी, झडती व जप्तीचे अधिकार.. . .. .. .. | ७७ |
| ६८. | वाहतुकीतील वस्तूंची तपासणी. .. .. .. .. | ८० |
| ६९. | अटक करण्याचा अधिकार. .. .. .. .. | ८० |
| ७०. | पुरावा देण्यासाठी व दस्तऐवज सादर करण्यासाठी व्यक्तींना समन्स पाठविण्याचा अधिकार. .. | ८० |
| ७१. | धंद्याच्या जागेत प्रवेश करणे. .. .. .. .. | ८१ |
| ७२. | समुचित अधिकाऱ्यांना सहाय्य करणारे अधिकारी. .. .. .. | ८१ |


प्रकरण पंधरा

## मागणी आणि वसुली


| | | |
|---|---|---|
| ७३. | लबाडी करणे किंवा हेतुपुरस्सर कोणतेही असत्य कथन करणे किंवा वस्तुस्थिती दडपणे या कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव न भरलेल्या किंवा कमी भरलेल्या किंवा चुकीने परतावा दिलेल्या किंवा चुकीने घेतलेल्या किंवा वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचे निश्चितीकरण. .. .. .. | ८२ |
| ७४. | लबाडी करून किंवा हेतुपुरस्सर कोणतेही असत्य कथन करून किंवा वस्तुस्थिती दडपून त्याद्वारे न भरलेल्या किंवा कमी भरलेल्या किंवा चुकीने परतावा दिलेल्या किंवा चुकीने घेतलेल्या किंवा वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचे निश्चितीकरण. .. .. | ८३ |
| ७५. | कर निश्चितीकरणाच्या सर्वसाधारण तरतुदी. .. .. .. | ८५ |
| ७६. | गोळा केलेला परंतु शासनाकडे भरणा न केलेला कर. .. .. .. | ८७ |

| **कलमे** | | **पृष्ठे** |
|---|---|---|
| ७७. | दोषपूर्ण रीतीने वसूल केलेला आणि केंद्र सरकारला किंवा राज्य शासनाला प्रदान केलेला कर. | ८८ |
| ७८. | वसुलीची कार्यवाही सुरू करणे. .. .. .. .. | ८८ |
| ७९. | कराची वसुली. .. .. .. .. .. | ८९ |
| ८०. | हप्त्यांमध्ये कराचा व इतर रकमेचा भरणा करणे. .. .. .. | ९१ |
| ८१. | विवक्षित प्रकरणी संपत्तीचे हस्तांतरण निरर्थक ठरणे. .. .. .. | ९२ |
| ८२. | मालमत्तेवर कराचा प्रथम भार असणे.. . .. .. .. | ९२ |
| ८३. | विवक्षित प्रकरणी महसुलाचे रक्षण करण्यासाठी तात्पुरती जप्ती आणणे .. .. | ९२ |
| ८४. | विवक्षित वसुलीची कार्यवाही चालू ठेवणे व ती विधिग्राह्य असणे. .. .. | ९२ |


प्रकरण सोळा

**विवक्षित प्रकरणातील भरणा करण्याचे दायित्व.**


| | | |
|---|---|---|
| ८५. | धंद्याचे हस्तांतरण करण्याच्या बाबतीतील दायित्व. .. .. .. | ९३ |
| ८६. | अभिकर्ता व प्रकर्ता यांचे दायित्व. .. .. .. | ९४ |
| ८७. | कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या किंवा विलीनीकरणाच्या बाबतीतील दायित्व. .. .. | ९४ |
| ८८. | कंपन्यांच्या परिसमापनाच्या बाबतीतील दायित्व. .. .. .. | ९४ |
| ८९. | खाजगी कंपनीच्या संचालकांचे दायित्व. .. .. .. | ९५ |
| ९०. | कर भरणा करण्याचे भागीदारी संस्थेच्या भागीदारांचे दायित्व. .. .. | ९५ |
| ९१. | पालक, विश्‍वस्त इत्यादींचे दायित्व. .. .. .. .. | ९६ |
| ९२. | पाल्याधिकरण इत्यादींचे दायित्व. .. .. .. .. | ९६ |
| ९३. | विवक्षित प्रकरणात कर, व्याज किंवा शास्ती भरणा करण्याच्या दायित्वासंबंधी विशेष तरतुदी.. . | ९६ |
| ९४. | इतर प्रकरणातील दायित्व. .. .. .. .. | ९८ |


प्रकरण सतरा

**आगाऊ अधिनिर्णय देणे.**


| | | |
|---|---|---|
| ९५. | व्याख्या. .. .. .. .. .. | ९९ |
| ९६. | आगाऊ अधिनिर्णय देण्यासाठी प्राधिकरण घटित करणे.. . .. .. | ९९ |
| ९७. | आगाऊ अधिनिर्णयासाठी अर्ज. .. .. .. .. | ९९ |
| ९८. | अर्ज प्राप्त झाल्यानंतरची कार्यपद्धती. .. .. .. .. | १०० |
| ९९. | आगाऊ अधिनिर्णय देण्यासाठी अपील प्राधिकरण घटित करणे. .. .. | १०१ |
| १००. | अपील प्राधिकरणाकडे अपील करणे.. . .. .. .. | १०१ |
| १०१. | अपील प्राधिकरणाचे आदेश. .. .. .. .. | १०२ |
| १०२. | आगाऊ अधिनिर्णयाची दुरूस्ती. .. .. .. .. | १०२ |
| १०३. | आगाऊ अधिनिर्णयाची प्रयोज्यता. .. .. .. .. | १०२ |

| कलमे. | | पृष्ठे |
|---|---|---|
| १०४. | विवक्षित परिस्थितीमध्ये आगाऊ अधिनिर्णय निरर्थक ठरणे. . . . . | १०३ |
| १०५. | प्राधिकरण आणि अपील प्राधिकरण यांचे अधिकार. . . . . . . | १०३ |
| १०६. | प्राधिकरण व अपील प्राधिकरण यांची कार्यपध्दती. . . . . . . | १०४ |

प्रकरण अठरा

**अपिले आणि पुनरीक्षण.**

| | | |
|---|---|---|
| १०७. | अपील प्राधिकाऱ्याकडे अपिले करणे. . . . . . . | १०४ |
| १०८. | पुनरीक्षण प्राधिकाऱ्याचे अधिकार. . . . . . . . . | १०६ |
| १०९. | अपील न्यायाधिकरण आणि त्याची न्यायपीठे. . . . . . . . | १०८ |
| ११०. | अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाची आणि सदस्यांची अर्हता, नेमणूक, त्यांच्या सेवेच्या शर्ती, इत्यादी. | १०८ |
| १११. | अपील न्यायाधिकरणापुढील कार्यपद्धती. . . . . . . . | १०८ |
| ११२. | अपील न्यायाधिकरणाकडे अपील करणे. . . . . | ११० |
| ११३. | अपील न्यायाधिकरणाचे आदेश. | १११ |
| ११४. | राज्य अध्यक्षाचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार. . . . . . . | ११३ |
| ११५. | अपील दाखल करण्यासाठी भरलेल्या रकमेच्या परताव्याच्या रकमे वरील व्याज . | ११३ |
| ११६. | प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत हजर राहणे. . . | ११३ |
| ११७. | उच्च न्यायालयाकडे अपील करणे. . . . . . . | ११५ |
| ११८. | सर्वोच्च न्यायालयात अपील करणे. . . . . . . . . | ११६ |
| ११९. | अपील, इत्यादी दाखल केलेले असले तरी, चुकत्या करावयाच्या करमा देय असणे. . . | ११७ |
| १२०. | विविक्षित प्रकरणात अपील दाखल न करणे. . . . . . . | ११७ |
| १२१. | अपील न करण्यायोग्य निर्णय आणि आदेश. . . . . . . | ११८ |

प्रकरण एकोणीस

**अपराध आणि शास्ती.**

| | | |
|---|---|---|
| १२२. | विवक्षित अपराधांबद्दलची शास्ती. . . . . . . . . | ११८ |
| १२३. | माहिती विवरण दाखल करण्यात कसूर केल्यास, शास्ती. . . . . | १२१ |
| १२४. | आकडेवारी सादर करण्यात कसूर केल्याबद्दल दंड . . . . . . . | १२२ |
| १२५. | सर्वसाधारण शास्ती. . . . . . . . . | १२२ |
| १२६. | शास्तीशी संबंधित सर्वसाधारण अनुशासन . . . . . . . | १२२ |
| १२७. | विविक्षित प्रकरणांमध्ये शास्ती लादण्याचा अधिकार. . . . . . . | १२३ |
| १२८. | शास्ती किंवा फी किंवा दोन्हींचा अधित्याग करण्याचा अधिकार. . . . . | १२३ |
| १२९. | मार्गस्थ वस्तू व वाहने अटकाव करणे, ती जप्त करणे व सोडून देणे. . . . . | १२३ |
| १३०. | वस्तू किंवा वाहन सरकारजमा करणे आणि शास्ती लादणे. . . . . | १२५ |
| १३१. | सरकारजमा करणे किंवा शास्ती लादणे हे अन्य शिक्षांच्या आड न येणे. . . . . | १२६ |

**कलमे.** **पृष्ठे**


१३२. विवक्षित अपराधांसाठी शिक्षा. . . . . . . . . १२६

१३३. अधिकारी व विवक्षित इतर व्यक्तींचे दायित्व. . . . . . . १२९

१३४. अपराधांची दखल घेणे. . . . . . . . . १२९

१३५. सदोष मानसिक स्थिती गृहितक. . . . . . . . . १२९

१३६. विवक्षित परिस्थितींमधील तथ्यांची संबद्धीता. . . . . . . १३०

१३७. कंपन्यांनी केलेले अपराध. . . . . . . . . १३०

१३८. अपराध आपसात मिटवणे. . . . . . . . . १३१


प्रकरण वीस

**संक्रमणकालीन तरतुदी.**


१३९. विद्यमान करदात्यांचे स्थलांतर. . . . . . . . . १३२

१४०. निविष्टी कराच्या जमा रकमेकरीता संक्रमणकालीन व्यवस्था. . . . . १३३

१४१. उक्ते कामाशी (जॉब वर्क) संबंधित संक्रमणकालीन तरतुदी. . . . . १३६

. .

१४२. संकीर्ण संक्रमणकालीन तरतुदी. . . . . . . . . १३८


प्रकरण एकवीस

**संकीर्ण तरतुदी.**


१४३. उक्त्या कामाची कार्यपद्धती. . . . . . . . . १४३

१४४. विवक्षित प्रकरणातील दस्तऐवजासंबंधी गृहीतके. . . . . . . १४५

१४५. दस्तऐवज म्हणून आणि पुरावा म्हणून दस्तऐवजांचे सुक्ष्मपट, प्रतिरूप प्रती व संगणकीय मुद्रित प्रती यांची स्वीकार्यता. . . . . . . . . १४५

१४६. सामाईक पोर्टल . . . . . . . . . . १४६

१४७. मानीव निर्यात . . . . . . . . . . १४६

१४८. विवक्षित प्रक्रियांसाठी विशेष कार्यपध्दती.. . . . . . . . १४६

१४९. वस्तू व सेवा कर अनुपालन श्रेणी. . . . . . . . . १४७

१५०. माहिती विवरणपत्र सादर करणे बंधनकारक असणे. . . . . . . १४७

१५१. आकडेवारी गोळा करण्याचा अधिकार. . . . . . . १४९

१५२. माहिती उघड करण्यास रोध. . . . . . . . . १४९

१५३ . तज्ज्ञांकडून साहाय्य घेणे. . . . . . . . . १४९

**कलमे.** **पृष्ठे**


| | | |
|---|---|---|
| १५४. | नमुने घेण्याचा अधिकार .. .. .. .. | १४९ |
| १५५. | शाबितीची भार. .. .. .. .. .. | १४९ |
| १५६. | व्यक्ती या लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. .. .. .. | १५० |
| १५७. | या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीस संरक्षण. .. .. | १५० |
| १५८. | लोकसेवकाने माहिती उघड करणे. .. .. .. .. | १५० |
| १५९. | विवक्षित प्रकरणांत, व्यक्तींच्या संबंधातील माहिती प्रसिध्द करणे. .. .. | १५२ |
| १६०. | निर्धारणांची कार्यवाही, इत्यादी विवक्षित कारणांमुळे विधिअग्राहय न ठरणे. .. | १५२ |
| १६१. | अभिलेखावरून उघड होणाऱ्या चुका दुरूस्त करणे. .. .. .. | १५३ |
| १६२. | दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेस रोध. .. .. .. | १५३ |
| १६३. | फी आकारणे. .. .. .. .. .. | १५४ |
| १६४. | नियम करण्याचा शासनाचा अधिकार. .. .. .. | १५४ |
| १६५. | विनियम करण्याचा अधिकार. .. .. .. .. | १५४ |
| १६६. | नियम, विनियम व अधिसूचना मांडणे. .. .. .. | १५४ |
| १६७. | अधिकारांचे प्रत्यायोजन. .. .. .. .. | १५५ |
| १६८. | सूचना व निदेश देण्याचा अधिकार. .. .. .. .. | १५५ |
| १६९. | विवक्षित परिस्थितीत नोटीस बजावणे. .. .. .. | १५५ |
| १७०. | कर, इत्यादी रक्कम पूर्णांकात करणे. .. .. .. .. | १५६ |
| १७१. | नफेखोरीविरोधी उपाय. .. .. .. .. | १५६ |
| १७२. | अडचणी दूर करणे. .. .. .. .. | १५७ |
| १७३. | निरसन. .. .. .. .. .. | १५७ |
| १७४. | व्यावृत्ती .. .. .. .. .. | १५७ |

**पहिली अनुसूची.**

**दुसरी अनुसूची.**

**तिसरी अनुसूची.**

## सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

## [महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७]

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **" महाराष्ट्र शासन राजपत्रात "** दिनांक १५ जून २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यात वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या राज्यांतर्गत होणाऱ्या पुरवठ्यावर कर आकारणे व त्याचे संकलन करणे यांकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या राज्यांतर्गत होणाऱ्या पुरवठ्यावर कर आकारणे व त्याचे संकलन करणे यांकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरता तरतुदी करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

### प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल :

परंतु, या अधिनियमाच्या निरनिराळ्या तरतुदींसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील आणि अशा कोणत्याही तरतुदींमधील या अधिनियमाच्या प्रारंभाबाबतच्या कोणत्याही निर्देशाचा अन्वयार्थ, ती तरतूद अंमलात आल्याचा निर्देश आहे, असा लावण्यात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

१८८२ चा ४. (१) " कारवाईयोग्य मागणीहक्क " यास, संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ याच्या कलम ३ मध्ये त्यास जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल ;

(२) " पोचवणीचा पत्ता " याचा अर्थ, अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही देण्यासाठी नोंदणीकृत व्यक्तीने निर्गमित केलेल्या कर बीजकावर दर्शविलेला, अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही घेणाऱ्या प्राप्तकर्त्याचा पत्ता, असा आहे ;

(३) " अभिलेखावरील पत्ता " याचा अर्थ, पुरवठादाराच्या अभिलेखांमध्ये उपलब्ध असेल असा, प्राप्तकर्त्याचा पत्ता, असा आहे ;

(४) " अभिनिर्णय प्राधिकारी " याचा अर्थ, या अधिनियमान्वये कोणताही आदेश किंवा निर्णय देण्यास नियुक्त किंवा प्राधिकृत केलेला कोणताही प्राधिकारी, असा आहे. परंतु, त्यात आयुक्त, पुनरीक्षण प्राधिकारी, आगाऊ अधिनिर्णय प्राधिकारी, आगाऊ अधिनिर्णय अपील प्राधिकारी, अपील प्राधिकारी व अपील न्यायाधिकरण यांचा समावेश असणार नाही ;

(५) " अभिकर्ता " याचा अर्थ, जो दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही पुरवण्याचा किंवा त्या प्राप्त करण्याचा धंदा करतो असा, अडत्या, दलाल, अडत अभिकर्ता, अडतीया, आश्वासक अभिकर्ता, लिलावकर्ता किंवा इतर कोणताही वाणिज्य अभिकर्ता,—मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो—अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(६) " एकूण उलाढाल " याचा अर्थ, केंद्रीय कर, राज्य कर आणि संघ राज्यक्षेत्र कर, एकात्मिक कर व उपकर वगळून एकच स्थायी खाते क्रमांक (पॅन) असलेल्या व्यक्तीच्या अखिल भारतीय स्तरावर परिगणना करावयाच्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या संपूर्ण करपात्र पुरवठ्यांचे (प्रत्यावर्ती आकार भरण्याच्या आधारे ज्या आवक पुरवठ्यावर एखाद्या व्यक्तीकडून कर देय असेल त्या आवक पुरवठ्याचे मूल्य वगळून) करमाफ पुरवठ्यांचे, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींची निर्यात आणि आंतरराज्य पुरवठ्यांचे एकूण मूल्य, असा आहे ;

(७) " शेतकरी " याचा अर्थ, जी व्यक्ती,—

(क) स्वतः अंगमेहनत करून, किंवा,

(ख) कुटुंबातील व्यक्तीकरवी अंगमेहनत करवून, किंवा,

(ग) तिच्या स्वतःच्या किंवा कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली रोखीने किंवा वस्तूच्या रूपात देय असलेल्या मजुरीवर नोकर ठेवून किंवा भाड्याने मजूर लावून,

जमीन कसते, अशी एखादी व्यक्ती किंवा हिंदू अविभक्त कुटुंब, असा आहे ;

(८) " अपील प्राधिकारी " याचा अर्थ, अपिलांची सुनावणी करण्यासाठी नियुक्त किंवा प्राधिकृत केलेला आणि कलम १०७ मध्ये निर्दिष्ट केलेला प्राधिकारी, असा आहे ;

(९) " अपील न्यायाधिकरण " याचा अर्थ, कलम १०९ अन्वये निर्दिष्ट केलेले वस्तू व सेवा कर अपील न्यायाधिकरण, असा आहे ;

(१०) " नियत दिवस " याचा अर्थ, ज्या दिनांकास या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात येतील तो दिनांक, असा आहे ;

(११) “ निर्धारण ” याचा अर्थ, या अधिनियमान्वये कर दायित्वाचे निर्धारण, असा आहे आणि त्यामध्ये स्वयं-निर्धारण, पुनर्निर्धारण, तात्पुरते निर्धारण, संक्षिप्त निर्धारण आणि सर्वोत्तम निर्णय शक्तीनुसार निर्धारण यांचा समावेश होतो ;

१९६१ चा ४३. (१२) “ सहयोगी उपक्रम ” यास, आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम ९२क मध्ये त्यास जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल ;

(१३) “ लेखापरीक्षा ” याचा अर्थ, घोषित केलेल्या उलाढालीची अचूकता, भरलेला कर, मागणी केलेला परतावा आणि घेतलेली निविष्टी कराची जमा रक्कम यांची पडताळणी करण्यासाठी आणि या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे अनुपालन निर्धारित करण्यासाठी, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये, नोंदणीकृत व्यक्तीने ठेवलेले किंवा सादर केलेले अभिलेख, विवरणे व इतर दस्तऐवज यांची तपासणी, असा आहे ;

(१४) “ प्राधिकृत बँक ” याचा अर्थ, या अधिनियमान्वये देय असलेला कर किंवा इतर कोणतीही रक्कम गोळा करण्यासाठी, केंद्र सरकारने प्राधिकृत केलेली एखादी बँक किंवा बँकेची शाखा, असा आहे ;

(१५) “ प्राधिकृत प्रतिनिधी ” याचा अर्थ, कलम ११६ अन्वये निर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रतिनिधी, असा आहे ;

१९६३ चा ५४. (१६) “ मंडळ ” याचा अर्थ, केंद्रीय महसूल मंडळे अधिनियम, १९६३ अन्वये घटित केलेले केंद्रीय उत्पादनशुल्क व सीमाशुल्क मंडळ, असा आहे ;

(१७) “ धंदा ” यामध्ये,—

(क) कोणताही व्यापार, वाणिज्य, निर्मितीकार्य, व्यवसाय, उदीम, साहसी उद्यम, पणव्यवहार (वेजर) किंवा इतर कोणताही तत्सम व्यवहार- मग तो आर्थिक लाभासाठी असो किंवा नसो-;

(ख) उपखंड (क) च्या संबंधात किंवा तदनुषंगिक किंवा सहाय्यभूत कोणताही व्यवहार किंवा संव्यवहार ;

(ग) उपखंड (क) च्या स्वरूपातील कोणतेही व्यवहार किंवा संव्यवहार,—मग अशा संव्यवहाराचे आकारमान, वारंवारता, सातत्य किंवा त्यात नियमितता असो किंवा नसो ;

(घ) धंद्याचा प्रारंभ किंवा समाप्ती यासंबंधात भांडवली वस्तू व सेवा यांसह वस्तूंचा पुरवठा किंवा त्यांचे संपादन ;

(ङ) क्लब, संघ, सोसायटी किंवा अशी कोणतीही संस्था याद्वारे तिच्या सदस्यांच्या सोयीकरिता किंवा लाभांकरिता (अभिदान किंवा इतर कोणताही मोबदला याकरिता) तरतूद ;

(च) कोणत्याही जागेत मोबदला घेऊन, व्यक्तींना देण्यात येणारा प्रवेश; आणि

(छ) एखाद्या व्यक्तीने जे कोणतेही पद आपल्या व्यापाराच्या, व्यवसायाच्या किंवा उदीमाच्या ओघात किंवा त्यांच्या अभिवृद्धीसाठी ग्रहण केलेले असेल अशा कोणत्याही पदाची धारक म्हणून तिने पुरविलेल्या सेवा ;

(ज) एखाद्या रेस क्लबमध्ये पणगणकाच्या किंवा लायसनदार बुकीच्या माध्यमातून अशा क्लबने पुरविलेल्या सेवा; आणि

(झ) ज्यात केंद्र सरकार, राज्य शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण सार्वजनिक प्राधिकरणे म्हणून काम करीत असतील त्यावेळी त्यांनी केलेला कोणताही व्यवहार किंवा संव्यवहार, यांचा समावेश होतो ;

(१८) " धंद्याचा भिन्नस्तरीय विभाग (बिझनेस व्हर्टिकल) " याचा अर्थ, जो कोणताही उपक्रम, धंद्याच्या इतर भिन्नस्तरीय विभागांमधील जोखिमांपेक्षा आणि प्राप्तींपेक्षा भिन्न अशा, जोखिमांना आणि प्राप्तींना अधीन राहून, वस्तूंचा किंवा सेवांचा स्वतंत्र पुरवठा करीत असेल किंवा गट स्वरूपातील अशा संबंधित वस्तूंचा किंवा सेवांचा पुरवठा करीत असेल, अशा कोणत्याही उपक्रमाचा एक स्वतंत्र घटकभाग, असा आहे ;

**स्पष्टीकरण :** या खंडाच्या प्रयोजनार्थ, जेथे वस्तू किंवा सेवा संबंधित असतील तेथे त्यांचे निश्चितीकरण करताना पुढील घटक विचारात घ्यावेत :—

(क) वस्तू किंवा सेवा यांचे स्वरूप ;

(ख) उत्पादन प्रक्रियांचे स्वरूप ;

(ग) वस्तू किंवा सेवा यांकरिता ग्राहकांचे प्रकार किंवा वर्ग ;

(घ) वस्तू वितरित करण्यासाठी किंवा सेवा पुरविण्यासाठी वापरलेल्या पद्धती ; आणि

(ङ) (लागू असल्यास) नियामक विषयक स्थितीचे स्वरूप, उदाहरणार्थ, बँक व्यवसाय, विमा किंवा सार्वजनिक सोयीसुविधा ;

(१९) " भांडवली वस्तू " याचा अर्थ, निविष्टी कराच्या जमा रकमेचा दावा करणाऱ्या व्यक्तीच्या लेखा पुस्तकांमध्ये ज्या वस्तूंचे मूल्य भांडवलाच्या रूपात परिगणित केले जाते आणि धंद्याच्या ओघात किंवा त्याच्या अभिवृद्धीसाठी ज्यांचा वापर केला जातो किंवा ज्याचा वापर करण्याचे उद्देशित केले जाते, असे मूल्य असलेल्या वस्तू, असा आहे ;

(२०) " नैमित्तिक करपात्र व्यक्ती " याचा अर्थ, जी कोणतीही व्यक्ती, जेथे तिच्या धंद्याचे कोणतेही निश्चित ठिकाण नाही अशा करपात्र प्रदेशामध्ये, प्रकर्ता, अभिकर्ता म्हणून असो किंवा इतर कोणत्याही नात्याने असो, धंद्याच्या ओघात किंवा त्याच्या अभिवृद्धीसाठी वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीच्या पुरवठ्याचा अंतर्भाव असणारा संव्यवहार अधूनमधून करते अशी व्यक्ती, असा आहे ;

(२१) “ केंद्रीय कर ” याचा अर्थ, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ९ अन्वये आकारलेला केंद्रीय वस्तू व सेवा कर, असा आहे ;

(२२) “ उपकर ” यास, वस्तू व सेवा कर (राज्यांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम यात त्यास जो अर्थ नेमून दिला असेल, तोच अर्थ असेल ;

१९४९ चा ३८. (२३) “ सनदी लेखापाल ” याचा अर्थ, सनदी लेखापाल अधिनियम, १९४९ याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सनदी लेखापाल, असा आहे ;

(२४) “ आयुक्त ” याचा अर्थ, कलम ३ अन्वये नियुक्त केलेला राज्य कर आयुक्त, असा आहे आणि त्यामध्ये कलम ३ अन्वये नियुक्त केलेला राज्य कर प्रधान आयुक्त किंवा मुख्य आयुक्त, यांचा समावेश होतो ;

(२५) “ मंडळ आयुक्त ” याचा अर्थ, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम १६८ मध्ये निर्दिष्ट केलेला आयुक्त, असा आहे ;

(२६) “ सामाईक पोर्टल ” याचा अर्थ, कलम १४६ मध्ये निर्दिष्ट केलेले सामाईक वस्तू व सेवा कर इलेक्ट्रॉनिक पोर्टल, असा आहे ;

(२७) “ सर्वसाधारण कामकाजाचे दिवस ” याचा अर्थ, केंद्र सरकारने किंवा **महाराष्ट्र शासनाने राजपत्रातील** सरकारी सुट्ट्या म्हणून जे घोषित केलेले नाहीत असे, सलग दिवस, असा आहे ;

१९८० चा ५६. (२८) “ कंपनी सचिव ” याचा अर्थ, कंपनी सचिव अधिनियम, १९८० याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कंपनी सचिव, असा आहे ;

(२९) “ सक्षम प्राधिकारी ” याचा अर्थ, शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल असा प्राधिकारी, असा आहे ;

(३०) “ संयुक्त पुरवठा ” याचा अर्थ, धंद्याच्या सामान्य ओघात ज्या वस्तू किंवा सेवा स्वाभाविकपणे पूरक असतील आणि ज्या एकमेकांबरोबर पुरविलेल्या असतील, ज्यापैकी एक मुख्य पुरवठा असेल, अशा दोन किंवा अधिक करपात्र वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा किंवा त्यांचा कोणत्याही संयुक्त स्वरूपात, एखाद्या करपात्र व्यक्तीकडून कोणत्याही प्राप्तकर्त्याला केला जाणारा पुरवठा, असा आहे ;

**उदाहरण**

जेथे वस्तू आवेष्टित करून व त्यांचा विमा काढून त्यांची वाहतूक केली जाते तेथे वस्तूंचा पुरवठा, आवेष्टनांचे साहित्य, वाहतूक व विमा हा संयुक्त पुरवठा ठरतो व वस्तूंचा पुरवठा हा मुख्य पुरवठा ठरतो ;

(३१) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याच्या संबंधात “ मोबदला ” यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो,—

(क) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्याच्या संबंधात, त्यास प्रतिसाद म्हणून किंवा त्याचे प्रलोभन म्हणून–मग ते प्राप्तकर्त्याकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून असो, केलेले किंवा करावयाचे कोणतेही प्रदान–मग ते पैशाच्या रूपात किंवा अन्य रूपात असो ; परंतु त्यात केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही अर्थसहाय्याचा समावेश होणार नाही ;

(ख) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्याच्या संबंधात, त्यास प्रतिसाद म्हणून किंवा त्याचे प्रलोभन म्हणून–मग ते प्राप्तकर्त्याकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून असो- कोणतीही कृती करण्यासाठी किंवा कृती न करण्यासाठी दिले जाणारे द्रव्यविषयक मूल्य परंतु, त्यात केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही अर्थसहाय्याचा समावेश होणार नाही :

परंतु, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्याच्या संबंधात दिलेली ठेव,–जर पुरवठादाराने अशा पुरवठ्याचा मोबदला म्हणून समायोजित केली नसेल तर,–अशा ठेवीस, अशा पुरवठ्याबद्दल केलेले प्रदान समजण्यात येणार नाही ;

(३२) " वस्तूंचा अखंड पुरवठा " याचा अर्थ, एखाद्या संविदेअन्वये ज्या वस्तू अखंडपणे किंवा आवर्ती तत्त्वावर पुरविल्या जातात किंवा पुरविण्याचे मान्य केले जाते आणि ज्याबाबत पुरवठादाराकडून नियमित किंवा नियतकालिक तत्त्वावर प्राप्तकर्त्याला बीजके दिली जातात, अशा वस्तूंचा पुरवठा—मग तो तारमार्ग, केबल, नळमार्ग किंवा इतर प्रणालीमार्फत केलेला असो वा नसो—असा आहे आणि त्यामध्ये शासन, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शर्तींना अधीन राहून केल्या जाणऱ्या अशा वस्तूंच्या पुरवठ्याचा समावेश होतो ;

(३३) " सेवांचा अखंड पुरवठा " याचा अर्थ, एखाद्या संविदेअन्वये नियतकालिक प्रदान करण्याच्या दायित्वासह तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीकरिता ज्या सेवा अखंडपणे किंवा आवर्ती तत्त्वावर पुरविल्या जातात किंवा पुरविण्याचे मान्य केले जाते अशा सेवांचा पुरवठा, असा आहे, आणि त्यामध्ये शासन अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा शर्तींना अधीन राहून, पुरविल्या जाणाऱ्या अशा सेवांच्या पुरवठ्याचा समावेश होतो ;

(३४) " वाहन " यामध्ये जहाज, विमान आणि वाहन, यांचा समावेश होतो ;

(३५) " परिव्यय लेखापाल " याचा अर्थ, परिव्यय व कार्य लेखापाल अधिनियम, १९५९ याच्या अर्थांतर्गत असलेला परिव्यय लेखापाल, असा आहे ; १९५९ चा २३.

(३६) " परिषद " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २७९क अन्वये स्थापन केलेली वस्तू व सेवा कर परिषद, असा आहे ;

(३७) " जमापत्र " याचा अर्थ, कलम ३४ च्या पोट-कलम (१) अन्वये नोंदणीकृत व्यक्तीने दिलेला दस्तऐवज, असा आहे ;

(३८) " नावेपत्र " याचा अर्थ, कलम ३४ च्या पोट-कलम (३) अन्वये एखाद्या नोंदणीकृत व्यक्तीने दिलेला दस्तऐवज, असा आहे ;

(३९) “ मानीव निर्यात ” याचा अर्थ, कलम १४७ अन्वये अधिसूचित करण्यात येतील अशा वस्तूंचा पुरवठा, असा आहे ;

(४०) “ पदनिर्देशित प्राधिकारी ” याचा अर्थ, आयुक्ताने अधिसूचित केला असेल असा प्राधिकारी, असा आहे ;

(४१) “ दस्तऐवज ” यामध्ये, कोणत्याही स्वरूपाचा लेखी किंवा मुद्रित अभिलेख
२००० चा २१. आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० याच्या कलम २ च्या खंड (न) यामध्ये व्याख्या केलेला कोणताही इलेक्ट्रॉनिक अभिलेख यांचा समावेश होतो ;

(४२) भारतात तयार केलेल्या व भारतातून निर्यात केलेल्या कोणत्याही वस्तूंच्या संबंधात “ करप्रतिग्रह (ड्रॉबॅक) याचा अर्थ, अशा वस्तू तयार करताना वापरलेल्या कोणत्याही आयात निविष्टींवर किंवा कोणत्याही देशांतर्गत निविष्टींवर किंवा निविष्टी सेवांवर आकारणीयोग्य असलेले शुल्क, कर व उपकर याबाबतचा वटाव, असा आहे ;

(४३) “ इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवही ” याचा अर्थ, कलम ४९ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवही, असा आहे ;

(४४) “ इलेक्ट्रॉनिक व्यापार ” याचा अर्थ, डिजिटल वस्तूंसह डिजिटल किंवा इलेक्ट्रॉनिक नेटवर्कने वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा, असा आहे ;

(४५) “ इलेक्ट्रॉनिक व्यापार प्रचालक ” याचा अर्थ, इलेक्ट्रॉनिक व्यापाराकरिता डिजिटल किंवा इलेक्ट्रॉनिक सुविधा किंवा व्यासपीठ जिच्या मालकीचे आहे, जी त्याचा वापर करते किंवा त्याचे व्यवस्थापन पाहते, अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(४६) “ इलेक्ट्रॉनिक जमा खातेवही ” याचा अर्थ, कलम ४९ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेली इलेक्ट्रॉनिक जमा खातेवही, असा आहे ;

(४७) “ करमाफ पुरवठा ” याचा अर्थ, ज्यास कराचा निरंक दर लागू होतो अशा किंवा ज्यास कलम ११ किंवा एकात्मिक वस्तू व सेवा कराच्या कलम ६ अन्वये करामधून सूट देण्यात येईल अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा, असा आहे आणि त्यामध्ये करपात्र नसलेल्या पुरवठ्याचा समावेश होतो ;

(४८) “ विद्यमान कायदा ” याचा अर्थ, कोणताही कायदा, अधिसूचना, आदेश, नियम किंवा विनियम करण्याचा अधिकार असलेल्या विधानमंडळाने किंवा कोणत्याही प्राधिकरणाने किंवा व्यक्तीने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी संमत केलेला किंवा केलेला, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींवर शुल्क किंवा कर आकारण्याच्या व गोळा करण्याच्या संबंधातील असा कोणताही कायदा, अधिसूचना, आदेश, नियम किंवा विनियम, असा आहे ;

(४९) " कुटुंब " याचा अर्थ,—

(एक) एखादी व्यक्ती, अशा व्यक्तीची, यथास्थिति, पत्नी किंवा पती आणि त्यांची मुले, आणि

(दोन) उक्त व्यक्तीवर जर कोणी संपूर्णतः किंवा मुख्यतः अवलंबून असतील असे तिचे आई–वडील, आजी-आजोबा, भाऊ व बहीण, असा आहे ;

(५०) " स्थिर आस्थापना " याचा अर्थ, सेवांचा पुरवठा करण्यासाठी, किंवा सेवा मिळविण्यासाठी आणि तिच्या स्वतःच्या गरजांकरिता सेवांचा वापर करण्यासाठी मानवी आणि तांत्रिक साधनसंपत्तीच्या अनुषंगाने पुरेशा प्रमाणात कायमस्वरूपी व सुयोग्य संरचना हे वैशिष्ट्य असलेली अशी (धंद्याच्या नोंदणीकृत ठिकाणाहून अन्य अशी) जागा, असा आहे ;

(५१) " निधी " याचा अर्थ, कलम ५७ अन्वये स्थापन करण्यात आलेला उपभोक्ता कल्याण निधी, असा आहे ;

(५२) " वस्तू " याचा अर्थ, पैसा आणि रोखे यांखेरीज प्रत्येक प्रकारची जंगम मालमत्ता, असा आहे आणि त्यामध्ये कारवाईयोग्य मागणीहक्क, ज्यांचा पुरवठा करण्यापूर्वी किंवा पुरवठा करण्याच्या संविदेअन्वये काढण्याबाबत संमती दिली असेल अशी वाढती पिके, गवत आणि भूमीशी संलग्न किंवा तिचा भाग असलेल्या वस्तू यांचा समावेश होतो ;

(५३) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(५४) " वस्तू व सेवा कर (राज्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत) अधिनियम " याचा अर्थ, वस्तू व सेवा कर (राज्यांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम, २०१७, असा आहे; २०१७ चा १५.

(५५) " वस्तू व सेवा कर व्यवसायी " याचा अर्थ, असा व्यवसायी म्हणून काम करण्यासाठी कलम ४८ अन्वये ज्या व्यक्तीस मान्यता देण्यात आली आहे, अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(५६) " भारत " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद १ मध्ये निर्दिष्ट केलेले भारताचे राज्यक्षेत्र, क्षेत्रीय जलधी, सागरमग्न खंडभूमि, अनन्यसाधारण आर्थिक क्षेत्र व इतर सागरी क्षेत्र अधिनियम, १९७६ यामध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे त्याचे क्षेत्रीय जलधी, १९७६ चा ८०. क्षेत्रीय जलधी याच्या आतील सागराखालील समुद्रतळी आणि अंतर्मृदा, सागरमग्न खंडभूमि, अनन्य आर्थिक परिक्षेत्र किंवा इतर कोणतेही सागरी क्षेत्र, आणि राज्यक्षेत्र व क्षेत्रीय जलधीवरील हवेचे अवकाश, असा आहे ;

२०१७ चा १३. (५७) " एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम " याचा अर्थ, एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७, असा आहे ;

(५८) " एकात्मिक कर " याचा अर्थ, एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये आकारलेला एकात्मिक वस्तू व सेवा कर, असा आहे ;

(५९) " निविष्टी (इनपुट) " याचा अर्थ, धंद्याच्या ओघात किंवा धंद्याच्या अभिवृद्धीसाठी एखाद्या पुरवठादाराने वापरलेल्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या भांडवली वस्तूंखेरीज इतर वस्तू, असा आहे ;

(६०) " निविष्टी सेवा (इनपुट सर्व्हिस) " याचा अर्थ, धंद्याच्या ओघात किंवा धंद्याच्या अभिवृद्धीसाठी एखाद्या पुरवठादाराने वापरलेल्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही सेवा, असा आहे ;

(६१) " निविष्टी सेवा वितरक (इनपुट सर्व्हिस डिस्ट्रीब्युटर) " याचा अर्थ, जेथे निविष्टी सेवा मिळाल्यासंबंधात कलम ३१ अन्वये कर बीजके स्वीकारली जातात आणि जेथे करपात्र वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठादाराला, उक्त सेवांवर भरलेल्या केंद्रीय कराची, राज्य कराची, एकात्मिक कराची किंवा संघ राज्यक्षेत्र कराची जमा रक्कम वितरित करण्याच्या प्रयोजनांसाठी एक विहित दस्तऐवज निर्गमित केला जातो असे, एकच स्थायी खाते क्रमांक असणाऱ्या, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराचे कार्यालय, असा आहे ;

(६२) एखाद्या नोंदणीकृत व्यक्तीच्या संबंधात " निविष्टी कर " याचा अर्थ, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या कोणत्याही पुरवठ्यावर आकारलेला केंद्रीय कर, राज्य कर, एकात्मिक कर किंवा संघ राज्यक्षेत्र कर ; असा आहे आणि त्यामध्ये पुढील करांचा समावेश होतो,—

(क) आयात वस्तूंवर आकारलेला एकात्मिक वस्तू व सेवा कर ;

(ख) कलम ९ ची पोट-कलमे (३) व (४) यांच्या तरतुदींन्वये देय असलेला कर ;

(ग) एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) आणि (४) च्या तरतुदींअन्वये देय असलेला कर ; किंवा

(घ) केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ९ ची पोट-कलमे (३) व (४) याच्या तरतुदींअन्वये देय असलेला कर,

परंतु त्यामध्ये आपसमेळ आकारणीखाली भरलेल्या कराचा समावेश होणार नाही ;

(६३) " निविष्टी कराची जमा रक्कम " याचा अर्थ, निविष्टी करांची जमा रक्कम, असा आहे ;

(६४) “ राज्यांतर्गत वस्तूंचा पुरवठा ” यास, एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ८ मध्ये त्यास जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल ;

(६५) “ राज्यांतर्गत सेवांचा पुरवठा ” यास एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ८ मध्ये त्यास जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल ;

(६६) “ बीजक ” किंवा “ कर बीजक ” याचा अर्थ, कलम ३१ मध्ये निर्दिष्ट केलेले कर बीजक, असा आहे ;

(६७) एखाद्या व्यक्तीच्या संबंधातील “ आवक पुरवठा ” याचा अर्थ, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींची होणारी प्राप्ती—मग ती खरेदी, संपादन याद्वारे किंवा इतर कोणत्याही माध्यमातून होवो आणि ती कोणत्याही मोबदल्यासाठी असो किंवा नसो— असा आहे ;

(६८) “ उक्ते काम (जॉब वर्क) ” याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने, दुसऱ्या नोंदणीकृत व्यक्तीच्या मालकीच्या वस्तूंचे संस्करण किंवा प्रक्रिया हाती घेणे, असा आहे आणि त्यानुसार “ उक्ते कामगार (जॉब वर्कर) ” या शब्दप्रयोगाचा अन्वयार्थ लावण्यात येईल ;

(६९) “ स्थानिक प्राधिकरण ” याचा अर्थ,—

(क) संविधानाच्या अनुच्छेद २४३ च्या खंड (घ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली “ पंचायत ”;

(ख) संविधानाच्या अनुच्छेद २४३ त च्या खंड (ङ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली “ नगरपालिका ” ;

(ग) केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही राज्य शासनाकडून, नगरपालिका किंवा स्थानिक निधीच्या नियंत्रणाचे किंवा व्यवस्थापनाचे कायदेशीर हक्क प्रदान करण्यात आलेली नगरपालिका समिती, जिल्हा परिषद, जिल्हा मंडळ आणि इतर कोणतेही प्राधिकरण ;

(घ) कटक अधिनियम, २००६ याच्या कलम ३ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले कटक मंडळ ; २००६ चा ४१.

(ङ) संविधानाच्या सहाव्या अनुसूचीखाली घटित केलेली प्रादेशिक परिषद किंवा जिल्हा परिषद ;

(च) संविधानाच्या अनुच्छेद ३७१ खाली घटित केलेले विकास मंडळ ; किंवा

(छ) संविधानाच्या अनुच्छेद ३७१ क खाली घटित केलेली प्रादेशिक परिषद,

असा आहे ;

(७०) " सेवा प्राप्तकर्त्याचे स्थान " याचा अर्थ,—

(क) ज्या धंद्याच्या जागेसाठी नोंदणी प्राप्त करण्यात आली असेल त्या धंद्याच्या जागी पुरवठा प्राप्त करण्यात आला असेल तर, धंद्याच्या अशा जागेचे स्थान ;

(ख) ज्या धंद्याच्या जागेसाठी नोंदणी प्राप्त करण्यात आली असेल त्या धंद्याच्या जागेहून अन्य जागी (अन्यत्र स्थिर आस्थापना) पुरवठा प्राप्त करण्यात आला असेल तर, अशा स्थिर आस्थापनेचे स्थान ;

(ग) एकाहून अधिक आस्थापनांमध्ये—मग ती धंद्याची जागा असो किंवा स्थिर आस्थापना असो, पुरवठा प्राप्त करण्यात आला असेल तर,—तो पुरवठा प्राप्त करण्याशी थेट संबंधित असलेले त्या आस्थापनेचे स्थान ;

(घ) अशी जागा उपलब्ध नसेल तर, प्राप्तकर्त्याच्या निवासस्थानाची नेहमीची जागा असलेले स्थान,

असा आहे ;

(७१) " सेवा पुरवठादाराचे स्थान " याचा अर्थ,—

(क) ज्या धंद्याच्या जागेसाठी नोंदणी प्राप्त करण्यात आली असेल त्या धंद्याच्या जागेवरून पुरवठा केलेला असेल तर, धंद्याच्या अशा जागेचे स्थान ;

(ख) ज्या धंद्याच्या जागेसाठी नोंदणी प्राप्त करण्यात आली असेल त्या धंद्याच्या जागेहून अन्य जागी (अन्यत्र स्थिर आस्थापना) पुरवठा केलेला असेल तर, अशा स्थिर आस्थापनेचे स्थान ;

(ग) एकाहून अधिक आस्थापनांमध्ये—मग ती धंद्याची जागा असो किंवा स्थिर आस्थापना असो—पुरवठा झाला असेल तर, तो पुरवठा करण्याच्या तरतुदीशी थेट संबंधित असलेले स्थिर आस्थापनेचे स्थान ;

(घ) अशी जागा उपलब्ध नसेल तर, पुरवठादाराच्या निवासस्थानाची नेहमीची जागा असलेले स्थान,

असा आहे ;

(७२) " निर्मितिकार्य " याचा अर्थ, जिच्या परिणामी एक स्वतंत्र नाव, गुणवैशिष्ट्ये आणि उपयोगक्षमता असलेले नवीन उत्पादन तयार होते अशी, कोणत्याही रीतीने कच्च्या मालावर किंवा निविष्टीवर केली जाणारी प्रक्रिया, असा आहे आणि त्यानुसार, " निर्माणक " या संज्ञेचा अन्वयार्थ लावण्यात येईल ;

(७३) " बाजार मूल्य " याचा अर्थ, जेथे प्राप्तकर्ता आणि पुरवठादार हे एकमेकांशी संबंधित नसतात तेथे एखाद्या पुरवठ्याच्या प्राप्तकर्त्याने, एकाचवेळी किंवा त्या सुमारास आणि एकाच वाणिज्यिक स्तरावर एकाच प्रकारच्या आणि दर्जाच्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही मिळण्यासाठी जी रक्कम देणे आवश्यक असते अशी संपूर्ण रक्कम, असा आहे ;

(७४) " मिश्र पुरवठा " याचा अर्थ, एकल किंमतीच्या बदल्यात एखाद्या करपात्र व्यक्तीकडून वस्तूंसह सेवा किंवा सेवांसह वस्तू अशा एकत्रित स्वरूपात वस्तूंचा किंवा सेवांचा दोन किंवा अधिक वेळा केलेला पुरवठा जेव्हा संयुक्त पुरवठा ठरत नसतो तेव्हा, असा पुरवठा, असा आहे ;

**उदाहरण**

डबाबंद अन्न, मिठाई, चॉकलेट, केक, सुकामेवा, वायुमिश्रित पेये आणि फळांचा रस यांचा जेव्हा एकल किंमतीच्या बदल्यात, एकाच गठ्ठ्याच्या स्वरूपात पुरवठा केला जातो, तेव्हा असा पुरवठा हा मिश्र पुरवठा ठरतो, जर यांपैकी प्रत्येक बाबीचा पुरवठा हा स्वतंत्रपणे केला जात असेल आणि त्या बाबी एकमेकांवर अवलंबून नसतील तर, तेव्हा त्यांचा केला जाणारा पुरवठा हा मिश्र पुरवठा ठरणार नाही ;

(७५) " पैसा " याचा अर्थ, जेव्हा एखादे दायित्व फेडण्यासाठी किंवा दुसऱ्या मूल्याचे भारतीय वैध चलनात रूपांतर करण्यासाठी मोबदल्याच्या स्वरूपात ज्याचा वापर केला जातो असे, भारतीय वैध चलन किंवा कोणतेही विदेशी चलन, धनादेश, वचनपत्र, विनिमयपत्र, धनाकर्ष, प्रदानादेश, प्रवासी धनादेश, मनिऑर्डर, डाक किंवा इलेक्ट्रॉनिक वित्तप्रेषण किंवा भारतीय रिझर्व्ह बँकेने मान्यता दिली असेल असा इतर कोणताही संलेख, असा आहे, परंतु, जे कोणतेही चलन, नाणकशास्त्रीय मूल्यासाठी धारण केले असेल तेव्हा अशा कोणत्याही चलनाचा त्यामध्ये समावेश होणार नाही ;

(७६) " मोटार वाहन " यास, मोटार वाहन अधिनियम, १९८८ याच्या कलम २ च्या खंड (२८) मध्ये त्यास जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल ; १९८८ चा ५९.

(७७) " अनिवासी करपात्र व्यक्ती " याचा अर्थ, भारतात धंद्याचे किंवा निवासस्थानाचे कोणतेही निश्चित ठिकाण नसलेली आणि प्रसंगानुसार वस्तू किंवा सेवा किंवा दोहोंच्या पुरवठ्याचा अंतर्भाव असलेले व्यवहार करणारी करपात्र व्यक्ती—मग ती प्रकर्ता किंवा अभिकर्ता म्हणून असो किंवा इतर कोणत्याही नात्याने असो,—असा आहे ;

(७८) " करेतर पुरवठा " याचा अर्थ, या अधिनियमान्वये किंवा एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये किंवा ज्याच्यावर कर आकारणीयोग्य नाही अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोहोंचा पुरवठा, असा आहे ;

(७९) " करमुक्त प्रदेश " याचा अर्थ, जो प्रदेश करपात्र प्रदेशाच्या बाहेर असेल असा प्रदेश, असा आहे ;

(८०) " अधिसूचना " याचा अर्थ, राजपत्रात प्रसिद्ध केलेली अधिसूचना असा आहे आणि तदनुसार, अधिसूचित करणे आणि अधिसूचित या शब्दप्रयोगाचा अन्वयार्थ लावण्यात येईल ;

(८१) " इतर प्रदेश " यात, राज्यामध्ये समाविष्ट असलेल्या प्रदेशाहून अन्य आणि खंड (११४) च्या उपखंड (क) ते (ङ) मध्ये निर्दिष्ट केलेले प्रदेश यांचा समावेश होतो ;

(८२) एखाद्या करपात्र व्यक्तीच्या संबंधात " उद्दिष्टी कर (आऊटपुट टॅक्स) " याचा अर्थ, अशा व्यक्तीकडून किंवा तिच्या अभिकर्त्याकडून केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या करपात्र पुरवठ्यावर, या अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेला कर असा आहे, मात्र त्यातून प्रत्यावर्ती आकार भरण्याच्या आधारे देय असलेला कर वगळला आहे ;

(८३) एखाद्या व्यक्तीच्या संबंधात " जावक पुरवठा " याचा अर्थ, धंद्याच्या ओघात किंवा त्याच्या अभिवृद्धीसाठी अशा व्यक्तीकडून करण्यात येणारा किंवा तिने करण्याचे मान्य केलेला वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा—मग तो विक्री, हस्तांतरण, वस्तुविनिमय, विनियम, लायसन, भाडेमूल्य, पट्टा किंवा विनियोग यांद्वारे किंवा इतर कोणत्याही माध्यमातून केलेला असो—असा आहे ;

(८४) " व्यक्ती " यामध्ये,—

(क) नैसर्गिक व्यक्ती ;

(ख) अविभक्त हिंदू कुटुंब ;

(ग) कंपनी ;

(घ) व्यवसाय संस्था ;

(ङ) मर्यादित दायित्व असलेली भागीदारी संस्था ;

(च) भारतातील किंवा भारताबाहेरील व्यक्तींचा संघ किंवा व्यक्तींचा निकाय—मग तो विधिसंस्थापित असो किंवा नसो ;

२०१३ चा १८. (छ) केंद्रीय अधिनियम, राज्य अधिनियम किंवा प्रांतिक अधिनियम यांद्वारे किंवा त्यांअन्वये स्थापन केलेले महामंडळ, किंवा कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम २ च्या खंड (४५) मध्ये व्याख्या केलेली शासकीय कंपनी ;

(ज) भारताबाहेरील एखाद्या देशाच्या कायद्याद्वारे किंवा तदन्वये विधिसंस्थापित केलेला कोणताही निगम निकाय ;

(झ) सहकारी संस्थासंबंधीच्या कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी केलेली सहकारी संस्था ;

(ञ) स्थानिक प्राधिकरण ;

(ट) केंद्र सरकार किंवा राज्य शासन ;

१८६० चा २१. (ठ) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० खाली व्याख्या केलेली सोसायटी ;

(ड) विश्वस्त मंडळ ; आणि

(ढ) वरील कोणत्याही उप-खंडात न मोडणारा प्रत्येक न्यायिक संघ,

यांचा समावेश होतो ;

(८५) “ धंद्याचे ठिकाण ” यामध्ये, पुढील ठिकाणाचा समावेश होतो,—

(क) सर्वसाधारणपणे जेथून धंदा चालविला जातो असे ठिकाण आणि त्यामध्ये, ज्याठिकाणी करपात्र व्यक्ती तिच्या वस्तूंचा साठा करते, जेथून वस्तू किंवा सेवा अथवा दोन्ही पुरविते किंवा स्वीकारते, अशी वखार, गोदाम किंवा इतर कोणतेही ठिकाण ; किंवा

(ख) जेथे करपात्र व्यक्ती आपली लेखापुस्तके ठेवते असे स्थान ; किंवा

(ग) जेथे करपात्र व्यक्ती अभिकर्त्यामार्फत धंदा चालवित असेल असे ठिकाण,–मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो ;

यांचा समावेश होतो ;

(८६) “ पुरवठ्याचे ठिकाण ” याचा अर्थ, एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या प्रकरण पाच मध्ये निर्देश केल्याप्रमाणे असलेले पुरवठ्याचे ठिकाण, असा आहे ;

(८७) “ विहित केलेले ” याचा अर्थ, परिषदेच्या शिफारशीनुसार या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(८८) “ प्रकर्ता ” याचा अर्थ, जिच्या वतीने एखादा अभिकर्ता वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्याचा किंवा त्या प्राप्त करण्याचा धंदा करतो अशी व्यक्ती, असा आहे ;

(८९) “ धंद्याचे मुख्य ठिकाण ” याचा अर्थ, नोंदणी प्रमाणपत्रात धंद्याचे मुख्य ठिकाण म्हणून विर्निर्दिष्ट केलेले असेल असे धंद्याचे ठिकाण, असा आहे ;

(९०) “ मुख्य पुरवठा ” याचा अर्थ, ज्या वस्तूंचा किंवा सेवांचा पुरवठा एखाद्या संयुक्त पुरवठ्याचा मुख्य घटक ठरतो आणि त्या संयुक्त पुरवठ्याचा भाग असणारा इतर कोणताही पुरवठा ज्याला सहाय्यभूत ठरतो असा वस्तूंचा किंवा सेवांचा पुरवठा, असा आहे ;

(९१) या अधिनियमान्वये पार पाडावयाच्या कोणत्याही कार्याच्या संबंधात “ समुचित अधिकारी ” याचा अर्थ, राज्य कर आयुक्त किंवा त्या आयुक्ताने ज्याला ती कार्ये नेमून दिलेली असतील असा राज्य कर अधिकारी, असा आहे ;

(९२) “ तिमाही ” याचा अर्थ, एखाद्या कॅलेंडर वर्षातील मार्च, जून, सप्टेंबर आणि डिसेंबर महिन्यांच्या शेवटच्या दिवशी संपणारा सलग तीन महिन्यांचा समावेश असणारा कालावधी, असा आहे ;

(९३) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्यांचा “प्राप्तकर्ता” याचा अर्थ,—

(क) जेथे वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्यासाठी कोणताही मोबदला देय असेल, तेथे असा कोणताही मोबदला देण्यास पात्र असलेली व्यक्ती ;

(ख) जेथे त्या वस्तूंच्या पुरवठ्यासाठी कोणताही मोबदला देय नसेल, तेथे जिला त्या वस्तू दिलेल्या असतील किंवा त्या उपलब्ध करून दिलेल्या असतील, किंवा त्या वस्तू जिच्या ताब्यात किंवा जिच्या वापराकरिता दिलेल्या असतील किंवा त्या उपलब्ध करून दिलेल्या असतील, अशी व्यक्ती; आणि

(ग) जेथे एखाद्या सेवेच्या पुरवठ्यासाठी कोणताही मोबदला देय नसेल तेथे जिला त्या सेवा दिलेल्या असतील अशी व्यक्ती,

असा आहे आणि जिला एखादा पुरवठा केलेला असेल अशा कोणत्याही व्यक्तीसंबंधीच्या निर्देशाचा अन्वयार्थ, त्या पुरवठ्याच्या प्राप्तकर्त्याच्या संबंधीचा तो निर्देश आहे, असा लावण्यात येईल आणि त्यामध्ये पुरवठा केलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या संबंधात प्राप्तकर्त्याच्या वतीने कार्य करणाऱ्या अभिकर्त्याचा समावेश होतो ;

(९४) “नोंदणीकृत व्यक्ती” याचा अर्थ, जिची कलम २५ अन्वये नोंदणी करण्यात आली असेल अशी व्यक्ती, असा आहे, परंतु त्यामध्ये विशिष्ट ओळख क्रमांक असणाऱ्या व्यक्तीचा समावेश होणार नाही ;

(९५) “विनियम ” याचा अर्थ, परिषदेच्या शिफारशीवरून, या अधिनियमान्वये शासनाने केलेले विनियम, असा आहे ;

(९६) वस्तूंच्या संबंधात “ वस्तू हलवणे ” याचा अर्थ,—

(क) वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराने अथवा अशा पुरवठादाराच्यावतीने काम करणाऱ्या कोणत्याही अन्य व्यक्तीने वस्तूची पोचवणी करणे, किंवा

(ख) प्राप्तकर्त्याने किंवा प्राप्तकर्त्याच्यावतीने काम करणाऱ्या कोणत्याही अन्य व्यक्तीने वस्तू घेणे,

असा आहे ;

(९७) “ विवरण ” याचा अर्थ, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये विहित केलेले किंवा अन्यथा सादर करणे आवश्यक असेल असे कोणतेही विवरण, असा आहे ;

(९८) “ प्रत्यावर्ती आकार ” याचा अर्थ, कलम ९ च्या पोट-कलम (३) मध्ये किंवा पोट-कलम (४) अन्वये, किंवा एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये अशा वस्तू व सेवा किंवा दोन्ही पुरविणाऱ्या व्यक्तीऐवजी वस्तू व सेवा प्राप्त करणाऱ्या व्यक्तीचे कर देण्याचे दायित्व, असा आहे ;

(९९) “ पुनरीक्षण प्राधिकारी ” याचा अर्थ, कलम १०८ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे निर्णयाचे किंवा आदेशांचे पुनरीक्षण करण्यासाठी नियुक्त केलेला किंवा प्राधिकृत केलेला प्राधिकारी, असा आहे ;

(१००) “ अनुसूची ” याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(१०१) “ रोखे ” यास रोखे करार (विनियमन) अधिनियम, १९५६ याच्या कलम २ च्या पोट-कलम (ज) मध्ये जो अर्थ नेमून देण्यात आला असेल तोच अर्थ असेल. १९५६ चा ४२.

(१०२) “ सेवा ” याचा अर्थ, वस्तू, पैसा व रोखे यांखेरीज अन्य कोणतीही गोष्ट, असा आहे ; परंतु, त्यामध्ये, ज्याकरिता एक स्वतंत्र मोबदला आकारला जातो अशा, एका प्रपत्रातून,चलनातून किंवा मूल्यातून दुसऱ्या प्रपत्रात, चलनात किंवा मूल्यात, पैशाच्या किंवा रोखीच्या किंवा इतर कोणत्याही पद्धतीच्या रूपांतराच्या वापराशी संबंधित कार्याचा समावेश होतो ;

(१०३) “ राज्य ” याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(१०४) “ राज्य कर ” याचा अर्थ, या अधिनियमान्वये आकारलेला कर, असा आहे;

(१०५) कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या संबंधात “ पुरवठादार ” याचा अर्थ, उक्त वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही पुरविणारी व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही पुरविण्याच्या संबंधात अशा पुरवठादाराच्या वतीने ते कार्य करणाऱ्या अभिकर्त्याचा समावेश होतो ;

(१०६) “ कर कालावधी ” याचा अर्थ, ज्या कालावधीसाठी विवरण (दाखल करणे) आवश्यक आहे तो कालावधी, असा आहे ;

(१०७) “ करपात्र व्यक्ती ” याचा अर्थ, कलम २२ किंवा कलम २४ अन्वये जिची नोंदणी करण्यात आली आहे किंवा जी नोंदणी करण्यास पात्र आहे, अशी व्यक्ती, असा आहे ;

(१०८) “ करपात्र पुरवठा ” याचा अर्थ, या अधिनियमान्वये ज्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींवर कर आकारणी पात्र आहे त्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा, असा आहे ;

(१०९) “ करपात्र प्रदेश ” याचा अर्थ, ज्या प्रदेशाला या अधिनियमाच्या तरतुदी लागू होतात असा प्रदेश, असा आहे ;

(११०) “ दूरसंचार सेवा ” याचा अर्थ, (इलेक्ट्रॉनिक मेल, व्हॉईस मेल, डेटा सेवा, श्राव्य मजकूर सेवा, व्हिडीओ मजकूर सेवा, रेडिओ पेजिंग आणि सेल्युलर भ्रमणध्वनी, दूरध्वनी सेवांसह) ज्या कोणत्याही प्रसारणाच्या किंवा ग्रहणाच्या आधारे चिन्हे, संकेत, लेख, आकृती व आवाज किंवा कोणत्याही प्रकारची गुप्तवार्ता किंवा तार, दृश्य किंवा अन्य विद्युत चुंबक अशा साधनांद्वारे जी वापरकर्त्यास उपलब्ध करून देण्यात येते अशी, कोणत्याही वर्णनाची सेवा, असा आहे ;

२०१७ चा १२. (१११) “ केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम ” याचा अर्थ, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ असा आहे ;

(११२) “ राज्यामधील उलाढाल ” किंवा “ संघ राज्यक्षेत्रामधील उलाढाल ” याचा अर्थ, जर केंद्रीय कर, राज्य कर, संघ राज्यक्षेत्र कर, एकात्मिक कर आणि उपकर आकारला असेल तर, तो वगळून करपात्र व्यक्तीकडून राज्यात किंवा संघ राज्यक्षेत्रात केलेला वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा करमाफ पुरवठा व निर्यात पुरवठा आणि उक्त करपात्र व्यक्तीने राज्यातून किंवा संघ राज्यक्षेत्रातून केलेला वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा आंतरराज्यीय पुरवठा वगळून, संपूर्ण करपात्र पुरवठ्याचे एकूण मूल्य (प्रत्यावर्ती आकार भरण्याच्या तत्त्वावर एखाद्या व्यक्तीकडून ज्यावर कर देय असेल अशा आवक पुरवठ्याचे मूल्य वगळून) असा आहे ;

(११३) “ निवासाचे नेहमीचे ठिकाण ” याचा अर्थ, –

(क) एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत, ती सर्वसाधारणपणे जिथे राहते ते ठिकाण ;

(ख) इतर बाबतीत त्या व्यक्तीचे विधिसंस्थापित किंवा अन्यथा कायदेशीररीत्या घटित केलेले ठिकाण ;

असा आहे ;

(११४) “ संघ राज्यक्षेत्र ” याचा अर्थ,

(क) अंदमान व निकोबार बेटे ;

(ख) लक्षद्वीप ;

(ग) दादरा व नगर हवेली ;

(घ) दमण व दीव ;

(ङ) चंदीगढ ; आणि

(च) इतर राज्यक्षेत्रे ;

असा आहे ;

**स्पष्टीकरण—**या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी उपखंड (क) ते (च) मध्ये विनिर्दिष्ट केलेली प्रत्येक राज्यक्षेत्रे ही स्वतंत्र संघ राज्यक्षेत्रे असल्याचे मानण्यात येईल ;

(११५) " संघ राज्यक्षेत्र कर " याचा अर्थ, संघ राज्यक्षेत्र वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये आकारण्यात आलेला संघ राज्यक्षेत्र वस्तू व सेवा कर, असा आहे ;

(११६) " संघ राज्यक्षेत्र वस्तू व सेवा कर अधिनियम " याचा अर्थ, संघ राज्यक्षेत्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७, असा आहे ; २०१७ चा १४.

(११७) " वैध विवरण " याचा अर्थ, ज्यानुसार स्वयंनिर्धारित कराचा संपूर्ण भरणा करण्यात आला असेल असे, कलम ३९ च्या पोट-कलम (१) अन्वये दाखल केलेले विवरण, असा आहे ;

(११८) " प्रमाणक (व्हाउचर) " याचा अर्थ, जेथे वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्यासाठीचा मोबदला म्हणून किंवा मोबदल्याचा एक भाग म्हणून जे स्वीकारणे बंधनकारक असते, आणि जेथे पुरविण्यात यावयाच्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींची त्यांच्या संभाव्य पुरवठादारांची ओळख, एकतर अशा संलेखात दर्शविण्यात आल्याप्रमाणे असते किंवा ज्यात त्याच्या दस्तऐवजीकरणाच्या संबंधात, अशा संलेखाच्या वापराच्या अटी व शर्तींसह, दर्शविलेली असते, असा संलेख, असा आहे ;

(११९) " कार्य कंत्राट " याचा अर्थ, कोणत्याही स्थावर मालमत्तेचे बांधकाम, उभारणी, निर्मिती, ते पूर्ण करणे, उभारणे, स्थापना (संचमांडणी करणे), जोडणी, सुधारणा, फेरबदल, दुरुस्ती किंवा कार्यान्वयन इत्यादी कामे पार पाडण्याकरिता करण्यात आलेली कोणतीही संविदा यांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या वस्तूंचे (वस्तूंच्या स्वरूपातील असो किंवा अन्य स्वरूपातील असो) वस्तूंचे हस्तांतरण असा आहे ;

(१२०) या अधिनियमात वापरलेल्या व व्याख्या न केलेल्या परंतु एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, संघ राज्यक्षेत्र वस्तू व सेवा कर अधिनियम आणि वस्तू व सेवा कर (राज्यांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम, यांत व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमांमध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

## प्रकरण दोन

## **प्रशासन**

या अधिनियमाखालील अधिकारी.

**३.** शासन, अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ पुढील अधिकारी वर्गांची नियुक्ती करील.

(क) राज्य कर आयुक्त,

(ख) राज्य कर विशेष आयुक्त,

(ग) राज्य कर अपर आयुक्त,

(घ) राज्य कर सह आयुक्त,

(ङ) राज्य कर उप आयुक्त,

(च) राज्य कर सहायक आयुक्त, आणि

(छ) त्यास योग्य वाटेल असा, इतर अधिकाऱ्यांचा वर्ग :

२००५ चा ९. परंतु, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नियुक्त करण्यात आलेले अधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

अधिकाऱ्यांची नियुक्ती.

**४.** (१) कलम ३ अन्वये अधिसूचित करण्यात येतील अशा अधिकाऱ्याव्यतिरिक्त, शासनास योग्य वाटतील अशा व्यक्तींची या अधिनियमाखालील अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल.

(२) आयुक्ताची संपूर्ण राज्यभर अधिकारिता असेल, विशेष आयुक्त आणि अपर आयुक्त यांची त्यांना नेमून दिलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही कार्यांच्या बाबतीत संपूर्ण राज्यभर किंवा राज्य शासन जे निदेश देईल, अशा, राज्याच्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असेल आणि इतर सर्व अधिकाऱ्यांची, विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, संपूर्ण राज्यभर किंवा आयुक्त आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा स्थानिक क्षेत्रांवर अधिकारिता असेल.

अधिकाऱ्यांचे अधिकार.

**५.** (१) आयुक्त लादील, अशा अटींना आणि मर्यादांना अधीन राहून, राज्य कर अधिकाऱ्यास या अधिनियमान्वये त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करता येईल आणि सोपवलेली किंवा नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडता येतील.

(२) राज्य कर अधिकाऱ्यास, त्याला दुय्यम असणाऱ्या, इतर कोणत्याही राज्य कर अधिकाऱ्याला या अधिनियमान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करता येईल आणि त्याच्याकडे सोपवलेली असतील अशी कर्तव्ये पार पाडता येतील.

(३) आयुक्तास, याबाबतीत त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींना व मर्यादांना अधीन राहून, त्याचे अधिकार त्याला दुय्यम असलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवता येतील.

(४) या कलमात काहीही अंतर्भूत असेल तरी, अपील प्राधिकारी, अन्य कोणत्याही राज्य कर अधिकाऱ्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करणार नाही आणि त्याच्याकडे सोपवलेली किंवा नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडणार नाही.

विवक्षित परिस्थितीत केंद्रीय कर अधिकाऱ्यांना समुचित अधिकारी म्हणून प्राधिकृत करणे.

**६.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना बाध न आणता, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना, शासनास, परिषदेच्या शिफारशीवरून, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शर्तींस अधीन राहून समुचित अधिकारी म्हणून प्राधिकृत करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींना

अधीन राहून,—

(क) या अधिनियमान्वये कोणताही समुचित अधिकारी एखादा आदेश काढील त्याबाबतीत, तो केंद्रीय कर अधिकारितेच्या अधिकाऱ्याला तसे कळवून उक्त अधिनियमाद्वारे प्राधिकृत केल्याप्रमाणे, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वयेदेखील आदेश काढील ;

(ख) केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये एखाद्या समुचित अधिकाऱ्याने एखाद्या विषयवस्तूवर कोणतीही कार्यवाही सुरू केली असेल त्याबाबतीत त्याच विषयवस्तूवर या अधिनियमान्वये कोणतीही कार्यवाही समुचित अधिकाऱ्याकडून सुरू केली जाणार नाही.

(३) या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाबाबत, जेथे जेथे लागू असेल तेथे तेथे, दुरुस्ती, अपील व पुनरीक्षण करण्याकरिताची कोणतीही कार्यवाही, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यापुढे दाखल करता येणार नाही.

प्रकरण तीन

## कर आकारणे व त्याचे संकलन करणे

पुरवठ्याची व्याप्ती.

**७.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, " पुरवठा " या शब्दप्रयोगामध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव होतो,

(क) एखाद्या व्यक्तीने धंदा करण्याच्या ओघात किंवा धंद्याच्या अभिवृद्धीसाठी मोबदल्याकरिता केलेली किंवा करण्याचे मान्य केलेली विक्री, हस्तांतरण, वस्तुविनिमय, देवाणघेवाण, दिलेली अनुज्ञप्ती, भाडे, भाडेपट्टा, अथवा केलेली विल्हेवाट यांसारख्या, सर्व प्रकारच्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा ;

(ख) धंदा करण्याच्या ओघात किंवा धंद्याच्या अभिवृद्धीसाठी असो अथवा नसो, मोबदल्याकरिता सेवा आयात करणे ;

(ग) मोबदला न घेता केलेली किंवा करण्याचे मान्य केलेली, अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्ये ; आणि

(घ) अनुसूची दोनमध्ये निर्दिष्ट केलेली, वस्तूंचा पुरवठा किंवा सेवांचा पुरवठा म्हणून समजण्यात येणारी कार्ये.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) अनुसूची तीन मध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्ये किंवा व्यवहार ; किंवा

(ख) ज्यांमध्ये केंद्र सरकार, राज्य शासन अथवा स्थानिक प्राधिकरण ही सार्वजनिक प्राधिकरणे म्हणून कार्यरत आहेत अशी त्यांनी हाती घेतलेली, परिषदेच्या शिफारशींवरून शासनाने अधिसूचित केलेली अशी कार्ये किंवा व्यवहार,

हे वस्तूंचा किंवा सेवांचा पुरवठा म्हणून समजली जाणार नाहीत.

(३) पोट-कलमे (१) व (२) च्या तरतुदींना अधीन राहून, शासनास, परिषदेच्या शिफारशींवरून,—

(क) सेवांचा पुरवठा म्हणून नव्हे, पण वस्तुंचा पुरवठा म्हणून ; किंवा

(ख) वस्तूंचा पुरवठा म्हणून नव्हे, पण सेवांचा पुरवठा म्हणून,

समजण्यात यावेत असे व्यवहार, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करता येतील.

**८.** संयुक्त किंवा मिश्र पुरवठ्यावरील कर दायित्व हे पुढील रीतीने निश्चित करण्यात येईल :— संयुक्त आणि मिश्र पुरवठ्यांवरील कर दायित्व.

(क) ज्यामधील एक पुरवठा हा मुख्य पुरवठा असेल असा, दोन वा त्याहून अधिक पुरवठ्यांचा समावेश असलेला संयुक्त पुरवठा हा अशा मुख्य पुरवठ्याचा पुरवठा म्हणून समजण्यात येईल ; आणि

(ख) दोन वा त्याहून अधिक पुरवठ्यांचा समावेश असलेला मिश्र पुरवठा हा, ज्यास उच्चतर कराचा दर लागू होईल त्या विशिष्ट पुरवठ्याचा पुरवठा म्हणून समजण्यात येईल.

**९.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, मानवी सेवनासाठीच्या अल्कोहोलयुक्त मद्याचा पुरवठा वगळता, अन्य वस्तुंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या राज्यांतर्गत सर्व पुरवठ्यांवर, कलम १५ अन्वये निश्चित केलेल्या मूल्यावर, शासन, परिषदेच्या शिफारशींवरून अधिसूचित करील अशा, वीस टक्क्यांहून अधिक नसेल अशा दरांनी, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर या नावाने संबोधला जाणारा कर आकारण्यात येईल आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याचे संकलन करण्यात येईल, तसेच करपात्र व्यक्तीला तो भरावा लागेल. कर आकारणे व संकलन करणे.

(२) पेट्रोलिअम क्रूड, हाय स्पीड डिझेल, मोटार स्पिरिट (सामान्यतः पेट्रोल म्हणून ओळखले जाणारे), नैसर्गिक वायू आणि विमानचालन चक्की इंधन (एव्हीएशन टर्बाइन फ्यूइल) यांच्या पुरवठ्यावरील *राज्य* कर हा, शासन, परिषदेच्या शिफारशींवरून अधिसूचित करील अशा दिनांकापासून आकारण्यात येईल.

(३) शासनास, परिषदेच्या शिफारशींवरून, ज्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींवर प्राप्तकर्त्याकडून प्रत्यावर्ती आकाराच्या आधारे (रिव्हर्स चार्ज) कर भरला जाईल अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याचे प्रवर्ग अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करता येतील आणि असा प्राप्तकर्ता जणू काही, अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याच्या संबंधात कर भरण्यास पात्र असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या सर्व तरतुदी अशा प्राप्तकर्त्यास लागू असतील.

(४) एखाद्या नोंदणीकृत नसलेल्या पुरवठादाराकडून नोंदणीकृत व्यक्तीस केल्या जाणाऱ्या, करपात्र वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याबाबत, अशा व्यक्तीकडून प्राप्तकर्ता म्हणून, प्रत्यावर्ती आकाराच्या आधारे राज्य कर भरण्यात येईल आणि अशी व्यक्ती जणू काही, अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याच्या संबंधात कर भरण्यास पात्र असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या सर्व तरतुदी अशा प्राप्तकर्त्यास लागू असतील.

(५) शासनाला, परिषदेच्या शिफारशीवरून, अधिसूचनेद्वारे, अशा सेवांचे प्रवर्ग विनिर्दिष्ट करता येतील, ज्या सेवा इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकामार्फत पुरविल्या जात असतील तर त्या सेवांच्या राज्यांतर्गत पुरवठ्यांवरील कर इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकाकडून प्रदान करण्यात येईल, आणि या अधिनियमाच्या सर्व तरतुदी ह्या, जणू काही तो इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालक अशा सेवा पुरविण्याच्या संबंधात कर प्रदान करण्यासाठी पात्र पुरवठादार आहे असे मानून अशा इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकाला लागू होतील :

परंतु, ज्या करपात्र प्रदेशामध्ये इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकाची प्रत्यक्ष उपस्थिती नसेल तेथे त्या करपात्र प्रदेशामध्ये कोणत्याही प्रयोजनासाठी अशा इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकाचे प्रतिनिधित्व करणारी कोणतीही व्यक्ती कर प्रदान करण्यास दायी असेल :

परंतु आणखी असे की, ज्या करपात्र प्रदेशामध्ये इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकाची प्रत्यक्ष उपस्थिती नसेल आणि तसेच उक्त प्रदेशामध्ये त्याचा प्रतिनिधी नसेल तेथे असा इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालक कर प्रदान करण्याच्या प्रयोजनासाठी करपात्र प्रदेशात एखाद्या व्यक्तीची नेमणूक करील आणि अशी व्यक्ती कर प्रदान करण्यास दायी असेल.

आपसमेळ कर आकारणी.

**१०.** (१) या अधिनियमात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु कलम ९ ची पोट-कलमे (३) व (४) यांच्या तरतुदींना अधीन राहून, जिची मागील वित्तीय वर्षातील एकूण उलाढाल पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक झालेली नसेल अशा नोंदणीकृत व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीनतेने तिच्याकडून देय असलेल्या कराऐवजी, विहित करण्यात येईल अशा दराने परिगणित केलेली, परंतु पुढील मर्यादांपेक्षा अधिक नसेल अशी रक्कम भरण्याचा पर्याय निवडता येईल,—

(क) उत्पादकाच्या बाबतीत, राज्यातील उलाढालीच्या एक टक्का,

(ख) अनुसूची दोन च्या परिच्छेद ६ च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेला पुरवठा करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत राज्यातील उलाढालीच्या अडीच टक्के, आणि

(ग) इतर पुरवठादारांच्या बाबतीत, राज्यातील उलाढालीच्या अर्धा टक्का :

परंतु, शासनास, अधिसूचनेद्वारे, उक्त पन्नास लाख रुपयांच्या मर्यादेत, परिषद शिफारस करील त्याप्रमाणे, एक कोटी रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढ्या उच्चतर रकमेपर्यंत वाढ करता येईल.

(२) नोंदणीकृत व्यक्ती जर,—

(क) अनुसूची दोन च्या परिच्छेद ६ च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या पुरवठ्याव्यतिरिक्त अन्य सेवा पुरवठा करणारी नसेल ;

(ख) या अधिनियमान्वये कर आकारण्यास पात्र नसतील अशा वस्तुंचा कोणताही पुरवठा करणारी नसेल ;

(ग) वस्तुंचा कोणताही आंतर-राज्य जावक पुरवठा करणारी नसेल ;

(घ) कलम ५२ अन्वये ज्याच्याबाबत मूळ स्रोतातून कराची वसुली करण्याची आवश्यकता आहे अशा इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकामार्फत वस्तुंचा कोणताही पुरवठा करणारी नसेल ; आणि

(ङ) परिषदेच्या शिफारशींवरून अधिसूचित करण्यात येतील अशा वस्तुंची उत्पादक नसेल,

तर, ती व्यक्ती पोट-कलम (१) खालील पर्याय निवडण्यास पात्र असेल :

१९६१ चा ४३. परंतु, एकाहून अधिक नोंदणीकृत व्यक्तींकडे (आयकर अधिनियम, १९६१ अन्वये दिलेला) एकच स्थायी लेखा क्रमांक (पॅन) असेल त्याबाबतीत अशा सर्व नोंदणीकृत व्यक्तींनी पोट-कलम (१) अन्वये कर भरण्याच्या पर्यायाची निवड करीपर्यंत, अशी नोंदणीकृत व्यक्ती त्या पोट-कलमाखालील योजनेचा पर्याय निवडण्यास पात्र असणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये एखाद्या नोंदणीकृत व्यक्तीने निवडलेला पर्याय हा, त्या वर्षातील तिची एकूण उलाढाल ज्या दिनांकास पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेहून अधिक होईल त्या दिनांकापासून संपुष्टात येईल.

(४) पोट-कलम (१) च्या तरतुदी लागू होणारी करपात्र व्यक्ती ही, तिने केलेल्या पुरवठ्यासंबंधात प्राप्तकर्त्याकडून कोणताही कर वसूल करणार नाही किंवा ती निविष्टी कर जमा खातीनोंद करण्यास हक्कदार असणार नाही.

(५) करपात्र व्यक्तीने पात्र नसतानादेखील पोट-कलम (१) अन्वये कर भरला असेल असे समुचित अधिकाऱ्यास सकारण वाटत असेल तर, अशी व्यक्ती, या अधिनियमाच्या इतर तरतुदींन्वये त्याच्याकडून देय असेल अशा कोणत्याही कराव्यतिरिक्त शास्तीस पात्र असेल आणि कलम ७३ किंवा, ७४ यांच्या तरतुदी ह्या, कर व शास्ती निश्चित करण्यासाठी योग्य त्या फेरफारांसह लागू असतील.

करातून सूट देण्याचा अधिकार.

**११.** (१) शासनाची, लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे याबाबत खात्री पटली असेल तर, शासनाला, परिषदेच्या शिफारशीवरून, अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वर्णनाच्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींना त्यावर आकारण्यायोग्य असलेल्या संपूर्ण किंवा अंशतः करातून त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून सर्वसाधारणतः एकतर पूर्णपणे किंवा तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा शर्तींना अधीन राहून, सूट देता येईल.

(२) शासनाची, लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे याबाबत खात्री पटली असेल तर, शासनाला, परिषदेच्या शिफारशीवरून, प्रत्येक प्रकरणात विशेष आदेशाद्वारे, ज्यावर कर आकारण्यायोग्य आहे अशा कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींना अशा आदेशामध्ये अपवादात्मक स्वरूपाची परिस्थिती नमूद करून कराच्या प्रदानातून सूट देता येईल.

(३) शासनाला, पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेची किंवा पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या आदेशाची व्याप्ती किंवा प्रयोज्यता स्पष्ट करण्याच्या प्रयोजनासाठी तसे करणे आवश्यक किंवा इष्ट वाटत असेल तर, शासनाला पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढल्याच्या किंवा पोट-कलम (२) अन्वये आदेश काढल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत कोणत्याही वेळी, अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत किंवा आदेशात स्पष्टीकरणाचा समावेश करता येईल आणि असे प्रत्येक स्पष्टीकरण हे, जणू काही अशा पहिल्या अधिसूचनेचा किंवा, यथास्थिति, आदेशाचा नेहमीच एक भाग होते असे मानून अंमलात येईल.

(४) परिषदेच्या शिफारशीवरून केंद्र सरकारने केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) अन्वये काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा पोट-कलम (२) अन्वये काढलेला आदेश हा, या अधिनियमान्वये काढलेली अधिसूचना किंवा, यथास्थिति, आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या बाबतीत, त्यावर आकारण्यायोग्य असलेल्या संपूर्ण करातून किंवा त्याच्या भागातून सूट दिलेली असेल तेथे, अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही पुरविणारी नोंदणीकृत व्यक्ती अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींवर लागू असलेल्या दरापेक्षा अधिक कर वसूल करणार नाही.

प्रकरण चार

## पुरवठ्याची वेळ आणि मूल्य

वस्तुंच्या पुरवठ्याची वेळ.

**१२.** (१) वस्तूंवरील कर प्रदान करण्यासाठीचे दायित्व, या कलमाच्या तरतुदींनुसार निश्चित केल्याप्रमाणे, पुरवठ्याच्या वेळी निर्माण होईल.

(२) वस्तुंच्या पुरवठ्याची वेळ पुढील दिनांकांपैकी जी अगोदरची असेल ती असेल :—

(क) पुरवठादाराने बीजक दिल्याचा दिनांक किंवा पुरवठा करण्याच्या संबंधात बीजक देण्यासाठी कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या दिनांकास त्यास फर्मावले असेल तो शेवटचा दिनांक ; किंवा

(ख) पुरवठा करण्याच्या संबंधात पुरवठादाराला ज्या दिनांकास प्रदान मिळाले असेल तो दिनांक :

परंतु, जेव्हा करपात्र वस्तुंच्या पुरवठादारास, कर बीजकात दर्शविण्यात आलेल्या रकमेपेक्षा एक हजार रुपयांपर्यंतची अधिक रक्कम प्राप्त होत असेल तेव्हा अशा अधिक रकमेच्या व्याप्तीपर्यंतच्या पुरवठ्याची वेळ उक्त पुरवठादाराच्या विकल्पावरून, अशा अधिक रकमेच्या बाबतीत बीजक, दिल्याचा दिनांक, ही असेल.

**स्पष्टीकरण १.——**खंड (क) आणि (ख) यांच्या प्रयोजनार्थ, " पुरवठा " हा, बीजकाद्वारे, किंवा यथास्थिति, प्रदानाद्वारे समाविष्ट करण्यात आलेला असेल तेवढ्या व्याप्तीपर्यंत करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण २.——**खंड (ख) च्या प्रयोजनार्थ, " पुरवठादारास प्रदान प्राप्त झाले तो दिनांक " हा, त्याच्या लेखा पुस्तकात प्रदानाची नोंद ज्या दिनांकास करण्यात आली असेल तो दिनांक किंवा त्याच्या बँक खात्यात प्रदान ज्या दिनांकास जमा झाले असेल तो दिनांक, यांपैकी जे अगोदर घडेल तो असेल.

(३) ज्या पुरवठ्याच्या बाबतीत कर भरला असेल किंवा प्रत्यावर्ती आकाराच्या आधारे भरावयासाठी पात्र असेल त्या पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठ्याची वेळ ही पुढील दिनांकापैकी जी अगोदरची असेल ती असेल :——

(क) वस्तू मिळाल्याचा दिनांक, किंवा

(ख) प्राप्तकर्त्याच्या लेखा पुस्तकांमध्ये नोंदवल्याप्रमाणे प्रदानाचा दिनांक किंवा त्याच्या बँक खात्यातून प्रदान खर्चखाती टाकण्यात आल्याचा दिनांक, यापैकी जो अगोदरचा असेल तो दिनांक, किंवा

(ग) पुरवठादाराने बीजक किंवा त्याच्याऐवजी, कोणत्याही नावाने संबोधला जाणारा अन्य कोणताही दस्तऐवज दिल्याच्या दिनांकापासून पुढील तीस दिवसांच्या लगतनंतरचा दिनांक :

परंतु, जेव्हा खंड (क), खंड (ख) किंवा खंड (ग) अन्वये पुरवठ्याची वेळ निश्चित करणे शक्य नसेल तर, पुरवठा प्राप्तकर्त्याच्या लेखा पुस्तकातील नोंदीचा दिनांक हा पुरवठ्याची वेळ असेल.

(४) पुरवठादाराने प्रमाणकाचा पुरवठा करण्याच्या प्रकरणात, पुरवठ्याची वेळ ही,——

(क) जर त्यावेळी पुरवठा निश्चित होणार असेल तर, प्रमाणक दिल्याचा दिनांक हा असेल; किंवा—

(ख) इतर सर्व प्रकरणांत, प्रमाणक सोडवणूक (redemption) दिनांक, हा असेल.

(५) पोट-कलम (२), पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) च्या तरतुदींनुसार पुरवठ्याची वेळ निश्चित करणे शक्य नसेल तर, पुरवठ्याची वेळ ही,—

(क) जर नियतकालिक विवरण भरावयाचे असेल तर, ज्या दिनांकास असे विवरण भरावयाचे असेल तो दिनांक असेल, किंवा

(ख) इतर कोणत्याही प्रकरणात, कर ज्या दिनांकास प्रदान केला असेल तो दिनांक असेल.

(६) कोणत्याही मोबदल्याच्या विलंबित प्रदानाकरिताचे व्याज, विलंब शुल्क किंवा शास्ती यांद्वारे पुरवठ्याच्या मूल्यातील वाढीच्या मर्यादेपर्यंत संबंधित पुरवठ्याची वेळ ज्या दिनांकास पुरवठादारास अशी मूल्यामधील वाढ प्राप्त होईल तो दिनांक असेल.

सेवेच्या पुरवठ्याची वेळ.

**१३.** (१) सेवांवर कर प्रदान करण्यासाठीचे दायित्व, या कलमाच्या तरतुदींनुसार निश्चित केल्याप्रमाणे, पुरवठ्याच्या वेळी निर्माण होईल.

(२) सेवेच्या पुरवठ्याची वेळ पुढील दिनांकापैकी जी अगोदरची असेल ती असेल :—

(क) जर बीजक, कलम ३१ च्या पोट-कलम (२) अन्वये विहित केलेल्या कालावधीच्या आत देण्यात आलेले असेल तर, पुरवठादाराने बीजक दिल्याचा दिनांक किंवा प्रदान प्राप्त झाल्याचा दिनांक यांपैकी जो अगोदरचा असेल तो दिनांक ; किंवा

(ख) जर बीजक, कलम ३१ च्या पोट-कलम (२) अन्वये विहित केलेल्या कालावधीच्या आत देण्यात आलेले नसेल तर, सेवा पुरविण्याचा दिनांक किंवा प्रदान प्राप्त झाल्याचा दिनांक यांपैकी जो अगोदरचा असेल तो दिनांक ; किंवा

(ग) ज्या प्रकरणास खंड (क) किंवा खंड (ख) च्या तरतुदी लागू नाहीत त्याच्या बाबतीत, प्राप्तकर्त्याने त्याच्या लेखा पुस्तकांमध्ये ज्या दिनाकांस सेवा प्राप्त झाल्याचे दर्शविले असेल तो दिनांक :

परंतु, जेव्हा करपात्र सेवांच्या पुरवठादारास, कर बीजकात दर्शविण्यात आलेल्या रकमेपेक्षा एक हजार रुपयांपर्यंतची अधिक रक्कम प्राप्त होत असेल तेव्हा अशा अधिक रकमेच्या व्याप्तीपर्यंतच्या पुरवठ्याची वेळ उक्त पुरवठादाराच्या विकल्पावरून अशा अधिक रकमेच्या संबंधात बीजक, दिल्याचा दिनांक ही असेल.

**स्पष्टीकरण —**खंड (क) आणि (ख) यांच्या प्रयोजनार्थ,–

(एक) पुरवठा हा, बीजकाद्वारे किंवा यथास्थिति, प्रदानाद्वारे समाविष्ट करण्यात आलेला असेल तेवढ्या व्याप्तीपर्यंत करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(दोन) " प्रदान प्राप्त झाल्याचा दिनांक " हा, पुरवठादाराच्या लेखा पुस्तकात प्रदानाची नोंद ज्या दिनांकास करण्यात आली असेल तो किंवा त्याच्या बँक खात्यात प्रदान ज्या दिनांकास जमा झाले असेल तो दिनांक, यांपैकी जो अगोदरचा असेल तो दिनांक असेल.

(३) ज्या पुरवठ्याच्या बाबतीत कर भरला असेल किंवा प्रत्यावर्ती आकाराच्या आधारे भरावयासाठी पात्र असेल त्या पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठ्याची वेळ ही, पुढील दिनांकांपैकी जी अगोदरची असेल ती असेल :—

(क) प्राप्तकर्त्याच्या लेखा पुस्तकांमध्ये नोंद केलेला प्रदानाचा दिनांक किंवा ज्या दिनांकास त्याच्या बँक खात्यामध्ये प्रदानाची खर्चखाती नोंद झाली तो दिनांक, यांपैकी जो अगोदरचा असेल तो दिनांक ; किंवा

(ख) पुरवठादाराने बीजक किंवा त्याच्याऐवजी, कोणत्याही नावाने संबोधला जाणारा अन्य कोणताही दस्तऐवज दिल्याच्या दिनांकापासून पुढील साठ दिवसांच्या लगतनंतरचा दिनांक :

परंतु, जेव्हा खंड (क) किंवा (ख) अन्वये पुरवठ्याची वेळ निश्चित करणे शक्य नसेल तर, पुरवठा प्राप्तकर्त्याच्या लेखा पुस्तकातील नोंदीचा दिनांक हा, पुरवठ्याची वेळ असेल :

परंतु आणखी असे की, सहयोगी उपक्रमांनी पुरवठा करण्याच्या बाबतीत, जेथे सेवा पुरवठादार हा भारताबाहेर स्थित असेल तर, पुरवठ्याची वेळ ही, पुरवठा प्राप्तकर्त्याच्या लेखा पुस्तकातील नोंदीचा दिनांक किंवा प्रदानाचा दिनांक, यांपैकी जो अगोदरचा असेल, तो दिनांक म्हणजे पुरवठ्याची वेळ असेल.

(४) पुरवठादाराने प्रमाणकाचा पुरवठा करण्याच्या प्रकरणात, पुरवठ्याची वेळ ही,—

(क) जर त्यावेळी पुरवठा निश्चित होणार असेल तर, प्रमाणक दिल्याचा दिनांक, हा असेल;

(ख) इतर सर्व, प्रकरणांत, प्रमाणक सोडवणूक (redemption) दिनांक, हा असेल.

(५) पोट-कलम (२), पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने सेवेच्या पुरवठ्याची वेळ निश्चित करणे शक्य नसेल तर, पुरवठ्याची वेळ ही—

(क) जर नियतकालिक विवरण भरावयाचे असेल तर, ज्या दिनांकास असे विवरण भरावयाचे असेल तो दिनांक, किंवा

(ख) इतर कोणत्याही प्रकरणात, कर ज्या दिनांकास प्रदान केला असेल तो दिनांक.

(६) कोणत्याही मोबदल्याच्या विलंबित प्रदानाकरिताचे व्याज, विलंब शुल्क किंवा शास्ती यांद्वारे पुरवठ्याच्या मूल्यातील वाढीच्या मर्यादेपर्यंत संबंधित पुरवठ्याची वेळ ज्या दिनांकास अशी मूल्यामधील वाढ प्राप्त होईल तो दिनांक असेल.

**१४.** कलम १२ किंवा कलम १३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या संबंधातील कराच्या दरात बदल असेल तेव्हा, पुरवठ्याची वेळ पुढील पद्धतीने निश्चित करण्यात येईल :— वस्तूंच्या किंवा सेवांच्या पुरवठ्याच्या संबंधातील कराच्या दरातील बदल.

(क) कराच्या दरात बदल होण्यापूर्वी वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्यात आला असेल तर,—

(एक) जर त्याच्यासाठीचे बीजक कराच्या दरात बदल झाल्यानंतर देण्यात आले असेल आणि प्रदानही नंतर प्राप्त झाले असेल तर, पुरवठ्याची वेळ ही, प्रदान प्राप्त झाल्याची दिनांक किंवा बीजक दिल्याचा दिनांक, यांपैकी जो, अगोदरचा असेल तो, दिनांक असेल; किंवा

(दोन) जर कराच्या दरात बदल होण्याच्या आधी बीजक दिलेले असेल पण प्रदान कराच्या दरात बदल झाल्यानंतर प्राप्त झाले असेल तर, बीजक दिल्याचा दिनांक ही पुरवठ्याची वेळ असेल ; किंवा

(तीन) जर कराच्या दरात बदल होण्याच्या आधी प्रदान प्राप्त झाले असेल, पण त्यासाठीचे बीजक कराच्या दरात बदल झाल्यानंतर देण्यात आले असेल तर, पुरवठ्याची वेळ प्रदान प्राप्त झाल्याचा दिनांक असेल ;

(ख) कराच्या दरात बदल झाल्यानंतर वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्यात आला असेल तर,—

(एक) जर कराच्या दरात बदल झाल्यानंतर प्रदान प्राप्त झाले असेल, पण बीजक, कराच्या दरात बदल होण्याआधीच देण्यात आले असेल तर, पुरवठ्याची वेळ ही प्रदान प्राप्त झाल्याचा दिनांक असेल ; किंवा

(दोन) जर कराच्या दरात बदल होण्याच्या आधी बीजक देण्यात आले असेल आणि प्रदान प्राप्त झाले असेल तर, पुरवठ्याची वेळ ही, प्रदान प्राप्त झाल्याचा दिनांक किंवा बीजक दिल्याचा दिनांक यांपैकी जे अगोदर घडेल तो, असेल ; किंवा

(तीन) जर कराच्या दरात बदल झाल्यानंतर बीजक देण्यात आले असेल पण, कराच्या दरात बदल होण्याच्या आधी प्रदान प्राप्त झाले असेल तर, पुरवठ्याची वेळ ही बीजक दिल्याचा दिनांक ही असेल :

परंतु, प्रदान प्राप्त झाल्याचा दिनांक हा, अशी बँक खात्यातील जमा ही कराच्या दरात बदल झाल्याच्या दिनांकापासून चार कामकाजाच्या दिवसानंतर झाली असेल तर, बँक खात्यात जमा झाल्याचा दिनांक असेल.

**स्पष्टीकरण.––** या कलमाच्या प्रयोजनार्थ, " प्रदान प्राप्त झाल्याचा दिनांक " हा, पुरवठादराच्या लेखा पुस्तकात प्रदानाची नोंद ज्या दिनांकास करण्यात आली असेल तो किंवा त्याच्या बँक खात्यात प्रदान ज्या दिनांकास जमा झाले असेल तो दिनांक, यांपैकी जे अगोदर घडेल, तो असेल.

करपात्र पुरवठ्याचे मूल्य.

**१५.** (१) जेथे पुरवठादार आणि प्राप्तकर्ता संबंधित नाहीत आणि किंमत ही पुरवठ्यासाठीचा एकमेव मोबदला आहे, अशा बाबतीत, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्याचे मूल्य हे, बाजार मूल्य असेल, जे वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या उक्त पुरवठ्यासाठी प्रत्यक्षात देण्यात आलेली किंवा देय किंमत आहे,

(२) पुरवठ्याच्या मूल्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होईल :—

(क) जर पुरवठादाराने स्वतंत्रपणे आकार घेतला असेल तर, हा अधिनियम, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम आणि वस्तू व सेवा कर (राज्यांना भरपाईदेण्याबाबत) अधिनियम यांव्यतिरिक्त त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये आकारलेले कोणतेही कर, शुल्क, उपकर, फी आणि खर्च ;

(ख) अशा पुरवठ्याच्या संबंधात पुरवठादार भरण्यास दायी असेल, पण जी प्राप्तकर्त्याने खर्च केलेली असेल आणि जी वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींसाठी प्रत्यक्षात भरलेल्या किंवा देय असलेल्या किंमतीत समाविष्ट नसेल अशी कोणतीही रक्कम ;

(ग) वस्तूंची पोचवणी किंवा सेवा पुरविण्याच्या वेळी किंवा त्या अगोदर, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरविण्याच्या संबंधात पुरवठादाराने केलेल्या कोणत्याही कृतीसाठी आकारण्यात आलेल्या कोणत्याही रकमेसह, पुरवठादाराने प्राप्तकर्त्यावर आकारलेले कमिशन आणि आवेष्टनावरील खर्च यांसह आनुषंगिक खर्च ;

(घ) कोणत्याही पुरवठ्यासाठी कोणत्याही मोबदल्याच्या प्रलंबित प्रदानासाठीचे व्याज किंवा विलंब फी किंवा शास्ती; आणि

(ङ) केंद्र सरकार व राज्य शासनांनी दिलेले अर्थसहाय्य वगळून मूल्याशी थेट निगडीत असलेले अर्थसहाय्य.

**स्पष्टीकरण**.—या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी, ज्या पुरवठादारास अर्थसहाय्य मिळाले आहे त्याच्या पुरवठा करण्याच्या मूल्यामध्ये अर्थसहाय्याची रक्कम समाविष्ट असेल.

(३) पुरवठा मूल्यामध्ये अशा कोणत्याही सवलतीचा अंतर्भाव असणार नाही, जर,—

(क) पुरवठा करण्यापूर्वी किंवा त्यावेळी देण्यात आलेल्या सवलतीची अशा पुरवठ्याच्या संबंधात दिलेल्या बीजकामध्ये रीतसर नोंद केलेली असेल तर ; आणि

(ख) अशी सवलत पुढीलप्रमाणे, पुरवठा करण्यात आल्यानंतर दिलेली असेल तर,—

(एक) असा पुरवठा करतेवेळी किंवा त्यापूर्वी केलेल्या करारनाम्यानुसार प्रस्थापित झालेली अशी सवलत दिलेली असेल आणि संबंधित बीजकाशी ती विनिर्देशपूर्वक निगडित असेल ; आणि

(दोन) प्राप्तकर्त्याने सवलती इतकी निविष्टी कराची जमा रक्कम पुरवठादाराने दिलेल्या दस्तऐवजाच्या आधारे परत केलेली असेल.

(४) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याचे मूल्य पोट-कलम (१) अन्वये, ठरविता आले नाही तर, ते विहित करण्यात येईल अशा रीतीने निश्चित करता येईल.

(५) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, परिषदेच्या शिफारशींनुसार शासन अधिसूचित करील अशा पुरवठ्याचे मूल्य विहित करण्यात येईल अशा रीतीने निश्चित केले जाईल.

**स्पष्टीकरण**.— या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी,—

(क) ज्या व्यक्ती,—

(एक) एकमेकांच्या धंद्याचे अधिकारी किंवा संचालक आहेत ;

(दोन) धंद्यातील कायदेशीररीत्या मान्यताप्राप्त भागीदार आहेत ;

(तीन) नियोक्ता (मालक) आणि कर्मचारी आहेत ;

(चार) त्या दोघांच्याही पंचवीस टक्के वा त्याहून अधिक शिल्लक मतसाठ्याची किंवा भागांची कोणत्याही व्यक्तीकडे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे मालकी आहे किंवा तिचे नियंत्रण आहे किंवा ती धारण करते :

(पाच) त्यांपैकी एकाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दुसऱ्यावर नियंत्रण करतात ;

(सहा) त्यांपैकी दोघांचेही त्रयस्थ व्यक्तीकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे नियंत्रण केले जाते ;

(सात) ज्या एकत्रितपणे त्रयस्थ व्यक्तीचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे नियंत्रण करतात ; किंवा

(आठ) ज्या एकाच कुटुंबाचे सदस्य आहेत,—

तर, अशा व्यक्तींना " संबंधित व्यक्ती " म्हणून समजण्यात येईल ;

(ख) " व्यक्ती " या संज्ञेमध्ये कायदेशीर व्यक्तींचा देखील समावेश होतो.

(ग) ज्या व्यक्ती एकमेकांच्या धंद्यामध्ये सहयोगी आहेत त्यामध्ये एक व्यक्ती ही दुसरीची, कोणत्याही नावाने वर्णन केलेली, एकमेव अभिकर्ता किंवा एकमेव वितरक किंवा एकमेव सवलतधारक असेल ती संबंधित म्हणून मानली जाईल.

प्रकरण पाच

## निविष्टी कराची जमा रक्कम

निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यासाठीच्या पात्रता व शर्ती.

**१६.** (१) प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, विहित करण्यात येतील अशा शर्ती व निर्बंधास अधीन राहून आणि कलम ४९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, त्याला पुरविण्यात आलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या ज्या तिने तिच्या धंद्याच्या ओघात किंवा धंद्याच्या अभिवृद्धीसाठी वापरल्या असतील किंवा वापरण्याचा तिचा उद्देश असेल अशा कोणत्याही पुरवठ्यावर आकारण्यात आलेली निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यास हक्कदार असेल आणि उक्त रक्कम अशा व्यक्तीच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीत जमा करण्यात येईल.

(२) या कलमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती,—

(क) या अधिनियमान्वये नोंदणीकृत असलेल्या पुरवठादाराने दिलेले कर बीजक, नावे पत्र किंवा विहित करण्यात येईल असे अन्य कोणतेही कर प्रदान दस्तऐवज तिच्या ताब्यात नसतील ;

(ख) तिला वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही प्राप्त झाल्या नसतील ;

**स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनार्थ, पुरवठादाराने अशा नोंदणीकृत व्यक्तीच्या निदेशावरून प्राप्तकर्त्याला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला–मग ती अभिकर्ता म्हणून अथवा अन्यथा कार्य करीत असो–एकतर वस्तुंच्या हक्कासंबंधी दस्तऐवजांचे हस्तांतरण करून अथवा, अन्यथा वस्तुंची ने-आण करण्यापूर्वी किंवा त्यादरम्यान वस्तुंची पोचवणी केली जात असेल त्याबाबतीत, नोंदणीकृत व्यक्तीला त्या वस्तू प्राप्त झाल्याचे मानण्यात येईल.

(ग) कलम ४१ च्या तरतुदींच्या अधीनतेने अशा पुरवठ्याच्या संदर्भात आकारण्यात आलेला कर शासनाच्या नावे रोखीच्या रूपात किंवा उक्त पुरवठ्याच्या संदर्भात अनुज्ञेय असलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचे उपयोजन करून भरला नसेल ; आणि

(घ) तिने कलम ३९ अन्वये विवरण सादर केले नसेल ;

तर तिला पुरविलेल्या वस्तू किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या कोणत्याही पुरवठ्याबाबत कोणत्याही निविष्टी कराच्या जमा रकमेसाठी हक्कदार असणार नाही :

परंतु, बीजकातील वस्तू गठ्ठ्यांमध्ये किंवा हप्त्याने प्राप्त झाल्या असतील तर, नोंदणीकृत व्यक्ती शेवटचा गठ्ठा किंवा हप्ता प्राप्त झाल्यावर कर जमा करण्यास हक्कदार असेल :

परंतु आणखी असे की, ज्यांच्या पुरवठ्यावर प्रत्यावर्ती आकार तत्त्वावर कर देय असेल त्यांव्यतिरिक्त अन्य वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठादारास पुरवठा मूल्याची रक्कम तसेच त्यावरील देय असलेला कर पुरवठादाराने बीजक दिल्याच्या दिनांकापासून एकशे ऐंशी दिवसांच्या कालावधीच्या आत प्राप्तकर्ता, प्रदान करण्यात कसूर करील त्याबाबतीत, प्राप्तकर्त्याने घेतलेली निविष्टी कराच्या जमा रकमेइतकी रक्कम, त्याच्या उद्दिष्टी कर दायित्वामध्ये त्यावरील व्याजासह विहित करण्यात येईल अशा रीतीने जमा करण्यात येईल :

परंतु तसेच, प्राप्तकर्त्याने वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठा मूल्याच्या रकमेचे त्यावरील देय असलेल्या व्याजासह प्रदान केल्यावर, तो निविष्टी कराची जमा रक्कम मिळण्यास हक्कदार असेल.

१९६१ चा ४३. (३) नोंदणीकृत व्यक्तीने आयकर अधिनियम, १९६१ याच्या तरतुदींन्वये भांडवली वस्तू आणि संयंत्र व यंत्रसामग्री यांवरील खर्चाच्या कर घटकावर घसाऱ्याची मागणी केली असेल त्याबाबतीत, उक्त कर घटकावर निविष्टी कराची जमा रक्कम घेण्याची मुभा असणार नाही.

(४) नोंदणीकृत व्यक्ती, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याकरिता, कोणत्याही बीजकाच्या अथवा नावे पत्राच्या बाबतीत, असे बीजक किंवा अशा नावे पत्राच्या संबंधातील बीजक ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतरच्या सप्टेंबर महिन्याकरिता कलम ३९ अन्वये विवरण दाखल करण्याच्या किंवा संबंधित वार्षिक विवरण दाखल केल्याच्या, यांपैकी जे अगोदर घडेल त्या नियत दिनांकानंतर, निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यास पात्र असणार नाही.

जमा रक्कम व रोखलेली जमा रक्कम यांचे संविभाजन.

**१७.** (१) जेथे नोंदणीकृत व्यक्ती, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही अंशतः कोणत्याही व्यापारी उद्देशासाठी व अंशतः इतर उद्देशासाठी वापरीत असेल, तेथे जमा रक्कम ही त्याच्या व्यापाराच्या उद्देशासाठी संबंधित असेल तेवढ्या निविष्टी कराच्या रकमेइतकी निर्बंधित असेल.

(२) जेथे नोंदणीकृत व्यक्ती या अधिनियमान्वये किंवा एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये अंशतः शून्याधारित दर पुरवठ्यांसह करपात्र पुरवठ्याचा आणि अंशतः करमाफ पुरवठा करण्याकरिता वस्तुंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा वापर करते तेथे, जमा रक्कम ही, शून्याधारित दर पुरवठ्यांसहित उक्त करपात्र पुरवठ्याकरिता संबंधित असेल तेवढ्या निविष्टी कराच्या रकमेइतकी निर्बंधित असेल.

(३) पोट-कलम (२) खालील करमाफ पुरवठ्याचे पुरवठा मूल्य हे, विहित केल्याप्रमाणे असेल आणि त्यात ज्यावर प्राप्तकर्ता प्रत्यावर्ती आकार तत्त्वावर कर भरण्यास पात्र असेल, असा पुरवठा रोख्यांवरील व्यवहार, जमिनीची विक्री आणि अनुसूची दोन मधील ५ व्या परिच्छेदातील खंड (ख) च्या अधीन राहून, इमारतीची विक्री यांचा अंतर्भाव असेल.

(४) ठेवी स्वीकारणे, कर्जे किंवा आगाऊ रकमा देणे यांद्वारे सेवा पुरविणारी बँकिंग कंपनी किंवा वित्तीय संस्था तसेच बँकेतर वित्तीय कंपनी यांच्याकडे एकतर पोट-कलम (२) च्या तरतुदींचे पालन करण्याचा विकल्प असेल किंवा प्रत्येक महिन्याला, त्या महिन्यामधील निविष्टी, भांडवली वस्तू आणि निविष्टी सेवा यांवर पात्र निविष्टी कर जमा रकमेच्या पन्नास टक्के रकमेएवढी रक्कम मिळण्याचा विकल्प असेल आणि उर्वरित रक्कम व्यपगत होईल :

परंतु, एकदा वापरलेला पर्याय त्या वित्तीय वर्षाच्या उर्वरित कालावधीमध्ये मागे घेता येणार नाही :

परंतु आणखी असे की, एकच स्थायी लेखा क्रमांक असणाऱ्या एका नोंदणीकृत व्यक्तीने दुसऱ्या नोंदणीकृत व्यक्तीला केलेल्या पुरवठ्यावर प्रदान करण्यात आलेल्या कराबाबत, पन्नास टक्क्यांचा निर्बंध लागू असणार नाही.

(५) कलम १६ च्या पोट-कलम (१) मध्ये व कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निविष्टी कर जमा पुढील बाबतीत उपलब्ध असणार नाहीत :—

(क) मोटार वाहन व इतर वाहतुकीची साधने, याचा वापर पुढील बाबतीत केला असेल त्याव्यतिरिक्त,—

(एक) खाली नमूद केलेल्या करपात्र पुरवठ्यासाठी असेल,

(क) अशा वाहनांचा किंवा वाहतुकीच्या साधनांचा आणखी पुरवठा करण्यासाठी ; किंवा

(ख) प्रवाशांच्या वाहतुकीसाठी ; किंवा

(ग) अशा वाहनांचा किंवा वाहतुकीच्या साधनांचा वाहन चालविण्याचे, हवाई उड्डाणाचे, जलवाहतुकीचे प्रशिक्षण देण्यासाठी ;

(दोन) वस्तुंच्या वाहतुकीसाठी असेल,

(ख) खालील वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्यासाठी असेल,—

(एक) विशिष्ट प्रवर्गाच्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा आवक पुरवठा जर नोंदणीकृत व्यक्तीने त्याच प्रवर्गाच्या वस्तूंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा जावक करपात्र पुरवठा करण्यासाठी किंवा करपात्र संयुक्त किंवा मिश्र घटकासाठी वापरला असेल त्याखेरीज अन्न व पेये, बाह्य खाद्यपेयव्यवस्था, सौंदर्योपचार, आरोग्य सेवा, सौंदर्य प्रसाधने आणि सुघटन शल्यचिकित्सा (प्लॅस्टिक सर्जरी) ;

(दोन) क्लब, आरोग्य व स्वास्थ केंद्राचे सदस्यत्व ;

(तीन) (क) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये, नियोक्त्याला त्याच्या कर्मचारीवर्गासाठी बंधनकारक केलेल्या असतील अशा शासनाने अधिसूचित केलेल्या सेवांखेरीज ; किंवा

(ख) विशिष्ट प्रवर्गाच्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा आवक पुरवठा जर नोंदणीकृत व्यक्तीने त्याच प्रवर्गाच्या जावक करपात्र पुरवठ्यासाठी किंवा करपात्र संयुक्त किंवा मिश्र पुरवठ्याचा भाग म्हणून वापरला असेल त्याखेरीज,

भाड्याची गाडी, आयुर्विमा आणि आरोग्य विमा या सेवा ; आणि

(चार) रजा किंवा स्वग्राम प्रवास सवलत यांसारख्या सुट्टीतील रजेवरील नोकरदारांसाठी देण्यात येणारे प्रवास लाभ ;

(ग) जेथे कार्य कंत्राट सेवेच्या पुढील पुरवठ्यासाठीची निविष्टी सेवा असेल ती वगळून संयंत्र व यंत्र- सामग्री यांहून अन्य स्थावर मालमत्तेच्या बांधकामासाठी जेव्हा सेवा पुरविण्यात आली असेल अशी कार्य कंत्राट सेवा ;

(घ) संयंत्रे व यंत्रसामग्री यांहून अन्य स्थावर मालमत्तेच्या बांधकामासाठी स्वतःकरिता, प्राप्त केलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही ; करपात्र व्यक्तीने जेव्हा अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही धंद्याच्या ओघात किंवा धंद्याच्या अभिवृद्धीसाठी वापरल्या असतील त्यासह ;

**स्पष्टीकरण.––** खंड (ग) व (घ) च्या प्रयोजनार्थ " बांधकाम " या शब्दप्रयोगामध्ये, भांडवलीकरणाच्या मर्यादेपर्यंत उक्त स्थावर मालमत्तेचे पुनर्बांधकाम, नूतनीकरण, अतिरिक्त बांधकाम, किंवा फेरफार किंवा दुरुस्ती, याचा समावेश होतो ;

(ङ) कलम १० अन्वये ज्यावर कर प्रदान करण्यात आला आहे अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही ;

(च) अनिवासी करपात्र व्यक्तीने आयात केलेल्या वस्तूंखेरीज त्याने प्राप्त केलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही ;

(छ) वैयक्तिक उपभोगासाठी वापरलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही ;

(ज) हरवलेल्या, चोरी झालेल्या, नष्ट केलेल्या, निर्लेखित केलेल्या किंवा देणगी किंवा मोफत नमुने या मार्गाने विल्हेवाट केलेल्या वस्तू ; आणि

(झ) कलम ७४, १२९ व १३० च्या संदर्भात प्रदान केलेला कोणताही कर.

(६) शासनास, या बाबतीत, ज्या रीतीने पोट-कलम (१) व (२) मध्ये निर्दिष्ट केलेली जमा रक्कम निर्देशित करण्यात येईल ती रीत विहित करता येईल.

**स्पष्टीकरण**.— या प्रकरणाच्या व प्रकरण सहाच्या प्रयोजनार्थ, " संयंत्र आणि यंत्रसामग्री " या शब्दांचा अर्थ वस्तू किंवा सेवा अथवा दोन्ही यांचा जावक पुरवठा करण्यासाठी वापरण्यात येत असलेला तलाधार (फाऊन्डेशन) किंवा संरचनात्मक आधार याद्वारे भूमिशी स्थिरीकृत उपकरण, साधनसामग्री व यंत्रसामग्री, असा आहे आणि त्यात अशा तळाधारांचा व संरचनात्मक आधाराचा समावेश होतो. परंतु,—

(एक) जमीन, इमारत किंवा इतर स्थापत्य संरचना ;

(दोन) दूरसंचार मनोरे ; आणि

(तीन) कारखान्याच्या आवाराच्या बाहेर टाकलेले नळमार्ग,

यांचा समावेश होत नाही.

विशेष परिस्थितीतील जमा रकमेची उपलब्धता.

**१८.** (१) विहित करता येतील अशा शर्तीस व निर्बंधांस अधीन राहून,—

(क) ज्या व्यक्तीने, ती ज्या दिनांकास नोंदणी करण्यासाठी पात्र ठरत असेल अशा दिनांकापासून तीस दिवसांच्या आत या अधिनियमान्वये नोंदणीसाठी अर्ज केला असेल आणि अशा नोंदणीसाठी मान्यता देण्यात आली असेल ती व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये ती ज्या दिनांकास कर भरण्यास दायी ठरत असेल त्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिवशी साठ्यात धारण केलेल्या निविष्टीच्या आणि साठ्यात धारण केलेल्या अर्ध-तयार (सेमी फिनिश) किंवा तयार वस्तूमध्ये अंतर्भूत असलेल्या निविष्टीच्या संबंधात निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यासाठी हक्कदार असेल.

(ख) ज्या व्यक्तीने, कलम २५ च्या पोट-कलम (३) अन्वये नोंदणी केली असेल ती व्यक्ती, नोंदणीस मान्यता दिल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिवशी साठ्यात धारण केलेल्या निविष्टीच्या आणि साठ्यात धारण केलेल्या अर्ध-तयार किंवा तयार वस्तूमध्ये अंतर्भूत असलेल्या निविष्टीच्या संबंधात, निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यासाठी हक्कदार असेल.

(ग) जेव्हा कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीने, कलम १० खालील कर भरण्याचे बंद केले असेल त्याबाबतीत, ती, कलम ९ अन्वये ज्या दिनांकास कर भरण्यास दायी ठरत असेल त्या दिनांकाच्या आणि भांडवली वस्तूंवरील लगतपूर्वीच्या दिवशी साठ्यात धारण केलेल्या निविष्टीच्या, साठ्यात धारण केलेल्या अर्ध-तयार किंवा तयार वस्तूमध्ये अंतर्भूत असलेल्या निविष्टीच्या संबंधातील आणि भांडवली वस्तूंवरील निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यासाठी हक्कदार असेल :

परंतु, भांडवली वस्तुवरील कराची जमा रक्कम, विहित करता येईल अशा गुणांच्या टक्केवारीने कमी करण्यात येईल.

(घ) जेव्हा एखाद्या नोंदणीकृत व्यक्तीने केलेला वस्तू किंवा सेवा किंवा या दोन्हींचा करमाफ पुरवठा, करपात्र पुरवठा ठरत असेल तेव्हा अशा बाबतीत, अशी व्यक्ती, असा पुरवठा ज्या दिनांकास करपात्र ठरला असेल त्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिवशी अशा करमाफ पुरवठ्याशी संबंधित असलेल्या साठ्यामध्ये धारण केलेल्या निविष्टीच्या साठ्यात, धारण केलेल्या अर्ध-तयार किंवा तयार वस्तूमध्ये अंतर्भूत असलेल्या निविष्टीच्या संबंधातील आणि अशा करमाफ पुरवठ्यासाठीच केवळ वापरलेल्या भांडवली वस्तुवरील निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यास हक्कदार असेल :

परंतु, भांडवली वस्तुवरील कराची जमा रक्कम, विहित करता येईल अशा गुणांच्या टक्केवारीने कमी करण्यात येईल.

(२) एखादी नोंदणीकृत व्यक्ती, तिला केलेल्या कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीच्या कोणत्याही पुरवठ्याबाबतीत अशा पुरवठ्याशी संबंधित असणाऱ्या कर बीजकाच्या दिनांकापासून एक वर्ष संपल्यानंतर पोट-कलम (१) अन्वये निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यासाठी हक्कदार असणार नाही.

(३) धंद्याची विक्री, विलिनिकरण, विलगीकरण, एकत्रीकरण, भाडेपट्टा किंवा हस्तांतरण या कारणांमुळे जेव्हा दायित्वांच्या हस्तांतरणाच्या विनिर्दिष्ट तरतुदीनुसार नोंदणीकृत व्यक्तीच्या रचनेत काही बदल झाला असेल त्याबाबतीत, उक्त नोंदणीकृत व्यक्तीस, विहित करता येईल अशा रीतीने, अशी विक्री, विलीनिकरण, विलगीकरण, एकत्रीकरण, भाडेपट्टा किंवा हस्तांतरण केलेल्या धंद्यातील त्याच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीमध्ये जी वापराविना पडून राहिलेली आहे ती निविष्टी कराची जमा रक्कम हस्तांतरित करण्याची मुभा देण्यात येईल.

(४) जेव्हा निविष्टी कराच्या जमा रकमेचा लाभ घेतलेली नोंदणीकृत व्यक्ती, कलम १० अन्वये कर भरण्याचा पर्याय स्वीकारते तेव्हा, किंवा जेव्हा तिने पुरवठा केलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही पूर्णपणे करमाफ झालेल्या असतील तेव्हा, ती, असा पर्याय वापरल्याच्या दिनांकाच्या किंवा यथास्थिति, अशी करमाफी मिळाल्याच्या दिनांकाच्या लगत पूर्वीच्या दिवशी विहित करण्यात येईल अशा गुणांच्या टक्केवारीने कमी केलेली साठ्यात धारण केलेल्या निविष्टीच्या किंवा साठ्यात धारण केलेल्या अर्ध-तयार किंवा तयार वस्तूमध्ये अंतर्भूत असलेल्या निविष्टीच्या भांडवली वस्तुवरील आणि निविष्टी कराच्या जमा रकमे-इतकी रक्कम, इलेक्ट्रॉनिक जमा खातेवही जमा किंवा इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवही यामध्ये खर्ची घालून त्याद्वारे प्रदान करील :

परंतु, अशी रक्कम प्रदान केल्यानंतर, तिच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीमध्ये पडून असणारी, निविष्टी जमा कराची शिल्लक रक्कम, कोणतीही असल्यास, व्यपगत होईल.

(५) पोट-कलम (१) खालील जमा रक्कम आणि पोट-कलम (४) खाली देय असलेली रक्कम यांची विहित करण्यात येईल अशा रीतीने परिगणना करण्यात येईल.

(६) ज्यावर निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यात आली आहे अशा भांडवली वस्तुंच्या किंवा संयंत्राच्या व यंत्रसामग्रीच्या पुरवठाच्या बाबतीत, नोंदणीकृत व्यक्ती, विहित करता येईल अशा गुणांच्या टक्केवारीने कमी केलेला उक्त भांडवली वस्तुवर किंवा संयंत्रे व यंत्रसामग्री यांवर घेण्यात आलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेइतकी रक्कम किंवा कलम १५ अन्वये निश्चित केलेल्या अशा भांडवली वस्तुच्या किंवा संयत्रे व यंत्रसामग्री यांच्या बाजार मुल्यांवरील कर, यांपैकी जी अधिक असेल तेवढी रक्कम प्रदान करील :

परंतु, जेव्हा भंगार म्हणून उत्तापसाही विटा, साचे व दाबसाचे, चाळण्या व खिळण्या यांचा पुरवठा करण्यात येत असेल तेव्हा, करपात्र व्यक्तीस, कलम १५ अन्वये निश्चित केल्या अशा वस्तुच्या बाजार मुल्यांवरील कर प्रदान करता येईल.

उक्त्या कामासाठी पाठविलेल्या निविष्टीच्या आणि भांडवली वस्तुंच्या बाबतीत निविष्टी कराची जमा रक्कम घेणे.

**१९.** (१) प्रकर्त्यास, विहित करण्यात येईल, अशा अटी व निर्बंधांच्या अधीन राहून उक्त्या कामासाठी उक्त्या कामगाराला पाठवलेल्या निविष्टीवरील निविष्टी कराची जमा रक्कम मिळण्याची मुभा असेल.

(२) कलम १६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रकर्ता जरी त्याच्या धंद्याच्या ठिकाणी प्रथम निविष्टी न आणता, उक्त्या कामासाठी उक्त्या कामगाराकडे थेट निविष्टी पाठविलेली असली तरी देखील निविष्टीवरील निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यासाठी हक्कदार असेल.

(३) जेव्हा उक्त्या कामासाठी पाठविलेल्या निविष्टी, त्या पाठविण्यात आल्यापासून एक वर्षाच्या कालावधीमध्ये उक्ते काम पूर्ण झाल्यानंतर किंवा अन्यथा प्रकर्त्यास परत मिळाल्या नसतील, किंवा उक्त्या कामगाराच्या धंद्याच्या ठिकाणापासून कलम १४३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) किंवा खंड (ख) नुसार पुरवठा करण्यात आल्या नसतील तेव्हा, ज्या दिवशी उक्त निविष्टी पाठविल्या होत्या त्या दिवशी प्रकर्त्याद्वारे उक्त्या कामगाराला अशा निविष्टी पुरविण्यात आल्या होत्या असे मानण्यात येईल :

परंतु, जेव्हा अशा निविष्टी थेट उक्त्या कामगारास पाठविण्यात येत असतील तेव्हा, एक वर्षाचा कालावधी हा, उक्त्या कामगाराला निविष्टी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून मोजण्यात येईल.

(४) प्रकर्त्यास, विहित करण्यात येईल अशा शर्तीस व निर्बधांस अधीन राहून, उक्त्या कामासाठी उक्त्या कामगाराला पाठविलेल्या भांडवली वस्तुंवर निविष्टी कराची जमा रक्कम मिळण्याची मुभा असेल.

(५) कलम १६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रकर्त्याने जरी भांडवली वस्तू प्रथम त्याच्या कामाच्या ठिकाणी न आणता थेट उक्त्या कामासाठी उक्त्या कामगाराकडे पाठविल्या असल्या तरीदेखील भांडवली वस्तुंवर निविष्टी करांची जमा रक्कम घेण्यास प्रकर्ता हक्कदार असेल.

(६) जेव्हा उक्त्या कामासाठी पाठविलेल्या भांडवली वस्तू त्या पाठविण्यात आल्यापासून तीन वर्षांच्या कालावधीत प्रकर्त्यास परत मिळाल्या नसतील, तेव्हा ज्या दिवशी उक्त भांडवली वस्तू पाठविल्या होत्या त्या दिवशी, अशा भांडवली वस्तुंचा प्रकर्त्याद्वारे उक्त्या कामगाराला पुरवठा करण्यात आला होता असे मानण्यात येईल :

परंतु, जेव्हा अशा भांडवली वस्तू थेट उक्त्या कामगाराला पाठविण्यात येत असतील तेव्हा तीन वर्षांचा कालावधी हा उक्त्या कामगाराला भांडवली वस्तू प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून मोजण्यात येईल.

(७) पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (६) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, उक्त्या कामासाठी उक्त्या कामगारांना पाठविलेले साचे व दाबसाचे, चाळण्या व खिळण्या किंवा हत्यारे यांना लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण**.— या कलमाच्या प्रयोजनार्थ "प्रकर्ता" याचा अर्थ, कलम १४३ मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती, असा आहे.

निविष्टी सेवा वितरकाने जमा रकमेचे वितरण करण्याची रीत.

**२०.** (१) निविष्टी सेवा वितरक, विहित करण्यात येईल अशा रीतीने, वितरित करण्यात येणाऱ्या निविष्टी कराची जमा रक्कम अंतर्भूत असणारे दस्तऐवज देऊन, त्याद्वारे राज्य कर हा राज्य कर किंवा एकात्मिक कर म्हणून आणि एकात्मिक कर हा एकात्मिक कर किंवा राज्य कर म्हणून वितरित करील.

(२) निविष्टी सेवा वितरकास, पुढील शर्तींस अधीन राहून, जमा रक्कम वितरित करता येईल :—

(क) जमा रक्कम विहित करता येईल अशा तपशीलांचा समावेश असलेल्या दस्तऐवजानुसार जमा रकमेच्या प्राप्तकर्त्यास वितरित करता येऊ शकेल ;

(ख) वितरित केलेली जमा रक्कम, वितरणासाठी उपलब्ध असलेल्या जमा रकमेपेक्षा अधिक असणार नाही ;

(ग) जमा रकमेच्या प्राप्तकर्त्याशी संबंधित असलेल्या निविष्टी सेवांवर प्रदान केलेल्या कराची जमा रक्कम, केवळ त्याच प्राप्तकर्त्यास वितरित करण्यात येईल ;

(घ) जमा रकमेच्या एकाहून अधिक प्राप्तकर्त्यांशी संबंधित असलेल्या निविष्टी सेवांवर प्रदान केलेल्या कराची जमा रक्कम, ज्यांच्याशी निविष्टी सेवा संबधित असेल अशा प्राप्तकर्त्यांमध्ये वितरित करण्यात येईल आणि असे वितरण, संबंद्ध कालावधीतील अशा प्राप्तकर्त्याच्या राज्यातील उलाढालीच्या किंवा संघराज्य क्षेत्रातील उलाढालीच्या आधारे, ज्यांच्याशी अशा निविष्टी सेवा संबंधित असतील आणि जे उक्त संबंद्ध कालावधीमधील चालू वर्षात कार्यरत असतील, अशा सर्व प्राप्तकर्त्यांच्या एकूण उलाढालीच्या यथाप्रमाणात करण्यात येईल ;

(ङ) जमा रकमेच्या सर्व प्राप्तकर्त्यांशी संबंधित असलेल्या निविष्टी सेवांवर प्रदान केलेली कराची जमा रक्कम, अशा प्राप्तकर्त्यामध्ये वितरित करण्यात येईल आणि असे वितरण, संबंद्ध कालावधीतील अशा प्राप्तकर्त्यांच्या राज्यातील उलाढालींच्या किंवा संघराज्य क्षेत्रातील उलाढालींच्या आधारे, जे उक्त कालावधीमधील चालू वर्षात कार्यरत असतील त्या सर्व प्राप्तकर्त्यांच्या एकूण उलाढालीच्या यथाप्रमाण करण्यात येईल.

**स्पष्टीकरण**.— या कलमाच्या प्रयोजनार्थ,–

(क) " संबद्ध कालावधी " हा,–

(एक) जर, जमा रकमेच्या प्राप्तकर्त्याची ज्या वर्षात जमा रक्कम वितरित करावयाची असेल, त्या वर्षाच्या आधीच्या वित्तीय वर्षात त्यांच्या राज्यांत किंवा संघराज्य क्षेत्रांत उलाढाल असेल ते उक्त वित्तीय वर्ष; किंवा

(दोन) जर, जमा रकमेच्या काही किंवा सर्व प्राप्तकर्त्यांची ज्या वर्षात जमा रक्कम वितरित करावयाची असेल त्या वर्षाच्या आधीच्या वित्तीय वर्षामध्ये त्यांच्या राज्यांत किंवा संघ राज्यक्षेत्रांत कोणतीही उलाढाल नसेल, तर ज्या महिन्यात जमा रक्कम वितरित करावयाची असेल त्या महिन्याच्या आधीची जेव्हा अशा सर्व प्राप्तकर्त्यांच्या अशा उलाढालीचा तपशील उपलब्ध असेल ती अंतिम तीमाही.

(ख) " जमा रकमेचा प्राप्तकर्ता " या शब्दप्रयोगाचा अर्थ, निविष्टी सेवा वितरकाकडील असलेल्या स्थायी खाते क्रमांक (पॅन) असलेला वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही यांचा पुरवठादार, असा आहे.

(ग) या अधिनियमान्वये करपात्र वस्तू तसेच करपात्र नसलेल्या वस्तू यांचा पुरवठा करणाऱ्या कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीच्या संबंधातील " उलाढाल " याचा अर्थ, संविधानाच्या सातव्या अनुसूचीच्या सूची एकच्या नोंद ८४ अन्वये आणि उक्त अनुसूचीच्या सूची दोनच्या नोंद ५१ व ५४ अन्वये आकारण्यात आलेल्या कोणत्याही शुल्काच्या किंवा कराच्या रकमेद्वारे घटविण्यात आलेले उलाढालीचे मूल्य, असा आहे.

अधिक रकमेने वितरित करण्यात आलेल्या जमा रकमेच्या वसुलीची रीत.

**२१.** निविष्टी सेवावितरकाने कलम २० मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करून जमा रकमेचे वितरण केल्याच्या परिणामी, जमा रकमेच्या एका व त्यापेक्षा अधिक प्राप्तकर्त्यास जमा रकमेचे अतिरिक्त वितरण केल्यास, अशा प्रकारे वितरित करण्यात आलेली अधिक जमा रक्कम अशा प्राप्तकर्त्यांकडून व्याजासह वसूल करण्यात येईल आणि अशी वसूल करावयाची रक्कम निश्चित करण्यासाठी कलम ७३ किंवा यथास्थिति, कलम ७४ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह त्यास लागू होतील.

प्रकरण सहा

## नोंदणी

नोंदणीसाठी पात्र व्यक्ती.

**२२.** (१) राज्यात वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही यांचा करपात्र पुरवठा करणाऱ्या प्रत्येक पुरवठादाराची वित्तीय वर्षातील एकूण उलाढाल जर वीस लाखांपेक्षा अधिक असेल, तर असा पुरवठादार या अधिनियमान्वये नोंदणी करावयासाठी पात्र असेल :

परंतु, जेव्हा विशिष्ट प्रवर्गातील राज्यांमध्ये वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा करपात्र पुरवठा करणाऱ्या अशा व्यक्तीची वित्तीय वर्षातील एकूण उलाढाल जर दहा लाखांपेक्षा अधिक असेल, तर अशी व्यक्ती नोंदणी करावयासाठी पात्र असेल.

(२) प्रत्येक व्यक्ती, जिने विद्यमान कायद्यान्वये नियत दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास नोंदणी केली आहे किंवा लायसन धारण केले आहे, ती त्या नियत दिनांकापासून या अधिनियमान्वये नोंदणी करण्यास पात्र असेल.

(३) जेव्हा या अधिनियमाखालील एखाद्या नोंदणीकृत करपात्र व्यक्तीने, ती करीत असलेला एखादा धंदा, धंदा म्हणून अन्य व्यक्तीला मग तो उत्तराधिकारी असल्यामुळे किंवा अन्यथा असो—हस्तांतरित केला असेल तर अशी हस्तांतरिती किंवा, यथास्थिति, असा उत्तराधिकारी, असे हस्तांतरण केल्याच्या किंवा असा उत्तराधिकारी नेमल्याच्या दिनांकापासून नोंदणी करण्यास पात्र असेल.

(४) पोट-कलमे (१) व (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या योजनेच्या मंजुरीनुसार हस्तांतरण किंवा त्याचे एकत्रीकरण करण्यासाठीची व्यवस्था करण्याच्या बाबतीत किंवा, यथास्थिति, दोन किंवा अधिक कंपन्यांचे विलगीकरण उच्च न्यायालय, न्यायाधिकरण यांच्या आदेशानुसार किंवा अन्यथा झाले असेल, तर, उच्च न्यायालय किंवा न्यायाधिकरण यांचे असे आदेश अंमलात आणण्यासाठी कंपनी निबंधकाने ज्या दिनांकापासून विधिसंस्थापन प्रमाणपत्र निर्गमित केले असेल त्या दिनांकापासून अशी हस्तांतरिती नोंदणी करण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) " एकूण उलाढाल " या शब्दप्रयोगामध्ये करपात्र व्यक्तीने केलेला सर्व पुरवठा-मग तो त्याने स्वतः केलेला असो किंवा त्याच्या सर्व प्रकर्त्यांच्या वतीने केलेला असो, याचा समावेश होतो ;

(दोन) नोंदणीकृत उक्त्या कामगाराने उक्ते काम पूर्ण केल्यानंतर अशा वस्तुंचा पुरवठा हा कलम १४३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकर्त्याने वस्तुंचा पुरवठा केला असल्याचे मानण्यात येईल आणि अशा वस्तुंचे मूल्य नोंदणीकृत उक्त्या कामगाराच्या एकूण उलाढालीमध्ये समाविष्ट केले जाणार नाही.

(तीन) " विशेष प्रवर्ग राज्ये " या शब्दाचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २७९ क च्या खंड (४) च्या उप खंड (छ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली राज्ये, असा आहे.

**२३.** (१) पुढील व्यक्ती नोंदणीसाठी पात्र असणार नाहीत :— नोंदणीसाठी पात्र नसणाऱ्या व्यक्ती.

(क) या अधिनियमान्वये किंवा एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये, ज्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही करपात्र नसतील अथवा ज्यांना करातून संपूर्णपणे सूट देण्यात आली असेल केवळ अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्याचा धंदा करणारी कोणतीही व्यक्ती ;

(ख) शेत जमिनीच्या लागवडी मधील शेत मालांच्या मर्यादेपर्यंत पुरवठा करणारा शेतकरी ;

(२) शासन, परिषदेच्या शिफारशींवरून, या अधिनियमान्वये, ज्या व्यक्तींना नोंदणी करण्यामधून सूट देता येईल असा व्यक्तींचा प्रवर्ग अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील.

विवक्षित प्रकरणांमध्ये सक्तीची नोंदणी.

**२४.** कलम २२ च्या पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये पुढील व्यक्तींच्या प्रवर्गांना नोंदणी करणे आवश्यक असेल,—

(एक) कोणताही आंतरराज्य करपात्र पुरवठा करणाऱ्या व्यक्ती ;

(दोन) करपात्र पुरवठा करणारी नैमित्तिक करपात्र व्यक्ती ;

(तीन) प्रत्यावर्ती आकारणीअन्वये कर भराव्या लागणाऱ्या व्यक्ती ;

(चार) कलम ९ च्या पोट-कलम (५) अन्वये कर भरावा लागणारी व्यक्ती ;

(पाच) करपात्र पुरवठा करणारी अनिवासी करपात्र व्यक्ती ;

(सहा) कलम ५१ अन्वये कर वजात करणे आवश्यक असणाऱ्या व्यक्ती, मग त्यांनी या अधिनियमान्वये स्वतंत्रपणे नोंदणी केलेली असो किंवा नसो ;

(सात) अभिकर्ता म्हणून किंवा अन्यथा, इतर करपात्र व्यक्तींच्या वतीने वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा करपात्र पुरवठा करणाऱ्या व्यक्ती ;

(आठ) निविष्टी सेवा वितरक, मग त्याने या अधिनियमान्वये स्वतंत्रपणे नोंदणी केलेली असो किंवा नसो ;

(नऊ) कलम ९ च्या पोट-कलम (५) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या पुरवठ्याखेरीज वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही यांचा ज्यांच्याकडून कलम ५२ अन्वये मूळ स्त्रोतातून कर गोळा करणे आवश्यक आहे अशा इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकाद्वारे पुरवठा करणाऱ्या व्यक्ती ;

(दहा) प्रत्येक इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालक ;

(अकरा) भारताबाहेरून भारतातील नोंदणीकृत व्यक्तीखेरीज अन्य व्यक्तीला ऑनलाईन माहिती किंवा संगणक माहिती सुविधा किंवा पुन:प्राप्त सेवा यांचा पुरवठा करणारी प्रत्येक व्यक्ती ; आणि

(बारा) परिषदेच्या शिफारशींवरून शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल त्याप्रमाणे अशी इतर व्यक्ती किंवा व्यक्तींचा प्रवर्ग.

नोंदणीची कार्यपद्धती.

**२५.** (१) कलम २२ किंवा कलम २४ अन्वये, नोंदणी करण्यास पात्र असलेली प्रत्येक व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींच्या अधीन राहून, नोंदणी करण्यास पात्र ठरत असेल अशा दिनांकापासून तीस दिवसांच्या आत नोंदणीसाठी अर्ज करील :

परंतु, नैमित्तिक करपात्र व्यक्ती किंवा अनिवासी करपात्र व्यक्ती, धंदा सुरू करण्यापूर्वी किमान पाच दिवस अगोदर नोंदणीसाठी अर्ज करील.

**स्पष्टीकरण.—** जी भारताच्या क्षेत्रीय जलधीमधून पुरवठा करते अशी प्रत्येक व्यक्ती जेथे समुचित आधार- रेषा ज्या राज्याच्या निकटतम ठिकाणी स्थित असेल अशा राज्यात नोंदणी मिळवील.

(२) या अधिनियमान्वये नोंदणीची मागणी करणाऱ्या व्यक्तीला एकच नोंदणी मंजूर करण्यात येईल :

परंतु, राज्यामध्ये धंद्याचे बहुविध भिन्नस्तरीय विभाग असणाऱ्या व्यक्तीला विहित करण्यात येईल अशा शर्तींना अधीन राहून, प्रत्येक वेगवेगळ्या धंद्याच्या भिन्नस्तरीय विभागासाठी स्वतंत्र नोंदणी मंजूर करण्यात येईल.

(३) एखादी व्यक्ती कलम २२ किंवा कलम २४ अन्वये नोंदणी करण्यासाठी पात्र नसली तरी सुद्धा त्या व्यक्तीस स्वेच्छेने स्वतःहून नोंदणी करता येईल आणि नोंदणीकृत व्यक्तीला या अधिनियमाच्या सर्व तरतुदी जशा लागू होतात तशाच त्या अशा व्यक्तीस लागू होतील.

(४) अशी व्यक्ती, जिने एकाहून अधिक नोंदणी प्राप्त केली असेल किंवा तिला प्राप्त करणे आवश्यक असेल, मग ते एका राज्यात किंवा संघ राज्यक्षेत्रात अथवा एका किंवा त्यापेक्षा अधिक राज्यात किंवा संघ राज्यक्षेत्रात असो—तिला अशा प्रत्येक नोंदणीसंबंधात या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, भिन्न व्यक्ती मानण्यात येईल.

(५) जेव्हा, अशी व्यक्ती, जिने एखाद्या आस्थापनेच्या संदर्भात एका राज्यात किंवा संघ राज्यक्षेत्रात नोंदणी  प्राप्त केली असेल अथवा तिला प्राप्त करणे आवश्यक असेल आणि त्याची आस्थापना अन्य राज्यात किंवा संघ राज्यक्षेत्रात असेल तर अशा आस्थापना या, अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, भिन्न व्यक्तींच्या आस्थापना असल्याचे मानण्यात येईल.

१९६१ चा ४३. (६) प्रत्येक व्यक्तीकडे नोंदणी करण्यासाठी पात्र असण्याच्या दृष्टीने, आयकर अधिनियम, १९६१ अन्वये दिलेला स्थायी खाते क्रमांक असला पाहिजे :

परंतु, कलम ५१ अन्वये कराची वजात करणे आवश्यक असेल अशा व्यक्तीकडे, स्थायी खाते क्रमांकाऐवजी, नोंदणीस मंजुरी देण्यासाठी पात्र असण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमान्वये दिलेला करवजावट व करसंकलन खाते क्रमांक (टॅन) असला पाहिजे.

(७) पोट-कलम (६) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विहित करण्यात येईल अशा इतर कागदपत्राच्या आधारे, पोट-कलम (१) अन्वये अनिवासी करपात्र व्यक्तीस नोंदणी मंजूर करण्यात येईल.

(८) या अधिनियमान्वये नोंदणी करण्यास पात्र असणाऱ्या व्यक्तीने नोंदणी करण्यात कसूर केली असेल तर, समुचित अधिकाऱ्यास, या अधिनियमान्वये अथवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये करण्यात येईल त्या कोणत्याही कार्यवाहीस हानी न पोचवता विहित करण्यात येईल अशा रीतीने अशा व्यक्तीची नोंदणी करण्याची कार्यवाही सुरू करता येईल.

(९) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,–

(क) संयुक्त राष्ट्र संघटनेची कोणतीही विशेषीकृत एजन्सी, किंवा संयुक्त राष्ट्रे (विशेषाधिकार व प्रतिक्षमता) अधिनियम, १९४७ अन्वये अधिसूचित करण्यात आलेली कोणतीही बहुपक्षीय वित्तीय संस्था व संघटना, राज्य वाणिज्य दूतावास किंवा परराष्ट्रीय दूतावास यांना,

(ख) आयुक्त अधिसूचित करील त्याप्रमाणे कोणतीही अन्य व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग,

यांना विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा प्रयोजनार्थ विशिष्ट ओळख क्रमांक देण्यात येईल व त्यामध्ये त्यांनी प्राप्त केलेल्या अधिसूचित वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीं यांवरील यांच्या पुरवठ्यावरील कराच्या परताव्याचा समावेश असेल.

(१०) नोंदणी व विशिष्ट ओळख क्रमांक, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीत योग्य पडताळणी केल्यानंतर मंजूर करण्यात येईल, किंवा, यथास्थिति, नामंजूर करण्यात येईल.

(११) नोंदणीचे प्रमाणपत्र, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा दिनांकापासून देण्यात येईल.

(१२) पोट-कलम (१०) अन्वये विहित केलेल्या कालावधीत अर्जदाराला कोणतीही त्रुटी कळविली नसेल तर, सदर कालावधी समाप्त झाल्यावर त्यास मंजूर झाला असल्याचे मानण्यात येईल.

मानीव नोंदणी.

**२६.** (१) केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये नोंदणी किंवा विशिष्ट ओळख क्रमांक मंजूर करणे म्हणजे, या अधिनियमान्वये कलम २५ च्या पोट-कलम (१०) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत, नोंदणी किंवा विशिष्ट ओळख क्रमांक मंजूर करण्यासाठीचा अर्ज, या अधिनियमान्वये नाकारण्यात आलेला नाही या शर्तीच्या अधीन राहून नोंदणी किंवा विशिष्ट ओळख क्रमांक मंजूर केले असल्याचे मानण्यात येईल.

(२) कलम २५ च्या पोट-कलम (१०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये, नोंदणी किंवा विशिष्ट ओळख क्रमांक यासाठीचा कोणताही अर्ज नाकारणे म्हणजे या अधिनियमान्वये, तो नोंदणी अर्ज नाकारला असल्याचे मानण्यात येईल.

नैमत्तिक करपात्र व्यक्ती व अनिवासी करपात्र व्यक्ती यांच्या संबंधांत विशेष तरतुदी.

**२७.** (१) नैमित्तिक करपात्र व्यक्तीला किंवा अनिवासी करपात्र व्यक्तीला, देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र, नोंदणी अर्जामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी अथवा नोंदणी अंमलात आल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांसाठी, यांपैकी जे अगोदर घडेल तेवढ्या कालावधीसाठी, विधिग्राह्य असेल आणि अशी व्यक्ती, नोंदणी प्रमाणपत्र दिल्यानंतरच केवळ करपात्र वस्तुंचा पुरवठा करील :

परंतु, समुचित अधिकाऱ्यास, उक्त करपात्र व्यक्तीने दर्शविलेल्या पुरेशा कारणावरून, नव्वद दिवसांचा उक्त कालावधी, नव्वद दिवसांपेक्षा अधिक नसेल एवढ्या आणखी कालावधीने वाढवून देता येईल.

(२) नैमित्तिक करपात्र व्यक्ती किंवा अनिवासी करपात्र व्यक्ती, कलम २५ च्या पोट-कलम (१) अन्वये, नोंदणीसाठी अर्ज सादर करतेवेळी, ज्या कालावधीसाठी नोंदणीची मागणी केली असेल अशा कालावधीसाठी अशा व्यक्तीच्या अंदाजित कर दायित्वाएवढी रक्कम, कराचा आगाऊ भरणा म्हणून जमा करील :

परंतु, पोट-कलम (१) अन्वये कोणतीही वाढीव मुदत मागितली असेल तर, अशी करपात्र व्यक्ती ज्या कालावधीसाठी वाढीव मुदत मागितली असेल त्या कालावधीकरिता अशा व्यक्तीच्या अंदाजित कर दायित्वाएवढी कराची अतिरिक्त रक्कम जमा करील.

(३) पोट-कलम (२) अन्वये जमा केलेली रक्कम, अशा व्यक्तीच्या इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीमध्ये जमा करण्यात येईल आणि कलम ४९ अन्वये तरतूद केलेल्या पद्धतीने उपयोगात आणण्यात येईल.

नोंदणीमधील सुधारणा.

**२८.** (१) प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती आणि ज्या व्यक्तीला विशिष्ट ओळखपत्र क्रमांक नेमून देण्यात आला आहे ती व्यक्ती, नोंदणीच्या वेळी किंवा त्यानंतर सादर केलेल्या माहितीमधील कोणतेही बदल, विहित करण्यात येतील अशा नमुन्यात, अशा रीतीने आणि अशा कालावधीत समुचित अधिकाऱ्याला कळवील.

(२) समुचित अधिकाऱ्यास, पोट-कलम (१) अन्वये सादर केलेल्या माहितीच्या आधारे किंवा त्याने खात्री करून घेतल्याप्रमाणे नोंदणीच्या तपशिलातील सुधारणा विहित केलेल्या पद्धतीने व अशा कालावधीमध्ये मान्य करता येतील किंवा फेटाळून लावता येतील :

परंतु, विहित केले असेल त्याप्रमाणे अशा तपशिलाच्या सुधारणेच्या संबंधात समुचित अधिकाऱ्याच्या मान्यतेची आवश्यकता असणार नाही :

परंतु आणखी असे की, समुचित अधिकारी, अशा व्यक्तीला सुनावणीची संधी दिल्याशिवाय नोंदणीच्या तपशिलामध्ये सुधारणा करण्यासाठीची विनंती फेटाळून लावणार नाही.

(३) केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये कोणतीही सुधारणा फेटाळणे किंवा मान्य करणे म्हणजे या अधिनियमान्वये सुधारणा फेटाळली किंवा मान्य केली असल्याचे मानण्यात येईल.

नोंदणी रद्द करणे.

**२९.** (१) समुचित अधिकाऱ्यास एकतर स्वतःहून किंवा नोंदणीकृत व्यक्तीने किंवा अशा व्यक्तीचा मृत्यू झाला असल्यास त्याच्या कायदेशीर वारसाने दाखल केलेल्या अर्जावरून, पुढील परिस्थिती विचारात घेऊन विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कालावधीमध्ये नोंदणी रद्द करता येईल,—

(क) मालकाचा मृत्यू यासह कोणत्याही कारणास्तव धंदा खंडित केला असेल, पूर्णतः हस्तांतरित केला असेल ; अन्य कायदेशीर संस्थेकडे एकत्रीकृत केला असेल, विभक्तीकरण केले असेल किंवा अन्यथा त्याची विल्हेवाट लावली असेल ; किंवा

(ख) धंद्याच्या रचनेत कोणताही बदल केला असेल, किंवा

(ग) कलम २५ च्या पोट-कलम (३) अन्वये नोंदणीकृत व्यक्तीशिवाय इतर करपात्र व्यक्ती कलम २२ किंवा कलम २४ अन्वये यापुढे नोंदणीसाठी पात्र ठरणार नाही.

(२) समुचित अधिकाऱ्यास—

(क) जर नोंदणीकृत व्यक्तीने विहित करण्यात येईल त्याप्रमाणे अशा अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन केले असेल ; किंवा

(ख) कलम १० अन्वये कर भरणाऱ्या व्यक्तीने तीन लागोपाठच्या कर कालावधीचे विवरण सादर केलेले नसेल ; किंवा

(ग) खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या व्यक्तीशिवाय कोणत्याही व्यक्तीने सहा महिन्यांच्या सलग कालावधीसाठी विवरण सादर केलेले नसेल ; किंवा

(घ) कलम २५ च्या पोट-कलम (३) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीने स्वेच्छेने नोंदणी केली असेल तिने नोंदणीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत धंदा सुरू केला नसेल, किंवा

(ङ) जर कोणतीही नोंदणी लबाडीने, हेतूपुरस्सर असत्य कथन करून किंवा वस्तुस्थिती लपवून प्राप्त केली असेल,

तर, कोणत्याही अगोदरच्या दिनांकासह त्यास योग्य वाटेल अशा दिनांकापासून व्यक्तीची नोंदणी रद्द करता येईल :

परंतु, समुचित अधिकारी, अशा व्यक्तीला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय नोंदणी रद्द करणार नाही.

(३) या कलमान्वये नोंदणी रद्द केल्यामुळे ती रद्द केल्याच्या दिनांकापूर्वी— मग असा कर व इतर देय रकमा नोंदणी रद्द केल्याच्या दिनांकापूर्वी किंवा दिनांकानंतर निश्चित केलेल्या असोत किंवा नसोत, कोणत्याही कालावधीसाठी या अधिनियमान्वये कर व इतर देय रकमा भरण्याच्या किंवा या अधिनियमान्वये किंवा त्यानुसार तयार केलेल्या नियमान्वये कोणतेही आबंधन पार पाडण्याच्या व्यक्तिच्या दायित्वावर परिणाम होणार नाही.

(४) केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये नोंदणी रद्द करणे म्हणजे या अधिनियमान्वये नोंदणी रद्द केली असल्याचे मानण्यात येईल.

(५) ज्याची नोंदणी रद्द झाली आहे अशी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, अशी नोंदणी रद्द केल्याच्या लगतपूर्वीच्या दिवशी साठ्यात असलेल्या निविष्टीच्या आणि साठ्यात असलेल्या अर्ध-तयार किंवा तयार वस्तूंमध्ये अंतर्भूत असलेल्या निविष्टीच्या किंवा भांडवली वस्तू किंवा तयार संयंत्रे व यंत्रसामग्री यांमध्ये अंतर्भूत असलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेशी समतूल्य रक्कम किंवा अशा वस्तूवर देय असलेल्या उद्विष्टी कराएवढी समतूल्य रक्कम यांपैकी विहित करण्यात येईल अशा पद्धतीने गणना केलेली, जी जास्त असेल ती रक्कम इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीत किंवा इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीत खर्ची घालून प्रदान करील :

परंतु, भांडवली वस्तू किंवा संयंत्रे व यंत्रसामग्री या बाबतीत, करपात्र व्यक्ती, उक्त भांडवली वस्तू किंवा संयंत्रे व यंत्रसामग्री यांवर घेतलेला या बाबतीत विहित करण्यात येईल अशा टक्केवारीच्या प्रमाणात कमी केलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेएवढी किंवा कलम १५ अन्वये अशा भांडवली वस्तूच्या किंवा संयंत्रे व यंत्रसामग्रीच्या व्यवहार मूल्यावरील कराएवढी, यांपैकी जी अधिक असेल तेवढी, रक्कम भरील.

(६) पोट-कलम (५) अन्वये देय असलेली रक्कम ही विहित करण्यात येईल अशा पद्धतीने परिगणित करण्यात येईल.

**३०.** (१) विहित करण्यात येईल अशा शर्तीस अधीन राहून, समुचित अधिकाऱ्याने स्वतःहून ज्याची नोंदणी रद्द केली असेल अशा कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीला त्याची नोंदणी रद्द केल्याचा आदेश बजाविल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत विहित रीतीने नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेण्यात यावा याकरिता अशा अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेणे.

(२) समुचित अधिकाऱ्यास, या बाबतीत विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीत आदेशाद्वारे एकतर नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेता येईल किंवा अर्ज फेटाळता येईल :

परंतु, अर्जदारास, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेण्यासाठी केलेला अर्ज फेटाळण्यात येणार नाही.

(३) केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेणे म्हणजे या अधिनियमान्वये नोंदणी रद्द केल्याचा आदेश मागे घेण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण सात

## **कराचे बीजक, जमापत्र व नावेपत्र**

**३१.** (१) करपात्र वस्तूंचा पुरवठा करताना नोंदणीकृत व्यक्ती,– कराचे बीजक.

(क) पुरवठ्यामध्ये वस्तूंची ने-आण अंतर्भूत असेल तर प्राप्तकर्त्याला पुरवठा करण्यासाठी वस्तू हलविण्यापूर्वी किंवा हलविण्याच्या वेळी, किंवा

(ख) अन्य कोणत्याही बाबतीत वस्तूंची पोचवणी किंवा त्या वस्तू प्राप्तकर्त्याला उपलब्ध करून देताना त्यापूर्वी किंवा त्यावेळी,—

वस्तूंचे वर्णन, प्रमाण आणि मूल्य, त्यावर आकारलेला कर आणि विहित करण्यात येईल असा इतर तपशील दर्शवणारे कराचे बीजक देईल :

परंतु, शासनास, परिषदेच्या शिफारशींवरून, अधिसूचनेद्वारे, ज्यांच्या संबंधात कराचे बीजक देण्यात येईल अशा वस्तूंचे किंवा पुरवठ्यांचे प्रवर्ग विनिर्दिष्ट करता येतील व विहित करण्यात येईल अशा वेळेत आणि अशा रीतीने कराचे बीजक देण्यात येईल.

(२) करपात्र सेवांचा पुरवठा करणारी नोंदणीकृत व्यक्ती सेवेची तरतूद करण्यापूर्वी किंवा त्यानंतर परंतु विहित केलेल्या कालावधीमध्ये सेवेचे वर्णन, मूल्य व त्यावर आकारलेला कर आणि विहित करण्यात येईल असा इतर तपशील दर्शवणारे कराचे बीजक देईल :

परंतु, शासनास, परिषदेच्या शिफारशीवरून, अधिसूचनेद्वारे आणि त्यामध्ये नमूद केलेल्या शर्तींना अधीन राहून, पुढील बाबतीत सेवांचा प्रवर्ग विनिर्दिष्ट करता येईल,

(क) पुरवठ्याच्या बाबतीत दिलेले कोणतेही इतर कागदपत्र हे कराचे बीजक असल्याचे मानण्यात येईल;

किंवा

(ख) कराचे बीजक देण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) पोट-कलमे (१) आणि (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) नोंदणीकृत व्यक्तीस, नोंदणी प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने, नोंदणी अंमलात आल्याच्या दिनांकापासून सुरू झालेल्या व त्याला नोंदणी प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीमध्ये अगोदर दिलेल्या बीजकाच्या ऐवजी सुधारित बीजक देता येईल.

(ख) नोंदणीकृत व्यक्तीला विहित करण्यात येईल अशा शर्तींना अधीन राहून व अशा रीतीने जर, पुरवठा करण्यात आलेल्या वस्तू किंवा सेवा अथवा दोन्हींचे मूल्य हे दोनशे रुपयांपेक्षा कमी असेल तर कराचे बीजक देण्याची आवश्यकता असणार नाही.

(ग) करातून सूट मिळालेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीं पुरविणारी किंवा कलम १० च्या तरतुदीअन्वये कर भरणारी नोंदणीकृत व्यक्ती, कर बीजकाच्या ऐवजी विहित करण्यात येईल असे व त्यारीतीने तपशील अंतर्भूत असणारे पुरवठ्याचे देयक देईल :

परंतु, नोंदणीकृत व्यक्तीने पुरवठा करण्यात आलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचे मूल्य हे दोनशे रुपयांपेक्षा कमी असेल तर पुरवठ्याचे देयक, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन राहून आणि त्या रीतीने देण्याची आवश्यकता असणार नाही.

(घ) नोंदणीकृत व्यक्ती, त्याने वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा कोणताही पुरवठा करण्याच्या संबंधात त्यास अग्रीम रक्कम मिळाल्यावर विहित करण्यात येईल असे तपशील अंतर्भूत असलेले प्राप्ती प्रमाणक (रिसिट व्हॉऊचर) किंवा अन्य कोणतेही कागदपत्र, अशी रक्कम मिळाल्याचा पुरावा म्हणून देईल ;

(ङ) जेव्हा, वस्तू किंवा सेवा अथवा दोन्हीं यांचा कोणताही पुरवठा करण्याच्या संबंधात त्यास अग्रीम रक्कम मिळाल्यावर नोंदणीकृत व्यक्तीने, प्राप्ती प्रमाणक दिले असेल परंतु, त्यानंतर असा पुरवठा करण्यात आला नसेल व त्याबाबतचे कर बीजक देण्यात आले नसेल तर, उक्त नोंदणीकृत व्यक्तीला, ज्या व्यक्तीने रक्कम दिली होती त्या व्यक्तीला अशा रकमेबाबत परतावा प्रमाणक देता येईल.

(च) कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये कर भरण्यास दायी असलेली नोंदणीकृत व्यक्ती, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही प्राप्त झाल्याच्या दिनांकास जो नोंदणीकृत नसेल अशा पुरवठादाराकडून तिला प्राप्त झालेल्या वस्तूंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या संबंधात बीजक देईल.

(छ) कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये कर भरण्यास दायी असलेली नोंदणीकृत व्यक्ती, पुरवठादारास प्रदान करतेवेळी प्रदान प्रमाणक देईल.

(४) ज्यामध्ये लागोपाठची लेखा विवरणपत्रे किंवा लागोपाठची प्रदाने अंतर्भूत असतात त्या वस्तूंच्या अखंडित पुरवठ्याच्या बाबतीत बीजक हे, असे प्रत्येक विवरणपत्र देण्यात येते किंवा यथास्थिति प्रत्येक असे प्रदान प्राप्त होते त्यापूर्वी किंवा त्यावेळी देण्यात येईल.

(५) पोट-कलम (३) च्या खंड (घ) च्या तरतुदींना अधीन राहून, सेवांच्या अखंडित पुरवठ्याच्या बाबतीत,—

(क) जेव्हा प्रदान करण्याचा देय दिनांक संविदेत ठरवितायेण्याजोगा असेल, तेव्हा बीजक हे प्रदान करण्याच्या देय दिनांकास किंवा त्यापूर्वी देण्यात येईल ;

(ख) जेव्हा प्रदान करण्याचा देय दिनांक संविदेत ठरवितायेण्याजोगा नसेल, तेव्हा बीजक हे सेवा पुरवठादाराला ज्यावेळी प्रदान प्राप्त झाले असेल त्यापूर्वी किंवा त्यावेळी देण्यात येईल ;

(ग) जेव्हा प्रदान हे घटना पूर्ण होण्याशी जोडले गेले असेल तेव्हा बीजक हे, ती घटना पूर्ण होण्याच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी देण्यात येईल.

(६) जेव्हा पुरवठा पूर्ण होण्यापूर्वी संविदेअन्वये सेवा पुरवठा बंद झाला असेल त्याबाबतीत बीजक हे, पुरवठा बंद झाला असेल त्यावेळी देण्यात येईल आणि असे बीजक पुरवठा अशा प्रकारे बंद होण्यापूर्वी झालेल्या पुरवठ्याच्या मर्यादेपर्यंत देण्यात येईल.

(७) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा वस्तू ही विक्रीच्या किंवा परत करण्याच्या मान्यतेवर पाठविण्यात येत असेल किंवा घेतली असेल व असा पुरवठा करण्यात येण्यापूर्वी ती हलविण्यात आली असेल तर बीजक हे, पुरवठा करण्यात येण्यापूर्वी किंवा त्यावेळी किंवा वस्तू हलविल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, यापैकी जे अगोदर घडेल तेव्हा, देण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ, ' कराचे बीजक ' या शब्दप्रयोगात, अगोदर केलेल्या पुरवठ्याच्या संबंधात पुरवठादाराने दिलेले कोणतेही सुधारित बीजक याचा समावेश होतो.

अनधिकृतरीत्या कर गोळा करण्यास प्रतिबंध.

**३२.** (१) जी व्यक्ती नोंदणीकृत नसेल ती व्यक्ती या अधिनियमान्वये कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याच्या बाबतीत कोणतीही रक्कम कराच्या रूपाने गोळा करणार नाही.

(२) कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींना अनुसरून असेल त्याव्यतिरिक्त असा कोणताही कर गोळा करणार नाही.

कराचे बीजक आणि इतर कागदपत्रे यांमध्ये कराची रक्कम दर्शवणे.

**३३.** ह्या अधिनियमात किंवा त्यात्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे कोणताही पुरवठा हा मोबदल्याकरिता केला जातो, अशा पुरवठ्याकरिता कर देण्यास दायी असलेली प्रत्येक व्यक्ती निर्धारणाच्या संबंधातील सर्व कागदपत्रे कर बीजक आणि यासारखी इतर कागदपत्रे यांमध्ये असा जो पुरवठा केलेला असेल त्याच्या किंमतीचा भाग बनणारी जी कराची रक्कम असेल ती प्रामुख्याने दर्शविली पाहिजे.

जमापत्र आणि नावेपत्र.

**३४.** (१) कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्याकरिता जेथे कराचे बीजक देण्यात येते आणि करपात्र मूल्य किंवा त्या कर बीजकामध्ये आकारलेला कर हा करपात्र मूल्य किंवा अशा पुरवठ्याबाबत देय असलेल्या करापेक्षा अधिक असल्याचा आढळते, किंवा पुरवठा केलेल्या वस्तू जेथे प्राप्तकर्त्याकडून परत केल्या जातात, किंवा पुरवठा केलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींची जेथे कमतरता आढळून येते ; अशा वेळी जिने अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा केलेला असेल अशा नोंदणीकृत व्यक्तीला, या बाबतीत विहित केल्याप्रमाणे अशा तपशिलांचा अंतर्भाव असलेले जमापत्र प्राप्तकर्त्यास देता येईल.

(२) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याच्या बाबतीत जी व्यक्ती जमापत्र देते अशी कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती, ज्या महिन्यात असे जमापत्र देण्यात आले असेल त्या महिन्याच्या विवरणामध्ये अशा जमापत्राचे तपशील घोषित करील, परंतु ज्या वित्तीय वर्षामध्ये असा पुरवठा करण्यात आला होता त्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतरच्या सप्टेंबर महिन्याच्या आत किंवा प्रस्तुत वार्षिक विवरण दाखल करण्याच्या दिनांकास, यांपैकी जे अगोदर घडेल त्यानंतर अशा जमापत्राचे तपशील त्याला घोषित करता येणार नाहीत आणि विहित करण्यात येईल अशारीतीने कर दायित्व समायोजित करण्यात येईल :

परंतु, जर अशा पुरवठ्यावरील कर व व्याज यांचा भार अन्य कोणत्याही व्यक्तीवर टाकला गेला असेल तर पुरवठादाराच्या उद्दिष्टी करदायित्वामध्ये कपात करण्यास परवानगी असणार नाही.

(३) कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्याकरिता जेथे कराचे बीजक देण्यात येते आणि करपात्र मूल्य त्या कर बीजकामध्ये आणि आकारलेला कर हा, करपात्र मूल्य किंवा अशा पुरवठ्याबाबत देय असलेल्या करापेक्षा कमी असल्याचा आढळतो, अशा वेळी अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा केलेला असेल अशा नोंदणीकृत व्यक्तीला याबाबतीत विहित केल्याप्रमाणे अशा तपशिलांचा अंतर्भाव असलेले नावेपत्र प्राप्तकर्त्यास देता येईल.

(४) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याच्या बाबतीत जी व्यक्ती नावेपत्र देते अशी कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती, ज्या महिन्यात असे नावेपत्र देण्यात आले असेल त्या महिन्याच्या विवरणामध्ये अशा नावेपत्राचा तपशील घोषित करील आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने करदायित्वाचे समायोजन करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**— या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ " नावेपत्र " या शब्दप्रयोगात पुरवणी बीजकांचाही समावेश होतो.

प्रकरण आठ

## लेखे व अभिलेख

**३५.** (१) प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, आपल्या मुख्य धंद्याच्या ठिकाणी, नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केल्याप्रमाणे,— लेखे व इतर अभिलेख.

(क) वस्तूंचे उत्पादन किंवा निर्मिती,

(ख) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा आवक किंवा जावक पुरवठा,

(ग) वस्तूंचा साठा,

(घ) घेतलेली निविष्टी कराची जमा रक्कम,

(ङ) देय असलेला आणि भरलेला उद्दिष्टी कर, आणि

(च) यासंबंधात विहित करण्यात येतील असे अन्य तपशील,

याबाबतचा खरा व बिनचूक लेखा ठेवील व परिरक्षित करील :

परंतु, जेथे नोंदणी प्रमाणपत्रात धंद्याची एकापेक्षा अधिक ठिकाणे विनिर्दिष्ट केलेली असतील तेथे, त्या धंद्याच्या प्रत्येक ठिकाणाशी संबंधित असलेले लेखे, त्या त्या धंद्याच्या ठिकाणी ठेवण्यात येतील :

परंतु आणखी असे की, नोंदणीकृत व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा रीतीने, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असे लेखे व अन्य तपशील ठेवता येतील व परिरक्षित करता येतील.

(२) वस्तूची साठवण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गोदामाचा किंवा वखारीचा किंवा कोणत्याही अन्य जागेचा प्रत्येक मालक किंवा परिचालक व प्रत्येक वाहतूकदार ती नोंदणीकृत व्यक्ती आहे किंवा नाही हे लक्षात न घेता, ती मालप्रेषक, मालप्रेषिती आणि विहित करण्यात येईल अशारीतीने वस्तूंच्या इतर संबद्ध तपशिलाचा अभिलेख ठेवील.

(३) आयुक्तास त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रयोजनासाठी, अतिरिक्त लेखे किंवा दस्तऐवज ठेवण्याकरिता करपात्र व्यक्तींचा वर्ग अधिसूचित करता येईल.

(४) करपात्र व्यक्तींचा कोणताही वर्ग, या कलमाच्या तरतुदींनुसार लेखे ठेवू शकत नाही किंवा त्यांचे परिरक्षण करू शकत नाही असे आयुक्ताला वाटेल त्याबाबतीत, त्यास, कारणे लेखी नमूद करून, विहित करण्यात येईल, अशा रीतीने, लेखे ठेवण्यासाठी अशा करपात्र व्यक्तींच्या वर्गाला, परवानगी देता येईल.

(५) ज्या नोंदणीकृत व्यक्तीची एखाद्या वित्तीय वर्षामधील उलाढाल विहित मर्यादेपेक्षा अधिक असेल अशी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, सनदी लेखापालाकडून किंवा परिव्यय लेखापालाकडून आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करवून घेईल आणि कलम ४४ च्या पोट-कलम (२) अन्वये लेखापरीक्षा केलेल्या वार्षिक लेख्यांची प्रत, आपसमेळ विवरणपत्र आणि यासंबंधात विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशारीतीने अशी अन्य कागदपत्रे, यांची प्रत सादर करील.

(६) कलम १७ च्या पोट-कलम (५) च्या खंड (ज) च्या तरतुदींच्या अधीन राहून, जेथे नोंदणीकृत व्यक्ती, पोट-कलम (१) अनुसार वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा लेखा ठेवण्यात कसूर करील तेथे, समुचित अधिकारी, जणू काही अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा अशा व्यक्तीकडून पुरवठा करण्यात आला होता असे समजून, हिशेबात न घेतलेल्या अशा वस्तू किंवा सेवांवर किंवा दोन्हींवर देय असलेली कराची रक्कम, निश्चित करील, आणि त्याबाबतीत कलम ७३ किंवा, यथास्थिति, कलम ७४ च्या तरतुदी असे कर निश्चित करण्यासाठी योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

लेखे जतन करून ठेवण्याचा कालावधी.

**३६.** कलम ३५ च्या पोट-कलम (१) अन्वये लेखापुस्तके किंवा अन्य अभिलेख ठेवणे व त्यांचे परिरक्षण करणे आवश्यक असलेली प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, अशा लेख्यांशी व अभिलेख्यांशी संबंधित वर्षाचे वार्षिक विवरणपत्र दाखल करण्याच्या नियत दिनांकापासून बहात्तर महिन्यांचा कालावधी समाप्त होईपर्यंत त्यांचे जतन करील :

परंतु, जी कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती, कोणत्याही अपील प्राधिकाऱ्यासमोरील किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्यासमोरील किंवा अपील न्यायाधिकरणासमोरील किंवा न्यायालयासमोरील अपील किंवा पुनरीक्षण किंवा इतर कोणत्याही कार्यवाहीतील मग ती तिने किंवा आयुक्ताने दाखल केलेली असो, पक्षकार असेल, किंवा प्रकरण एकोणीस खालील एखाद्या अपराधाबद्दल तिची चौकशी सुरू असेल अशी कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती, अशा अपिलाच्या किंवा पुनरीक्षणाच्या किंवा कार्यवाहीच्या किंवा चौकशीच्या विषयवस्तूशी संबंधित असलेली लेखापुस्तके आणि इतर अभिलेख यांचे, अशा अपिलाचा किंवा पुनरीक्षणाचा किंवा कार्यवाहीचा किंवा चौकशीचा निकाल लागल्यानंतर, एका वर्षाचा कालावधी, किंवा वर विनिर्दिष्ट केलेला कालावधी, यांपैकी जो नंतरचा असेल त्या कालावधीपर्यंत, परिरक्षण करील.

## प्रकरण नऊ

## विवरणे

जावक पुरवठ्याचा तपशील दाखल करणे.

**३७.** (१) निविष्टी सेवा वितरक, अनिवासी करपात्र व्यक्ती आणि कलम १० किंवा कलम ५१ किंवा कलम ५२ च्या तरतुदींअन्वये कर भरणारी व्यक्ती याव्यतिरिक्त प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, कर कालावधीमध्ये ज्यांचा पुरवठा केलेला असेल अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या जावक पुरवठ्याचा तपशील, उक्त कर कालावधी लगतनंतर येणाऱ्या महिन्याच्या दहाव्या दिवशी किंवा त्यापूर्वी विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील आणि असा तपशील उक्त पुरवठ्याच्या प्राप्तकर्त्यास विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा रीतीने कळविण्यात येईल :

परंतु, नोंदणीकृत व्यक्तीला, कर कालावधी लगतनंतर येणाऱ्या महिन्याच्या ११ व्या दिवसापासून ते १५ व्या दिवसांपर्यंतच्या कालावधीत जावक पुरवठ्याचा तपशील दाखल करण्यास परवानगी असणार नाही :

परंतु आणखी असे की, आयुक्तास, अधिसूचनेद्वारे, तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा करपात्र व्यक्तींच्या वर्गांसाठी, असे तपशील सादर करण्यासाठीची कालमर्यादा कारणे लेखी नमूद करून, वाढवता येईल :

परंतु, तसेच केंद्रीय कर आयुक्ताने अधिसूचित केलेली कोणतीही वाढीव कालमर्यादा ही आयुक्ताने अधिसूचित केली असल्याचे मानण्यात येईल.

(२) ज्या नोंदणीकृत व्यक्तीला कलम ३८ च्या पोट-कलम (३) अन्वये तपशील कळविले असतील किंवा कलम ३८ च्या पोट-कलम (४) अन्वये निविष्टी सेवा वितरकाच्या आवक पुरवठ्याशी संबंधित तपशील कळविले असतील अशी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, असे तिला कळविण्यात आलेले तपशील, कर कालावधीच्या लगतनंतर येणाऱ्या महिन्याच्या १७ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी परंतु, १५ व्या दिवसांच्या अगोदरचा नसेल अशा दिवशी एकतर स्वीकारील किंवा फेटाळील आणि पोट-कलम (१) अन्वये तिने दाखल केलेले तपशील तद्नुसार सुधारित झाल्याप्रमाणे असतील.

(३) कोणत्याही कर कालावधीसाठी ज्या कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीने, पोट-कलम (१) अन्वये, तपशील दाखल केला असेल आणि कलम ४२ किंवा कलम ४३ अन्वये त्यामध्ये विसंगती असेल तर तो, त्यामध्ये कोणतीही चूक किंवा वगळणूक आढळून आल्यास, अशी चूक किंवा वगळणूक विहित करण्यात येईल अशा रीतीने सुधारील आणि अशा कर कालावधीसाठी दाखल करावयाच्या विवरणपत्रामध्ये अशी चूक किंवा वगळणूक यामुळे कराचा काही कमी भरणा केलेला असल्यास, कर व त्यावरील व्याज, असल्यास, भरील :

परंतु, पोट-कलम (१) अन्वये दाखल केलेल्या तपशिलाच्याबाबतीत कोणतीही चूक किंवा वगळणूक यामध्ये सुधारणा करण्यास अशा तपशिलाशी संबंधित असलेल्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतरच्या सप्टेंबर महिन्यासाठी, कलम ३९ अन्वये विवरण दाखल केल्यानंतर किंवा संबद्ध वार्षिक विवरण भरल्यानंतर, यांपैकी जे अगोदर घडेल त्यानंतर परवानगी असणार नाही.

**स्पष्टीकरण.—**या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी " जावक पुरवठ्याचा तपशील " या शब्दप्रयोगात कोणत्याही कर कालावधीच्या दरम्यान जावक पुरवठ्याशी संबंधात देण्यात आलेले बीजक, नावेपत्र, जमापत्र आणि सुधारित बीजक यांच्या तपशिलाचा समावेश असेल.

**३८.** (१) निविष्टी सेवा वितरक किंवा अनिवासी करपात्र व्यक्ती किंवा कलम १० किंवा कलम ५१ किंवा कलम ५२ च्या तरतुदीअन्वये कर भरणारी व्यक्ती यांव्यतिरिक्त, प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, तिचा आवक पुरवठा व जमा किंवा नावेपत्रांचा तपशील तयार करण्यासाठी, कलम ३७ च्या पोट-कलम (१) अन्वये कळविलेला जावक पुरवठा व जमा

आवक पुरवठ्याचा तपशील दाखल करणे.

किंवा नावेपत्र यांच्याशी संबंधित तपशील यांची आवश्यकता असल्यास, पडताळणी करील, तो संमत करील, त्यात फेरबदल करील किंवा तो वगळील आणि कलम ३७ च्या पोट-कलम (१) अन्वये पुरवठादाराने घोषित केलेला नाही अशा पुरवठ्याच्या संबंधात त्याला प्राप्त झालेल्या आवक पुरवठ्याच्या आणि जमा किंवा नावे पत्रांच्या तपशिलाचा त्यात समावेश करील.

(२) निविष्टी सेवा वितरक किंवा अनिवासी करपात्र व्यक्ती किंवा कलम १० किंवा कलम ५१ किंवा कलम ५२ अन्वये कर भरणारी व्यक्ती यांव्यतिरिक्त, प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, ज्यांवर या अधिनियमान्वये प्रत्यावर्ती आकाराच्या आधारे कर देय असेल अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा आवक पुरवठा यांसह करपात्र वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या आवक पुरवठ्यांचा आणि एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाखाली करपात्र असलेल्या अथवा ज्यांवर सीमाशुल्क प्रशुल्क अधिनियम, १९७५ च्या कलम ३ अन्वये एकात्मिक वस्तू व सेवा कर देय आहे अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा आवक पुरवठ्यांचा आणि कर कालावधीमधील अशा पुरवठ्याच्या संबंधात प्राप्त झालेल्या जमा किंवा नावे पत्रांचा तपशील, त्या कर कालावधीच्या लगतनंतर येणाऱ्या महिन्याच्या दहाव्या दिवसानंतर, परंतु त्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी किंवा त्यापूर्वी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील :

परंतु, आयुक्तास अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे अशा करपात्र व्यक्तींच्या वर्गासाठी असे तपशील दाखल करण्यासाठी कारणे लेखी नमूद करून, कालमर्यादा वाढविता येईल :

परंतु आणखी असे की, केंद्रीय कर आयुक्ताने अधिसूचित केलेली कोणतीही वाढीव कालमर्यादा आयुक्ताने अधिसूचित केली असल्याचे मानण्यात येईल.

(३) प्राप्तकर्त्याने पुरवठ्यात फेरबदल केलेला, वगळलेला किंवा समाविष्ट केलेला, आणि पोट-कलम (२) अन्वये दाखल केलेला तपशील, विहित करण्यात येईल अशारीतीने व अशा मुदतीच्या आत संबंधित पुरवठादाराला कळवण्यात येईल.

(४) प्राप्तकर्त्याने कलम ३९ च्या पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (४) अन्वये दाखल केलेल्या विवरणामधील फेरबदल केलेला, वगळलेला किंवा समाविष्ट केलेला पुरवठ्याचा तपशील, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा मुदतीच्या आत संबंधित पुरवठादाराला कळविण्यात येईल.

(५) जिने पोट-कलम (२) अन्वये, कोणत्याही कर कालावधीचा तपशील सादर केला असेल आणि कलम ४२ किंवा कलम ४३ अन्वये त्यामध्ये विसंगती असेल तर अशी कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती, त्यात कोणतीही चूक किंवा वगळणूक असल्यास, ज्या कर कालावधीमध्ये अशी चूक किंवा वगळणूक निदर्शनास आली असेल त्या कर कालावधीत अशी चूक किंवा वगळणूक विहित करण्यात येईल अशा रीतीने दुरुस्त करील आणि अशा कर कालावधीसाठी दाखल करावयाच्या विवरणात अशा चुकीमुळे किंवा वगळणुकीमुळे कराचा कमी भरणा केलेला असल्यास, कर व त्यावरील व्याज, असल्यास, भरील :

परंतु, पोट-कलम (२) अन्वये दाखल केलेल्या तपशिलांच्या बाबतीतील कोणतीही चूक किंवा वगळणूक यामध्ये सुधारणा करण्यास, अशा तपशीलाशी संबंधित असलेल्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतरच्या सप्टेंबर महिन्यासाठी कलम ३९ अन्वये विवरण दाखल केल्यानंतर किंवा संबद्ध वार्षिक विवरण दाखल केल्यानंतर, यांपैकी जे अगोदर घडेल त्यानंतर, परवानगी असणार नाही.

**३९.** (१) निविष्ट सेवा वितरक किंवा अनिवासी करपात्र व्यक्ती किंवा कलम १० किंवा कलम ५१ किंवा कलम ५२ यांच्या तरतुदींन्वये कर भरणारी व्यक्ती, यांव्यतिरिक्त प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा आवक व जावक पुरवठा, घेतलेली निविष्टी कराची जमा रक्कम, देय असलेला कर, भरलेला कर व विहित करण्यात येईल असा अन्य तपशील यांबाबतचे प्रत्येक कॅलेंडर महिन्याचे किंवा त्याच्या भागाचे विवरण अशा कॅलेंडर महिन्याच्या किंवा त्याच्या भागाच्या लगतनंतरच्या महिन्याच्या विसाव्या दिवशी किंवा त्यापूर्वी विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील. विवरणे दाखल करणे.

(२) कलम १० च्या तरतुदीअन्वये कर भरणारी कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती, राज्यातील उलाढालीचे, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या आवक पुरवठ्याचे, देय असलेल्या कराचे आणि भरलेल्या कराचे प्रत्येक तिमाहीचे किंवा त्यातील भागाचे विवरण, अशा तिमाहीच्या समाप्तीनंतर अठरा दिवसांच्या आत विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील.

(३) जिला कलम ५१ च्या तरतुदीअन्वये मूळ स्रोतातून कर संकलन करणे आवश्यक असेल, ती प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, ज्या महिन्यात अशा वजाती केलेल्या असतील अशा महिन्याचे विवरण, अशा महिन्याच्या समाप्तीनंतर दहा दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील.

(४) निविष्ट सेवा वितरक म्हणून नोंदणी केलेली प्रत्येक करपात्र व्यक्ती, प्रत्येक कॅलेंडर महिन्याचे किंवा त्याच्या भागाचे विवरण अशा महिन्याच्या समाप्तीनंतर तेरा दिवसांच्या आत विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील.

(५) प्रत्येक नोंदणीकृत  अनिवासी व्यक्ती, प्रत्येक कॅलेंडर महिन्याचे किंवा त्याच्या भागाचे विवरण, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने त्या कॅलेंडर महिन्याच्या समाप्तीनंतर वीस दिवसांच्या आत किंवा कलम २७ च्या पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या नोंदणीच्या कालावधीच्या शेवटच्या दिवसानंतर सात दिवसांच्या आत, यांपैकी जे अगोदर घडेल तेव्हा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील.

(६) आयुक्तास, अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गासाठी कारणे लेखी नमूद करून या कलमान्वये विवरणे दाखल करण्याची कालमर्यादा वाढविता येईल :

परंतु, केंद्रीय कर आयुक्ताने अधिसूचित केलेली कोणतीही वाढीव कालमर्यादा आयुक्ताने अधिसूचित केली असल्याचे मानण्यात येईल.

(७) जिला पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (५) अन्वये विवरण दाखल करणे आवश्यक केले असेल, अशी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, ज्या अंतिम दिनांकापर्यंत असे विवरण दाखल करणे तिला आवश्यक केले असेल, त्या दिनांकाच्या आत अशा विवरणाप्रमाणे देय असलेला कर शासनाकडे भरील.

(८) जिला पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये विवरण दाखल करणे आवश्यक केले असेल, अशी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, प्रत्येक कर कालावधीचे विवरण—-मग अशा कर कालावधीत वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा कोणताही पुरवठा करण्यात आलेला असो किंवा नसो, दाखल करील.

(९) कलम ३७ व ३८ च्या तरतुदींना अधीन राहून, जर कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीस, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) किंवा पोट-कलम (५) अन्वये विवरण सादर केल्यानंतर कर प्राधिकाऱ्यांकडून केली जाणारी छाननी, लेखापरीक्षा, तपासणी किंवा अंमलबजावणी याच्या परिणामी असेल त्याखेरीज, त्यात कोणतीही वगळणूक किंवा चुकीचा मजकूर आढळून येईल तर, ती, अशी वगळणूक किंवा चुकीचा मजकूर जेव्हा तिच्या निदर्शनास आला असेल त्या महिन्याच्या किंवा, यथास्थिति, तिमाहीच्या दाखल करावयाच्या विवरणात या अधिनियमान्वये त्याबाबतीत व्याज प्रदान करण्याच्या अधीन राहून, दुरुस्त करील :

परंतु, कोणत्याही वगळणुकीतील किंवा चुकीच्या तपशिलातील अशा दुरुस्तीस, वित्तीय वर्ष समाप्त झाल्यानंतरच्या सप्टेंबर महिन्यासाठीचे किंवा दुसऱ्या तिमाहीसाठीचे विवरण दाखल करण्यासाठीच्या देय दिनांकानंतर किंवा संबद्ध वार्षिक विवरण दाखल करण्याच्या प्रत्यक्ष दिनांकास, यांपैकी जे अगोदर घडेल, त्यानंतर परवानगी असणार नाही.

(१०) नोंदणीकृत व्यक्तीला, जर त्याने कोणत्याही पूर्वीच्या कर कालावधीचे विवरण दाखल केलेले नसेल तर अशा कर कालावधीचे विवरण दाखल करण्याची अनुमती नसेल.

पहिले विवरण.

**४०.** प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, जी नोंदणीस पात्र झाली असेल त्या दिनांकापासून ते नोंदणी मंजूर केली असेल त्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत तिने जावक पुरवठा केला असेल तो, जावक पुरवठा ती, नोंदणी मंजूर केल्यानंतर दाखल केलेल्या पहिल्या विवरणात घोषित करील.

निविष्टी कराच्या जमा रकमेचा दावा करणे आणि त्याचा तात्पुरता स्वीकार करणे.

**४१.** (१) प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती त्याबाबतीत विहित करण्यात येतील अशा अटी व निर्बंधांना अधीन राहून, आपल्या विवरणात स्वयंनिर्धारित केलेली पात्र निविष्टी कराची जमा रक्कम प्राप्त करण्यासाठी हक्कदार असेल आणि अशी रक्कम तिच्या इलेक्ट्रॉनिक खातेवहीमध्ये तात्पुरत्या तत्त्वावर जमा करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली जमा रक्कम, उक्त पोट-कलमामध्ये निर्दिष्ट केलेल्या विवरणानुसार स्वयंनिर्धारित केलेल्या उद्दिष्टी करदायित्वाच्या प्रदानासाठीच फक्त वापरण्यात येईल.

निविष्टी कराच्या जमा रकमेचा दावा ताडून पाहणे, ती प्रत्यावर्तित करणे आणि तिची पुनर्मागणी करणे.

**४२.** (१) एखाद्या नोंदणीकृत व्यक्तीने (यात यापुढे या कलमात जिचा निर्देश 'प्राप्तकर्ता' असा केला आहे) एखाद्या कर कालावधीसाठी दाखल केलेल्या प्रत्येक आवक पुरवठ्याचे तपशील :—

(क) तत्सम नोंदणीकृत व्यक्तीने (यात यापुढे या कलमात जिचा निर्देश 'पुरवठादार' असा करण्यात आला आहे) त्याच कर कालावधीसाठी किंवा पूर्वीच्या कोणत्याही कर कालावधीसाठी आपल्या वैध विवरणाद्वारे दाखल केलेल्या जावक पुरवठ्याच्या तत्सम तपशिलांशी ;

१९७५ चा ५१. (ख) तिने आयात केलेल्या वस्तूंच्या संबंधात सीमाशुल्क प्रशुल्क अधिनियम, १९७५ याच्या कलम ३ अन्वये भरलेल्या एकात्मिक वस्तू व सेवा कराशी, आणि ;

(ग) निविष्टी कराच्या जमा रकमेच्या दाव्याच्या पुनरावृत्तीशी,

विहित रीतीने आणि विहित मुदतीच्या आत पडताळून पाहण्यात येतील.

१९७५ चा ५१. (२) तत्सम जावक पुरवठ्याच्या तपशिलाशी किंवा त्याने आयात केलेल्या वस्तूंच्या संबंधात सीमा शुल्क प्रशुल्क अधिनियम, १९७५ याच्या कलम ३ अन्वये भरलेल्या एकात्मिक वस्तू व सेवाकराशी जुळत असलेल्या आवक पुरवठ्याच्या संबंधातील बीजके किंवा नावे पत्र यातील निविष्टी कर जमा रकमेची मागणी अंतिमतः मान्य करण्यात येईल आणि अशी मान्यता विहित करण्यात येईल अशा रीतीने प्राप्तकर्त्याला कळविण्यात येईल.

(३) आवक पुरवठ्यासंबंधात प्राप्तकर्त्याने केलेला निविष्टी कराच्या जमा रकमेचा दावा त्याच पुरवठ्यासाठी पुरवठादाराने घोषित केलेल्या करापेक्षा अधिक असेल किंवा पुरवठादाराने आपल्या वैध विवरणात जावक पुरवठा घोषित केला नसेल त्याबाबतीत, ती विसंगती अशा दोन्ही व्यक्तींना, विहित करण्यात येईल अशा रीतीने कळविण्यात येईल.

(४) निविष्टी कराच्या जमा रकमेच्या दाव्याच्या पुनरावृत्तीबाबत विहित करण्यात येईल अशा रीतीने प्राप्तकर्त्याला कळविण्यात येईल.

(५) ज्या रकमेच्या संबंधात कलम (३) अन्वये कोणतीही विसंगती कळविलेली असेल आणि ती विसंगती कळविण्यात आली असेल त्या महिन्याच्या वैध विवरणात पुरवठादाराने त्याबाबत दुरुस्ती केलेली नसेल त्याबाबतीत, अशी रक्कम, विसंगती कळविण्यात आली असेल त्या महिन्यालगत नंतरच्या महिन्याच्या प्राप्तकर्त्याच्या विवरणात, विहित करण्यात येईल अशा रीतीने, त्या प्राप्तकर्त्याच्या उद्दिष्टी कर दायित्वामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

(६) जी रक्कम दाव्यांच्या पुनरावृत्तीमुळे अतिरिक्त असल्याचे आढळून येईल अशी, निविष्टी कराची जमा रकमेच्या स्वरूपात मागणी केलेली रक्कम, पुनरावृत्ती कळविण्यात आली असेल त्या महिन्याच्या प्राप्तकर्त्याच्या विवरणात त्याच्या उद्दिष्टी करदायित्वात समाविष्ट करण्यात येईल.

(७) जर पुरवठादाराने कलम ३९ च्या पोट-कलम (९) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत आपल्या वैध विवरणाद्वारे बीजकांचा किंवा नावेपत्रांचा तपशील घोषित केलेला असेल तर, प्राप्तकर्ता, आपल्या उद्दिष्टी करदायित्वातून पोट-कलम (५) अन्वये समाविष्ट केलेली रक्कम वजा करण्यास पात्र असेल.

(८) पोट-कलम (५) किंवा पोट-कलम (६) अन्वये ज्याच्या उद्दिष्टी करदायित्वात कोणतीही रक्कम समाविष्ट करण्यात आली असेल असा कोणताही प्राप्तकर्ता, उक्त पोट कलमांन्वये तत्सम वाढीव रक्कम समाविष्ट करण्यात येईपर्यंत, जमा रक्कम घेतल्याच्या दिनांकापासून अशा समाविष्ट करण्यात आलेल्या रकमेवर, कलम ५० च्या पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या दराने व्याज भरण्यास पात्र असेल.

(९) पोट-कलम (७) अन्वये उद्दिष्टी करदायित्वातील कोणत्याही वजातीला मान्यता दिली असेल त्याबाबतीत, पोट-कलम (८) अन्वये प्रदान केलेल्या व्याजाची रक्कम, विहित करण्यात येईल अशा रीतीने, प्राप्तकर्त्याच्या इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीच्या तत्सम शीर्षामध्ये जमा करून त्याद्वारे ती त्याला परत करण्यात येईल :

परंतु, कोणत्याही परिस्थितीत जमा करावयाच्या व्याजाची रक्कम ही, पुरवठादाराने भरणा केलेल्या व्याजाच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

(१०) पोट-कलम (७) च्या तरतुदींचे उल्लंघन करून उद्दिष्टी करदायित्वातून वजात केलेली रक्कम, ज्या महिन्यात असे उल्लंघन केले असेल त्या महिन्याच्या प्राप्तकर्त्याच्या विवरणातील त्याच्या उद्दिष्टी करदायित्वामध्ये समाविष्ट करण्यात येईल आणि असा प्राप्तकर्ता, कलम ५० च्या पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने अशा प्रकारे समाविष्ट करण्यात येणाऱ्या रकमेवर व्याज भरण्यास दायी असेल.

उद्दिष्टी कर दायित्वातून कपातीचा मेळ बसविणे, ती प्रत्यावर्तित करणे आणि तिची पुनर्मागणी करणे.

**४३.** **(१)** नोंदणीकृत व्यक्तीने (यापुढे या कलमात जिचा निर्देश " पुरवठादार " असा करण्यात आला आहे) दाखल केलेल्या एखाद्या कर कालावधीमधील जावक पुरवठ्याच्या संबंधातील प्रत्येक जमापत्राचे तपशील,–

(क) तत्सम करपात्र व्यक्तीने, (यापुढे, या कलमात जिचा निर्देश 'प्राप्तकर्ता' असा करण्यात आला आहे) त्याच कर कालावधीसाठी किंवा त्यानंतरच्या कोणत्याही कर कालावधीसाठी त्याच्या वैध विवरणाद्वारे केलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेच्या तत्सम कपातीच्या दाव्याशी ;

(ख) उद्दिष्टी करदायित्वातून करण्यात येणाऱ्या कपातीच्या दाव्यांच्या पुनरावृत्तीशी

विहित रीतीने आणि विहित मुदतीच्या आत ताडून पाहण्यात येतील ;

(२) प्राप्तकर्त्याकडून करण्यात येणाऱ्या निविष्टी कराच्या जमा रकमेच्या तत्सम कपातीच्या दाव्याशी जुळत असेल अशी, पुरवठादाराच्या उद्दिष्टी करदायित्वातून कपात करण्याबद्दलचा दावा अंतिमतः मान्य करण्यात येईल आणि अशी मान्यता विहित करण्यात येईल अशा रीतीने, पुरवठादाराला कळविण्यात येईल.

(३) जावक पुरवठ्याच्या संबंधात उद्दिष्टी करदायित्वातून करावयाच्या कपातीची रक्कम निविष्टी कराच्या जमा रकमेच्या तत्सम कपातीच्या दाव्याच्या रकमेपेक्षा अधिक असेल किंवा प्राप्तकर्त्याने आपल्या वैध विवरणामध्ये तत्सम जमापत्र घोषित केले नसेल त्याबाबतीत, ती विसंगती अशा दोन्ही व्यक्तींना विहित करण्यात येईल अशा रीतीने कळविण्यात येईल.

(४) उद्दिष्टी करदायित्वातून कपातीच्या दाव्यांच्या पुनरावृत्तीबाबत विहित करण्यात येईल अशा रीतीने पुरवठादाराला कळविण्यात येईल.

(५) ज्या रकमेच्या संबंधात पोट-कलम (३) अन्वये कोणतीही विसंगती कळविण्यात आली असेल आणि ती विसंगती कळविण्यात आली असेल त्या महिन्याच्या वैध विवरणात प्राप्तकर्त्याने त्याबाबत दुरुस्ती केलेली नसेल त्याबाबतीत अशी रक्कम, विसंगती कळविण्यात आली असेल त्या महिन्यालगतनंतरच्या महिन्याच्या पुरवठादाराच्या विवरणात, विहित करण्यात येईल अशा रीतीने, त्या पुरवठादाराच्या उद्दिष्टी करदायित्वामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

(६) दाव्यांच्या पुनरावृत्तीमुळे अतिरिक्त असल्याचे आढळून येईल अशी उद्दिष्टी करदायित्वातून कोणतीही कपात करण्यासंबंधातील रक्कम, पुनरावृत्ती कळविण्यात आली असेल त्या महिन्याच्या पुरवठादाराच्या विवरणात त्याच्या उद्दिष्टी करदायित्वामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

(७) जर प्राप्तकर्त्याने कलम ३९ च्या पोट-कलम (९) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत आपल्या वैध विवरणात जमापत्राचे तपशील घोषित केले असतील तर, पुरवठादार हा, आपल्या उद्दिष्टी करदायित्वातून पोट-कलम (५) अन्वये समाविष्ट केलेली रक्कम वजा करण्यास पात्र असेल.

(८) पोट-कलम (५) किंवा पोट-कलम (६) अन्वये ज्याच्या उद्दिष्टी कर दायित्वात कोणतीही रक्कम समाविष्ट करण्यात आली असेल असा कोणताही पुरवठादार, उक्त पोट-कलमांन्वये तत्सम रक्कम समाविष्ट करण्यात येईपर्यंत उद्दिष्टी करदायित्वातून अशा कपातीचा दावा केल्याच्या दिनांकापासून, अशा समाविष्ट करण्यात आलेल्या रकमेच्या संबंधात, कलम ५० च्या पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या दराने व्याज भरण्यास दायी असेल.

(९) पोट-कलम (७) अन्वये उद्दिष्टी करदायित्वातील कोणत्याही कपातीला मान्यता दिली असेल त्याबाबतीत, पोट-कलम (८) अन्वये प्रदान केलेल्या व्याजाची रक्कम, विहित करण्यात येईल अशा रीतीने, पुरवठादाराच्या इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीच्या तत्सम शीर्षामध्ये जमा करून त्याद्वारे ती त्याला परत करण्यात येईल :

परंतु, कोणत्याही परिस्थितीत जमा करावयाच्या व्याजाची रक्कम ही, प्राप्तकर्त्याने भरलेल्या व्याजाच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही,

(१०) पोट-कलम (७) च्या तरतुदींचे उल्लंघन करून उद्दिष्टी कर दायित्वातून कपात केलेली रक्कम, ज्या महिन्यात असे उल्लंघन केले असेल त्या महिन्यातील पुरवठादाराच्या विवरणातील त्याच्या उद्दिष्टी कर दायित्वामध्ये समाविष्ट करण्यात येईल आणि असा पुरवठादार, कलम ५० च्या पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने अशा प्रकारे समाविष्ट करण्यात आलेल्या रकमेवर व्याज भण्यास दायी असेल.

वार्षिक विवरण. **४४.** (१) निविष्टी सेवा वितरक, कलम ५१ किंवा कलम ५२ अन्वये कर भरणारी व्यक्ती, नैमित्तिक करपात्र व्यक्ती आणि अनिवासी करपात्र व्यक्ती, यांव्यतिरिक्त प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, प्रत्येक वित्तीय वर्षाचे वार्षिक विवरण अशा वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतरच्या ३१ डिसेंबर रोजी किंवा त्यापूर्वी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील.

(२) कलम ३५ च्या पोट-कलम (५) अन्वये जिने आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करवून घेणे आवश्यक असेल अशी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, वार्षिक लेख्यांची लेखापरीक्षा केलेली प्रत व लेखापरीक्षा केलेल्या वार्षिक वित्तीय विरणपत्रासह त्या वित्तीय वर्षासाठी सादर केलेल्या विवरणात घोषित केलेल्या पुरवठ्यांच्या मूल्यांचे मेळ बसविणारे पुनर्मेळ विवरणपत्र आणि विहित करण्यात येतील असे इतर तपशील यांसह पोट-कलम (१) खालील वार्षिक विवरण इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील.

अंतिम विवरण. **४५.** जिने कलम ३९ च्या पोट-कलम (१) अन्वये विवरण दाखल करणे आवश्यक आहे, आणि जिची नोंदणी रद्द केली असेल अशी प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती अंतिम विवरण विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, नोंदणी रद्द केल्याच्या दिनांक किंवा नोंदणी रद्द केल्याच्या आदेशाचा दिनांक, यांपैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत दाखल करील.

विवरण कसूरदार व्यक्तींना नोटीस. **४६.** नोंदणीकृत व्यक्तींने कलम ३९ किंवा कलम ४४ किंवा कलम ४५ अन्वये विवरण दाखल करण्यात कसूर केली असेल त्याबाबतीत, असे विवरण पंधरा दिवसांच्या आत दाखल करण्यास सांगणारी नोटीस विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने काढण्यात येईल.

विलंब फी आकारणे. **४७.** (१) नियत दिनांकापर्यंत कलम ३७ किंवा कलम ३८ अन्वये आवश्यक केलेल्या जावक किंवा आवक पुरवठ्यांचे तपशील, किंवा कलम ३९ किंवा कलम ४५ अन्वये आवश्यक असलेली विवरणे दाखल करण्यात कसूर करील अशी कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती, ज्या कालावधीमध्ये अशी कसूर करण्याचे चालू ठेवील अशा कालावधीसाठी पाच हजार रुपयांच्या कमाल रकमेच्या अधीन राहून प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपये इतकी विलंब फी भरण्यास दायी असेल.

(२) नियत दिनांकापर्यंत कलम ४४ अन्वये आवश्यक केलेले विवरण दाखल करण्यात कसूर करील अशी कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती ज्या कालावधीमध्ये अशी कसूर करण्याचे चालू ठेवील अशा कालावधीत राज्यातील तिच्या एकूण उलाढालीच्या पाव टक्के इतक्या दराने परिगणना केलेल्या कमाल रकमेच्या अधीन राहून प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपये इतकी विलंब फी भरण्यास दायी असेल.

**४८.** (१) वस्तू व सेवा कर व्यवसायींच्या मान्यतेची रीत, त्यांच्या पात्रतेच्या शर्ती, कर्तव्ये व आबंधने, त्यांना काढून टाकण्याची रीत आणि त्यांचे कार्य पार पाडण्याशी संबंधित असलेल्या इतर शर्ती, विहित करण्यात येतील अशा असतील. वस्तू व सेवा कर व्यवसायी.

(२) नोंदणीकृत व्यक्तीस, कलम ३७ अन्वये जावक पुरवठ्यांचे तपशील, कलम ३८ अन्वये आवक पुरवठ्यांचे तपशील व कलम ३९ किंवा कलम ४४ किंवा कलम ४५ अन्वये विवरण दाखल करण्यासाठी मान्यताप्राप्त वस्तू व सेवा कर व्यवसायीला, विहित केलेल्या रीतीने, प्राधिकृत करता येईल.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, वस्तू व सेवा कर व्यवसायीने दाखल केलेले विवरण किंवा इतर तपशील यांमध्ये सादर केलेल्या कोणत्याही तपशिलांच्या अचूकतेची जबाबदारी ही, जिच्या वतीने असे विवरण व तपशील दाखल केला असेल अशा नोंदणीकृत व्यक्तीचीच राहील.

## प्रकरण दहा

## **कराचे प्रदान**

**४९.** (१) एखाद्या व्यक्तीने, इंटरनेट बँकिंगद्वारे किंवा क्रेडिट किंवा डेबिट कार्ड किंवा नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर (एनईएफटी) किंवा रिअल टाईम ग्रॉस सेटलमेंट (आरटीजीएस) यांचा वापर करून किंवा अशा इतर कोणत्याही पद्धतीद्वारे कर, व्याज, शास्ती, फी किंवा इतर कोणतीही रक्कम यासंबंधात केलेली प्रत्येक जमा ही, विहित करण्यात येतील अशा शर्ती व निर्बंधांना अधीन राहून, विहित करण्यात येईल अशा रीतीने ठेवावयाच्या अशा व्यक्तीच्या इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीत जमा करण्यात येईल. कर, व्याज, शास्ती व इतर रकमा यांचे प्रदान.

(२) नोंदणीकृत व्यक्तीच्या विवरणामध्ये स्वयं-निर्धारित केलेल्या निविष्टी कराची जमा रक्कम, कलम ४१ अनुसार विहित करण्यात येईल अशा रीतीने ठेवावयाच्या तिच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीत जमा करण्यात येईल.

(३) इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीत उपलब्ध असलेल्या रकमेचा, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींना अधीन राहून आणि अशा मुदतीच्या आत, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार देय असलेला कर, व्याज, शास्ती, फी किंवा इतर कोणतीही रक्कम यासंबंधीचा कोणताही भरणा करण्यासाठी उपयोग करता येईल.

(४) इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीत उपलब्ध असलेल्या रकमेचा, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींना अधीन राहून आणि अशा मुदतीच्या आत, या अधिनियमाच्या किंवा एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या तरतुदींअन्वये देय असेल अशा, उद्दिष्टी कराचा कोणताही भरणा करण्यासाठी उपयोग करता येईल.

(५) नोंदणीकृत व्यक्तीच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीत पुढील करांमुळे उपलब्ध असलेली निविष्टी कराची जमा रक्कम,–

(क) एकात्मिक कर—प्रथमतः एकात्मिक कराचे प्रदान करण्यासाठी वापरण्यात येईल आणि उर्वरित रक्कम, कोणतीही असल्यास, केंद्रीय कर व राज्य कर किंवा यथास्थिति संघ राज्यक्षेत्र कर या क्रमाने तिचे प्रदान करण्यासाठी वापरण्यात येईल ;

(ख) केंद्रीय कर—प्रथमतः केंद्रीय कराचे प्रदान करण्यासाठी वापरण्यात येईल आणि उर्वरित रक्कम, कोणतीही असल्यास, एकात्मिक कराचे प्रदान करण्यासाठी वापरण्यात येईल ;

(ग) राज्य कर—प्रथमतः राज्य कराचे प्रदान करण्यासाठी वापरण्यात येईल आणि उर्वरित रक्कम, कोणतीही असल्यास, एकात्मिक कराचे प्रदान करण्यासाठी वापरण्यात येईल ;

(घ) संघ राज्यक्षेत्र कर—प्रथमतः संघ राज्यक्षेत्र कराचे प्रदान करण्यासाठी वापरण्यात येईल आणि उर्वरित रक्कम, कोणतीही असल्यास, एकात्मित कराचे प्रदान करण्यासाठी वापरण्यात येईल ;

(ङ) केंद्रीय कर—राज्य कर किंवा संघ राज्यक्षेत्र कर याचे प्रदान करण्यासाठी वापरण्यात येणार नाही ; आणि

(च) राज्य कर किंवा संघ राज्यक्षेत्र कर हा केंद्रीय कराचा भरणा करण्यासाठी वापरण्यात येणार नाही.

(६) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये देय असलेला कर, व्याज, शास्ती, फी किंवा इतर कोणतीही रक्कम यांचे प्रदान केल्यानंतर, इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीतील किंवा इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीतील शिल्लक रक्कम, कलम ५४ च्या तरतुदींनुसार परत करता येईल.

(७) या अधिनियमाखालील करपात्र व्यक्तीची सर्व दायित्वे, विहित करण्यात येईल अशा रीतीने इलेक्ट्रॉनिक दायित्व नोंदवहीमध्ये अभिलिखित व परिरक्षित करण्यात येतील.

(८) प्रत्येक करपात्र व्यक्ती, या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेल्या नियमांखाली आपला कर आणि इतर देणी पुढील क्रमाने चुकती करील :—

(क) आधीच्या कर कालावधीच्या विवरणांशी संबंधित असलेला स्वयं-निर्धारित कर आणि इतर देणी ;

(ख) चालू कर कालावधीच्या विवरणांशी संबंधित असलेला स्वयं-निर्धारित कर आणि इतर देणी ;

(ग) कलम ७३ किंवा ७४ अन्वये निश्‍चित केलेल्या मागणीसह या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये देय असलेली इतर कोणतीही रक्कम.

(९) जिने या अधिनियमान्वये वस्तू किंवा सेवा किंवा या दोन्हींवरील कर भरलेला असेल अशा प्रत्येक व्यक्तीने, एतद्‌विरुद्ध सिद्ध केले नाही तर, अशा कराचा संपूर्ण भार अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या प्राप्तकर्त्यावर टाकला असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) अधिकृत बँकेतील शासनाच्या खात्यात जमा केल्याचा दिनांक हा इलेक्ट्रॉनिक रोकड खाते वहीत जमा केल्याचा दिनांक मानण्यात येईल.

(ख) (एक) " कराची देणी " या शब्दप्रयोगाचा अर्थ, या अधिनियमाखालील देय असलेला कर, असा आहे आणि त्यामध्ये व्याज, फी व शास्ती यांचा समावेश होत नाही ;

(दोन) " अन्य देणी " या शब्दप्रयोगाचा अर्थ, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमान्वये देय असलेले व्याज, शास्ती, फी किंवा अन्य कोणतीही रक्कम, असा आहे.

कराच्या विलंबित प्रदानावरील व्याज.

**५०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार कर भरण्यास पात्र असलेली परंतु विहित कालावधीत शासनाकडे तो कर किंवा त्या कराचा कोणताही भाग भरण्यात कसूर करणारी अशी प्रत्येक व्यक्ती, ज्या कालावधीसाठी कर किंवा त्याचा कोणताही भाग भरावयाचा राहिला असेल त्या कालावधीसाठी, परिषदेच्या शिफारशीवरून शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल त्याप्रमाणे अठरा टक्क्यांपेक्षा जास्त नसेल अशा दराने, स्वतःहून व्याज भरील.

(२) पोट-कलम (१) खालील व्याजाची परिगणना ही, ज्या दिवशी असा कर भरण्यास देय होता त्या दिवसाच्या लगतनंतरच्या दिवसापासून विहित करण्यात येईल, अशा रीतीने करण्यात येईल.

(३) एखाद्या करपात्र व्यक्तीने कलम ४२ च्या पोट-कलम (१०) अन्वये निविष्टी कराच्या जमा रकमेचा गैरवाजवी किंवा जास्तीचा दावा केला असेल किंवा कलम ४३ च्या पोट-कलम (१०) अन्वये उद्दिष्टी करदायित्वातून गैरवाजवी किंवा जास्तीची कपात केली

असेल त्याबाबतीत, ती, अशा गैरवाजवी किंवा जास्तीच्या दाव्याच्या रकमेवर किंवा यथास्थिति, अशा गैरवाजवी किंवा जास्तीच्या कपातीच्या रकमेवर, परिषदेच्या शिफारशीवरून शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा चोवीस टक्क्यांपेक्षा जास्त नसलेल्या अशा दराने व्याज देईल.

मूळ स्रोतातून कराची वजात.

**५१.** (१) या अधिनियमात एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, शासनास,–

(क) केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या विभागाला किंवा आस्थापनेला ; किंवा

(ख) स्थानिक प्राधिकरणाला, किंवा

(ग) शासकीय अभिकरणांना, किंवा

(घ) परिषदेच्या शिफारशींवरून शासनाकडून अधिसूचित करण्यात येतील अशा व्यक्तींना किंवा अशा व्यक्तींच्या प्रवर्गाला,

(यात यापुढे या कलमात ज्यांचा निर्देश " वजातदार (डिडक्टर) " असा करण्यात आला आहे.) ज्या पुरवठ्याचे संविदेखालील मूल्य दोन लाख पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक असेल तेथे अशा करपात्र वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठादाराला (यात यापुढे, या कलमात ज्याचा निर्देश " वजाती (डिडक्टी) " असा करण्यात आला आहे) प्रदान करण्यात आलेल्या किंवा त्याच्या खात्यात जमा करण्यात आलेल्या रकमेतून एक टक्का इतक्या दराने कराची वजात करण्यासाठी

आदेश देता येईल :

परंतु, जर एखाद्या राज्यातील किंवा संघ राज्यक्षेत्रातील पुरवठादाराचे स्थान आणि पुरवठ्याचे ठिकाण हे प्राप्तकर्त्याने नोंदणी केलेल्या राज्याहून किंवा, यथास्थिति, संघ राज्यक्षेत्राहून वेगळे असेल तर वजात करण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.—**वर विनिर्दिष्ट केलेल्या कराच्या वजातीच्या प्रयोजनासाठी, बीजकामध्ये दर्शविलेली केंद्रीय कराची, राज्य कराची, एकात्मिक कराची व उपकराची रक्कम वगळून उर्वरित रक्कम ही पुरवठ्याचे मूल्य म्हणून गणली जाईल.

(२) या कलमान्वये कर म्हणून वजात केलेली रक्कम, ज्या महिन्यात अशी वजात केली असेल, त्या महिन्याच्या समाप्तीनंतर दहा दिवसांच्या आत वजातदाराकडून शासनाच्या खात्यात विहित केलेल्या अशा रीतीने भरण्यात येईल.

(३) कपातदार, संविदा मूल्य, वजातीचा दर, वजात केलेली रक्कम, शासनाकडे भरलेली रक्कम आणि विहित करण्यात येतील असे अन्य तपशील नमूद असलेले प्रमाणपत्र वजातीला देईल.

(४) कोणत्याही वजातदाराने, मूळ स्रोतातून कराची वजात केल्यानंतर अशी वजात केलेली रक्कम शासनाकडे जमा केल्यापासून पाच दिवसांच्या आत, वजातीला त्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात कसूर केली असेल तर, वजातदार, अशा पाच दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीनंतरच्या दिवसापासून ती चूक दुरुस्त होईपर्यंत जास्तीत जास्त पाच हजार रुपयांच्या रकमेस अधीन राहून, विलंब फी म्हणून, प्रतिदिन शंभर रुपये इतकी रक्कम भरील.

(५) वजाती, वजात केलेला आणि कलम ३९ च्या पोट-कलम (३) अन्वये, दाखल करण्यात आलेल्या वजातदाराच्या विवरणामध्ये दर्शविलेला कर, आपल्या इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीमध्ये विहित करण्यात येईल अशा रीतीने जमा करण्याचा दावा करील.

(६) कोणत्याही वजातदाराने, पोट-कलम (१) अन्वये, कर म्हणून वजात केलेली रक्कम शासनाच्या खात्यात भरण्यास कसूर केली असल्यास, तो, वजात केलेल्या कराच्या रकमेव्यतिरिक्त कलम ५० च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींनुसार व्याज देईल.

(७) या कलमाखालील कसुरीच्या रकमेची निश्चिती, कलम ७३ किंवा कलम ७४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने करण्यात येईल.

(८) जास्तीची किंवा चुकीची वजात केल्यामुळे वजातदाराला किंवा वजातीला प्राप्त होणाऱ्या परताव्याबाबत कलम ५४ च्या तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल :

परंतु, वजात केलेली रक्कम, वजातीच्या इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीमध्ये जमा करण्यात आली असल्यास, वजातदाराला कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

**५२.** (१) या अधिनियमात एतद्‌विरुद्ध काहीही असले तरी, अभिकर्ता नसलेल्या प्रत्येक इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालकाकडून (यानंतर, या कलमात ज्याचा निर्देश 'प्रचालक' असा करण्यात आला आहे.) जेथे करपात्र पुरवठ्याच्या संबंधातील मोबदला प्रचालकाद्वारे गोळा करावयाचा असेल तेथे, अन्य पुरवठादारांकडून पुरवठा केलेल्या करपात्र पुरवठ्याच्या निव्वळ मूल्याच्या बाबतीत, परिषदेच्या शिफारशींवरून अधिसूचित करण्यात येईल त्याप्रमाणे एक टक्क्याहून अधिक नसेल अशा दराने परिगणित केलेली रक्कम गोळा करण्यात येईल. मूळ स्रोतातून कर गोळा करणे.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी, " करपात्र पुरवठ्याचे निव्वळ मूल्य " या शब्दप्रयोगाचा अर्थ, सर्व नोंदणीकृत व्यक्तींनी प्रचालकामार्फत कोणत्याही महिन्यात केलेल्या, कलम ९ च्या पोट-कलम ५ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांव्यतिरिक्त अन्य वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या करपात्र पुरवठ्याचे ज्यातून उक्त महिन्यात पुरवठादारांना परत करण्यात आलेल्या करपात्र पुरवठ्यांचे एकूण मूल्य वजा केलेले असेल त्या पुरवठ्यांचे एकूण मूल्य, असा आहे.

(२) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली रक्कम गोळा करण्याचा अधिकार हा, प्रचालकाकडून वसुलीच्या इतर कोणत्याही प्रकारास बाध आणणारा नसेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये गोळा करण्यात आलेली रक्कम, ज्या महिन्यात अशी रक्कम गोळा करण्यात आली असेल तो महिना संपल्यानंतर दहा दिवसांच्या आत विहित केलेल्या पद्धतीने प्रचालकाद्वारे शासनाकडे भरण्यात येईल.

(४) प्रत्येक प्रचालक, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने असा महिना संपल्यानंतर दहा दिवसांच्या आत, त्या महिन्यात त्याच्याद्वारे परत करण्यात आलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्यासह त्याच्याद्वारे पुरविलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या निर्गत पुरवठ्याचा तपशील अंतर्भूत असणारे आणि पोट-कलम (१) अन्वये गोळा केलेल्या रकमेचे, विवरणपत्र इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करील.

(५) जो, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली रक्कम गोळा करील असा प्रत्येक प्रचालक, इलेक्ट्रॉनिक रीतीने त्यामार्फत करण्यात आलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या जावक पुरवठ्याचा तपशील समाविष्ट असलेले एक वार्षिक विवरणपत्र, त्यामार्फत परत करण्यात आलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याचा आणि त्या वित्तीय वर्षात उक्त पोट-कलमान्वये गोळा केलेल्या रकमेच्या तपशिलासह, त्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतर येणाऱ्या डिसेंबर महिन्याच्या एकतीस तारखेपूर्वी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने दाखल करील.

(६) जर कोणत्याही प्रचालकाला, पोट-कलम (४) अन्वये विवरणपत्र दाखल केल्यानंतर, कर प्राधिकरणाने केलेली छाननी, लेखापरीक्षा, तपासणी किंवा अंमलबजावणी कार्य यांच्या परिणामाव्यतिरिक्त कोणतीही वगळणूक किंवा त्यातील चुकीचा तपशील आढळून आला असेल तर, तो, कलम ५० च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, व्याजाच्या प्रदानाच्या अधीन राहून ज्या महिन्यात अशी वगळणूक किंवा चुकीचा तपशील निदर्शनास आला असेल त्या महिन्यात दाखल करावयाच्या विवरणपत्रातील वगळणूक व चुकीचे तपशील यांमध्ये दुरुस्ती करील :

परंतु, कोणतीही वगळणूक किंवा चुकीच्या तपशिलामध्ये अशी दुरुस्ती करण्यास, वित्तीय वर्ष संपल्यानंतर पुढील सप्टेंबर महिन्याचे विवरणपत्र दाखल करण्यासाठी असलेल्या नियत दिनांकानंतर किंवा संबंधित वर्षाचे विवरणपत्र सादर करण्याच्या प्रत्यक्ष दिनांकानंतर, यापैकी जो अगोदरचा असेल, त्या दिनांकानंतर, मुभा असणार नाही.

(७) ज्या पुरवठादाराने प्रचालकामार्फत वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीं पुरविल्या आहेत, असा पुरवठादार, त्याच्या इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीत, पोट-कलम (४) अन्वये गोळा करण्यात आलेल्या आणि तदन्वये प्रचालकाच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या जमा रकमेचा विहित करण्यात येईल अशा रीतीने दावा करील.

(८) पोट-कलम (४) अन्वये, प्रत्येक प्रचालकाने दाखल केलेला पुरवठ्याचा तपशील या अधिनियमाखाली नोंदणीकृत असलेल्या संबंधित पुरवठादाराने विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि कालावधीत, दाखल केलेल्या जावक पुरवठ्याच्या तत्सम तपशिलाशी ताडून पाहण्यात येईल.

(९) जर पोट-कलम (४) अन्वये प्रचालकाने दाखल केलेला जावक पुरवठ्याचा तपशील कलम ३७ अन्वये पुरवठादाराने दाखल केलेल्या तत्सम तपशिलाशी मिळताजुळता नसेल तर ही विसंगती, विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कालावधीत दोन्ही व्यक्तींना कळविण्यात येईल.

(१०) ज्या रकमेच्या संबंधात पोट-कलम (९) अन्वये, कोणतीही विसंगती कळविण्यात आली असेल आणि जी पुरवठादाराने त्या महिन्याच्या त्याच्या वैध विवरणात किंवा प्रचालकाने त्याच्या विवरणपत्रात दुरुस्त केली नसेल तर, त्या रकमेची जेव्हा प्रचालकाने दाखल केलेल्या जावक पुरवठ्याचे मूल्य हे पुरवठादाराने दाखल केलेल्या जावक पुरवठ्याच्या मूल्यापेक्षा अधिक असेल तेव्हा, उक्त पुरवठादाराच्या उद्दिष्टी कर दायित्वामध्ये ज्या महिन्यात विसंगती कळविण्यात आली असेल त्या महिन्याच्या पुढील महिन्यासाठीच्या त्याच्या विवरणात विहित करण्यात येईल अशा रीतीने भर घालण्यात येईल.

(११) ज्याच्या उद्दिष्टी कर दायित्वात पोट-कलम (१०) अन्वये कोणत्याही रकमेची, भर घालण्यात आली असेल, असा संबंधित पुरवठादार, अशा प्रकारे भर घालण्यात आलेल्या रकमेवर असा कर ज्या दिनांकापासून देय होता त्या दिनांकापासून तो कर भरण्यात आल्याच्या दिनांकापर्यंत, कलम ५० च्या पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या दराने व्याजासह, अशा पुरवठ्याशी संबंधित देय असलेला कर भरण्यास दायी असेल.

(१२) उप आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पदावर असलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास, एकतर या अधिनियमान्वये कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी किंवा कार्यवाही चालू असताना, पुढील बाबींच्या संबंधातील असे तपशील नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, सादर करण्याबाबत प्रचालकाला फर्माविणारी नोटीस बजाविता येईल,—

(क) कोणत्याही कालावधीदरम्यान अशा प्रचालकामार्फत करण्यात आलेला वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा ; किंवा

(ख) अशा प्रचालकामार्फत पुरवठा करताना, अशा प्रचालकांनी व्यवस्था केलेल्या आणि अशा पुरवठादारांनी धंद्याची अतिरिक्त ठिकाणे म्हणून घोषित केलेल्या गोदामांमध्ये किंवा वखारींमध्ये–मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येवोत, ठेवलेला वस्तूंचा साठा.

(१३) पोट-कलम (१२) अन्वये ज्या प्रचालकावर नोटीस बजावण्यात आलेली असेल असा प्रत्येक प्रचालक, अशी नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून कामकाजाच्या १५ दिवसांच्या आत आवश्यक माहितीसादर करील.

(१४) पोट-कलम (१२) अन्वये बजावण्यात आलेल्या नोटिशीद्वारे आवश्यक असलेली माहिती सादर करण्यास कसूर करील अशी कोणतीही व्यक्ती, कलम १२२ अन्वये घेण्यात आलेल्या किंवा घेण्यात येईल त्या कारवाईस बाध न आणता, पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा शास्तीस पात्र असेल.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ, " संबंधित पुरवठादार " या शब्दप्रयोगाचा अर्थ, प्रचालकामार्फत वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करणारा पुरवठादार, असा आहे.

निविष्टी कराच्या जमा रकमेचे हस्तांतरण.

**५३.** या अधिनियमाखाली जमा खात्यात उपलब्ध असलेली निविष्टी कराची जमा रक्कम कलम ३९ च्या, पोट-कलम (१) अन्वये सादर केलेल्या वैध विवरणात दर्शविल्याप्रमाणे, कलम ४९ चे पोट-कलम (५) याच्या तरतुदींनुसार एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाखालील कराची देणी चुकती करण्यासाठी वापरल्यावर राज्य कराच्या रूपाने गोळा केलेली रक्कम ही, अशा जमा खात्यातील अशा वापरलेल्या रकमेएवढ्या रकमेने कमी केल्याप्रमाणे असेल आणि राज्य शासन, अशा प्रकारे कमी केलेल्या रकमेएवढी रक्कम, विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा मुदतीत, राज्य कराच्या खात्यातून एकात्मिक कर खात्यात हस्तांतरित करील.

प्रकरण - अकरा

## परतावा

कराचा परतावा.

**५४.** (१) एखाद्या व्यक्तीस तिने भरलेल्या कोणत्याही कराचा व अशा करावर भरलेल्या व्याजाचा, कोणतेही असल्यास, किंवा इतर कोणत्याही रकमेचा परतावा मागण्यासाठी प्रस्तुत दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने अर्ज करता येईल :

परंतु, कलम ४९ च्या पोट-कलम (६) नुसार इलेक्ट्रॉनिक रोकड खातेवहीतील कोणत्याही शिल्लक असलेल्या रकमेच्या परताव्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा रीतीने कलम ३९ अन्वये सादर केलेल्या विवरणातील अशा परताव्याचा दावा करता येईल.

(२) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या आवक पुरवठ्याबाबत तिने प्रदान केलेल्या कराचा परतावा मिळण्यास हक्कदार असलेल्या, संयुक्त राष्ट्र संघाच्या विशेषीकृत अभिकरणास किंवा संयुक्त राष्ट्रे (विशेषाधिकार प्रतिक्षमता) अधिनियम, १९४७ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या कोणत्याही बहुपक्षीय वित्तीय संस्थेला व संघटनेला, परराष्ट्रीय वाणिज्य दूतावासास किंवा राजदूतावासास किंवा कलम ५५ अन्वये अधिसूचित केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या वर्गास ज्या तिमाहीमध्ये असा पुरवठा प्राप्त झाला होता त्या तिमाहीच्या शेवटच्या दिवसापासून सहा महिन्यांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने अशा परताव्यासाठी अर्ज करता येईल. १९४७ चा ४६.

(३) पोट-कलम (१०) च्या तरतुदींना अधीन राहून, नोंदणीकृत व्यक्तीस, कोणत्याही कर कालावधीच्या शेवटी न वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेच्या कोणत्याही परताव्याचा दावा करता येईल :

परंतु,—

(एक) कराचे प्रदान न करता शून्याधारित पुरवठा केला असेल ;

(दोन) जेथे परिषदेच्या शिफारशीवरून शासनाकडून अधिसूचित करण्यात येतील अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीच्या पुरवठ्याव्यतिरिक्त जावक पुरवठ्यावरील (निरंक दराने किंवा पूर्णतः सूट दिलेल्या पुरवठ्यांव्यतिरिक्त) कराच्या दराहून अधिक दर असणाऱ्या निविष्टीवरील कराच्या दरामुळे जमा रक्कम संचित झाली असेल, तेथे त्यांखेरीज इतर कोणत्याही बाबतीत, न वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचा कोणताही परतावा दिला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, जेथे निर्यात शुल्कास अधीन राहून, वस्तू भारताबाहेर निर्यात केल्या असतील त्याबाबतीत, कोणत्याही न वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचा परतावा दिला जाणार नाही :

परंतु तसेच, जर वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठादाराने, अशा पुरवठ्यांवर प्रदान केलेल्या एकात्मिक कराच्या परताव्याचा दावा केला असेल तर, कोणत्याही निविष्टी कराच्या जमा रकमेचा परतावा दिला जाणार नाही.

(४) अर्जासोबत,—

(क) अर्जदाराला परतावा देय असल्याचे सिद्ध करणारा, विहित करण्यात येईल असा कागदोपत्री पुरावा ; आणि

(ख) कराची रक्कम व अशा कराच्या रकमेवर भरलेले व्याज, कोणतेही असल्यास, किंवा ज्या रकमेच्या संबंधात, अशा परताव्याचा दावा केला असेल अशी भरलेली इतर कोणतीही रक्कम, अर्जदाराकडून गोळा करण्यात आली होती किंवा ती त्याच्याकडून भरण्यात आली होती आणि अशा कराचा आणि व्याजाचा भार इतर कोणत्याही व्यक्तीवर टाकण्यात आला नव्हता असे सिद्ध करणारा, अर्जदार सादर करील असा कागदोपत्री किंवा इतर पुरावा (कलम ३३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कागदपत्रांसह) :

परंतु, जेथे परतावा म्हणून दावा केलेली रक्कम दोन लाख रुपयांपेक्षा कमी असेल त्याबाबतीत, अर्जदाराने कोणताही कागदोपत्री किंवा अन्य एखादा पुरावा सादर करणे आवश्यक असणार नाही. परंतु त्यास, त्याच्याकडून अशा कराच्या आणि व्याजाच्या रकमेचा भार कोणत्याही अन्य व्यक्तीवर टाकण्यात आला नसल्याचे उपलब्ध असलेल्या कागदोपत्री किंवा अन्य पुराव्याच्या आधारे प्रमाणित करणारे प्रतिज्ञापत्र दाखल करता येईल.

(५) असा कोणताही अर्ज मिळाल्यावर जर समुचित अधिकाऱ्याची अशी खात्री पटली असेल की, परतावा म्हणून दावा केलेली संपूर्ण रक्कम किंवा रकमेचा भाग परतावा योग्य आहे तर त्यास, तद्नुसार आदेश काढता येईल आणि कलम ५७ मध्ये निर्दिष्ट केलेली अशा प्रकारे निश्चित केलेली रक्कम निधीमध्ये जमा करण्यात येईल.

(६) पोट-कलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, समुचित अधिकाऱ्यास, परिषदेच्या शिफारशीवरून, शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा नोंदणीकृत व्यक्तींच्या प्रवर्गाव्यतिरिक्त नोंदणीकृत व्यक्तींनी केलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या शून्याधारित पुरवठ्यामुळे परताव्याचा कोणताही दावा केलेला असल्यास, विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा शर्ती, मर्यादा व संरक्षक उपाययोजना यांना अधीन राहून, तात्पुरत्या स्वरूपात स्वीकारण्यात आलेली निविष्टी कराची जमा रक्कम वगळून, अशा प्रकारे दावा केलेल्या एकूण रकमेच्या नव्वद टक्के इतक्या रकमेचा तात्पुरत्या स्वरूपात परतावा देता येईल आणि त्यानंतर अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची यथोचित पडताळणी केल्यावर, दावा केलेला परतावा अंतिमतः चुकता करण्यासाठी पोट-कलम (५) अन्वये आदेश देता येईल.

(७) समुचित अधिकारी, सर्व बाबतीत परिपूर्ण असा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, पोट-कलम (५) खाली आदेश जारी करील.

(८) पोट-कलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परतावायोग्य रक्कम, जर अशी रक्कम पुढीलपैकी कोणत्याही बाबींशी संबंधित असेल तर, निधीत जमा करण्याऐवजी अर्जदारास चुकती करण्यात येईल :—

(क) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या शून्याधारित पुरवठ्यावर किंवा असा शून्याधारित पुरवठा करताना वापरलेल्या निविष्टींवरील किंवा निविष्टी सेवांवरील कराचा परतावा ;

(ख) पोट-कलम (३) अन्वये विनियोग न करण्यात आलेल्या निविष्टी कर जमा रकमेचा परतावा ;

(ग) ज्याची तरतूद करण्यात आलेली नाही—मग ती पूर्णतः किंवा अंशतः असो, आणि ज्याकरिता बीजक देण्यात आलेले नाही किंवा परतावा प्रमाणक देण्यात आलेले आहे अशा पुरवठ्यावर प्रदान केलेल्या कराचा परतावा ;

(घ) कलम ७७ अनुसार कराचा परतावा ;

(ङ) अर्जदाराने प्रदान केलेला कर आणि व्याज, कोणतेही असल्यास, किंवा इतर कोणतीही रक्कम, जर त्याने असा कर आणि व्याजाचा भार कोणत्याही इतर व्यक्तीवर टाकलेला नसल्यास ; किंवा

(च) शासन, परिषदेच्या शिफारशीवरून अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे अर्जदाराच्या अशा इतर वर्गाने सोसलेल्या करांचा किंवा व्याजाचा भार.

(९) अपील न्यायाधिकरण किंवा कोणतेही न्यायालय याचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा, आदेश किंवा निदेश किंवा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (८) मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

(१०) जिने कोणतेही विवरण सादर करण्यात कसूर केली असेल किंवा ज्यास, ज्यासाठी विनिर्दिष्ट दिनांकास, कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा अपील प्राधिकरण यांच्याकडून स्थगिती देण्यात आलेली नाही असा कोणताही कर, व्याज किंवा शास्ती देणे आवश्यक असेल अशा नोंदणीकृत व्यक्तीला, पोट-कलम (३) अन्वये, कोणताही परतावा देय असेल तर समुचित अधिकाऱ्यास,

(क) उक्त व्यक्तीने विवरण सादर करेपर्यंत किंवा कर, व्याज किंवा, यथास्थिति, शास्तीची रक्कम भरण्यात येईतोपर्यंत, देय परताव्याचे प्रदान रोखून धरता येईल ;

(ख) या अधिनियमान्वये किंवा विद्यमान कायद्यान्वये, करपात्र व्यक्ती ज्यासाठी दायी असेल परंतु, देय परताव्यातून ती तिने दिली नसेल तर कर, व्याज, शास्ती किंवा इतर कोणतीही रक्कम देय परताव्यातून वजा करता येईल.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "विनिर्दिष्ट दिनांक" या शब्दप्रयोगाचा अर्थ, या अधिनियमान्वये अपील दाखल करण्याचा अखेरचा दिनांक, असा असेल.

(११) ज्यातून परतावा उद्‌भवतो असा आदेश हा एखाद्या अपिलाचा किंवा पुढील कार्यवाहीचा विषय असेल तेव्हा किंवा या अधिनियमाखालील इतर कोणतीही कार्यवाही प्रलंबित असेल आणि आयुक्ताचे असे मत असेल की, असा परतावा दिल्यास महसुलावर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव आहे, किंवा उक्त अपिलात किंवा इतर कार्यवाहींमध्ये महसुलात दुष्कर्म करण्याचा किंवा लबाडी करण्याचा संभव आहे तर, त्यास, करपात्र व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, तो निश्चित करील अशा मुदतीपर्यंत, परतावा रोखून धरता येईल.

(१२) जेव्हा पोट-कलम (११) अन्वये परतावा रोखून ठेवण्यात आला असेल तेव्हा, करपात्र व्यक्ती, पोट-कलम ५६ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, परिषदेच्या शिफारशींवरून अधिसूचित केले असेल त्याप्रमाणे अपील किंवा पुढील कार्यवाहीच्या परिणामी परतावा मिळण्यास हक्कदार ठरत असेल तर ती, ६ टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही अशा दराने व्याज मिळण्यास हक्कदार असेल.

(१३) या कलमामध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, कलम २७ च्या पोट-कलम (२) अन्वये नैमित्तिक करपात्र व्यक्तीने किंवा अ-निवासी करपात्र व्यक्तीने जमा केलेली आगाऊ रक्कम, अशा व्यक्तीने ज्या कालावधीकरिता त्याला दिलेले नोंदणी प्रमाणपत्र अंमलात होते त्या संपूर्ण कालावधीच्या संबंधातील कलम ३९ अन्वये आवश्यक केलेली सर्व विवरणे दाखल केली नसतील तर, परत देण्यात येणार नाही.

(१४) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, जर परताव्याची रक्कम एक हजार रुपयांपेक्षा कमी असेल तर पोट-कलम (५) किंवा पोट-कलम (६) अन्वये अर्जदारास कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ :—

(१) " परतावा " यात वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या शुन्याधारित पुरवठ्यावरील किंवा असा शुन्याधारित पुरवठा करताना वापरण्यात आलेल्या निविष्टी किंवा निविष्टी सेवा यांबाबतीत भरण्यात आलेल्या कराचा परतावा किंवा पोट-कलम (३) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे मानीव निर्यात म्हणून मानण्यात आलेल्या वस्तूच्या पुरवठ्यावरील कराचा परतावा किंवा न वापरेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचा परतावा यांचा अंतर्भाव होतो.

२. " संबंधित दिनांक " याचा अर्थ—

(क) जेथे कराचा परतावा उपलब्ध असेल तेथे भारताबाहेर निर्यात केलेल्या वस्तूंच्या बाबतीत, त्या वस्तू किंवा, यथास्थिति, अशा वस्तूंमध्ये वापरलेल्या निविष्टी किंवा निविष्टी सेवा यांच्या संबंधात,—

(एक) जर त्या वस्तू समुद्रमार्गे किंवा हवाईमार्गे निर्यात केलेल्या असतील तर, अशा वस्तू ज्या जहाजामध्ये किंवा विमानामध्ये भरलेल्या असतील ते जहाज किंवा विमान ज्या दिनांकास भारत सोडेल तो दिनांक ; किंवा

(दोन) जर त्या वस्तू भूमार्गे निर्यात केल्या असतील तर, अशा वस्तू ज्या दिनांकास सरहद्द पार होतील तो दिनांक; किंवा

(तीन) जर त्या वस्तू टपालाने निर्यात केल्या असतील तर, भारताबाहेरील ठिकाणी संबंधित टपाल कार्यालयाने वस्तू पाठविल्याचा दिनांक ;

(ख) जेथे भरलेल्या कराचा परतावा उपलब्ध असेल तेथे मानीव निर्यात म्हणून मानलेल्या वस्तूंच्या पुरवठ्याच्या बाबतीत, अशा मानीव निर्यातीशी संबंधित विवरण ज्या दिनांकास दाखल केले असेल तो दिनांक ;

(ग) जेथे दिलेल्या कराचा परतावा उपलब्ध असेल तेथे भारताबाहेर निर्यात केलेल्या सेवांच्या बाबतीत, त्या सेवा किंवा, यथास्थिति, अशा सेवांमध्ये वापरलेल्या निविष्टी किंवा निविष्टी सेवा यांच्या संबंधात ;

(एक) जेथे सेवेचा पुरवठा असे प्रदान मिळण्यापूर्वी पूर्ण केलेला असेल तेथे विनिमययोग्य विदेशी चलनामध्ये प्रदानाच्या पावतीचा दिनांक, किंवा

(दोन) जेथे सेवेसाठीचे प्रदान, बीजक निर्गमित करण्याच्या दिनांकापूर्वी आगाऊ प्राप्त झाले असेल तेथे बीजक निर्गमित करण्याचा दिनांक ;

(घ) अपील प्राधिकारी, अपील न्यायाधिकरण किंवा कोणतेही न्यायालय यांचा न्यायनिर्णय, हुकूमनामा, आदेश किंवा निदेश याच्या परिणामी जेथे कर परतावायोग्य असेल त्याबाबतीत, असा न्यायनिर्णय, हुकूमनामा, आदेश किंवा निदेश कळविण्याचा दिनांक ;

(ङ) पोट-कलम (३) अन्वये खात्यातील निविष्टी कराच्या जमा रकमेच्या परताव्याच्या बाबतीत, ज्या वित्तीय वर्षी असा परताव्यासाठीचा दावा केला असेल ते वित्तीय वर्षाच्या समाप्त होण्याचा दिनांक ;

(च) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये जेथे कर तात्पुरता प्रदान केला असेल त्याबाबतीत, त्या कराच्या अंतिम निर्धारणानंतर कराच्या समायोजनाचा दिनांक ;

(छ) पुरवठादाराव्यतिरिक्त इतर व्यक्तीच्या बाबतीत, अशा व्यक्तीस वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींही मिळाल्याचा दिनांक ; आणि

(ज) इतर कोणत्याही बाबतीत, कराच्या प्रदानाचा दिनांक,

असा आहे.

विवक्षित प्रकरणातील परतावा.

**५५.** शासनास, परिषदेच्या शिफारशींवरून, अधिसूचनेद्वारे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या विशेषीकृत अभिकरणास किंवा संयुक्त राष्ट्रे (विशेषाधिकार व प्रतिक्षमता) अधिनियम, १९४७ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या कोणत्याही बहुपक्षीय वित्तीय संस्था व संघटनेला परराष्ट्राच्या वाणिज्यिक दूतावासाला किंवा राजदूतावासाला आणि जी अशा विहित करण्यात आलेल्या शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या अधिसूचित पुरवठ्यांवर भरलेल्या करांच्या परताव्याच्या मागणीस हक्कदार असेल किंवा असतील व याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला विनिर्दिष्ट करता येईल.

१९४७ चा ४६.

विलंबाने केलेल्या परताव्यांवर व्याज.

**५६.** जर कोणत्याही अर्जदाराला कलम ५४ च्या पोट-कलम (५) अन्वये कराचा परतावा देण्याचा आदेश दिला असेल, त्याचा परतावा, त्या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत दिलेला नसेल तर, उक्त पोट-कलमान्वये अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरच्या दिनांकापासून अशा कराच्या परताव्याच्या दिनांकापर्यंत, अशा परताव्याच्या संबंधात, परिषदेच्या शिफारशींवरून शासनाने काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे सहा टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही अशा दराने व्याज देय असेल :

परंतु असे की, जेथे अभिनिर्णय प्राधिकारी किंवा अपील प्राधिकारी किंवा अपील न्यायाधिकरण किंवा न्यायालय यांनी दिलेल्या व ज्यास अंतिम स्वरूप प्राप्त झाले आहे अशा आदेशाने उद्भवलेला परताव्याचा कोणताही दावा आणि अशा आदेशाच्या परिणामी दाखल केलेला अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत परतावा दिलेला नसेल तर, परिषदेच्या शिफारशींवरून अधिसूचित करण्यात येईल, त्याप्रमाणे नऊ टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही अशा दराने अशा परताव्याच्या संबंधात अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरच्या दिनांकापासून परताव्याच्या दिनांकापर्यंत व्याज देय असेल.

**स्पष्टीकरण.—**कलम ५४ च्या पोट-कलम (५) अन्वये, समुचित अधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अपील प्राधिकाऱ्याने, न्यायाधिकरणाने किंवा कोणत्याही न्यायालयाने परताव्याचा कोणताही आदेश दिला असेल त्याबाबतीत, या कलमाच्या प्रयोजनार्थ, अपील प्राधिकाऱ्याने, न्यायाधिकरणाने किंवा न्यायालयाने दिलेला आदेश हा, उक्त पोट-कलम (५) अन्वये दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ग्राहक कल्याण निधी. **५७.** ग्राहक कल्याण निधी म्हणून संबोधला जाणारा एक निधी शासनाकडून स्थापन करण्यात येईल आणि त्या निधीमध्ये विहित करण्यात येईल अशा रीतीने रकमा जमा करण्यात येतील,—

(क) कलम ५४ च्या पोट-कलम (५) मध्ये निर्दिष्ट केलेली कराची रक्कम ;

(ख) निधीत जमा केलेल्या रकमेच्या गुंतवणुकीतून येणारे कोणतेही उत्पन्न ; आणि

(ग) त्यास प्राप्त झालेल्या अशा इतर रकमा.

निधीचा विनियोग. **५८.** (१) शासनाकडून, विहित करण्यात येईल अशा रीतीने या निधीत जमा झालेल्या सर्व रकमांचा विनियोग ग्राहकांच्या कल्याणासाठी करण्यात येईल.

(२) शासन किंवा शासनाने विनिर्दिष्ट केलेले प्राधिकरण, निधीसंबंधीचा उचित व स्वतंत्र लेखा आणि इतर संबद्ध अभिलेख ठेवील आणि भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्याशी विचारविनिमय करून, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात लेख्यांचे वार्षिक विवरण तयार करील.

## प्रकरण बारा

## **निर्धारण**

स्वयंनिर्धारण. **५९.** प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, या अधिनियमान्वये देय असलेल्या करांचे स्वतः निर्धारण करील आणि कलम ३९ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक कर कालावधीसाठीचे विवरण सादर करील.

तात्पुरते निर्धारण. **६०.** (१) जेव्हा करपात्र व्यक्ती, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचे मूल्य निश्चित करण्यास किंवा त्यास लागू असणाऱ्या कराचा दर निश्चित करण्यास असमर्थ असेल तेव्हा, तिला, समुचित अधिकाऱ्याकडे लेखी स्वरूपात तात्पुरत्या तत्त्वावर कराच्या प्रदानासाठीची कारणे नमूद करून विनंती करता येईल आणि समुचित अधिकारी, अशी विनंती केल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीत त्याने विनिर्दिष्ट केले असेल त्याप्रमाणे अशा दराने किंवा अशा मूल्याने तात्पुरत्या तत्त्वावर कराचा भरणा करण्यास मुभा देणारा आदेश मंजूर करील.

(२) जर करपात्र व्यक्तीने, याबाबत विहित केले असेल अशा नमुन्यात बंधपत्र निष्पादित केले असेल आणि अंतिमतः निर्धारित केलेल्या कराची रक्कम आणि तात्पुरती निर्धारित

केलेली कराची रक्कम यांतील फरकाची रक्कम प्रदान करण्यासाठी बंधनकारक असणारी समुचित अधिकाऱ्यास उचित वाटेल अशी हमी किंवा अशी प्रतिभूति करपात्र व्यक्तीने दिली असेल तर, तिला तात्पुरत्या तत्त्वावर कराचा भरणा करण्याची मुभा देण्यात यावी.

(३) समुचित अधिकारी, पोट-कलम (१) अन्वये निर्गमित केलेला आदेश पाठविल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही एवढ्या कालावधीत, निर्धारण अंतिम स्वरूपात तयार करण्यासाठी आवश्यक असेल अशी माहिती विचारात घेऊन अंतिम निर्धारण आदेश पारित करील :

परंतु, या पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेला कालावधी, पुरेसे कारण दर्शविल्यास आणि लेखी नमूद करण्यात येतील अशा कारणांसाठी, सह आयुक्तास किंवा अपर आयुक्तास सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल एवढ्या पुढील कालावधीपर्यंत आणि आयुक्तास चार वर्षांपेक्षा अधिक नसेल एवढ्या पुढील कालावधीपर्यंत वाढवण्यात येईल.

(४) नोंदणीकृत व्यक्ती, तात्पुरत्या निर्धारणांतर्गत वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्यावर देय असलेल्या परंतु कलम ३९ च्या पोट-कलम (७) अन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास न भरलेल्या कोणत्याही करावर, कलम ५० च्या पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या दराने उक्त वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या बाबतीतील कर प्रदान करण्याच्या नियत दिनांकानंतरच्या पहिल्या दिवसापासून प्रत्यक्ष भरल्याच्या दिनांकापर्यंत—मग अशी रक्कम अंतिम निर्धारणासाठी आदेश देण्यापूर्वी किंवा दिल्यानंतर, भरलेली असेल किंवा नसेल, व्याज देण्यासाठी दायी असेल.

(५) नोंदणीकृत व्यक्ती, पोट-कलम (३) अन्वये अंतिम निर्धारणासाठी काढण्यात आलेल्या आदेशाच्या परिणामी परतावा मिळण्यास हक्कदार असेल तर, कलम ५४ च्या पोट-कलम (८) च्या अधीन राहून, कलम ५६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अशा परताव्यावर व्याज देण्यात येईल.

**६१.** (१) समुचित अधिकाऱ्यास, विहित करण्यात येईल अशा रीतीने नोंदणीकृत व्यक्तीच्या विवरणाच्या अचूकतेची पडताळणी करण्यासाठी, तिने सादर केलेल्या विवरणाची आणि संबंधित तपशिलांची छाननी करता येईल आणि तिच्या, निदर्शनास आलेल्या विसंगती, कोणत्याही असल्यास, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्यास कळविता येईल आणि त्याबाबत त्याच्याकडून स्पष्टीकरण मागता येईल. विवरणांची छाननी.

(२) जर ते स्पष्टीकरण मान्य झाल्यास, नोंदणीकृत व्यक्तीला त्याबाबत कळविण्यात येईल आणि त्यासंबंधात पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

(३) समुचित अधिकाऱ्याकडून, कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत किंवा त्याच्याकडून परवानगी देण्यात येईल अशा वाढीव कालावधीच्या आत समाधानकारक स्पष्टीकरण सादर न केल्याच्या बाबतीत किंवा नोंदणीकृत व्यक्तीने, त्या विसंगती मान्य केल्यानंतर, ज्या महिन्यातील त्या विसंगती मान्य केल्या असतील त्या महिन्याच्या

आपल्या विवरणामध्ये सुधारात्मक उपाय योजण्यात कसूर केल्याच्या बाबतीत, समुचित अधिकाऱ्यास, कलम ६५ किंवा कलम ६६ किंवा कलम ६७ अन्वये असेल त्यांसह योग्य ती कार्यवाही सुरू करता येईल, किंवा कलम ७३ किंवा कलम ७४ अन्वये कर आणि इतर देणी निश्चित करण्याची कार्यवाही करता येईल.

विवरण दाखल न करणाऱ्या व्यक्तीचे निर्धारण.

**६२.** (१) कलम ७३ किंवा कलम ७४ मध्ये एतद्‌विरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी नोंदणीकृत व्यक्ती, कलम ४६ अन्वये नोटीस बजावल्यानंतरसुद्धा, कलम ३९ किंवा कलम ४५ खालील आवश्यक ते विवरण दाखल करण्यात कसूर करील त्या बाबतीत, समुचित अधिकाऱ्यास, उपलब्ध असतील किंवा त्याने गोळा केलेली असतील अशी सर्व संबंधित तथ्ये विचारात घेऊन, आपल्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार उक्त व्यक्तीच्या कर दायित्वाच्या निर्धारणाची कार्यवाही करता येईल आणि कलम ४४ अन्वये विनिर्दिष्ट तारखेपासून ज्या वर्षाशी संबंधित कर भरलेला नसेल त्या वर्षाचे वार्षिक विवरण दाखल करण्यास पाच वर्षांच्या कालावधीच्या आत निर्धारण आदेश काढता येईल.

(२) नोंदणीकृत व्यक्ती, पोट-कलम (१) खालील निर्धारण आदेश बजावण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत वैध विवरण दाखल करील त्याबाबतीत, उक्त निर्धारण आदेश, मागे घेण्यात आला असल्याचे मानण्यात येईल. परंतु, कलम ५० च्या पोट-कलम (१) अन्वये व्याज भरण्याच्या किंवा कलम ४७ अन्वये विलंब फी भरण्याच्या दायित्वातून त्याची मुक्तता होणार नाही.

नोंदणी न केलेल्या व्यक्तींचे निर्धारण.

**६३.** कलम ७३ किंवा कलम ७४ यांमध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी करपात्र व्यक्ती नोंदणी केली जाण्यास पात्र असूनही नोंदणी प्राप्त करण्यात कसूर करील किंवा कलम २९ च्या पोट-कलम (२) अन्वये ज्याची नोंदणी रद्द करण्यात आली आहे परंतु तो कर भरण्यास पात्र होता, त्याबाबतीत, समुचित अधिकाऱ्यास, आपल्या सर्वोत्तम निर्णयशक्तीनुसार संबंधित कर कालावधीतील अशा करपात्र व्यक्तीच्या कर दायित्वाचे निर्धारण करता येईल आणि कलम ४४ अन्वये विनिर्दिष्ट तारखेपासून ज्या वर्षाशी संबंधित कर भरलेला नसेल त्या वर्षाचे वार्षिक विवरण दाखल करण्यास पाच वर्षांच्या कालावधीच्या आत निर्धारण आदेश काढता येईल :

परंतु, त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय असा कोणताही निर्धारण आदेश पारित करता येणार नाही.

विवक्षित विशेष प्रकरणांत विनासोपस्कार निर्धारण करणे.

**६४.** (१) समुचित अधिकाऱ्यास, करपात्र व्यक्तीचे कर दायित्व दर्शविणारा कोणताही पुरावा निदर्शनास आल्यावर, अपर आयुक्त्याच्या किंवा सहआयुक्ताच्या पूर्वपरवानगीने, महसुली हिताचे रक्षण करण्यासाठी अशा व्यक्तीच्या कर दायित्वाच्या निर्धारणाची कार्यवाही सुरू करता येईल आणि जर तसे करताना होणाऱ्या कोणत्याही विलंबामुळे महसुली हितावर प्रतिकूल परिणाम होऊ शकेल, असे मानण्यास त्याच्याकडे पुरेसे कारण असेल तेव्हा, त्यास निर्धारण आदेश काढता येईल :

परंतु, ते दायित्व कोणत्या व्यक्तीशी संबंधित आहे याची खातरजमा करता येत नसेल आणि असे दायित्व वस्तूंच्या पुरवठ्याशी संबंधित असेल त्याबाबतीत, अशा वस्तूंचा ताबा ज्या व्यक्तीकडे असेल अशा व्यक्ती, या कलमान्वये निर्धारण केली जाण्यास आणि कर आणि देय असलेली कोणतीही इतर रक्कम भरण्यास पात्र असलेली करपात्र व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेला आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत करपात्र व्यक्तीने अर्ज केल्यावर किंवा अपर आयुक्तास किंवा सहआयुक्तास स्वतःहून असे आदेश चुकीचे आहेत असे वाटत असेल तर, तो असे आदेश मागे घेईल आणि कलम ७३ किंवा ७४ मध्ये घालून दिलेल्या कार्यपद्धीचा अवलंब करील.

प्रकरण तेरा

## लेखापरीक्षा

**६५.** (१) आयुक्तास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विहित करण्यात येईल अशा कालांतराने आणि अशा रीतीने, अशा कालावधीसाठी कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीची लेखापरीक्षा हाती घेता येईल. कर प्राधिकाऱ्यांनी लेखापरीक्षा करणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यास, नोंदणीकृत व्यक्तीच्या धंद्याच्या ठिकाणी किंवा त्यांच्या कार्यालयात लेखापरीक्षा आयोजित करता येईल.

(३) नोंदणीकृत व्यक्तीस लेखापरीक्षा आयोजित करण्यापूर्वी विहित करण्यात येईल अशा रीतीने कामाच्या पंधरा दिवसांहून कमी नाही, इतक्या पुरेशा अवधी अगोदर नोटिशीद्वारे कळवण्यात येईल.

(४) पोट-कलम (१) खालील लेखापरीक्षा ही लेखापरीक्षेस प्रारंभ केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत पूर्ण करण्यात येईल :

परंतु, अशा नोंदणीकृत व्यक्तीच्या संबंधातील लेखापरीक्षा, तीन महिन्यांच्या आत पूर्ण होऊ शकणार नाही, याबाबत आयुक्ताची खात्री पटली असेल त्याबाबतीत त्यास, कारणे लेखी नमूद करून, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतका आणखी कालावधी वाढवून देता येईल.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी, ‘ लेखापरीक्षेस प्रारंभ ’ याचा अर्थ, ज्या दिनांकास कर प्राधिकाऱ्यांनी मागवलेला अभिलेख आणि इतर कागदपत्रे नोंदणीकृत व्यक्तीकडून उपलब्ध करून देण्यात आले असतील तो दिनांक, किंवा धंद्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष लेखापरीक्षा सुरू केल्याचा दिनांक, यांपैकी जो नंतरचा असेल, तो दिनांक, असा असेल.

(५) लेखापरीक्षा करण्याच्या कालावधीत, प्राधिकृत अधिकाऱ्यास,—

(एक) लेखापुस्तके किंवा त्यास आवश्यक वाटेल अशी, इतर कागदपत्रे यांची पडताळणी करण्यासाठी, त्याला आवश्यक ती सुविधा पुरविण्यास,

(दोन) त्यास आवश्यक वाटेल अशी माहिती सादर करण्यास आणि लेखापरीक्षा वेळेवर पूर्ण करण्यासाठी साहाय्य करण्यास,

त्या नोंदणीकृत व्यक्तीला फर्मावता येईल.

(६) लेखापरीक्षा समाप्त झाल्यावर, समुचित अधिकारी, जिच्या अभिलेखांची लेखापरीक्षा केली असेल त्या नोंदणीकृत व्यक्तीला, निष्कर्षाबाबत, त्याचे हक्क आणि आबंधने यांबाबत आणि अशा निष्कर्षांबद्दलची कारणे तीस दिवसांच्या आत कळवील.

(७) पोट-कलम (१) अन्वये आयोजित केलेल्या लेखापरीक्षेच्या परिणामी कर भरला नसल्याचे किंवा तो कमी भरला असल्याचे किंवा चुकीने परतावा दिल्याचे किंवा चुकीने निविष्टी कराची जमा रक्कम घेतल्याचे किंवा त्याचा वापर केल्याचे उघडकीस आले असेल त्याबाबतीत, समुचित अधिकाऱ्यास कलम ७३ किंवा ७४ अन्वये कारवाई सुरू करता येईल.

विशेष लेखापरीक्षा.

**६६.** (१) सहायक आयुक्ताच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यापुढील छाननीच्या, चौकशीच्या, अन्वेषणाच्या किंवा इतर कोणत्याही कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर प्रकरणाचे स्वरूप आणि गुंतागुंत व महसुलाचे हित लक्षात घेता, त्याचे असे मत झाले असेल की, मूल्य बरोबर घोषित केले गेले नसेल किंवा घेतलेली जमा रक्कम सामान्य मर्यादेत येत नसेल त्याबाबतीत, त्यास, आयुक्तांच्या पूर्वमान्यतेने, अशा नोंदणीकृत व्यक्तीला लेखी कळवून त्याद्वारे तिच्या लेखापुस्तकांची तसेच अभिलेखांची, त्याबाबतीत आयुक्तांकडून नामनिर्देशित करण्यात येईल अशा सनदी लेखापालांकडून किंवा परिव्यय लेखापालांकडून तपासणी आणि लेखापरीक्षा करवून घेण्याचे लेखी निदेश देता येतील.

(२) असा नामनिर्देशित केलेला सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल, विनिर्दिष्ट करण्यात येईल असे इतर तपशील नमूद करून त्याने यथोचितरीत्या स्वाक्षरित व प्रमाणित केलेला असा लेखापरीक्षेचा अहवाल, नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत उक्त सहायक आयुक्ताला सादर करील:

परंतु, सहायक आयुक्तास, त्याबाबत नोंदणीकृत व्यक्तीने किंवा सनदी लेखापालाने किंवा परिव्यय लेखापालाने त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरून, किंवा कोणत्याही महत्त्वाच्या आणि पुरेशा कारणास्तव, उक्त कालावधी आणखी नव्वद दिवस इतका वाढवून देता येईल.

(३) या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये नोंदणीकृत व्यक्तीच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यात आलेली असली तरी, पोट-कलम (१) च्या तरतूदी लागू होतील.

(४) पोट-कलम (१) अन्वये विशेष लेखापरीक्षेच्या आधारे जी कोणतीही गोळा केलेली तथ्ये या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमांखालील कोणत्याही कार्यवाहीत नोंदणीकृत व्यक्तीविरुद्ध वापरण्याचे प्रस्तावित केले असेल अशा कोणत्याही तथ्यांच्या संबंधात त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल.

(५) पोट-कलम (१) अन्वये, अशा सनदी लेखापालाच्या किंवा परिव्यय लेखापालाच्या पारिश्रमिकासह, अभिलेखांच्या तपासणीचा आणि लेखापरीक्षेचा खर्च, आयुक्ताकडून निश्चित करण्यात येईल आणि तो त्याच्याकडून चुकता करण्यात येईल आणि ते निश्चितीकरण अंतिम असेल.

(६) पोट-कलम (१) अन्वये आयोजित केलेल्या विशेष लेखापरीक्षेच्या परिणामी, कर भरला नसल्याचे किंवा तो कमी भरला असल्याचे किंवा चुकीने परतावा दिल्याचे किंवा चुकीने निविष्टी कराची जमा रक्कम घेतल्याचे किंवा त्याचा वापर केल्याचे उघडकीस आले असेल त्याबाबतीत, समुचित अधिकाऱ्यास कलम ७३ किंवा ७४ अन्वये कारवाई सुरू करता येईल.

प्रकरण चौदा

## तपासणी, झडती, जप्ती व अटक

तपासणी, झडती व जप्तीचे अधिकार.

**६७.** (१) जेव्हा सह आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या समुचित अधिकाऱ्यास,—

(क) करपात्र व्यक्तीने, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याशी अथवा हाती असलेल्या वस्तूंच्या साठ्याशी संबंधित असणारा कोणताही व्यवहार लपवून ठेवला असेल, किंवा या अधिनियमान्वये तिने हक्कदार असण्यापेक्षा अधिक निविष्टी कराच्या जमा रकमेचा दावा केला असेल किंवा या अधिनियमाखालील कर चुकविण्यासाठी या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींच्या उल्लंघनामध्ये ती सहभागी असेल ; किंवा

(ख) वस्तूंची वाहतूक करण्याच्या धंद्यात सहभागी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने अथवा वखारीच्या किंवा गोदामाच्या किंवा इतर कोणत्याही ठिकाणाच्या मालकाने किंवा प्रचालकाने ज्याच्या कराचे प्रदान करण्याचे टाळलेले आहे अशा वस्तू ठेवल्या असतील किंवा या अधिनियमान्वये देय असलेला कर चुकवण्याचा संभव आहे अशा रीतीने त्याचे लेखे किंवा वस्तू ठेवल्या असतील,

असे त्यास सकारण वाटत असेल तेव्हा, तो, राज्य कराच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याला, करपात्र व्यक्तीच्या किंवा वस्तूंची वाहतूक करण्याच्या धंद्यात सहभागी असलेल्या व्यक्तीच्या किंवा वखारीच्या किंवा गोदामाच्या किंवा इतर कोणत्याही ठिकाणाच्या मालकाच्या किंवा प्रचालकाच्या धंद्याच्या कोणत्याही ठिकाणाची तपासणी करण्यासाठी लेखी प्राधिकृत करू शकेल.

(२) सह आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या समुचित अधिकाऱ्यास, एकतर पोट-कलम (१) अन्वये केलेल्या तपासणीनुसार किंवा, अन्यथा, कोणत्याही वस्तू सरकारजमा करण्यास पात्र आहेत किंवा त्याच्या मते जी या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीसाठी उपयोगी असतील किंवा त्याच्या संबंधित असतील अशी कोणतीही कागदपत्रे किंवा पुस्तके किंवा गोष्टी कोणत्याही ठिकाणी गुप्तरीत्या ठेवल्या आहेत असे त्यास सकारण वाटत असेल तेव्हा तो, अशा वस्तू, कागदपत्रे किंवा पुस्तके किंवा गोष्टी शोधण्याकरिता व जप्त करण्याकरिता राज्य कराच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्यास लेखी प्राधिकृत करू शकेल किंवा स्वतः शोध घेऊ शकेल व जप्त करू शकेल :

परंतु, जेव्हा अशा कोणत्याही वस्तू जप्त करणे व्यवहार्य नसेल तेव्हा, समुचित अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी अशा अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीखेरीज, मालक किंवा वस्तूंचा अभिरक्षक वस्तू हलविणार नाही, त्यांचा ताबा सोडून देणार नाही किंवा अन्यथा त्याची देवाण-घेवाण करणार नाही असा आदेश बजावू शकेल :

परंतु आणखी असे की, अशा प्रकारे जप्त केलेली कागदपत्रे किंवा पुस्तके किंवा गोष्टी या अधिनियमान्वये त्यांच्या तपासणीसाठी आणि कोणत्याही चौकशीसाठी किंवा कार्यवाहीसाठी जोपर्यंत आवश्यक असतील तोपर्यंतच केवळ, अशा अधिकाऱ्याकडून ठेवून घेण्यात येतील.

(३) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये नोटीस काढण्याकरिता ज्यावर अवलंबून राहता येणार नाही अशी पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेली कागदपत्रे, पुस्तके किंवा वस्तू किंवा करपात्र व्यक्तीने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने सादर केलेली अन्य काणतीही कागदपत्रे, पुस्तके किंवा वस्तू, उक्त नोटीस काढल्यापासून तीस दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीत अशा व्यक्तीला परत करण्यात येतील.

(४) पोट-कलम (२) अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, ज्यात व्यक्तीच्या कोणत्याही वस्तू, लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्रे लपवल्याचा संशय आहे अशा जागा, कपाट (आलमारी), इलेक्ट्रॉनिक साधने, पेटी किंवा भांडे यांच्या तपासणीस मज्जाव केला असेल तेव्हा अशा कोणत्याही जागेचा दरवाजा सीलबंद करण्याचा किंवा तो तोडून उघडण्याचा किंवा असे कोणतेही कपाट (आलमारी), इलेक्ट्रॉनिक साधने, पेटी, भांडे तोडून उघडण्याचा अधिकार असेल.

(५) पोट-कलम (२) अन्वये ज्या व्यक्तीच्या अभिरक्षेतून कोणतीही कागदपत्रे जप्त केली आहेत अशी व्यक्ती, जेव्हा समुचित अधिकाऱ्याच्या मते, अशा प्रतिलिपी करणे किंवा असे उतारे घेणे अन्वेषणास प्रतिकूलपणे बाधक ठरू शकेल त्याखेरीज, याबाबतीत प्राधिकृत अधिकाऱ्याच्या उपस्थितीत, असा अधिकारी निर्देशित करील अशा ठिकाणी व वेळी त्याच्या प्रतिलिपी करण्यास किंवा त्यातील उतारे घेण्यास हक्कदार असेल.

(६) पोट-कलम (२) अन्वये अशा प्रकारे जप्त केलेल्या वस्तू, अनुक्रमे विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा प्रमाणात बंधपत्र करून दिल्यावर व प्रतिभूती सादर केल्यावर किंवा, यथास्थिति, लागू असलेला कर, देय व्याज व शास्ती यांचा भरणा केल्यावर, तात्पुरत्या स्वरूपात मुक्त करण्यात येतील.

(७) जेव्हा कोणत्याही वस्तू पोट-कलम (२) अन्वये जप्त केल्या जातात आणि वस्तू जप्त केल्यापासून सहा महिन्याच्या आत, त्याच्याबाबतीत कोणतीही नोटीस दिलेली नसेल तेव्हा ज्या व्यक्तीच्या कब्जातून अशा वस्तू जप्त केल्या होत्या त्या व्यक्तीला त्या परत करण्यात येतील :

परंतु, सहा महिन्यांचा कालावधी हा, पुरेसे कारण दर्शविल्यानंतर सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या आणखी कालावधीसाठी समुचित अधिकाऱ्याकडून वाढवून देण्यात येईल.

(८) शासनास, कोणत्याही वस्तूंचे नाशिवंत किंवा धोकादायक स्वरूप, काळाच्या ओघात होणारी वस्तूंच्या मूल्यातील घसरण, वस्तूंच्या साठवणुकीच्या जागेच्या अडचणी किंवा इतर कोणत्याही संबंधित विचारार्थ बाबी लक्षात घेता, पोट-कलम (२) अन्वये वस्तू जप्त केल्यानंतर विहित करण्यात येईल अशा रीतीने समुचित अधिकाऱ्याद्वारे ज्याची लवकरात लवकर विल्हेवाट लावण्यात येईल अशा वस्तू किंवा वस्तूंचा वर्ग अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करता येईल.

(९) जेव्हा, पोट-कलम (८) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही वस्तू, पोट-कलम (२) अन्वये समुचित अधिकाऱ्याद्वारे किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याद्वारे जप्त करण्यात आलेल्या असतील तेव्हा, तो विहित करण्यात येईल अशा रीतीने अशा वस्तूंची वस्तुसूची तयार करील.

१९७४ चा २. (१०) झडती व जप्ती यांच्याशी संबंधित असणाऱ्या फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ याच्या तरतुदी, जणू काही " दंडाधिकारी " हा शब्द जेथे जेथे आला असेल तेथे तेथे " आयुक्त " हा शब्द दाखल करण्यात आला होता असे समजून उक्त संहितेच्या कलम १६५ चे पोट-कलम (५) अंमलात आले असावे अशा फेरबदलास अधीन राहून शक्य असेल तितपत या कलमाखालील झडतीस व जप्तीस लागू असतील.

(११) जेव्हा समुचित अधिकाऱ्यास, कोणतीही व्यक्ती कोणत्याही कराचे प्रदान चुकवीत आहे किंवा चुकविण्याचा प्रयत्न करीत आहे असे त्यास सकारण वाटत असेल तेव्हा तो, कारणे लेखी नमूद करून त्यांच्यासमोर सादर केलेले लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्रे जप्त करू शकेल, आणि त्याची पावती देईल आणि खटला भरण्यासाठी या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात आवश्यक असेल तोपर्यंत ते ठेवून घेईल.

(१२) आयुक्तास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, कोणतीही करपात्र व्यक्ती पुरवठ्याची कर— बीजके किंवा देयके देत असल्याची तपासणी करण्यासाठी अशा करपात्र व्यक्तीच्या धंद्याच्या जागेमधून त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीद्वारे कोणत्याही वस्तू किंवा सेवा अथवा दोन्हींची खरेदी करण्याची व्यवस्था करता येईल आणि अशा अधिकाऱ्याने अशा प्रकारे खरेदी केलेल्या वस्तू परत केल्यावर अशी करपात्र व्यक्ती किंवा धंद्याच्या जागेची प्रभारी असलेली कोणतीही व्यक्ती यापूर्वी दिलेले पुरवठ्याचे कोणतेही करबीजक किंवा देयक रद्द केल्यानंतर, अशा वस्तूपोटी अशा प्रकारे प्रदान केलेल्या रकमेचा परतावा करील.

वाहतुकीतील वस्तूंची तपासणी.

**६८.** (१) शासनास, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेपेक्षा अधिक मूल्याच्या वस्तूंच्या कोणत्याही वस्तूंची पाठवणी करणाऱ्या वाहतूक साधनाच्या प्रभारी व्यक्तीस, विहित करण्यात येतील अशी कागदपत्रे व अशी साधने त्याच्या सोबत बाळगण्यास फर्मावता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये बाळगण्याची आवश्यकता असलेल्या कागदपत्रांतील तपशील, विहित करण्यात येईल अशा रीतीने विधिग्राह्य करण्यात येईल.

(३) जेव्हा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही वाहतूक साधन समुचित अधिकाऱ्याद्वारे कोणत्याही ठिकाणी थांबविण्यात येईल तेव्हा तो, उक्त वाहनाच्या प्रभारी व्यक्तीस उक्त पोट-कलमान्वये विहित केलेली कागदपत्रे व साधने पडताळणीसाठी सादर करण्यास फर्मावील आणि उक्त व्यक्ती कागदपत्रे व साधने सादर करण्यास तसेच वस्तूंच्या निरीक्षणास परवानगी देण्यास पात्र असेल.

अटक करण्याचा अधिकार.

**६९.** (१) जेव्हा आयुक्तास, कोणत्याही व्यक्तीने कलम १३२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (एक) किंवा (दोन) किंवा पोट-कलम (२) अन्वये शिक्षापात्र असलेला उक्त कलमाच्या पोट-कलम (१) च्या खंड (क) किंवा खंड (ख) किंवा खंड (ग) किंवा खंड (घ) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही अपराध केला आहे असे सकारण वाटत असेल तेव्हा, तो अशा व्यक्तीला अटक करण्यासाठी आदेशाद्वारे राज्य कराच्या कोणत्याही अधिकाऱ्याला प्राधिकृत करू शकेल.

(२) जेव्हा एखाद्या व्यक्तीला कलम १३२ च्या पोट-कलम (५) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाबद्दल पोट-कलम (१) अन्वये अटक केली असेल, त्याबाबतीत, त्या व्यक्तीला अटक करण्यासाठी प्राधिकृत केलेला अधिकारी, अशा व्यक्तीला अटकेची कारणे कळवील आणि चोवीस तासांच्या आत तिला दंडाधिकाऱ्यासमोर हजर करील.

(३) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या तरतुदींस अधीन राहून,— १९७४ चा २.

(क) जेव्हा एखाद्या व्यक्तीस, कलम १३२ च्या पोट-कलम (४) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अपराधासाठी पोट-कलम (१) अन्वये अटक केली जाते तेव्हा, तिला जामीन मंजूर करण्यात येईल किंवा जामीन देण्यात कसूर केल्यास दंडाधिकाऱ्याच्या कोठडीत पाठविण्यात येईल ;

(ख) अदखलपात्र व जामीनपात्र अपराधाच्या बाबतीत, अटक केलेल्या व्यक्तीला जामिनावर किंवा अन्यथा मुक्त करण्याच्या प्रयोजनार्थ उपआयुक्तास किंवा सहायक आयुक्तास एखाद्या पोलीस ठाण्याच्या ठाणे अंमलदारास जे अधिकार असतात तेच अधिकार असतील आणि तो ज्या तरतुदींना अधीन असतो तशाच तरतुदींना अधीन असेल.

पुरावा देण्यासाठी व दस्तऐवज सादर करण्यासाठी व्यक्तींना समन्स पाठविण्याचा अधिकार.

**७०.** (१) या अधिनियमाखालील समुचित अधिकाऱ्यास, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या तरतुदींन्वये एखाद्या दिवाणी न्यायालयाच्या बाबतीत तरतूद केलेली असेल त्याच रीतीने कोणत्याही चौकशीमध्ये एकतर पुरावा देण्यासाठी किंवा कागदपत्रे किंवा अन्य कोणतीही गोष्ट सादर करण्यासाठी ज्या व्यक्तीची उपस्थिती त्यास आवश्यक वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीस, समन्स पाठविण्याचा अधिकार असेल. १९०८ चा ५.

१८६० चा ४५. (२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली अशी प्रत्येक चौकशी ही भारतीय दंड संहिता, १८६० याच्या कलम १९३ व कलम २२८ च्या अर्थांतर्गत " न्यायिक कार्यवाही " असल्याचे मानण्यात येईल.

**७१.** (१) सह आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या समुचित अधिकाऱ्याने या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, महसुलाचे हितसंरक्षण करण्यासाठी आवश्यक असेल अशी कोणतीही लेखापरीक्षा, छाननी, पडताळणी व तपासण्या करण्याच्या प्रयोजनार्थ, लेखापुस्तके, कागदपत्रे, संगणक, संगणक प्रणाली (प्रोग्राम), संगणक आज्ञावली (सॉफ्टवेअर)—मग ते संगणकात किंवा अन्य स्वरूपात बसविलेले असोत ; आणि तो मागणी करील अशा, आणि त्या ठिकाणी उपलब्ध असू शकतील अशा इतर गोष्टी यांची तपासणी करण्यासाठी, एखाद्या नोंदणीकृत व्यक्तीच्या धंद्याच्या कोणत्याही ठिकाणी प्रवेश करता येईल. धंद्याच्या जागेत प्रवेश करणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या ठिकाणाचा ताबा असलेली प्रत्येक व्यक्ती, मागणी केल्यावर, पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास किंवा समुचित प्राधिकाऱ्याने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षक व्यक्तींस किंवा कलम ६६ अन्वये नामनिर्देशित केलेल्या परिव्यय लेखापालास किंवा सनदी लेखापालास,—

(एक) विहित करण्यात येईल अशा रीतीने नोंदणीकृत व्यक्तीने तयार केलेले किंवा ठेवलेले असे आणि समुचित प्राधिकाऱ्याकडे घोषित केलेले अभिलेख ;

(दोन) तेरीज किंवा त्याचा समतुल्य असा दस्तऐवज ;

(तीन) यथोचितरीत्या लेखापरीक्षा केलेल्या वार्षिक वित्तीय लेख्यांची विवरणपत्रे, आवश्यकता असेल त्या-त्या वेळी ;

२०१३ चा १८. (चार) कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम १४८ अन्वये परिव्यय लेखापरीक्षा अहवाल, कोणताही असल्यास ;

१९६१ चा ४३. (पाच) आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम ४४क ख अन्वये, आयकर लेखापरीक्षा अहवाल, कोणताही असल्यास ; आणि

(सहा) इतर कोणताही संबद्ध अभिलेख,

अशी मागणी केल्याच्या दिनांकापासून पंधरापेक्षा अधिक नसतील इतक्या कामकाजाच्या दिवसांच्या कालावधीत किंवा उक्त अधिकारी किंवा लेखापरीक्षक व्यक्ती किंवा सनदी लेखापाल किंवा, परिव्यय लेखापाल परवानगी देईल अशा आणखी कालावधीत असा अधिकारी किंवा लेखापरीक्षक व्यक्ती किंवा सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल यांच्याकडून होणाऱ्या छाननीकरिता उपलब्ध करून देईल.

**७२.** (१) सर्व पोलीस, रेल्वे, सीमा शुल्क अधिकारी आणि ग्राम अधिकाऱ्यांसह जमीन महसूल गोळा करणारे अधिकारी, केंद्रीय कर अधिकारी व संघ राज्यक्षेत्र कर अधिकारी हे, या अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये समुचित अधिकाऱ्यास साहाय्य करतील. समुचित अधिकाऱ्यांना साहाय्य करणारे अधिकारी.

(२) आयुक्त जेव्हा तसे करण्याची मागणी करील तेव्हा, शासनास, अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये समुचित अधिकाऱ्यांना साहाय्य करण्यासाठी इतर कोणत्याही वर्गाच्या अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करता येतील आणि फर्मावता येईल.

प्रकरण पंधरा

## मागणी आणि वसुली

लबाडी करणे किंवा हेतुपुरस्सर कोणतेही असत्य कथन करणे किंवा वस्तुस्थिती दडपणे या कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव न भरलेल्या किंवा कमी भरलेल्या किंवा चुकीने परतावा दिलेल्या किंवा चुकीने घेतलेल्या किंवा वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचे निश्चितीकरण.

**७३.** (१) कर चुकविण्यासाठी लबाडी किंवा हेतुपुरस्सर कोणतेही असत्य कथन करणे किंवा वस्तुस्थिती दडपणे या कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव कोणताही कर भरलेला नसेल किंवा तो कमी भरलेला असेल किंवा त्याचा चुकीने परतावा दिलेला असेल किंवा निविष्टी कराची जमा रक्कम चुकीने घेतलेली असेल किंवा वापरलेला असेल असे समुचित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आल्यास, तो, अशा प्रकारे जिने कर भरलेला नसेल किंवा जो कमी भरलेला असेल किंवा जिने चुकीचा परतावा दिलेला असेल, किंवा चुकीने निविष्टी कराची जमा रक्कम घेतलेली असेल किंवा वापरलेली असेल अशा कर आकारणीयोग्य व्यक्तीने, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेली रक्कम आणि कलम ५० अन्वये तीवर देय असलेले व्याज आणि या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्याखालील केलेल्या नियमांन्वये आकारणीयोग्य असलेली शास्ती का भरू नये याबाबत एक कारणे दाखवा नोटीस बजावील.

(२) समुचित अधिकारी, आदेश काढण्यासाठीच्या पोट-कलम (१०) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेच्या किमान तीन महिने अगोदर पोट-कलम (१) अन्वये नोटीस काढील.

(३) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही कालावधीबद्दल नोटीस काढण्यात आली असेल त्याबाबतीत, समुचित अधिकाऱ्यास कर आकारणीयोग्य व्यक्तीवर, पोट-कलम (१) खालील व्याप्तीत येत असतील त्यांव्यतिरिक्त अशा इतर कालावधींसाठी न भरलेल्या किंवा कमी भरलेल्या किंवा चुकीने परतावा दिलेल्या कराचा किंवा चुकीने घेतलेल्या किंवा वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचा तपशील अंतर्भूत असलेले एक विवरणपत्र बजावता येईल.

(४) अशा विवरणपत्राच्या बजावणीस, पोट-कलम (१) खालील व्याप्तीत येत असतील त्यांव्यतिरिक्त अशा कर कालावधींच्या पुष्ट्यर्थ असलेली कारणे, आधीच्या नोटिशीत नमूद केलेल्या कारणांप्रमाणेच आहेत या शर्तीच्या अधीन राहून, जणू काही पोट-कलम (१) खालील ती नोटीसच बजावली आहे, असे मानण्यात येईल.

(५) कर आकारणीयोग्य व्यक्तीस, पोट-कलम (१) अन्वये नोटीस किंवा, यथास्थिति, पोट-कलम (३) अन्वये विवरणपत्र बजावण्यापूर्वी, अशा कराबाबत तिची स्वतःची खात्री करून घेऊन किंवा समुचित अधिकाऱ्याकडून खातरजमा करण्यात आलेल्या कराच्या आधारे, येणाऱ्या कराच्या रकमेसह तीवर पोट-कलम (५०) अन्वये देय असलेले व्याज भरता येईल आणि असा भरणा केल्याची लेखी माहिती समुचित अधिकाऱ्याला कळविता येईल.

(६) समुचित अधिकारी, अशी माहिती मिळाल्यावर अशा भरलेल्या कराच्या किंवा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये देय असलेल्या कोणत्याही शास्तीच्या रकमेच्या संबंधात पोट-कलम (१) अन्वये कोणतीही नोटीस किंवा, यथास्थिति, पोट-कलम (३) अन्वये विवरणपत्र बजावणार नाही.

(७) पोट-कलम (५) अन्वये भरलेली रक्कम, प्रत्यक्षात देय असलेल्या रकमेपेक्षा कमी भरली असल्याचे समुचित अधिकाऱ्याचे मत बनले असेल त्याबाबतीत, प्रत्यक्षात देय असलेल्या रकमेपेक्षा जेवढी रक्कम कमी भरलेली असेल तेवढ्याच रकमेच्या संबंधात पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नोटीस काढण्याची कार्यवाही सुरू करील.

(८) पोट-कलम (१) अन्वये किंवा पोट-कलम (३) अन्वये कर आकारणीयोग्य असलेली कोणतीही व्यक्ती, कारणे दाखवा नोटीस काढण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, कलम ५० अन्वये देय असलेल्या व्याजासह कराची रक्कम भरील त्याबाबतीत कोणतीही शास्ती देय असणार नाही आणि उक्त नोटिशीच्या संबंधातील सर्व कार्यवाही समाप्त झाली असल्याचे मानण्यात येईल.

(९) समुचित अधिकारी, कर आकारणीयोग्य व्यक्तीकडून करण्यात आलेले अभिवेदन, कोणतेही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, अशा व्यक्तीकडून देय असलेल्या कराची रक्कम आणि व्याज आणि त्या कराच्या रकमेच्या दहा टक्के इतकी किंवा दहा हजार रुपये यांपैकी जी अधिक असेल तेवढी, शास्ती निश्चित करील आणि तसा आदेश काढील.

(१०) समुचित अधिकारी, न भरलेला किंवा कमी भरलेला कर किंवा चुकीने घेतलेली किंवा वापरलेली निविष्टी कराची जमा रक्कम ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाचे वार्षिक विवरण दाखल करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांच्या आत किंवा चुकीचा परतावा दिल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या आत, पोट-कलम (९) अन्वये आदेश काढील.

(११) पोट-कलम (६) किंवा पोट-कलम (८) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे स्वयं निर्धारित कराची कोणतीही रक्कम किंवा कर म्हणून वसूल करण्यात आलेली कोणतीही रक्कम, अशा कराच्या देय दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत भरण्यात आली नाही तर, पोट-कलम (९) अन्वये शास्तीची रक्कम देय असेल.

लबाडी करून किंवा हेतुपुरस्सर कोणतेही असत्य कथन करून किंवा वस्तुस्थिती दडपून त्याद्वारे न भरलेल्या किंवा कमी भरलेल्या किंवा चुकीने परतावा दिलेल्या किंवा चुकीने घेतलेल्या किंवा वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचे निश्चितीकरण.

**७४.** (१) कर चुकविण्यासाठी लबाडी करून किंवा हेतुपुरस्सर कोणतेही असत्य कथन करून किंवा वस्तुस्थिती दडपून त्याद्वारे कोणताही कर भरलेला नसेल किंवा तो कमी भरलेला असेल किंवा त्याला चुकीने परतावा दिला असेल किंवा निविष्टी कराची जमा रक्कम चुकीने घेतलेली असेल किंवा ती वापरलेली असेल असे समुचित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आल्यास, तो अशा प्रकारे जिने कर भरलेला नसेल किंवा तो कमी भरलेला असेल किंवा जिला चुकीचा परतावा दिला असेल, किंवा जिने चुकीने निविष्टी कराची जमा रक्कम घेतलेली किंवा वापरलेली असेल अशा कर आकारणीयोग्य व्यक्तीवर, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेली रक्कम, आणि कलम ५० अन्वये तीवर देय असलेले व्याज आणि त्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कराच्या रकमेएवढी शास्ती का भरू नये याबाबत, कारणे दाखवा नोटीस बजावील.

(२) समुचित अधिकारी, आदेश काढण्यासाठीच्या पोट-कलम (१०) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेच्या किमान सहा महिने अगोदर पोट-कलम (१) अन्वये नोटीस काढील.

(३) पोट-कलम (१) अन्वये जेथे कोणत्याही कालावधीबद्दल नोटीस काढण्यात आली असेल त्याबाबतीत, समुचित अधिकाऱ्यास, कर आकारणीयोग्य व्यक्तीवर, पोट-कलम (१) खालील व्याप्तीत येत असतील त्यांव्यतिरिक्त अशा इतर कालावधींच्या न भरलेल्या किंवा कमी भरलेल्या किंवा चुकीने परतावा दिलेल्या कराचा, किंवा चुकीने घेतलेल्या किंवा वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेचा तपशील अंतर्भूत असलेले एक विवरणपत्र बजावता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये विवरणपत्राच्या बजावणीस पोट-कलम (१) खालील व्याप्तीत येत असतील त्यांव्यतिरिक्त अशा कर कालावधीच्या पुष्ठ्यर्थ असलेली कारणे उक्त

विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या कर चुकवण्यासाठी लबाडी करणे किंवा कोणतेही हेतुपुरस्सर असत्य कथन करणे किंवा वस्तुस्थिती दडवणे यांव्यतिरिक्त कारणांप्रमाणेच आहेत, या शर्तीच्या अधीन राहून, जणूकाही कलम ७३ च्या पोट-कलम (१) खालील ती नोटीसच बजावली आहे, असे मानण्यात येईल.

(५) कर आकारणीयोग्य व्यक्तीस, पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्यापूर्वी, अशा कराबाबत तिची स्वतःची खात्री करून घेऊन किंवा समुचित अधिकाऱ्याकडून खात्री करण्यात आलेल्या कराच्या आधारे, येणाऱ्या कराच्या रकमेसह तीवर कलम ५० अन्वये देय असलेले व्याज आणि अशा कराच्या रकमेच्या पंधरा टक्क्याइतकी शास्ती भरता येईल आणि असा भरणा केल्याची लेखी माहिती समुचित अधिकाऱ्याला कळविता येईल.

(६) समुचित अधिकारी अशी माहिती मिळाल्यावर, अशा भरलेल्या कराच्या किंवा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये देय असलेल्या कोणत्याही शास्तीच्या रकमेच्या संबंधात पोट-कलम (१) अन्वये कोणतीही नोटीस बजावणार नाही.

(७) पोट-कलम (५) अन्वये भरलेली रक्कम, प्रत्यक्षात देय असलेल्या रकमेपेक्षा कमी भरली असल्याचे समुचित अधिकाऱ्याचे मत बनले असेल त्याबाबतीत, प्रत्यक्षात देय असलेल्या रकमेपेक्षा जेवढी रक्कम कमी भरलेली असेल तेवढ्याच रकमेच्या संबंधात पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नोटीस काढण्याची कार्यवाही सुरू करील.

(८) पोट-कलम (१) अन्वये कर आकारणीयोग्य कोणतीही व्यक्ती, नोटीस काढल्यापासून तीस दिवसांच्या आत कलम ५० अन्वये देय असलेल्या व्याजासह उक्त कराची रक्कम आणि अशा कराच्या रकमेच्या पंचवीस टक्के इतकी शास्तीची रक्कम भरील त्याबाबतीत, उक्त नोटिशीच्या संबंधातील सर्व कार्यवाही समाप्त झाली असल्याचे मानण्यात येईल.

(९) समुचित अधिकारी, कर आकारणीयोग्य व्यक्तीकडून करण्यात आलेले अभिवेदन, कोणतेही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, अशा व्यक्तीकडून देय असलेला कर, व्याज आणि शास्तीची रक्कम निश्चित करील आणि तसा आदेश काढील.

(१०) समुचित अधिकारी, न भरलेली किंवा कमी भरलेली किंवा चुकीने घेतलेली किंवा वापरलेली निविष्टी कराची जमा रक्कम ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाचे वार्षिक विवरण दाखल करण्याच्या नियत दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीच्या आत, किंवा यथास्थिति, चुकीचा परतावा दिल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या आत पोट-कलम (७) अन्वये आदेश काढील.

(११) पोट-कलम (९) अन्वये काढलेला आदेश जिच्यावर बजावण्यात आला आहे अशी कोणतीही व्यक्ती, कलम ५० अन्वये देय असलेल्या व्याजासहीत कराची रक्कम आणि अशा कराच्या रकमेच्या पन्नास टक्के इतकी शास्ती, तो आदेश कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत भरील त्याबाबतीत, उक्त नोटिशीच्या संबंधातील सर्व कार्यवाही समाप्त झाली असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण १.—**कलम ७३ च्या आणि या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(एक) "उक्त नोटिशीच्या संबंधातील सर्व कार्यवाही" या शब्दप्रयोगात, कलम १३२ खालील कार्यवाहींचा समावेश असणार नाही ;

(दोन) एकाच कार्यवाहीखाली कर भरण्यासाठी दायी असलेल्या मुख्य व्यक्तीला आणि काही अन्य व्यक्तींना नोटीस काढण्यात आली असेल आणि मुख्य व्यक्तीविरुद्ध अशी कार्यवाही कलम ७३ किंवा कलम ७४ अन्वये समाप्त करण्यात आली असेल तर, कलमे १२२, १२५, १२९ व १३० अन्वये शास्ती भरण्यासाठी दायी असलेल्या सर्व व्यक्तींविरुद्धची कार्यवाही समाप्त झाल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण २.—**या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी "दडपणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, एखाद्या करपात्र व्यक्तीने, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये सादर केलेले विवरण, विवरणपत्र, अहवाल किंवा इतर कोणतेही दस्तऐवज यांमध्ये जी तथ्ये किंवा माहिती कायदेशीररीत्या घोषित करणे आवश्यक आहे अशी तथ्ये किंवा माहिती घोषित न करणे, किंवा समुचित अधिकाऱ्याकडून लेखी स्वरूपात फर्मावण्यात आल्यावर कोणतीही माहिती सादर करण्यात कसूर करणे, असा आहे.

कर निश्चितीकरणाच्या सर्वसाधारण तरतुदी.

**७५.** (१) नोटीस बजावणीस किंवा आदेश काढण्यास एखाद्या न्यायालयाच्या किंवा अपील न्यायाधिकरणाच्या आदेशाद्वारे स्थगिती देण्यात आली असेल त्याबाबतीत, कलम ७३ च्या पोट-कलम (२) व (१०) किंवा यथास्थिति, कलम ७४ च्या पोट-कलम (२) व (१०) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी मोजताना, त्यातून अशा स्थगितीचा कालावधी वगळण्यात येईल.

(२) जिला कलम ७४ च्या पोट-कलम (१) अन्वये नोटीस काढली होती त्या व्यक्तीविरुद्धचे कर चुकविण्यासाठी लबाडी करणे किंवा हेतुपुरस्सर असत्य कथन करणे किंवा वस्तुस्थिती दडपणे हे दोषारोप सिद्ध झालेले नसल्यामुळे, ती काढलेली नोटीस समर्थनीय ठरत नसल्याचा कोणत्याही अपील प्राधिकाऱ्याने किंवा अपील न्यायाधिकरणाने किंवा न्यायालयाने निष्कर्ष काढला असेल त्याबाबतीत, समुचित अधिकारी, जणू काही कलम ७३ च्या पोट-कलम (१) अन्वये नोटीस काढण्यात आली होती असे मानून अशा व्यक्तीकडून देय असलेला कर निश्चित करील.

(३) अपील प्राधिकाऱ्याच्या किंवा अपील न्यायाधिकरणाच्या किंवा न्यायालयाच्या निदेशानुसार कोणताही आदेश काढणे आवश्यक असेल त्याबाबतीत असा आदेश, उक्त निदेश कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत काढण्यात येईल.

(४) कर किंवा शास्ती आकारणीयोग्य असलेल्या व्यक्तीची लेखी स्वरूपात कोणतीही विनंती प्राप्त झाली असेल, किंवा अशा व्यक्तीविरुद्ध कोणताही प्रतिकूल निर्णय देण्याचे विचाराधीन असेल त्याबाबतीत, त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल.

(५) समुचित अधिकारी, कर आकारणीयोग्य असलेल्या व्यक्तीने पुरेसे कारण दिल्यास, उक्त व्यक्तीला मुदत देईल आणि कारणे लेखी नमूद करून ती सुनावणी तहकूब करील :

परंतु, कार्यवाहीदरम्यान कोणत्याही व्यक्तीची सुनावणी तीनपेक्षा अधिक वेळा तहकूब करता येणार नाही.

(६) समुचित अधिकारी, आपल्या आदेशात संबद्ध तथ्ये आणि त्याच्या निर्णयाचा मूलाधार विषद करील.

(७) आदेशात मागणी केलेल्या कराची, व्याजाची आणि शास्तीची रक्कम त्या नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही आणि त्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव त्या मागणीस पुष्टी देण्यात येणार नाही.

(८) समुचित अधिकाऱ्याने निश्चित केलेल्या कराच्या रकमेत अपील प्राधिकारी किंवा अपील न्यायाधिकरण किंवा न्यायालय फेरबदल करील त्याबाबतीत अशा फेरबदल केलेल्या कराची रक्कम विचारात घेऊन तद्नुसार व्याजाच्या आणि शास्तीच्या रकमेत फेरबदल होईल.

(९) कमी भरलेल्या किंवा न भरलेल्या कराच्या रकमेवर व्याज—मग कर दायित्व निश्चितीकरणाच्या आदेशात ते विनिर्दिष्ट केलेले असो किंवा नसो, देय असेल.

(१०) जर तो आदेश, कलम ७३ च्या पोट-कलम (१०) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तीन वर्षांच्या आत किंवा कलम ७४ च्या पोट-कलम (१०) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पाच वर्षांच्या आत काढण्यात आला नाही तर, अभिनिर्णयाची कार्यवाही समाप्त झाली असल्याचे मानण्यात येईल.

(११) एखाद्या वादप्रश्नावर अपील प्राधिकाऱ्याने किंवा अपील न्यायाधिकरणाने किंवा उच्च न्यायालयाने आपला निर्णय दिलेला असेल आणि तो निर्णय एखाद्या दुसऱ्या कार्यवाहीतील महसुली हितास बाधक ठरत असेल आणि त्या अपील प्राधिकाऱ्याच्या किंवा अपील न्यायाधिकरणाच्या किंवा, उच्च न्यायालयाच्या अशा निर्णयाविरुद्ध अनुक्रमे, अपील न्यायाधिकरणात किंवा उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात केलेले अपील प्रलंबित असेल तेव्हा जेथे उक्त कलमान्वये कारणे दाखवा नोटीस देऊन कार्यवाही सुरू झाली असेल, तेथे अपिलावरील प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा दिनांक आणि अपील न्यायाधिकरणाच्या निर्णयाचा दिनांक आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दिनांक किंवा, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दिनांक यांमध्ये व्यतित झालेला कालावधी, कलम ७३ च्या पोट-कलम (१०) मध्ये किंवा, यथास्थिति, कलम ७४ च्या पोट-कलम (१०) मध्ये निर्दिष्ट केलेला कालावधी मोजताना, वगळण्यात येईल.

(१२) कलम ७३ किंवा ७४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३९ अन्वये सादर केलेल्या कोणत्याही विवरणानुसार स्वयंनिर्धारित केलेली कराची कोणतीही रक्कम एकतर पूर्णतः किंवा अंशतः भरलेली नसेल किंवा अशा कराच्या रकमेवर देय असलेली व्याजाची कोणतीही रक्कम भरलेली नसेल त्याबाबतीत, ती रक्कम कलम ७९ मधील तरतुदींअन्वये वसूल करण्यात येईल.

(१३) एखाद्या व्यक्तीवर एकाच कृती व अकृतीसाठी कलम ७३ किंवा कलम ७४ अन्वये कोणतीही शास्ती लादण्यात आली असेल तर, या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदींअन्वये त्याच व्यक्तीवर कोणतीही शास्ती लादण्यात येणार नाही.

**७६.** (१) कोणताही अपील प्राधिकारी किंवा अपील न्यायाधिकरण किंवा न्यायालय यांच्या कोणत्याही आदेशात किंवा निदेशात किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये किंवा त्याखाली केलेल्या नियमांमध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या व्यक्तीने दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून या अधिनियमाखालील कर स्वरूपातील कोणतीही रक्कम गोळा केली असेल, आणि ती केंद्र सरकारकडे किंवा राज्य शासनाकडे भरलेली नसेल अशी प्रत्येक व्यक्ती—मग ज्या पुरवठाच्या संबंधात अशी रक्कम गोळा केली असेल असा पुरवठा करपात्र असो किंवा नसो–हे विचारात न घेता, उक्त रक्कम तात्काळ शासनाकडे भरील. गोळा केलेला परंतु शासनाकडे भरणा न केलेला कर.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही रक्कम शासनास भरणे आवश्यक असेल, आणि ती अशा प्रकारे भरण्यात आली नसेल त्या बाबतीत, समुचित अधिकाऱ्यास, अशी रक्कम भरण्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीने, नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली उक्त रक्कम शासनाला का भरणा करू नये आणि नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या रकमेएवढी शास्ती या अधिनियमाच्या तरतुदींन्वये तिच्यावर का लादण्यात येऊ नये याबाबत तिच्यावर कारणे दाखवा नोटीस बजावता येईल.

(३) समुचित अधिकारी, जिच्यावर पोट-कलम (२) अन्वये नोटीस बजावली असेल अशा व्यक्तीने केलेले अभिवेदन, कोणतेही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, अशा व्यक्तीकडून देय असलेली रक्कम निश्चित करील आणि त्यानंतर, ती व्यक्ती अशी निश्चित केलेली रक्कम भरील.

(४) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती, पोट-कलम (१) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेली रक्कम भरण्याबरोबर आणखी ज्या दिनांकास तिने अशी रक्कम वसूल केली असेल त्या दिनांकापासून अशी रक्कम ती शासनाकडे भरण्यात आल्याच्या दिनांकापर्यंत, कलम ५० अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या दराने त्या रकमेवरील व्याज भरण्यासदेखील दायी असेल.

(५) जिच्यावर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती त्या व्यक्तीकडून लेखी विनंती करण्यात आल्यास, त्या बाबतीत तिला आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल.

(६) समुचित अधिकारी नोटीस काढल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत आदेश काढील.

(७) आदेश काढण्यास न्यायालयाच्या किंवा अपील न्यायाधिकरणाच्या आदेशाद्वारे, स्थगिती दिली असेल त्याबाबतीत, एक वर्षाचा कालावधी मोजताना, अशा स्थगितीचा कालावधी वगळण्यात येईल.

(८) समुचित अधिकारी, आपल्या आदेशात संबद्ध तथ्ये आणि त्याच्या निर्णयाची मूलधार कारणे विषद करील.

(९) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) अन्वये शासनाकडे भरण्यात आलेल्या रकमेतून पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या पुरवठ्याच्या संबंधात व्यक्तीकडून देय असलेला कोणताही कर, असल्यास, समायोजित करण्यात येईल.

(१०) पोट-कलम (९) अन्वये समायोजन केल्यानंतर, कोणतीही रक्कम शिल्लक राहील त्याबाबतीत, अशी शिल्लक रक्कम, एकतर निधीत जमा करण्यात येईल, किंवा अशा रकमेचा भार सहन करणाऱ्या व्यक्तीला ती परत करण्यात येईल.

(११) रकमेचा भार जिला सहन करावा लागला असेल अशा व्यक्तीस, कलम ५४ च्या तरतुदींनुसार त्या शिल्लक रकमेचा परतावा मिळण्यासाठी अर्ज करता येईल.

दोषपूर्ण रीतीने वसूल केलेला आणि केंद्र सरकारला किंवा राज्य शासनाला प्रदान केलेला कर.

**७७.** (१) ज्या नोंदणीकृत व्यक्तीने राज्यांतर्गत पुरवठा समजून एखाद्या व्यवहाराबाबत केंद्रीय कर किंवा राज्य कर भरलेला असेल, परंतु नंतर तो, आंतरराज्यीय पुरवठा असल्याचा निर्णय झाला असेल तेव्हा विहित करण्यात येईल अशा पद्धतीने आणि अशा शर्तींच्या अधीन राहून, अशा भरलेल्या कराच्या रकमेचा परतावा करण्यात येईल.

(२) ज्या नोंदणीकृत व्यक्तीने आंतरराज्यीय पुरवठा समजून एखाद्या व्यवहाराबाबत एकात्मिक कर प्रदान केला असेल, परंतु नंतर तो, राज्यांतर्गत पुरवठा असल्याचा निर्णय झाला तेव्हा अशा व्यक्तीस देय असलेल्या राज्य कराच्या रकमेवर कोणतेही व्याज भरण्याची आवश्यकता असणार नाही.

वसुलीची कार्यवाही सुरू करणे.

**७८.** कोणतीही करपात्र व्यक्ती, या अधिनियमाखाली काढलेल्या आदेशानुसार तिच्याकडून देय असलेली कोणतीही रक्कम, असा आदेश बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत भरील. अशा रकमेचा भरणा करण्यात कसूर केल्यास वसुलीची कार्यवाही सुरू करण्यात येईल :

परंतु, समुचित अधिकाऱ्यास, महसुलाच्या हितासाठी त्यास इष्ट वाटेल त्या बाबतीत, कारणे लेखी नमूद करून त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधीच्या आत, अशा रकमेचा भरणा करण्यास उक्त करपात्र व्यक्तीला फर्माविता येईल.

कराची वसुली.

**७९.** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये एखाद्या व्यक्तीकडून देय असलेली कोणतीही रक्कम भरण्यात आली नसेल त्या बाबतीत, समुचित अधिकारी खाली नमूद केलेल्या कोणत्याही एका किंवा अनेक पद्धतीने ती रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरू करील,–

(क) समुचित अधिकाऱ्यास, अशा व्यक्तीला येणे असलेली जी कोणतीही रक्कम समुचित अधिकाऱ्याच्या किंवा अशा इतर कोणत्याही विनिर्दिष्ट अधिकाऱ्याच्या नियंत्रणात असेल अशा कोणत्याही रकमेतून, अशी देय रक्कम कापून घेता येईल किंवा ती कापून घेण्यास अशा इतर कोणत्याही विनिर्दिष्ट अधिकाऱ्याला सांगता येईल.

(ख) समुचित अधिकाऱ्यास, अशा व्यक्तीच्या ज्या कोणतीही वस्तू समुचित अधिकाऱ्याच्या किंवा इतर कोणत्याही विनिर्दिष्ट अधिकाऱ्याच्या नियंत्रणात असतील अशी कोणतीही वस्तू अडवून ठेवून किंवा त्यांची विक्री करून त्याद्वारे, अशी देय रक्कम वसूल करता येईल किंवा ती वसूल करण्यास अशा इतर कोणत्याही विनिर्दिष्ट अधिकाऱ्याला सांगता येईल.

(ग) (एक) समुचित अधिकाऱ्यास, लेखी नोटिशीद्वारे, ज्या कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीकडून अशा व्यक्तीला पैसे देय असतील किंवा ते देय होतील किंवा जी कोणतीही दुसरी व्यक्ती अशा व्यक्तीकरिता किंवा तिच्या कारणास्तव पैसे धारण करते किंवा नंतर पैसे धारण करील अशा कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीला, शासनाकडे, एकतर ते पैसे देय झाल्यानंतर किंवा ते धारण केल्यानंतर तात्काळ किंवा त्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वेळी किंवा मुदतीच्या आत, अशा व्यक्तीकडून देय असलेली रक्कम भरण्यासाठी जेवढे पैसे पुरेसे असतील तेवढे पैसे भरण्यास, किंवा ते पैसे त्या रकमेएवढे असतील किंवा त्या रकमेपेक्षा कमी असतील तेव्हा ते संपूर्ण पैसे भरण्यास फर्मावता येईल ;

(दोन) उप-खंड (एक) अन्वये ज्या व्यक्तीला नोटीस पाठविण्यात आली असेल ती प्रत्येक व्यक्ती अशा नोटिशीचे अनुपालन करण्यासाठी बांधील असेल आणि विशेषकरून जेव्हा अशी कोणतीही नोटीस टपाल कार्यालय, बँकिंग कंपनी किंवा विमाकार यांना पाठविण्यात आली असेल तर, कोणताही नियम, प्रथा किंवा आवश्यकता यांविरुद्ध असले तरी प्रदान करण्यात येण्यापूर्वी कोणत्याही नोंदीच्या, पृष्ठांकनाच्या किंवा यासारख्या करण्यात येत असलेल्या गोष्टीच्या प्रयोजनासाठी कोणतेही पासबुक, ठेव जमा पावती, विमापत्र किंवा अन्य कोणताही दस्तऐवज सादर करण्याची आवश्यकता असणार नाही ;

(तीन) उप-खंड (एक) अन्वये ज्या व्यक्तीला नोटीस पाठविण्यात आलेली आहे त्या व्यक्तीने त्या नोटिशीनुसार शासनाला प्रदान करण्यात कसूर केली असेल त्या बाबतीत, ती व्यक्ती नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेच्या संबंधात कसूरदार असल्याचे मानण्यात येईल आणि तिला या अधिनियमाचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे सर्व परिणाम लागू होतील ;

(चार) उप-खंड (एक) अन्वये नोटीस पाठविणाऱ्या अधिकाऱ्यास, कोणत्याही वेळी अशा नोटिशीत सुधारणा करता येईल किंवा अशी नोटीस रद्द करता येईल किंवा नोटिशीच्या अनुषंगाने कोणतेही प्रदान करण्यासाठीची मुदत वाढविता येईल ;

(पाच) उप-खंड (एक) अन्वये पाठविलेल्या नोटिशीच्या अनुपालनार्थ कोणतेही प्रदान करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या प्राधिकारानुसार प्रदान केले असल्याचे मानण्यात येईल आणि शासनाकडे जमा होणारे असे प्रदान, पावतीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेच्या मर्यादेपर्यंत कसूरदार व्यक्तीमार्फत अशा व्यक्तीचे उचित व पुरेसे दायित्व पालन झाले असल्याचे मानण्यात येईल ;

(सहा) उप-खंड (एक) अन्वये काढण्यात आलेली नोटीस कसूरदार व्यक्तीवर बजाविण्यात आल्यानंतर तिचे कोणतेही दायित्व फेडणारी कोणतीही व्यक्ती, कर, व्याज व शास्ती यासाठी दायित्व फेडलेल्या मर्यादेपर्यंत किंवा कसूरदार व्यक्तीच्या दायित्वाच्या मर्यादेपर्यंत, यांपैकी जे कमी असेल, त्याकरिता शासनाला व्यक्तिशः दायी असेल ;

(सात) उप-खंड (एक) अन्वये ज्या व्यक्तीवर नोटीस बजाविण्यात आलेली असेल त्या व्यक्तीने, तिच्यावर बजाविण्यात आलेल्या नोटिशीच्या वेळी मागणी करण्यात आलेली रक्कम किंवा त्या रकमेचा कोणताही भाग, कसूरदार व्यक्तीकडून देय नाही किंवा तिने कसूरदार व्यक्तीसाठी किंवा तिच्या वतीने कोणतीही रक्कम धारण केलेली नाही वा मागणी केलेली रक्कम किंवा त्या रकमेचा कोणताही भाग उक्त व्यक्तीकडून देय असल्याची संभाव्यता नाही किंवा अशा व्यक्तीसाठी किंवा तिच्या वतीने धारण करण्याची संभाव्यता नाही अशी नोटीस पाठविणाऱ्या अधिकाऱ्याची खात्री पटेल अशा रीतीने सिद्ध केले असेल तर, या कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही अशी रक्कम, किंवा त्या रकमेचा भाग शासनाला प्रदान करण्यासाठी ज्या व्यक्तीवर नोटीस बजाविण्यात आलेली असेल त्या व्यक्तीला ती फर्माविण्यात आली असल्याचे मानण्यात येणार नाही ;

(घ) समुचित अधिकाऱ्यास, या बाबतीत केलेल्या नियमानुसार, अशा व्यक्तीच्या मालकीची किंवा तिच्या नियंत्रणाधीन असलेली कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता अटकावून ठेवता येईल आणि ती मालमत्ता देय रकमेचा भरणा होईपर्यंत निरुद्ध करता येईल ; आणि उक्त देय रकमेचा कोणताही भाग किंवा अटकावून ठेवलेल्या किंवा घेतलेल्या मालमत्तेची किंमत कोणत्याही अशा अटकावणीनंतरच्या पुढील तीस दिवसांच्या कालावधीसाठी चुकती करण्यात आली नाही तर उक्त मालमत्ता विकण्याची व्यवस्था करता येईल आणि अशा विक्रीतून मिळालेले उत्पन्न, देय रक्कम आणि चुकत्या न केलेल्या विक्रीच्या खर्चासह वादखर्च यांची फेड करता येईल आणि शिल्लक रक्कम, कोणतीही असेल तर, अशा व्यक्तीला देण्यात येईल ;

(ङ) समुचित अधिकाऱ्यास, अशा व्यक्तीकडून देय रक्कम विनिर्दिष्ट करणारे त्याची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र तयार करता येईल आणि ते अशा व्यक्तीच्या मालकीची कोणतीही मालमत्ता ज्या जिल्ह्यात आहे किंवा अशी व्यक्ती ज्या जिल्ह्यात राहते किंवा तिचा धंदा करते त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे पाठविता येईल आणि उक्त जिल्हाधिकारी किंवा उक्त अधिकारी असे प्रमाणपत्र मिळाल्यावर, अशा व्यक्तीकडून, जणू काही ती जमीन महसुलाची थकबाकी होती असे समजून त्या अंतर्गत विनिर्दिष्ट केलेली रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करील ;

१९७४ चा २. (च) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, समुचित अधिकाऱ्यास उचित दंडाधिकाऱ्याकडे अर्ज दाखल करता येईल आणि असा दंडाधिकारी, अशा व्यक्तीकडून, जणू काही त्याने लादलेला द्रव्यदंड होता असे समजून त्या अंतर्गत विनिर्दिष्ट केलेली रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करील.

(२) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये किंवा विनियमांन्वये कोणत्याही बंधपत्राच्या किंवा अन्य संलेखाच्या निष्पादित केलेल्या अटींमध्ये अशी तरतूद करण्यात आली असेल की, अशा संलेखाअन्वये कोणतीही देय रक्कम पोट-कलम (१) मध्ये निर्धारित केलेल्या रितीने वसूल करण्यात येईल तर ती रक्कम, वसुलीच्या कोणत्याही अन्य पद्धतीला हानी न पोचवता, त्या पोट-कलमाच्या तरतुदींनुसार वसूल करण्यात येईल.

(३) जेव्हा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये एखाद्या व्यक्तीद्वारे शासनाला कराची, व्याजाची किंवा शास्तीची कोणतीही रक्कम देय असेल आणि ती भरण्यात आली नसेल तेव्हा केंद्रीय कराच्या समुचित अधिकाऱ्यास, उक्त कराची थकबाकी वसूल करताना, उक्त व्यक्तीकडून जणू काही केंद्रीय कराची थकबाकी होती असे समजून रकमेची वसुली करता येईल आणि अशी वसूल केलेली रक्कम शासनाच्या खात्यात जमा करता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये वसूल केलेली रक्कम, केंद्र सरकारला आणि राज्य शासनाला देय असलेल्या रकमेपेक्षा कमी असेल तर, संबंधित शासनांच्या खाती जमा करावयाची रक्कम, प्रत्येकी अशा शासनाला देय असलेल्या रकमेच्या प्रमाणात असेल.

**८०.** करपात्र व्यक्तीने दाखल केलेल्या अर्जावरून, आयुक्तास, कारणे लेखी नमूद करून, विहित करण्यात येतील अशा निर्बंधांसह व शर्तीसह कलम ५० अन्वये व्याज भरण्याच्या अधीन राहून, अशा व्यक्तीने, कोणत्याही विवरणात स्वयंनिर्धारित केलेल्या दायित्वानुसार देय असलेल्या रकमेव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये देय असलेली कोणतीही रक्कम २४ पेक्षा अधिक नसतील इतक्या मासिक हप्त्यांमध्ये भरण्यासाठी मुदत वाढवून देता येईल किंवा ती रक्कम भरण्यास परवानगी देता येईल : हप्त्यांमध्ये कराचा व इतर रकमेचा भरणा करणे.

परंतु, भरणा करण्याच्या नियत दिनांकास कोणताही हप्ता भरण्यात कसूर करण्यात येईल त्या बाबतीत अशा दिनांकास देय असलेली संपूर्ण अदत्त शिल्लक रक्कम ही तात्काळ देय व प्रदेय होईल आणि त्या व्यक्तीवर आणखी कोणतीही नोटीस न बजावता ती रक्कम वसुलीसाठी पात्र ठरेल.

विवक्षित प्रकरणी संपत्तीचे हस्तांतरण निरर्थक ठरणे.

**८१.** एखादी व्यक्ती, तिच्याकडून कोणतीही रक्कम देय झाल्यानंतर, शासकीय महसूल बुडविण्याच्या उद्देशाने, इतर कोणत्याही व्यक्तीच्या लाभार्थ, विक्री, गहाण, अदलाबदल, यांद्वारे किंवा तिच्या कोणत्याही मालमत्तेच्या हस्तांतरणाच्या इतर कोणत्याही पद्धतीने तिच्या मालकीच्या किंवा तिच्या ताब्यातील मालमत्तेवर किंवा तिच्या भागावर भार निर्माण करील त्याबाबतीत, उक्त व्यक्तीकडून देय असलेल्या कोणत्याही कराच्या किंवा इतर कोणत्याही रकमेच्या संबंधातील कोणत्याही दाव्याच्या तुलनेत असा भार किंवा हस्तांतरण निरर्थक ठरेल :

परंतु, जर, सद्भावनेने पुरेसा मोबदला घेऊन आणि या अधिनियमान्वये अशी कार्यवाही प्रलंबित असल्याची सूचना नसताना किंवा उक्त व्यक्तीकडून अशा देय कराची किंवा इतर देय रकमेची सूचना नसताना किंवा समुचित अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने, भार निर्माण केला असेल किंवा हस्तांतरण केले असेल तर, असा भार किंवा हस्तांतरण, निरर्थक ठरणार नाही.

मालमत्तेवर कराचा प्रथम भार असणे.

**८२.** नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ यात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, कर, व्याज किंवा शास्ती यापोटी एखाद्या करपात्र व्यक्तीकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून देय असलेली जी कोणतीही रक्कम, शासनाला देण्यास ती दायी असेल, अशी कोणतीही रक्कम ही, अशा करपात्र व्यक्तीच्या किंवा, यथास्थिति, अशा व्यक्तीच्या मालमत्तेवरील प्रथम भार असेल.

विवक्षित प्रकरणी महसुलाचे रक्षण करण्यासाठी तात्पुरती जप्ती आणणे.

**८३.** (१) कलम ६२, किंवा कलम ६३ किंवा कलम ६४ किंवा कलम ६७ किंवा कलम ७३ किंवा कलम ७४ यांखालील कोणतीही कार्यवाही प्रलंबित असताना, शासनाच्या महसुलाच्या हिताचे रक्षण करण्याच्या प्रयोजनासाठी, तसे करणे आवश्यक असल्याबाबत आयुक्ताचे मत झाले असेल त्या बाबतीत, त्यास लेखी आदेशाद्वारे, विहित करण्यात येईल अशा रीतीने करपात्र व्यक्तीच्या बँक खात्यासह तिच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेवर, तात्पुरती जप्ती आणता येईल.

(२) अशी प्रत्येक तात्पुरती जप्ती ही, पोट-कलम (१) अन्वये आदेश काढण्यात आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर, अंमलात असण्याचे बंद होईल.

विवक्षित वसुलीची कार्यवाही चालू ठेवणे व ती विधिग्राह्य असणे.

**८४.** या अधिनियमान्वये देय असलेल्या कोणत्याही कराच्या, शास्तीच्या, व्याजाच्या किंवा इतर कोणत्याही रकमेच्या (यात यापुढे या कलमात ज्यांचा निर्देश " शासकीय देणी " असा केला आहे) संबंधातील मागणीची कोणतीही नोटीस, कोणत्याही करपात्र व्यक्तीवर किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीवर बजावण्यात आली असेल आणि अशा शासकीय देणीच्या संबंधात, कोणतेही अपील, पुनरीक्षण अर्ज दाखल करण्यात आला असेल किंवा अन्य कोणतीही कार्यवाही सुरू करण्यात आली असेल, त्या बाबतीत नंतर,—

(क) अशा अपिलात, पुनरीक्षणात किंवा इतर कार्यवाहींमध्ये अशा शासकीय देणींच्या रकमेत वाढ करण्यात आली असेल तेव्हा आयुक्त, अशा शासकीय देणीची जेवढी रक्कम वाढवण्यात आली असेल तेवढ्याच रकमेच्या बाबतीत त्या करपात्र व्यक्तीवर किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीवर दुसरी मागणीची नोटीस बजावील आणि असे अपील, पुनरीक्षण किंवा कार्यवाही निकालात काढण्यापूर्वी, तिच्यावर बजावलेल्या मागणीच्या नोटिशीमध्ये समाविष्ट असलेल्या अशा शासकीय देणीच्या संबंधातील वसुलीची कोणतीही कार्यवाही, किंवा अन्य कार्यवाही, कोणतीही नवीन मागणीची नोटीस न बजावता, अशी कार्यवाही निकालात काढण्याच्या लगतपूर्वी ज्या टप्प्यावर होती त्या टप्प्यापासून ती पुढे चालू ठेवता येईल.

(ख) अशा अपिलात, पुनरीक्षणात किंवा इतर कोणत्याही कार्यवाहीत अशा शासकीय देणीची रक्कम कमी करण्यात आली असेल तेव्हा,—

(एक) आयुक्ताने त्या करपात्र व्यक्तीवर मागणीची नवीन नोटीस बजावण्याची आवश्यकता असणार नाही ;

(दोन) आयुक्त, त्या व्यक्तीला आणि वसुलीची कार्यवाही ज्याच्याकडे प्रलंबित असेल त्या उचित प्राधिकाऱ्याला अशी रक्कम कमी केल्याची सूचना देईल ;

(तीन) असे अपील, पुनरीक्षण किंवा इतर कार्यवाही निकालात काढण्यापूर्वी तिच्यावर बजावलेल्या मागणीच्या नोटिशीच्या आधारे सुरू करण्यात आलेली वसुलीची कोणतीही कार्यवाही, ही अशा रीतीने कमी केलेल्या रकमेच्या बाबतीत, असे अपील, पुनरीक्षण किंवा कार्यवाही निकालात काढण्याच्या लगतपूर्वी ज्या अवस्थेत होती त्या अवस्थेपासून पुढे चालू ठेवता येईल.

## प्रकरण सोळा

## विवक्षित प्रकरणातील भरणा करण्याचे दायित्व

धंद्याचे हस्तांतरण करण्याच्या बाबतीतील दायित्व.

**८५.** (१) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेली करपात्र व्यक्ती, तिच्या धंद्याचे, संपूर्णतः किंवा अंशतः, विक्रीद्वारे, बक्षिसाद्वारे, भाडेपट्ट्याद्वारे, परवानगी व अनुज्ञाद्वारे भाड्याने किंवा इतर कोणत्याही रीतीने, मग ती कोणतीही असो, हस्तांतरण करील त्याबाबतीत, ती करपात्र व्यक्ती आणि ज्या कोणाला तो धंदा अशाप्रकारे हस्तांतरित केला असेल ती व्यक्ती, संपूर्णतः किंवा, अशा हस्तांतरणाच्या व्याप्तीपर्यंत, अशा हस्तांतरणाच्या वेळेपर्यंत करपात्र व्यक्तीकडून देय असलेला कर, व्याज किंवा कोणतीही शास्ती देण्यासाठी, संयुक्तपणे आणि पृथकपणे पात्र असेल - मग असा कर, व्याज किंवा शास्ती अशा हस्तांतरणाच्या पूर्वी निश्चित करण्यात आलेला असो परंतु, न भरलेला असो, किंवा त्यानंतर निश्चित करण्यात आलेला असो.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेला धंद्याचा हस्तांतरिती, असा धंदा एकतर त्याच्या स्वतःच्या नावाने किंवा एखाद्या अन्य नावाने चालवत असल्यास, तो अशा हस्तांतरणाच्या दिनांकापासून त्याच्याकडून केलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीच्या पुरवठ्यांवर कर भरण्यास पात्र असेल आणि जर, तो या अधिनियमान्वये नोंदणीकृत व्यक्ती असेल तर, त्याच्या नोंदणी प्रमाणपत्रामध्ये सुधारणा करण्यासाठी विहित कालावधीत अर्ज करील.

अभिकर्ता व प्रकर्ता यांचे दायित्व.

**८६.** जेव्हा अभिकर्ता, त्याच्या प्रकर्त्याच्या वतीने कोणत्याही करपात्र मालाचा पुरवठा करीत असेल किंवा माल स्वीकारीत असेल तर, असा अभिकर्ता व त्याचा प्रकर्ता या अधिनियमाखाली अशा मालावर देय असणारा कर भरण्यासाठी, संयुक्तपणे व पृथकपणे, पात्र असतील.

कंपन्यांच्या एकत्रीकरणाच्या किंवा विलीनीकरणाच्या बाबतीतील दायित्व.

**८७.** (१) दोन किंवा त्याहून अधिक कंपन्यांचे न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार किंवा अन्यथा एकत्रीकरण किंवा विलीनीकरण करण्यात यायचे असल्यास आणि आदेशाच्या दिनांकाच्या अगोदरच्या दिनांकास तो आदेश अंमलात यावयाचा असेल आणि अशा कोणत्याही दोन किंवा अधिक कंपन्यांनी आदेश अंमलात येणाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि आदेशाच्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीत, एकमेकांना कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही पुरविल्या असतील किंवा प्राप्त केल्या असतील तर, अशा पुरवठ्याचे आणि प्राप्तीचे व्यवहार संबंधित कंपन्यांच्या पुरवठ्याचा किंवा प्राप्तीच्या उलाढालीमध्ये समाविष्ट केले जातील आणि त्यानुसार त्या कर भरण्यास पात्र असतील.

(२) उक्त आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, उक्त दोन किंवा अधिक कंपन्या, उक्त आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधींसाठी वेगवेगळ्या कंपन्या असल्याचे समजण्यात येईल आणि उक्त कंपन्यांची नोंदणी प्रमाणपत्रे उक्त आदेश अंमलात आल्याच्या दिनांकापासून रद्द केली जातील.

कंपनीच्या परिसमापनाच्या बाबतीतील दायित्व.

**८८.** (१) एखाद्या कंपनीच्या कामकाजाचे परिसमापन होत असल्यास - मग ते न्यायालयाच्या किंवा, न्यायाधिकरणाच्या आदेशाने वा अन्यथा होत असो - कंपनीच्या कोणत्याही मत्तेचा प्रापक म्हणून नियुक्त केलेली प्रत्येक व्यक्ती, (यापुढे या कलमामध्ये जिचा निर्देश “ परिसमापक ” असा केला आहे) तिच्या नियुक्तीनंतर तीस दिवसांच्या कालावधीत आयुक्तास त्याच्या नियुक्तीची सूचना देईल.

(२) आयुक्त, अशी चौकशी केल्यानंतर किंवा त्यास योग्य वाटेल, त्याप्रमाणे अशी माहिती मागविण्यात आल्यानंतर, त्याला ज्या दिनांकास परिसमापकाची नियुक्ती झाल्याबाबतची सूचना प्राप्त झाली असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत परिसमापकाला कंपनीकडून त्यावेळी देय असलेला किंवा त्यानंतर देय असण्याची संभाव्यता असलेला कोणताही कर, व्याज किंवा शास्ती याकरिता तरतूद करण्यासाठी आयुक्ताच्या मते पर्याप्त ठरणार असेल अशी रक्कम अधिसूचित करील.

(३) जेव्हा कोणत्याही खाजगी कंपनीचे कामकाज गुंडाळण्यात आले असेल आणि या अधिनियमान्वये कंपनीवर कोणत्याही कालावधीसाठी निश्चित केलेला कोणताही कर, व्याज किंवा शास्ती-मग तो कालावधी कंपनीच्या परिसमापनाच्या पूर्वीचा असेल अथवा परिसमापन होतानाचा असेल अथवा त्या नंतरचा असेल–वसूल करता आली नसेल तर, कंपनीकडून ज्या कालावधीसाठी कर देय होता त्या कालावधीमधील कोणत्याही वेळी अशा कंपनीचा संचालक असलेली प्रत्येक व्यक्ती, तिने आपण कोणतीही अक्षम्य हयगय केल्यामुळे, अपकार्य केल्यामुळे किंवा कंपनीच्या कामकाजासंबंधाने आपल्या वतीने कर्तव्याचा भंग झाल्यामुळे वसुली होऊ शकली नाही. असे आयुक्ताची खात्री पटेल अशा रीतीने सिद्ध केले नसेल तर, ती संयुक्तपणे व पृथकपणे असा कर, व्याज किंवा शास्ती प्रदान करण्यासाठी जबाबदार असेल.

२०१३ चा १८. **८९.** (१) कंपनी अधिनियम, २०१३ यात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा कोणत्याही कालावधीसाठी वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीच्या कोणत्याही पुरवठ्याबाबत खाजगी कंपनीकडून देय असलेला कोणताही कर, व्याज किंवा शास्ती वसूल करता आली नसेल तर, अशा कालावधीमध्ये खाजगी कंपनीचा संचालक असलेली प्रत्येक व्यक्ती, तिने आपण कोणतीही अक्षम्य हयगय केल्यामुळे, अपकार्य केल्यामुळे किंवा कंपनीच्या कामकाजासंबंधात आपल्या वतीने कर्तव्याचा भंग झाल्यामुळे वसुली होऊ शकली नाही असे सिद्ध केले नसेल तर, संयुक्तपणे व पृथकपणे असा कर, व्याज किंवा शास्ती प्रदान करण्यासाठी जबाबदार असेल. खाजगी कंपनीच्या संचालकांचे दायित्व.

(२) जेव्हा खाजगी कंपनी सार्वजनिक कंपनीत रूपांतरित झाली असेल आणि ज्या कालावधीत अशी कंपनी खाजगी कंपनी होती, त्या कोणत्याही कालावधीत वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीच्या कोणत्याही पुरवठ्याबाबतचा कर, व्याज किंवा शास्ती कंपनी रूपांतरित होण्यापूर्वी वसूल करता आली नसेल तर, पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही बाब, अशा खाजगी कंपनीच्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीच्या अशा पुरवठ्याच्या संबंधात अशा खाजगी कंपनीचा संचालक असलेल्या कोणत्याही व्यक्तीस लागू होणार नाही :

परंतु, या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही बाब अशा संचालकावर लादण्यात आलेल्या कोणत्याही वैयक्तिक शास्तीस लागू होणार नाही.

**९०.** कोणत्याही संविदेत काहीही विरुद्ध असले तरी, आणि त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात, काहीही असले तरी, जेव्हा या अधिनियमान्वये कोणताही कर, व्याज किंवा शास्ती भरणा करण्यास कोणतीही भागीदारी संस्था दायी असेल तर भागीदारी संस्था आणि तिचा प्रत्येक भागीदार संयुक्तपणे व पृथकपणे असा भरणा करण्यासाठी दायी असेल : कर भरणा करण्याचे भागीदारी संस्थेच्या भागीदारांचे दायित्व.

परंतु, कोणताही भागीदार, भागीदारी संस्थेतून निवृत्त होत असल्यास, तो किंवा भागीदारी संस्था त्याबाबत लेखी नोटीस देऊन उक्त भागीदाराच्या निवृत्तीची तारीख आयुक्ताला कळवील आणि असा भागीदार त्याच्या निवृत्तीच्या तारखेपर्यंत देय असलेला कर, व्याज किंवा शास्ती —मग तो त्या तारखेस निश्चित केलेला असो अथवा नसो— भरणा करण्यास दायी असेल :

परंतु, आणखी असे की, जर अशी सूचना निवृत्तीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत देण्यात आली नाही तर, पहिल्या परंतुकाअन्वये अशा भागीदाराचे दायित्व अशी सूचना आयुक्तास ज्या तारखेस प्राप्त होईल त्या तारखेपर्यंत चालू राहील.

पालक, विश्वस्त इत्यादींचे दायित्व.

**९१.** या अधिनियमान्वये, ज्या धंद्याच्या संबंधात, कोणताही कर, व्याज किंवा शास्ती देय असेल असा धंदा, अज्ञान व्यक्तीचा किंवा इतर असमर्थ व्यक्तीचा कोणताही पालक, विश्वस्त किंवा अभिकर्ता, अशा अज्ञान व्यक्तीच्या किंवा इतर असमर्थ व्यक्तीच्या वतीने आणि तिच्या लाभासाठी चालवित असेल तर, अशा कोणत्याही अज्ञान व्यक्तीसाठी किंवा इतर असमर्थ व्यक्तीसाठी, जणू काही, ती व्यक्ती सज्ञान किंवा समर्थ होती आणि ती स्वतः धंदा चालवित होती असे मानून निर्धारित करण्यात आली असती अशा रीतीने व त्याच मर्यादेपर्यंत असा पालक, विश्वस्त किंवा अभिकर्ता यांच्याकडून कर, व्याज किंवा शास्ती आकारण्यात येईल व वसुलीयोग्य असेल आणि या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या सर्व तरतुदी, तद्नुसार लागू होतील.

पाल्याधिकरण इत्यादींचे दायित्व.

**९२.** या अधिनियमान्वये, ज्या धंद्याच्या संबंधात कोणताही कर, व्याज किंवा शास्ती देय असेल अशा धंद्याची मालकी असणाऱ्या करपात्र व्यक्तीची संपदा किंवा संपदेचा कोणताही भाग, न्यायालयाच्या कोणत्याही आदेशाद्वारे किंवा तद्न्वये नियुक्त केलेल्या पाल्याधिकरणाच्या, महाप्रशासकाच्या, अधिकृत विश्वस्ताच्या किंवा प्रापकाच्या किंवा व्यवस्थापकाच्या (जी वस्तुतः धंद्याचे व्यवस्थापन करीत असेल अशा कोणत्याही व्यक्ती, मग तिचे पदनाम कोणतेही असो, यासह) नियंत्रणाखाली असेल तर, अशा करपात्र व्यक्तीसाठी जणू काही, ती स्वतः धंदा चालवित होती असे मानून निर्धारित करण्यात आली असती अशा रीतीने व त्याच मर्यादेपर्यंत असे पाल्यधिकरण, महाप्रशासक, अधिकृत विश्वस्त, प्रापक किंवा व्यवस्थापक यांच्याकडून कर, व्याज किंवा शास्ती आकारण्यात येईल व वसुलीयोग्य असेल आणि या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या सर्व तरतुदी तदनुसार लागू होतील.

विवक्षित प्रकरणात कर, व्याज किंवा शास्ती भरणा करण्याच्या दायित्त्वासंबंधी विशेष तरतुदी.

**९३.** (१) नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये कर, व्याज किंवा शास्ती भरणा करण्यास दायी असलेल्या व्यक्तीचा जर मृत्यू झाला तर,— २०१६ चा ३१.

(क) त्या व्यक्तीकडून चालवण्यात आलेला धंदा तिच्या मृत्यूनंतर तिच्या कायदेशीर प्रतिनिधीकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून चालविण्याचे सुरू ठेवले असेल तर, असा कायदेशीर प्रतिनिधी किंवा इतर व्यक्ती ही, या अधिनियामान्वये अशा व्यक्तीकडून देय असलेला कर, व्याज किंवा शास्ती भरणा करण्यास दायी असेल ; आणि

(ख) त्या व्यक्तीकडून चालवण्यात येत असलेला धंदा बंद झाला असेल तर- मग तो तिच्या मृत्यूपूर्वी किंवा मृत्यूनंतर असो, त्याचा कायदेशीर प्रतिनिधी, मृत व्यक्तीच्या संपदेमधून ज्या मर्यादेपर्यंत आकार भागविण्याची संपदेची क्षमता आहे त्या मर्यादेपर्यंत, या अधिनियमान्वये अशा व्यक्तीकडून देय असलेला कर, शास्ती किंवा व्याज भरणा

करण्यास दायी असेल—मग असा कर, व्याज किंवा शास्ती तिच्या मृत्यूपूर्वी निश्चित करण्यात आलेली असेल, मात्र भरणा करण्यात आलेली नसेल किंवा तिच्या मृत्यूनंतर निश्चित करण्यात आलेली असेल.

२०१६ चा ३१. (२) नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त या अधिनियमान्वये कर, व्याज किंवा शास्ती भरणा करण्यास दायी असेलेली करपात्र व्यक्ती ही, हिंदू अविभक्त कुटुंबातील किंवा व्यक्तींच्या संघातील असेल आणि हिंदू अविभक्त कुटुंब किंवा व्यक्तींचा संघ, यांची मालमत्ता वेगवेगळ्या सदस्यांमध्ये किंवा सदस्यांच्या गटात विभागण्यात आली असेल तर, प्रत्येक सदस्य किंवा सदस्यांचा गट संयुक्तपणे किंवा पृथकपणे, विभागणी केल्या वेळेपर्यंतचा या अधिनियमान्वये करपात्र व्यक्तीकडून देय असलेला कर, व्याज किंवा शास्ती भरणा करण्यास दायी असेल–मग असा कर, व्याज किंवा शास्ती ही विभागणीपूर्वी निश्चित करण्यात आलेली असेल, मात्र भरणा करण्यात आलेली नसेल किंवा विभागणीनंतर निश्चित करण्यात आलेली असेल.

२०१६ चा ३१. (३) नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, जर या अधिनियमान्वये कर, व्याज किंवा शास्ती भरणा करण्यास दायी असलेली करपात्र व्यक्ती ही भागीदारी संस्था असेल आणि भागीदारी संस्था विसर्जित झाली असेल तर, भागीदार असलेली प्रत्येक व्यक्ती संयुक्तपणे किंवा पृथकपणे, भागीदारी संस्था विसर्जित झाल्याच्या वेळेपर्यंत या अधिनियमान्वये भागीदारी संस्थेकडून देय असलेला कर, व्याज किंवा शास्ती–मग असा कर, व्याज किंवा शास्ती भागीदारी संस्था विसर्जित होण्यापूर्वी निश्चित केलेली असेल मात्र भरणा केलेली नसेल किंवा विसर्जित झाल्यानंतर निश्चित केलेली असेल, भरणा करण्यास दायी असेल.

२०१६ चा ३१. (४) नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त या अधिनियमान्वये कर, व्याज किंवा शास्ती भरणा करण्यास पात्र असलेली एखादी करपात्र व्यक्ती,—

(क) एखाद्या पाल्याचा पालक असेल व जो त्या पाल्याच्या वतीने तो धंदा चालवत असेल, किंवा

(ख) विश्वस्त असेल, जी विश्वस्तव्यवस्थेअंतर्गत असलेल्या लाभार्थ्यांसाठी धंदा चालवित असेल,

तर, पालकत्व किंवा विश्वस्तव्यवस्था समाप्त करण्यात आली तर, पाल्य किंवा लाभार्थी, असे पालकत्व किंवा विश्वस्तव्यवस्थेची समाप्ती होण्याच्या वेळेपर्यंत, करपात्र व्यक्तीकडून, येणे असलेला कर, व्याज किंवा शास्ती भरण्यास पात्र असेल, मग असा कर, व्याज किंवा शास्ती ही, पालकत्व किंवा विश्वस्त व्यवस्थेची समाप्ती होण्यापूर्वी निश्चित करण्यात आलेली परंतु न भरलेली असो किंवा त्यानंतर निश्चित करण्यात आलेली असो.

इतर प्रकरणातील दायित्व.

**९४.** (१) करपात्र व्यक्ती, ही एखादी भागीदारी संस्था किंवा व्यक्तींचा संघ किंवा एखादे हिंदू अविभक्त कुटुंब असेल आणि अशा भागीदारी संस्थेने, संघाने किंवा कुटुंबाने धंदा करण्याचे बंद केले असल्यास,—

(क) अशी भागीदारी संस्था, संघ किंवा कुटुंब यांच्याकडून या अधिनियमान्वये देय असलेला कर व्याज किंवा शास्ती ही, जणू काही अशाप्रकारे धंदा बंद करण्यात आलेलाच नाही असे समजून, अशाप्रकारे धंदा बंद करण्याच्या दिनांकापर्यंत, निश्चित करण्यात येईल ; आणि

(ख) अशा प्रकारे धंदा बंद करण्याच्या वेळी, अशा भागीदारी संस्थेचा भागीदार किंवा अशा संघाचा किंवा कुटुंबाचा सदस्य असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, अशा प्रकारे धंदा बंद केला असला तरी, अशी भागीदारी संस्था, संघ किंवा कुटुंब हे, त्यांच्यावर निश्चित केलेला कर व व्याज व लादण्यात आलेली व देय असलेली शास्ती, भरणा करण्यास, संयुक्तपणे व पृथकपणे, दायी असेल, मग निश्चित केलेला असा कर व व्याज व लादण्यात आलेली शास्ती ही, अशाप्रकारे धंदा बंद करण्यापूर्वी किंवा नंतर निश्चित केलेली असो आणि उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे, या अधिनियमाच्या तरतुदी या, अशा प्रत्येक व्यक्तीस किंवा भागीदारास किंवा सदस्यास, ती स्वतःच जणूकाही एक करपात्र व्यक्ती आहे असे समजून, त्या व्यक्तीला त्या जशा व जेथवर लागू होतात, त्याप्रमाणे, लागू होतील.

(२) एखाद्या भागीदारी संस्थेच्या किंवा व्यक्तींच्या संघाच्या रचनेमध्ये बदल झाल्यास, भागीदारी संस्थेचे भागीदार किंवा संघाचे सदस्य हे, अशी पुनर्रचना होण्यापूर्वी अस्तित्त्वात होते व अशा पुनर्रचनेनंतर अस्तित्त्वात असल्याप्रमाणे, कलम ९० च्या तरतुदींना बाध न आणता, तिच्या पुनर्रचनेपूर्वीच्या कोणत्याही कालावधीकरिता, अशा भागीदारी संस्थेकडून किंवा संघाकडून, देय असलेला कर, व्याज किंवा शास्ती करण्यास, संयुक्तपणे व पृथकपणे, दायी असतील.

(३) पोट-कलम (१) च्या तरतुदी, करपात्र व्यक्ती, भागीदारी संस्था किंवा व्यक्तींचा संघ म्हणून विसर्जित झाली असेल किंवा करपात्र व्यक्ती, ही एक हिंदू अविभक्त कुटुंब म्हणून असेल तर, तिच्याकडून चालविल्या जाणाऱ्या धंद्याच्या संबंधात, विभागणी झाली असेल तर, शक्य होईल तितपत लागू होतील आणि तदनुसार, धंदा बंद करण्यासाठीच्या त्या पोट-कलमातील निर्देशांचा अन्वयार्थ, विसर्जित झाल्याचा किंवा विभागणी झाल्याचा निर्देश म्हणून लावण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ,— २००९ चा ६.

(एक) मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८ च्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात व नोंदणी करण्यात आलेल्या " मर्यादित दायित्व भागीदारी " ही एक भागीदारी संस्था म्हणूनही समजण्यात येईल ;

(दोन) " न्यायालय " याचा अर्थ, जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय, किंवा सर्वोच्च न्यायालय, असा आहे.

प्रकरण सतरा

## आगाऊ अधिनिर्णय देणे

**९५.** या प्रकरणात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,– व्याख्या.

(क) " आगाऊ अधिनिर्णय देणे " याचा अर्थ, अर्जदार करीत असलेल्या किंवा त्याने करण्याचे योजलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याच्या संबंधात, कलम ९७ च्या पोट-कलम (२) मध्ये किंवा कलम १०० च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींवर किंवा प्रश्नांवर प्राधिकरणाने किंवा, अपील प्राधिकरणाने दिलेला निर्णय, असा आहे ;

(ख) " अपील प्राधिकरण " याचा अर्थ, आगाऊ अधिनिर्णय देण्यासाठी, कलम ९९ अन्वये घटित केलेले अपील प्राधिकरण, असा आहे ;

(ग) " अर्जदार " याचा अर्थ, या अधिनियमान्वये नोंदणी केलेली किंवा नोंदणी मिळविण्यास इच्छुक असलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(घ) "अर्ज " याचा अर्थ, कलम ९७ च्या पोट-कलम (१) अन्वये प्राधिकरणाकडे केलेला अर्ज, असा आहे ;

(ङ) " प्राधिकरण " याचा अर्थ, आगाऊ अधिनिर्णय देण्यासाठी कलम ९६ अन्वये घटित केलेले, प्राधिकरण, असा आहे ;

**९६.** (१) शासन, अधिसूचनेद्वारे, आगाऊ अधिनिर्णय देण्यासाठी महाराष्ट्र आगाऊ अधिनिर्णय प्राधिकरण या नावाने ओळखले जाणारे प्राधिकरण घटित करील : आगाऊ अधिनिर्णय देण्यासाठी प्राधिकरण घटित करणे.

परंतु, शासनाला, परिषदेच्या शिफारशीनुसार, राज्याकरिता प्राधिकरण म्हणून कार्य करण्यासाठी अन्य राज्यात स्थित असलेल्या कोणत्याही प्राधिकरणाला अधिसूचित करता येईल.

(२) प्राधिकरण हे, अनुक्रमे केंद्र सरकारने व राज्य शासनाने नियुक्त करावयाचा,–

(एक) केंद्रीय कराच्या अधिकाऱ्यांमधून एक सदस्य ; आणि

(दोन) राज्य कराच्या अधिकाऱ्यांमधून एक सदस्य,

यांनी मिळून बनलेले असेल.

(३) सदस्यांच्या नियुक्तीसाठीच्या अर्हता व पद्धती आणि त्यांच्या सेवांच्या अटी व शर्ती विहित करण्यात येतील त्याचप्रमाणे असतील.

**९७.** (१) या प्रकरणाखाली आगाऊ अधिनिर्णय मिळविण्यास इच्छुक असलेल्या अर्जदाराला ज्या प्रश्नावर आगाऊ अधिनिर्णय मिळण्याची मागणी केली असेल तो प्रश्न नमूद करून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने आणि अशा शुल्कासह अर्ज करता येईल. आगाऊ अधिनिर्णयासाठी अर्ज.

(२) या अधिनियमाखालील ज्या प्रश्नावर आगाऊ अधिनिर्णयाची मागणी केली असेल तो प्रश्न,—

(क) कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही याचे वर्गीकरण ;

(ख) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये काढलेल्या अधिसूचनेची प्रयोज्यता ;

(ग) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही यांच्या पुरवठ्याची वेळ आणि मूल्याचे निश्चितीकरण ;

(घ) कर भरणा केलेल्या किंवा भरणा करण्यात आल्याचे मानलेल्या निविष्टी कर जमा रकमेची स्वीकार्यता ;

(ङ) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींवर कर भरण्याच्या दायित्वाचे निश्चितीकरण;

(च) अर्जदाराची नोंदणी करण्याची आवश्यकता आहे किंवा कसे ;

(छ) कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही यांच्या बाबतीत अर्जदाराने, केलेली कोणतीही विशिष्ट गोष्ट ही त्या संज्ञेच्या अर्थांतर्गत वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीचा पुरवठा केल्याचे किंवा केल्याच्या परिणामी आहे किंवा कसे,

याच्या संबंधात असेल ;

अर्ज प्राप्त झाल्यानंतरची कार्यपद्धती.

**९८.** (१) अर्ज प्राप्त झाल्यावर, प्राधिकरण, संबंधित अधिकाऱ्यांना त्या अर्जाची प्रत पाठविण्याची व्यवस्था करील आणि आवश्यकता असल्यास, संबंधित अभिलेख सादर करण्यासाठी त्याला फर्मावील :

परंतु, कोणत्याही बाबतीत, प्राधिकरणाने असा अभिलेख मागितलेला असेल तर असा अभिलेख शक्य तितक्या लवकर, उक्त संबंधित अधिकाऱ्याला परत करण्यात येईल ;

(२) प्राधिकरणाला, अर्जाची व मागितलेल्या अभिलेखांची तपासणी केल्यानंतर आणि अर्जदार किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी यांची सुनावणी घेतल्यानंतर, आदेशाद्वारे, एकतर अर्ज दाखल करून घेता येईल किंवा फेटाळता येईल :

परंतु, प्राधिकरण हे, अर्जामध्ये उपस्थित केलेला प्रश्न या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये अर्जदाराच्या प्रकरणातील कोणत्याही कार्यवाहीमध्ये अगोदरच प्रलंबित असेल किंवा निर्णय घेतलेला असेल तेथे, असा अर्ज दाखल करून घेणार नाही :

परंतु आणखी असे की, अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज, या पोट-कलमान्वये कोणताही अर्ज फेटाळण्यात येणार नाही :

परंतु तसेच, अर्ज फेटाळला असेल तेथे, असा अर्ज फेटाळण्याची कारणे आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील.

(३) पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या प्रत्येक आदेशाची प्रत अर्जदाराला व संबंधित अधिकाऱ्याला पाठविण्यात येईल.

(४) पोट-कलम (२) अन्वये अर्ज दाखल करून घेतला असेल तेथे, प्राधिकरण,

अर्जदाराकडून त्याच्यासमोर ठेवण्यात येईल अशा किंवा प्राधिकरणाने प्राप्त केलेल्या अशा आणखी साहित्याची तपासणी केल्यानंतर आणि अर्जदाराला किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीला तसेच संबंधित अधिकाऱ्याला किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, अर्जामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रश्नावर आपला आगाऊ अधिनिर्णय अधिघोषित करील ;

(५) ज्या प्रश्नावर आगाऊ अधिनिर्णयाची मागणी केली असेल अशा कोणत्याही प्रश्नाबाबत, प्राधिकरणाच्या सदस्यांमध्ये मतभिन्नता असेल तेथे, ते सदस्य, त्यांच्यामध्ये मतभेद असेल असा मुद्दा किंवा मुद्दे नमूद करून, सदर प्रश्नावर सुनावणी घेण्यासाठी व त्यावर निर्णय घेण्यासाठी, ते अपील प्राधिकरणाकडे निर्देश दाखल करतील.

(६) प्राधिकरण, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, आपला लेखी आगाऊ अधिनिर्णय अधिघोषित करील.

(७) प्राधिकरणाने अधिघोषित केलेल्या व सदस्यांनी यथोचितरीत्या स्वाक्षरित केलेल्या आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रमाणित केलेल्या आगाऊ अधिनिर्णयाची प्रत अशी अधिघोषणा केल्यानंतर अर्जदाराला, संबंधित अधिकाऱ्याला व अधिकारिता असलेल्या अधिकाऱ्याला पाठविण्यात येईल.

आगाऊ अधिनिर्णय देण्यासाठी अपील प्राधिकरण घटित करणे.

**९९.** शासन अधिसूचनेद्वारे आगाऊ अधिनिर्णय प्राधिकरणाने, अधिघोषित केलेल्या अधिनिर्णयाच्या विरोधातील अपिलांची सुनावणी करण्यासाठी, वस्तू व सेवा कर आगाऊ अधिनिर्णय अपील प्राधिकरण म्हणून ओळखले जाणारे प्राधिकरण घटित करील. ते,—

(एक) मंडळाने पदनिर्देशित केल्याप्रमाणे केंद्रीय कर मुख्य आयुक्त, आणि

(दोन) राज्य कर आयुक्त,

यांचे मिळून बनलेले असेल :

परंतु, शासनास, परिषदेच्या शिफारशींवरुन, राज्य अपील प्राधिकरण म्हणून कार्य करण्यासाठी दुसऱ्या राज्यात किंवा संघ राज्य क्षेत्रात स्थित असलेले कोणतेही अपील प्राधिकरणास अधिसूचित करता येईल.

अपील प्राधिकरणाकडे अपील करणे.

**१००.** (१) कलम ९८ च्या पोट-कलम (४) अन्वये अधिघोषित केलेल्या कोणत्याही आगाऊ अधिनिर्णयामुळे व्यथित झालेला संबंधित अधिकारी, अधिकारिता असलेला अधिकारी किंवा अर्जदार यांना, अपील प्राधिकरणाकडे अपील करता येईल.

(२) या कलमाखालील प्रत्येक अपील हे, ज्या अधिनिर्णयाविरुद्ध अपील करावयाचे आहे तो अधिनिर्णय संबंधित अधिकारी, अधिकारिता असलेला अधिकारी व अर्जदार यांना ज्या दिनांकास कळविण्यात आलेला असेल त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत दाखल करण्यात येईल :

परंतु, अपीलकर्त्याला, उक्त तीस दिवसांच्या कालावधीत अपील सादर न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत अपील प्राधिकरणाची खात्री पटली असेल तर, अपील प्राधिकाऱ्याला, तीस दिवसांपेक्षा अधिक नसेल अशा आणखी कालावधीत ते सादर करण्याची मुभा देता येईल.

(३) या कलमाखालील प्रत्येक अपील हे, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा फीसह असेल आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याची पडताळणी करण्यात येईल.

अपील प्राधिकरणाचे आदेश.

**१०१.** (१) अपील प्राधिकरणाला, अपिलातील किंवा निर्देश केलेल्या पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, त्यास योग्य वाटत असेल त्याप्रमाणे, ज्या विरुद्ध अपील केलेले असेल किंवा निर्देश केलेला असेल त्या अधिनिर्णयाशी अनुरूप असा किंवा त्यात फेरबदल करणारा असा आदेश देता येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला आदेश, कलम १०० अन्वये अपील दाखल केल्याच्या किंवा कलम ९८ च्या पोट-कलम (५) अन्वये निर्देश दाखल केल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीत देण्यात येईल.

(३) अपिलामध्ये किंवा निर्देशामध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही मुद्यावर किंवा मुद्यांवर अपील प्राधिकरणाच्या सदस्यांमध्ये मतभिन्नता असेल तेथे, अपिलामध्ये किंवा निर्देशात अंतर्भूत असलेल्या प्रश्नाच्या संबंधात, कोणताही आगाऊ अधिनिर्णय दिला जाऊ शकत नाही असे मानण्यात येईल.

(४) अपील प्राधिकरणाने अधिघोषित केलेल्या व सदस्यांनी यथोचितरीत्या स्वाक्षरीत केलेल्या आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रमाणित केलेल्या आगाऊ अधिनिर्णयाची एक प्रत, अशा अधिघोषणेनंतर, अर्जदाराला, संबंधित अधिकाऱ्याला व अधिकारिता असलेल्या अधिकाऱ्याला आणि प्राधिकरणालाााठविण्यात येईल.

आगाऊ अधिनिर्णयाची दुरुस्ती.

**१०२.** प्राधिकरणास किंवा अपील प्राधिकरणास, कलम ९८ किंवा कलम १०१ अन्वये, त्याने दिलेल्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, त्यातील अभिलेख्याच्या दर्शनी बाजूवर उघड-उघड दिसून येणारी कोणतीही चूक स्वतःहून त्याच्या निदर्शनास आली असेल किंवा ती, संबंधित अधिकाऱ्याने, अधिकारिता असलेल्या अधिकाऱ्याने किंवा अर्जदाराने किंवा अपिलकर्त्याने निदर्शनास आणून दिली असेल तर अशी कोणतीही चूक दुरूस्त होण्यासाठी अशा कोणत्याही आदेशाची सुधारणा करता येईल :

परंतु, जिच्या परिणामी करदायित्वामध्ये वाढ होईल किंवा अनुज्ञेय निविष्टी कर जमा रकमेत घट होईल अशी कोणतीही दुरुस्ती त्या अर्जदाराला, किंवा अपिलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आल्याशिवाय केली जाणार नाही.

आगाऊ अधिनिर्णयाची प्रयोज्यता.

**१०३.** (१) या प्रकरणाखाली प्राधिकरणाद्वारे किंवा अपील प्राधिकाऱ्याद्वारे करण्यात आलेल्या आगाऊ अधिनिर्णयाची अधिघोषणा केवळ,–

(क) आगाऊ अधिनिर्णयासाठी, कलम ९७ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत ज्याने प्राधिकरणाकडे मागणी केली होती त्या अर्जदारावर ;

(ख) अर्जदाराच्या संबंधात संबंधित अधिकाऱ्यावर किंवा अधिकारिता असलेल्या अधिकाऱ्यावर

बंधनकारक असेल ;

(२) मूळ आगाऊ अधिनिर्णयास आधारभूत ठरणारे कायदे, वस्तुस्थिती किंवा परिस्थिती यांमध्ये बदल होत नाही तोपर्यंत, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला आगाऊ अधिनिर्णय बंधनकारक असेल.

**१०४.** (१) जेथे, प्राधिकरण किंवा अपील प्राधिकाऱ्यास कलम ९८ च्या पोट-कलम (४) अन्वये किंवा कलम १०१ च्या पोट-कलम (१) अन्वये, अधिघोषित करण्यात आलेला आगाऊ अधिनिर्णय, अर्जदाराने किंवा अपीलकर्त्याने लबाडीने, प्रत्यक्ष वस्तुस्थिती दडपून किंवा वस्तुस्थितीचा विपर्यास करून, प्राप्त केला आहे, असे आढळले तर, प्राधिकरण किंवा अपील प्राधिकरण, असा अधिनिर्णय प्रारंभापासून निरर्थक असल्याचे आदेशाद्वारे घोषित करील आणि त्यानंतर या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या सर्व तरतुदी, जणू काही असा आगाऊ अधिनिर्णय देण्यातच आला नव्हता असे मानून, अर्जदाराला लागू होतील : विवक्षित परिस्थितीमध्ये आगाऊ अधिनिर्णय निरर्थक ठरणे.

परंतु, अर्जदाराला किंवा अपीलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय या पोट-कलमान्वये कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—कलम ७३ ची पोट-कलमे (२) व (१०) आणि कलम ७४ ची पोट-कलमे (२) व (१०) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीची गणना करताना, अशा आगाऊ अधिनिर्णयाच्या दिनांकाने सुरू होणारा व या पोट-कलमान्वये आदेशाच्या दिनांकाने समाप्त होणारा कालावधी, वगळण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाची प्रत अर्जदार, संबंधित अधिकारी व अधिकारिता असलेला अधिकारी यांना पाठविण्यात येईल.

**१०५.** (१) प्राधिकरण किंवा अपील प्राधिकरण यांना, प्राधिकरण आणि अपील प्राधिकरण यांचे अधिकार.

(क) शोध आणि निरीक्षण,

(ख) कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे,

(ग) आयोगपत्रे काढणे व लेखापुस्तक व अन्य अभिलेख सादर करण्यास भाग पाडणे,

१९०८ चा ५. यासंबंधी त्यांच्या अधिकारांचा वापर करण्याच्या प्रयोजनार्थ दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील.

१९७४ चा २. (२) प्राधिकरण किंवा अपील प्राधिकरण हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या प्रकरण सव्वीस च्या प्रयोजनांव्यतिरिक्त, कलम १९५ च्या प्रयोजनार्थ दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि प्राधिकरण किंवा अपील प्राधिकरणापुढील प्रत्येक कार्यवाही ही, कलम १८६० चा ४५. १९३ व २२८ च्या अर्थांतर्गत व भारतीय दंड संहितेच्या कलम १९६ च्या प्रयोजनार्थ न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

प्राधिकरण व अपील प्राधिकरण यांची कार्यपद्धती.

**१०६.** प्राधिकरण किंवा अपील प्राधिकरण यांना या प्रकरणाच्या तरतुदीच्या अधीन राहून, त्यांच्या स्वतःच्या कार्यपद्धतीचे नियमन करण्याचा अधिकार असेल.

प्रकरण अठरा

## अपिले आणि पुनरीक्षण

अपील प्राधिकाऱ्याकडे अपिले करणे.

**१०७** (१) या अधिनियमान्वये किंवा केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये एखाद्या अभिनिर्णय प्राधिकाऱ्याकडून पारित करण्यात आलेल्या कोणत्याही निर्णयामुळे किंवा आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, ज्या दिनांकास उक्त निर्णय किंवा आदेश अशा व्यक्तीला कळविण्यात आला असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, निहित करण्यात येईल अशा अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(२) आयुक्तास, स्वतःहून अथवा केंद्रीय कर आयुक्ताच्या विनंतीवरून, उक्त निर्णयाच्या किंवा आदेशाच्या वैधतेविषयी किंवा औचित्याविषयी स्वतःची खात्री पटविण्याच्या प्रयोजनासाठी, ज्या कार्यवाहीत अभिनिर्णय प्राधिकाऱ्याने या अधिनियमान्वये किंवा केंद्रीय वस्तू सेवा व कर अधिनियमान्वये कोणताही निर्णय किंवा आदेश आदेश पारित केला असेल त्या कार्यवाहीचा अभिलेख मागविता येईल आणि त्याची तपासणी करता येईल आणि आयुक्तास, आदेशाद्वारे तो आपल्या आदेशात विनिर्दिष्ट करील असे, उक्त निर्णयामुळे अथवा आदेशामुळे उद्‌भवलेले मुद्दे निर्णित करण्यासाठी, उक्त निर्णय अथवा आदेश पारित केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत त्याला दुय्यम असलेल्या एखाद्या अधिकाऱ्याला, अपील प्राधिकाऱ्याकडे अर्ज करण्याचे निदेश देता येतील.

(३) जेथे पोट-कलम (२) खाली देण्यात आलेल्या आदेशास अनुसरून, प्राधिकृत अधिकारी अपील प्राधिकाऱ्याकडे अर्ज करील त्या बाबतीत, अपील प्राधिकारी अशा अर्जावर जणू काही, असा अर्ज हा अभिनिर्णय प्राधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुद्ध अथवा आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले होते आणि असा प्राधिकृत अधिकारी अपीलकर्ता होता, असे समजून कार्यवाही करील आणि अपिलाशी संबंधित असलेल्या या अधिनियमाच्या तरतुदी अशा अर्जास लागू होतील.

(४) अपील प्राधिकाऱ्यास जर उपरोक्त तीन महिन्यांच्या किंवा, यथास्थिति, सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत अपीलकर्त्याला पुरेशा कारणामुळे अपील दाखल करता आले नव्हते याबाबत त्याची खात्री पटली असेल तर, आणखी एक महिन्याच्या कालावधीत अपील सादर करण्याची मुभा देता येईल.

(५) या कलमाखालील प्रत्येक अपील, निहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल आणि निहित करण्यात येईल अशा रीतीने त्याचे सत्यापन करण्यात येईल.

(६) जर अपीलकर्त्याने,—

(क) त्याने कबूल केल्याप्रमाणे आक्षेपित आदेशानुसार उद्‌भवलेल्या कराच्या रकमेचा असा भाग, व्याज, दंड, शास्ती, फी यांचा पूर्णतः भरणा केला नसेल ; आणि

(ख) ज्याच्यासंबंधात अपील दाखल करण्यात आले असेल त्या उक्त आदेशातून उद्‌भवलेल्या उर्वरित विवादग्रस्त कराच्या रकमेच्या दहा टक्के इतक्या रकमेचा भरणा केला नसेल तर,

पोट-कलम (१) अन्वये कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही.

(७) अपीलकर्त्याने, पोट-कलम (६) अन्वये रकमेचा भरणा केला असेल त्याबाबतीत शिल्लक रकमेच्या वसुलीची कार्यवाही स्थगित केली आहे असे मानण्यात येईल.

(८) अपील प्राधिकारी अपीलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल.

(९) अपील प्राधिकाऱ्यास, अपिलाच्या सुनावणीच्या कोणत्याही टप्प्यावर, पुरेसे कारण दिसून आल्यास पक्षकारांना किंवा त्यापैकी कोणालाही मुदत देता येईल आणि कारणे लेखी नमूद करून अपिलाची सुनावणी तहकूब करता येईल :

परंतु, अपिलाच्या सुनावणी दरम्यान कोणत्याही पक्षकाराला तीन पेक्षा अधिक वेळा अशी तहकूबी देण्यात येणार नाही.

(१०) अपील प्राधिकाऱ्यास, अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, जर अपिलाच्या कारणांमधून कोणतेही कारण वगळण्याची कृती ही हेतुपुरस्सर केली नव्हती किंवा ती गैरवाजवी नव्हती याबाबत त्याची खात्री पटल्यास, त्या अपिलाच्या कारणांमध्ये विनिर्दिष्ट न केलेले असे कोणतेही कारण समाविष्ट करण्याची कोणत्याही अपीलकर्त्याला मुभा देता येईल.

(११) अपील प्राधिकारी, आवश्यक असेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, ज्याच्याविरूद्ध अपील केले असेल त्या निर्णयास किंवा आदेशास पुष्टी देणारा, त्यात फेरबदल करणारा किंवा तो रद्दबातल करणारा, त्यास न्यायोचित वाटेल असा आदेश देईल, मात्र ज्याने उक्त निर्णय किंवा आदेश दिला त्या अभिनिर्णय प्राधिकाऱ्याकडे ते प्रकरण परत पाठवणार नाही :

परंतु, सरकारजमा करण्याऐवजी कोणतीही फी किंवा शास्ती किंवा दंड वाढविणारा किंवा अधिक मूल्य असलेल्या वस्तू सरकारजमा करणारा किंवा परतावा किंवा निविष्टी कर जमा रक्कम कमी करणारा आदेश हा, अपीलकर्त्याला प्रस्तावित आदेशाविरूद्ध कारण दाखविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, पारित करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणताही कर भरण्यात आलेला नाही किंवा तो कमी भरण्यात आला आहे किंवा त्याचा चुकीने परतावा देण्यात आला आहे किंवा निविष्टी कर जमा रक्कम चुकीने प्राप्त करण्यात किंवा ती वापरण्यात आली आहे असे अपील

प्राधिकाऱ्याचे मत झाले असेल त्याबाबतीत अपीलकर्त्याला प्रस्तावित आदेशाविरुद्ध कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्याखेरीज, असा कर किंवा निविष्टी कर जमा रक्कम भरण्यास फर्माविणारा आदेश पारित करण्यात येणार नाही आणि असा आदेश कलम ७३ किंवा कलम ७४ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत पारित करण्यात येईल.

(१२) अपील निकालात काढण्याचा अपील प्राधिकाऱ्याचा आदेश लेखी असेल आणि त्यात निर्णीत करण्यासाठीचे मुद्दे, त्यावरील निर्णय आणि अशा निर्णयाबाबतची कारणे नमूद केलेली असतील.

(१३) अपील प्राधिकारी, जेथे शक्य असेल तेथे, ज्या दिनांकास अपील दाखल करण्यात आले असेल त्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत अशा प्रत्येक अपिलाची सुनावणी करील आणि त्यावर निर्णय देईल :

परंतु, एखाद्या न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या आदेशावरून आदेश काढण्यास स्थगिती दिली असेल त्याबाबतीत, एक वर्षाचा कालावधी मोजताना त्यातून अशा स्थगितीचा कालावधी, वगळण्यात येईल.

(१४) अपील निकालात काढल्यावर, अपील प्राधिकारी, त्याने पारित केलेला आदेश अपीलकर्त्याला, उत्तरवादीला आणि अभिनिर्णय प्राधिकाऱ्याला कळवील.

(१५) अपील प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाची एक प्रत आयुक्ताला किंवा याबाबत त्याने पदनिर्देशित केलेल्या प्राधिकाऱ्याला आणि अधिकारिता असलेल्या केंद्रीय कर आयुक्ताला किंवा याबाबत त्याने पदनिर्देशित केलेल्या प्राधिकाऱ्याला देण्यात येईल.

(१६) या कलमान्वये पारित केलेला प्रत्येक आदेश, कलम १०८ किंवा कलम ११३ किंवा कलम ११७ किंवा कलम ११८ यांच्या तरतुदींना अधीन राहून, अंतिम असेल आणि तो पक्षकारांवर बंधनकारक असेल.

पुनरीक्षण प्राधिकाऱ्याचे अधिकार.

**१०८.** (१) कलम १२१ च्या आणि त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, पुनरीक्षण प्राधिकाऱ्यास, स्वतःहून किंवा त्याला प्राप्त झालेल्या माहितीवरून किंवा केंद्रीय कर आयुक्ताच्या विनंतीवरून, कोणत्याही कार्यवाहीचे अभिलेख मागवता येतील आणि त्याची तपासणी करता येईल, आणि त्याला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याद्वारे या अधिनियमान्वये किंवा केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये पारित केलेला कोणताही निर्णय किंवा आदेश, जेथवर तो महसुली हितास बाधक असेल तेथवर, चुकीचा आणि बेकायदेशीर किंवा अनुचित असल्याचे, किंवा त्यात विवक्षित महत्त्वाची वस्तुस्थिती मग ती उक्त आदेश काढण्याच्या वेळी उपलब्ध असोत किंवा नसोत, किंवा ती भारताच्या नियंत्रक व महा लेखापरीक्षकाच्या निरीक्षणाच्या परिणामस्वरुप असोत—विचारात घेतली नसल्याचे त्याला वाटत असेल तर त्यास, आवश्यकता भासल्यास, अशा निर्णयाच्या किंवा आदेशाच्या प्रवर्तनाला, त्याला योग्य

वाटेल अशा कालावधीसाठी स्थगिती देता येईल, आणि संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, उक्त निर्णयात किंवा आदेशात वाढ करणारा किंवा त्यात फेरबदल करणारा किंवा तो रद्दबातल करणारा, त्याला न्यायोचित वाटेल असा आदेश पारित करता येईल.

(२) पुनरीक्षण प्राधिकारी, जर—

(क) तो आदेश, कलम १०७ किंवा कलम ११२ अथवा कलम ११७ किंवा कलम ११८ खालील अपिलाच्या अधीन असेल ; किंवा

(ख) कलम १०७ च्या पोट-कलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेला कालावधी अद्याप समाप्त झाला नसेल अथवा ज्यात पुनरीक्षण करावयाचे आहे तो निर्णय किंवा आदेश पारित केल्यानंतर तीन वर्षांपेक्षा अधिक काळ लोटलेला असेल ; किंवा

(ग) तो आदेश आधीच्या कोणत्याही टप्प्यावर या कलमान्वये पुनरीक्षणासाठी अगोदरच घेण्यात आला असेल ;

(घ) तो आदेश पोट-कलम (१) अन्वये अधिकारांचा वापर करून पारित करण्यात आला असेल,

तर पोट-कलम (१) खालील कोणत्याही अधिकारांचा वापर करणार नाही :

परंतु, पुनरीक्षण प्राधिकाऱ्यास, पोट-कलम (२) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या एखाद्या अपीलावरील आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी किंवा त्या पोट-कलमाच्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेला तीन वर्षांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी, यापैकी जो नंतरचा असेल त्या कालावधीपूर्वी, अशा अपिलात, जो मुद्दा उपस्तित करण्यात आला नसेल आणि त्यावर निर्णय देण्यात आला नसेल अशा कोणत्याही मुद्यावर पोट-कलम (१) अन्वये आदेश देता येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये पुनरीक्षणामध्ये देण्यात आलेला प्रत्येक आदेश, कलम ११३ किंवा कलम ११७ किंवा कलम ११८ च्या तरतुदींच्या अधीन राहून अंतिम असेल आणि तो पक्षकारांवर बंधनकारक असेल.

(४) उक्त निर्णय किंवा आदेश, यांमध्ये अंतर्भूत असलेल्या ज्या मुद्यावर अपील न्यायाधिकरणाने किंवा उच्च न्यायालयाने एखाद्या दुसऱ्या कार्यवाहीमध्ये आपला निर्णय दिलेला असेल आणि अपील न्यायाधिकरणाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या अशा निर्णयाविरुद्धचे अपील उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असेल, असा कोणताही मुद्दा उक्त निर्णयात किंवा आदेशात अंतर्भूत असेल तर, अपील न्यायाधिकरणाच्या निर्णयाचा दिनांक आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दिनांक किंवा,

यथास्थिति, उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दिनांक आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दिनांक यादरम्यान व्यतीत झालेला कालावधी, जेथे या कलमान्वये नोटीस देऊन त्याद्वारे पुनरीक्षणाची कार्यवाही सुरू करण्यात आली असेल तेथे पोट-कलम (२) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीची गणना करताना, वगळण्यात येईल.

(५) पोट-कलम (१) खालील आदेश काढण्यास एखाद्या न्यायालयाच्या किंवा अपील न्यायाधिकरणाच्या आदेशाद्वारे स्थगिती देण्यात आली असेल अशा स्थगितीचा कालावधी, पोट-कलम (२) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीची गणना करताना, वगळण्यात येईल.

(६) या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) 'अभिलेख' या संज्ञेमध्ये पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने तपासणी करतेवेळी, या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीसंबंधी उपलब्ध असलेल्या सर्व अभिलेखाचा समावेश होतो ;

(दोन) 'निर्णय' या संज्ञेमध्ये, पुनरीक्षण प्राधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जा असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून देण्यात आलेल्या सूचनेचा समावेश होतो.

अपील न्यायाधिकरण आणि त्याची न्यायपीठे.

**१०९.** (१) या प्रकरणाच्या तरतुदींच्या अधीन राहून, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमान्वये घटित केलेले वस्तू व सेवा कर न्यायाधिकरण हे, या अधिनियमान्वये अपील प्राधिकाऱ्याने किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशावरील अपीलांची सुनावणी करणारे अपील न्यायाधिकरण असेल.

(२) राज्यात स्थित असलेल्या राज्य न्यायपीठाची आणि क्षेत्रीय न्यायपीठांची रचना आणि अधिकारिता केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम १०९ च्या तरतुदीनुसार किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांनुसार करण्यात येईल.

अपील न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाची आणि सदस्यांची अर्हता, नेमणूक, त्यांच्या सेवेच्या शर्ती, इत्यादी.

**११०.** राज्य न्यायपीठ आणि क्षेत्रीय न्यायपीठांचे अध्यक्ष आणि सदस्य यांची अर्हता, नेमणूक, वेतन व भत्ते, पदावधी, राजीनामा, पदावरून दूर करणे, हे केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ११० च्या तरतुदीनुसार करण्यात यईल.

अपील न्यायाधिकरणापुढील कार्यपद्धती.

**१११.** (१) अपील न्यायाधिकरणास, त्यासमोरील कोणतेही कामकाज किंवा त्यांच्यासमोरील कोणतेही अपील, निकालात काढताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ यांमध्ये नमूद केलेली कार्यपद्धती अनुसरणे बंधनकारक असणार नाही. मात्र, तो, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करील आणि या अधिनियमाच्या इतर तरतुदींना आणि त्याखाली केलेल्या नियमांना अधीन राहून, अपील न्यायाधिकरणास आपली स्वतःची कार्यपद्धती विनियमित करण्याचा अधिकार असेल ; (१९०८ चा ५.)

१९०८ चा ५. (२) अपील न्यायाधिकरणास, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाकडे दाव्याची न्यायचौकशी करताना, जे अधिकार निहित असतात तसेच अधिकार पुढील बाबतीत असतील,—

(क) कोणत्याही व्यक्तीवर समन्स बजावणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) दस्तऐवजांचा शोध घेण्यास व ते सादर करण्यास भाग पाडणे ;

(ग) शपथपत्रावर पुरावे स्वीकारणे ;

१८७२ चा १. (घ) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ याच्या कलम १२३ आणि १२४ मधील तरतुदींस अधीन राहून, कोणत्याही कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा दस्तऐवज किंवा अशा अभिलेखाची अथवा दस्तऐवजाची प्रत मागविणे ;

(ङ) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे ;

(च) अनुपस्थितीबद्दलचे अभिवेदन फेटाळणे किंवा त्यावर एकतर्फी निर्णय देणे ;

(छ) अनुपस्थितीबद्दलचे कोणतेही अभिवेदन फेटाळणारा कोणताही आदेश किंवा त्याने एकतर्फी दिलेला कोणताही आदेश रद्द करणे ; आणि

(ज) निहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) अपील न्यायाधिकरणाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाची, जणूकाही तो एखाद्या न्यायालयाने त्याच्यासमोर प्रलंबित असलेल्या एखाद्या दाव्यामध्ये दिलेला एक हुकूमनामाच होता, असे समजून तशाच रीतीने अंमलबजावणी करता येईल, आणि असा आदेश, ज्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादेच्या आत,—

(क) जर तो आदेश एखाद्या कंपनीविरुद्ध असेल तर त्या, कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय स्थित असेल ; किंवा

(ख) जर तो आदेश, इतर कोणत्याही व्यक्तिविरुद्ध असेल तर, ती संबंधित व्यक्ती स्वेच्छेने वास्तव्य करीत असेल किंवा लाभाकरिता धंदा करीत असेल किंवा व्यक्तिशः काम करीत असेल.

त्या न्यायालयाकडे अंमलबजावणीकरिता पाठवणे विधिसंमत असेल.

१८६० चा ४५. १९७४ चा २. (४) अपील न्यायाधिकरणासमोरील सर्व कार्यवाही ही भारतीय दंड संहितेच्या कलमे १९३ आणि २२८ यांच्या अर्थांतर्गत आणि कलम १९६ च्या प्रयोजनार्थ न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि अपील न्यायाधिकरण हे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे कलम १९५ आणि प्रकरण सव्वीसच्या प्रयोजनार्थ दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

अपील न्यायाधिकरणाकडे अपील करणे.

**११२.** (१) या अधिनियमाच्या किंवा केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम १०७ किंवा कलम १०८ अन्वये दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा आदेशाविरुद्ध अपील न्यायाधिकरणाकडे अपील करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला ज्या आदेशाविरूद्ध अपील करावयाचे आहे असा आदेश तिला कळविल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत अपील करता येईल.

(२) अपील न्यायाधिकरणास, आपल्या स्वेच्छाधिकारात जेथे अशा आदेशात अंतर्भूत असलेल्या कराची किंवा निविष्टी कराची जमा रक्कम अथवा त्यात अंतर्भूत असलेल्या कराच्या किंवा निविष्टी कराच्या जमा रकमेच्या फरकाची रक्कम अथवा अशा आदेशाद्वारे निश्चित केलेल्या दंडाची, फीची किंवा शास्तीची रक्कम पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल तेथे, असे कोणतेही अपील दाखल करून घेण्यास नकार देता येईल.

(३) आयुक्तास, स्वतःहून अथवा केंद्रीय कर आयुक्ताच्या विनंतीवरून उक्त आदेशाच्या वैधतेविषयी किंवा त्याच्या औचित्याविषयी आपली स्वतःची खात्री पटविण्याच्या प्रयोजनार्थ, ज्या कार्यवाहीत अपील प्राधिकाऱ्याने किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने या अधिनियमाखाली किंवा केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाखाली कोणताही आदेश दिला असेल त्या कार्यवाहीचा अभिलेख मागविता येईल आणि त्याची तपासणी करता येईल आणि त्यास आदेशाद्वारे, तो आपल्या अशा आदेशात विनिर्दिष्ट करील असे, उक्त आदेशामुळे उद्‌भवलेले मुद्दे निर्णीत करण्यासाठी उक्त आदेश दिल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत अपील न्यायाधिकरणाकडे अर्ज करण्याचे निदेश त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला देता येतील.

(४) पोट-कलम (३) खाली देण्यात आलेल्या आदेशास अनुसरून, तो प्राधिकृत अधिकारी अपील न्यायाधिकरणाकडे अर्ज करील त्याबाबतीत, अपील न्यायधिकरण अशा अर्जावर जणूकाही असे अपील हे, कलम १०७ च्या पोट-कलम (११) खालील किंवा कलम १०८ च्या पोट-कलम (१) खालील आदेशाविरुद्ध केलेले अपील होते असे समजून कार्यवाही करील आणि या अधिनियमाच्या तरतुदी ह्या पोट-कलम (१) अन्वये दाखल केलेल्या अपीलांसंबंधात जशा लागू होतात तशाच त्या, अशा अर्जाला लागू होतील.

(५) या कलमान्वये अपील दाखल करण्यात आल्याची सूचना प्राप्त झाल्यानंतर, ज्याच्याविरुद्ध अपील दाखल करण्यात आले आहे अशा पक्षकारास जरी त्याने अशा आदेशाविरुद्ध किंवा त्याच्या भागाविरुद्ध अपील दाखल केलेले नसले तरीही, नोटीस प्राप्त झाल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, ज्याच्याविरुद्ध अपील केले असेल त्या आदेशाच्या कोणत्याही भागाविरुद्ध निहित रीतीने सत्यापन केलेला उलट-आक्षेप अर्ज दाखल करता येईल आणि अपील न्यायाधिकरण असा अर्ज, जणूकाही तो पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत दाखल केलेले अपील होते असे समजून निकालात काढील.

(६) जर त्या निर्दिष्ट मुदतीच्या आत ते अपील किंवा उलट-आक्षेप अर्ज सादर न करण्यास पुरेसे कारण होते, याबाबत अपील न्यायाधिकरणाची खात्री पटवून दिल्यास, त्या अपील न्यायाधिकरणास, पोट-कलम (१) मधील निर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर तीन महिन्यांत अपील दाखल करून घेता येईल किंवा पोट-कलम (५) मधील निर्दिष्ट कालावधीच्या समाप्तीनंतर पंचेचाळीस दिवसांच्या आत, उलट-आक्षेप अर्ज दाखल करण्याची परवानगी देता येईल.

(७) अपील न्यायाधिकरणाकडे करण्यात येणारे प्रत्येक अपील निहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा रीतीने सत्यापित केलेले असेल आणि विहित करण्यात येईल अशा फी सोबत सादर केलेले असेल.

(८) अपीलकर्त्याने,—

(क) त्या आक्षेपित आदेशातून उद्‌भवणाऱ्या रकमेच्या भागापैकी, त्याने मान्य केली असेल अशी कराची, व्याजाची, दंडाची, फीची आणि शास्तीची संपूर्ण रक्कम भरली नाही तर ; आणि

(ख) ज्याच्या संबंधात अपील दाखल करण्यात आले असेल त्या उक्त आदेशातून उद्‌भवणारी, कलम १०७ च्या पोट-कलम (६) अन्वये भरलेल्या रकमेव्यतिरिक्त विवादास्पद कराच्या उर्वरित रकमेच्या वीस टक्के एवढी रक्कम भरली नाही तर,

पोट-कलम (१) अन्वये कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही.

(९) अपीलकर्त्याने पोट-कलम (८) प्रमाणे रक्कम भरली असेल त्याबाबतीत, शिल्लक रकमेच्या वसुलीच्या कार्यवाहीस ते अपील निकालात काढण्यात येईपर्यंत, स्थगिती दिली असल्याचे मानण्यात येईल.

(१०) अपील न्यायाधिकरणासमोर,—

(क) अपील अर्जातील चूक दुरुस्त करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी ; किंवा

(ख) एखाद्या अपिलाची किंवा अर्जाची पुनःस्थापना करण्यासाठी,

दाखल करण्यात येणारा प्रत्येक अर्ज, विहित करण्यात येईल अशा फीसोबत सादर करण्यात येईल.

**११३.** (१) अपील न्यायाधिकरणास, अपिलातील पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, ज्यावर अपील केले असेल त्या निर्णयास किंवा आदेशास पुष्टी देणारा, त्यात फेरबदल करणारा किंवा तो रद्द करणारा, त्यास योग्य

अपील न्यायाधिकरणाचे आदेश.

वाटेल असा आदेश देता येईल, अथवा नव्याने अभिनिर्णय किंवा निर्णय करण्यासाठी अतिरिक्त साक्षीपुरावा, कोणताही असल्यास, घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटतील अशा निदेशांसह ते प्रकरण अपील प्राधिकाऱ्याकडे किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्याकडे किंवा मूळ अधिकारिता असलेल्या प्राधिकाऱ्याकडे परत पाठविता येईल.

(२) अपील न्यायाधिकरणास, एखादया अपिलाच्या सुनावणीच्या कोणत्याही टप्प्यावर, पुरेसे कारण दर्शविल्यास, त्यातील पक्षकारांना किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही पक्षकाराला मुदत देता येईल किंवा कारणे लेखी नमूद करून त्या अपीलाची सुनावणी तहकूब करता येईल :

परंतु, त्या अपिलाच्या सुनावणी दरम्यानच्या कालावधीत कोणत्याही पक्षकारास तीनपेक्षा अधिक वेळा मुदत दिली जाणार नाही.

(३) अपील न्यायाधिकरणास, पोट-कलम (१) अन्वये त्याने दिलेल्या आदेशाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत, त्यातील अभिलेखात उघडपणे दिसून येणारी कोणतीही चूक स्वतःहून त्याच्या निदर्शनास आली असेल किंवा ती, आयुक्ताने किंवा केंद्रीय कर आयुक्ताने किंवा अपिलातील इतर कोणत्याही पक्षकाराने निदर्शनास आणून दिली असेल तर, अशी कोणतीही चूक दुरुस्त करण्यासाठी अशा कोणत्याही आदेशात सुधारणा करता येईल :

परंतु, जिच्या परिणामी, परताव्याच्या किंवा निविष्टी कराच्या जमा रकमेच्या निर्धारणात वाढ होईल किंवा घट होईल किंवा अन्यथा दुसऱ्या पक्षकाराच्या दायित्वात वाढ होईल अशी कोणतीही सुधारणा, त्या त्या पक्षकाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आल्याशिवाय, केली जाणार नाही.

(४) अपील न्यायाधिकरण, शक्यतोवर, प्रत्येक अपिलाची, ते ज्या दिनांकास दाखल केले असेल त्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीच्या आत, सुनावणी करील आणि त्यावर निर्णय देईल.

(५) अपील न्यायाधिकरण, या कलमाखाली दिलेल्या प्रत्येक आदेशाची एकेक प्रत, अपील प्राधिकारी किंवा पुनरीक्षण प्राधिकरण, किंवा, यथास्थिति, मूळ अभिनिर्णय प्राधिकारी, अपीलकर्ता आणि आयुक्त किंवा अधिकारिता असलेला केंद्रीय कर आयुक्त यांना पाठवील.

(६) कलम ११७ किंवा कलम ११८ मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, एखादया अपिलावर अपील न्यायाधिकरणाने दिलेला आदेश हा, अंतिम असेल आणि तो, यातील पक्षकारांवर बंधनकारक असेल.

**११४.** राज्य अध्यक्ष, राज्यातील अपील न्यायाधिकरणाच्या राज्य न्यायपीठासाठी आणि क्षेत्रिय न्यायपीठांसाठी निहित करण्यात येतील अशा, वित्तीय आणि प्रशासकीय अधिकारांचा वापर करील : राज्य अध्यक्षाचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार.

परंतु, राज्य अध्यक्षास, त्याला योग्य वाटतील असे त्याचे कोणतेही वित्तीय व प्रशासकीय अधिकार राज्य न्यायपीठाच्या किंवा क्षेत्रीय न्यायपीठाच्या इतर कोणत्याही सदस्याकडे किंवा कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपविण्याचा प्राधिकार असेल. मात्र, असा सदस्य किंवा अधिकारी, अशा सोपविलेल्या अधिकारांचा वापर करताना, राज्य अध्यक्षाचे निदेश, नियंत्रण आणि पर्यवेक्षण याखाली काम करील, अशी त्याकरिता अट राहील.

**११५.** कलम १०७ च्या पोट-कलम (६) अन्वये किंवा कलम ११२ च्या पोट-कलम (८) अन्वये अपीलकर्त्याने भरलेली कोणतीही रक्कम, अपील प्राधिकाऱ्याच्या किंवा अपील न्यायाधिकरणाच्या कोणत्याही आदेशाच्या परिणामी, परत करणे आवश्यक असेल त्याबाबतीत, त्या रकमेचा भरणा केल्याच्या दिनांकापासून तिचा परतावा करण्याच्या दिनांकापर्यंत, अशा परताव्याच्या रकमेसंबंधात, कलम ५६ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या दराने व्याज देय असेल. अपील दाखल करण्यासाठी भरलेल्या रकमेच्या परताव्याच्या रकमेवरील व्याज.

**११६.** (१) या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यासमोर किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात अपील प्राधिकाऱ्यासमोर किंवा अपील न्यायाधिकरणासमोर हजर राहण्यास हक्कदार असलेल्या किंवा हजर होण्यास फर्माविलेल्या कोणत्याही व्यक्तीस, या कलमाच्या इतर तरतुदींच्या अधीन राहून, शपथेवर तपासणी करण्यासाठी किंवा दृढकथन करण्यासाठी व्यक्तिशः हजर राहण्यास या अधिनियमान्वये फर्माविण्यात आले असेल त्यांव्यतिरिक्त, इतर बाबतीत प्रतिनिधीमार्फत हजर राहता येईल. प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत हजर राहणे.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, "प्राधिकृत प्रतिनिधी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीने, आपल्या वतीने हजर राहण्यासाठी,—

(क) तिची नातेवाईक किंवा नियमित कर्मचारी या नात्याने ; किंवा

(ख) जी व्यक्ती भारतातील कोणत्याही न्यायालयात वकिली व्यवसाय करण्यास हक्कदार असेल आणि जिला भारतातील कोणत्याही न्यायालयासमोर वकिली व्यवसाय करण्यापासून मनाई करण्यात आलेली नसेल अशी अधिवक्ता या नात्याने ; किंवा

(ग) जिने व्यवसाय प्रमाणपत्र धारण केले असेल आणि जिला व्यवसाय करण्यापासून मनाई करण्यात आलेली नसेल अशी कोणतीही सनदी लेखापाल, परिव्यय लेखापाल किंवा कंपनी सचिव या नात्याने ; किंवा

(घ) जिने आपल्या शासकीय सेवेच्या कालावधीत गट-ब राजपत्रित अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाच्या पदावर दोन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी काम केले होते अशी, कोणत्याही राज्य शासनाच्या किंवा संघ राज्यक्षेत्राच्या किंवा मंडळाच्या वाणिज्य कर विभागाचा सेवानिवृत्त अधिकारी या नात्याने :

परंतु, अशी अधिकारी असलेली व्यक्ती तिच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून किंवा राजीनाम्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीपर्यंत या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत अशाप्रकारे हजर राहण्यास हक्कदार असणार नाही ; किंवा

(ङ) जिला संबंधित नोंदणीकृत व्यक्तीच्या वतीने वस्तू व सेवा कर व्यवसायी म्हणून काम करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती या नात्याने, प्राधिकृत केलेली एखादी व्यक्ती,

असा असेल.

(३) ज्या व्यक्तीला,—

(क) शासनाच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले असेल किंवा काढून टाकण्यात आले असेल ; किंवा

(ख) जिला हा अधिनियम, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम किंवा संघ राज्यक्षेत्र वस्तू व सेवा कर अधिनियम यांखालील, किंवा विद्यमान कायद्याखालील किंवा वस्तुंच्या विक्रीवर अथवा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्यावर कर बसविण्याशी संबंधित असलेल्या एखाद्या राज्य विधानमंडळाकडून संमत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीशी संबंधित असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराधी ठरविलेले असेल किंवा ;

(ग) जिला विनिर्दिष्ट प्राधिकाऱ्याने गैरवर्तणुकीबद्दल दोषी ठरविलेले असेल ;

(घ) जिला नादार म्हणून अभिनिर्णित करण्यात आले असेल,

अशा कोणत्याही व्यक्तीस, पोट-कलम (१) खालील कोणत्याही व्यक्तीचे प्रतिनिधित्व करण्यासाठी,—

(एक) जर ती खंड (क), (ख) आणि (ग) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तींपैकी असेल तर, कायमस्वरूपी अपात्र ठरविण्यात येईल, आणि

(दोन) जर ती खंड (घ) मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती असली तर, ती नादार असेपर्यंतच्या कालावधीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

(४) केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम किंवा इतर कोणत्याही राज्याचा वस्तू व सेवा कर अधिनियम किंवा संघ राज्यक्षेत्र वस्तू व सेवा कर अधिनियम याअन्वये अपात्र ठरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमान्वये अपात्र ठरविण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

**११७.** (१) अपील न्यायाधिकरणाच्या राज्य न्यायपीठाने किंवा क्षेत्रीय न्यायपीठांनी दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, उच्च न्यायालयात अपील दाखल करता येईल आणि उच्च न्यायालयास, जर त्या प्रकरणात विधिविषयक महत्त्वाचा प्रश्न अंतर्भूत असल्याबाबत त्याची खात्री पटली असेल तर, असे अपील दाखल करून घेता येईल.

उच्च न्यायालयाकडे अपील करणे.

(२) पोटकलम (१) खालील कोणतेही अपील , ज्या आदेशाविरुद्ध असे अपील करावयाचे असेल तो आदेश व्यथित झालेल्या व्यक्तीला ज्या दिनांकास मिळाला असेल त्या दिनांकापासून एकशे ऐंशी दिवसांच्या कालावधीच्या आत दाखल करण्यात येईल :

परंतु उच्च न्यायालयास, अशा कालावधीच्या आत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते, याबाबत त्याची खात्री पटल्यास, उक्त कालावधी संपल्यानंतरसुद्धा असे अपील दाखल करून घेता येईल.

(३) एखाद्या प्रकरणात विधिविषयक महत्त्वाचा प्रश्न अंतर्भूत असल्याची उच्च न्यायालयाची खात्री पटली असेल त्याबाबतीत, उच्च न्यायालय तो प्रश्न सूत्रबद्ध करील आणि अशाप्रकारे सूत्रबद्ध केलेल्या केवळ त्या प्रश्नावरच त्या अपिलाची सुनावणी करील, आणि उत्तरवादीस, त्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, त्या प्रकरणात असा प्रश्न अंतर्भूत नाही, असा युक्तिवाद करण्याची परवानगी देण्यात येईल :

परंतु, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, त्या न्यायालयाने सूत्रबद्ध न केलेला इतर कोणताही विधिविषयक महत्त्वाचा प्रश्न त्या प्रकरणात अंतर्भूत असल्याची त्याची खात्री पटली असेल तर, अशा कोणत्याही प्रश्नावर त्या अपिलाची, कारणे नमूद करून, सुनावणी करण्याचा त्याचा अधिकार हिरावून घेतला असल्याचे किंवा त्या अधिकाराचा संकोच झाला असल्याचे मानले जाणार नाही.

(४) उच्च न्यायालय, अशा सूत्रबद्ध केलेल्या कायद्याच्या त्या प्रश्नावर निर्णय करील आणि असा निर्णय ज्यावर आधारित आहे अशी कारणे अंतर्भूत करून, त्यावर न्यायनिर्णय देईल आणि त्यास योग्य वाटेल असा खर्च देण्याचा निवाडा त्यास देता येईल.

(५) उच्च न्यायालयास, ज्या प्रश्नावर,—

(क) राज्य न्यायपीठाने किंवा क्षेत्रीय न्यायपीठांनी निर्णय देण्यात आलेला नसेल; किंवा

(ख) पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा विधिविषयक प्रश्नावरील निर्णयाच्या कारणाने, राज्य न्यायपीठाकडून किंवा क्षेत्रीय न्यायापीठांकडून चुकीने निर्णय देण्यात आलेला असेल,

अशा कोणत्याही प्रश्नावर निर्णय येईल.

(६) उच्च न्यायालयासमोर अपील करण्यात आले असेल त्याबाबतीत, त्यावर, उच्च न्यायालयाच्या दोन पेक्षा कमी नसतील इतक्या न्यायाधीशांच्या न्यायपीठाकडून सुनावणी करण्यात येईल, आणि त्यावर, अशा न्यायाधीशांच्या मतानुसार किंवा अशा न्यायाधीशांच्या बहुमतानुसार, कोणतेही असल्यास, निर्णय देण्यात येईल.

(७) असे बहुमत नसेल त्याबाबतीत, ते न्यायाधीश ज्या विधिविषयक मुद्याबाबत भिन्नमत असेल, तो विधिविषयक मुद्दा नमूद करतील आणि त्यानंतर, त्या प्रकरणात, उच्च न्यायालयाच्या दुसऱ्या एका किंवा त्यापेक्षा अधिक न्यायाधीशांकडून केवळ त्या मुद्यावरच सुनावणी करण्यात येईल आणि अशा मुद्यावर, ज्यांनी प्रथम सुनावणी केली असेल त्या न्यायाधीशांसह त्या प्रकरणावर ज्यांनी अशाप्रकारे सुनावणी केली असेल अशा न्यायाधीशांच्या बहुमतानुसार निर्णय करण्यात येईल.

(८) उच्च न्यायालयाने, या कलामान्वये त्याच्यासमोर दाखल करण्यात आलेल्या एखाद्या अपिलावर न्यायनिर्णय दिला असेल त्याबाबतीत, त्यातील कोणत्याही बाजूकडून, त्या न्यायनिर्णयाच्या प्रमाणित प्रतीच्या आधारे, असा न्यायनिर्णय अंमलात आणला जाईल.

(९) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज, उच्च न्यायालयाकडे करण्यात येणाऱ्या अपिलांच्या संबंधात दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या तरतुदी जेथवर लागू होतात तेथवर त्या, या कलमाखालील अपिलांच्या बाबतीतदेखील लागू असतील. १९०८ चा ५.

सर्वोच्च न्यायालयात अपील करणे.

**११८.** (१) (क) अपील न्यायाधिकरणाच्या राष्ट्रीय न्यायपीठाने किंवा प्रादेशिक न्यायपीठांनी दिलेल्या कोणत्याही आदेशावर; किंवा

(ख) ज्या प्रकरणात कलम ११७ खाली केलेल्या अपिलात उच्च न्यायालयाने न्यायनिर्णय किंवा आदेश दिला असेल अशा कोणत्याही प्रकरणात, न्यायनिर्णय किंवा आदेश दिल्याच्या लगतनंतर उच्च न्यायालयाने स्वतःहून किंवा व्यथित झालेल्या पक्षकाराने किंवा त्याच्यावतीने केलेल्या अर्जावरून, ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी योग्य असल्याचे प्रमाणित केल्यावर, सर्वोच्च न्यायालयास उच्च न्यायालयाच्या अशा कोणत्याही न्यायनिर्णयावर किंवा आदेशावर,

सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करता येईल.

१९०८ चा ५. (२) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या तरतुदी, सर्वोच्च न्यायालयात केल्या जाणाऱ्या अपिलांच्या संबंधात जेथवर लागू होतात तेथवर, त्या जशा उच्च न्यायालयाच्या हुकूमनाम्यावरील अपिलांच्या बाबतीत लागू होतात तशाच त्या, या कलमाखालील अपिलांच्या बाबतीत देखील लागू असतील.

(३) उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयात अपिलामुळे बदल केला असेल किंवा तो न्यायनिर्णय फिरविण्यात आला असेल त्याबाबतीत, जर तो, उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय असेल तर कलम ११७ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने सर्वोच्च न्यायालयाचा आदेश अंमलात आणला जाईल.

अपील, इत्यादी दाखल केलेले असले तरी, चुकत्या करावयाच्या रकमा देय असणे.

**११९.** उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आलेले असले तरी, कलम ११३ च्या पोट-कलम (१) अन्वये अपील न्यायाधिकरणाच्या राष्ट्रीय न्यायपीठाने किंवा प्रादेशिक न्यायपीठांनी दिलेल्या आदेशाच्या किंवा कलम ११३ च्या पोट-कलम (१) अन्वये अपील न्यायाधिकरणाच्या राज्य न्यायपीठाने किंवा क्षेत्रीय न्यायपीठांनी दिलेल्या आदेशाच्या किंवा, यथास्थिति, कलम ११७ अन्वये उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या परिणामी, शासनाला देय असलेल्या रकमा ह्या, अशाप्रकारे दिलेल्या आदेशानुसार प्रदेय असतील.

विवक्षित प्रकरणात अपील दाखल न करणे.

**१२०.** (१) आयुक्तास, परिषदेच्या शिफारशींवरून, या प्रकरणाच्या तरतुदींन्वये राज्य कर अधिकाऱ्याकडून अपील किंवा अर्ज दाखल करताना विनियमन करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास योग्य वाटेल अशी आर्थिक मर्यादा निश्चित करणारे आदेश, किंवा अनुदेश किंवा निदेश वेळोवेळी काढता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या आदेशांनुसार किंवा अनुदेशांनुसार किंवा निदेशांनुसार, राज्य कर अधिकाऱ्याने या अधिनियमाच्या तरतुदींन्वये दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध अपील किंवा अर्ज दाखल केला नसेल त्याबाबतीत, अशा राज्य कर अधिकाऱ्यास, तेच किंवा तसेच वादप्रश्न किंवा विधिविषयक प्रश्न अंतर्भूत असणाऱ्या इतर कोणत्याही प्रकरणात अपील किंवा अर्ज दाखल करण्यापासून प्रतिबंध होणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या आदेशांना किंवा अनुदेशाना किंवा निदेशांना अनुसरून राज्य कर अधिकाऱ्याने कोणतेही अपील किंवा अर्ज दाखल केलेला नसेल, अशी वस्तुस्थिती असली तरी, एखादे अपील किंवा अर्ज दाखल न केल्यामुळे विवादित प्रश्नावरील निर्णयास राज्य कर अधिकाऱ्यांने मूकसंमती दिली आहे असे, अपिलातील किंवा अर्जातील पक्षकार असलेली कोणतीही व्यक्ती म्हणणार नाही.

(४) अपील न्यायाधिकरण किंवा न्यायालय, अशा अपील किंवा अर्जाच्या सुनावणीच्या वेळी पोट-कलम (१) अन्वये दिलेला आदेश किंवा अनुदेश किंवा निदेशांनुसार राज्य कर अधिकाऱ्याकडून अपील किंवा अर्ज ज्या परिस्थितीत दाखल करण्यात आला नव्हता ती परिस्थिती विचारात घेईल.

अपील न करण्यायोग्य निर्णय आणि आदेश.

**१२१.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींशी काहीही विरुद्ध असले तरी राज्य कर अधिकाऱ्याने घेतलेल्या कोणत्याही निर्णयावर किंवा दिलेल्या आदेशाविरुद्ध जर असा घेतलेला निर्णय किंवा आदेश खालीलपैकी कोणत्याही एक किंवा अनेक बाबींशी संबंधित असेल, तर अपील करता येणार नाही :—

(क) एका अधिकाऱ्याकडून दुसऱ्या अधिकाऱ्याकडे कार्यवाही हस्तांतरित करण्यासाठी आयुक्ताने किंवा असे निदेश देण्याचे अधिकार प्रदान केलेल्या इतर अधिकाऱ्याने दिलेले आदेश ; किंवा

(ख) लेखापुस्तके, नोंदवही आणि इतर दस्तऐवज जप्त किंवा ताब्यात घेण्यासंबंधीचा आदेश ; किंवा

(ग) या अधिनियमान्वये खटला मंजूर करण्याचे आदेश ; किंवा

(घ) कलम ८० अन्वये दिलेला आदेश.

प्रकरण एकोणीस

## अपराध आणि शास्ती

विवक्षित अपराधांबद्दलची शास्ती.

**१२२.** (१) जी कोणतीही करपात्र व्यक्ती,-

(एक) कोणतेही बीजक न देता, कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करील किंवा अशा कोणत्याही पुरवठ्याच्या संबंधात चुकीचे किंवा खोटे बीजक देईल ;

(दोन) या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचा भंग करून, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा न करता, कोणतेही बीजक किंवा देयक देईल ;

(तीन) कर स्वरूपात कोणतीही रक्कम गोळा करील, परंतु ज्या दिनांकास अशा रकमेचा भरणा देय झाला असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीनंतर शासनाकडे भरण्यात कसूर करील ;

(चार) या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून, कोणताही कर गोळा करील, परंतु अशा कराचा भरणा ज्या दिनांकास देय झाला असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीनंतर शासनाकडे भरण्यात कसूर करील ;

(पाच) कलम ५१ च्या पोट-कलम (१) नुसार कराची वजात करण्यात कसूर करील, किंवा उक्त पोट-कलमानुसार वजात करणे आवश्यक असलेल्या रकमेपेक्षा कमी रकमेची वजात करील, किंवा कराच्या स्वरूपात गोळा केलेली रक्कम पोट-कलम (२) अन्वये शासनाकडे भरण्यात कसूर करील ;

(सहा) कलम ५२ च्या पोट-कलम (१) नुसार कर गोळा करण्यात कसूर करील किंवा उक्त पोट-कलमानुसार गोळा करणे आवश्यक असलेल्या रकमेपेक्षा कमी रक्कम गोळा करील किंवा कराच्या स्वरुपात गोळा केलेली रक्कम, कलम ५२ च्या पोट-कलम (३) नुसार शासनाकडे भरण्यात कसूर करील ;

(सात) या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन करून वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीही प्रत्यक्ष पूर्णतः किंवा अंशतः स्वरूपात प्राप्त न करता निविष्टी कराची जमा रक्कम घेईल किंवा तिचा वापर करील ;

(आठ) लबाडीने या अधिनियमाखालील कराचा परतावा प्राप्त करील ;

(नऊ) कलम २० चे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन करून, निविष्टी कराची जमा रक्कम घेईल किंवा ती वितरित करील ;

(दहा) या अधिनियमाखाली देय असलेल्या कराचा भरणा टाळण्याच्या हेतूने, बनावट वित्तीय अभिलेख तयार करील किंवा बदली वित्तीय अभिलेखांचा वापर करील किंवा खोटे लेखे किंवा कागदपत्रे सादर करील किंवा खोटी माहिती किंवा विवरण दाखल करील ;

(अकरा) या अधिनियमांन्वये नोंदणी करण्यास पात्र असेल, परंतु नोंदणी करण्यात कसूर करील ;

(बारा) नोंदणीसाठी अर्ज करताना किंवा त्यानंतर नोंदणीच्या तपशिलासंबंधीची कोणतीही खोटी माहिती सादर करील ;

(तेरा) कोणत्याही अधिकाऱ्यास या अधिनियमाखालील त्याची कर्तव्ये पार पाडण्यास अडथळा निर्माण करील किंवा त्याला अटकाव करील ;

(चौदा) याबाबत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कागदपत्रांची पूर्तता न करता कोणत्याही करपात्र वस्तूंची वाहतूक करील ;

(पंधरा) या अधिनियमाखालील कर चुकविण्याच्या हेतूने आपल्या उलाढालीची माहिती दडवून ठेवील ;

(सोळा) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार लेखा पुस्तके आणि इतर कागदपत्रे ठेवण्यात, त्यांचे परिरक्षण करण्यात, किंवा ते जतन करण्यात कसूर करील ;

(सतरा) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार अधिकाऱ्याने मागितलेली माहिती किंवा कागदपत्रे सादर करण्यात कसूर करील किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही कारवाई दरम्यान खोटी माहिती किंवा खोटी कागदपत्रे सादर करील ;

(अठरा) ज्या वस्तू या अधिनियमाखाली जप्त करण्यास पात्र असल्याचे तिला सकारण वाटेल अशा कोणत्याही वस्तूंचा पुरवठा, वाहतूक, किंवा साठा करील ;

(एकोणीस) दुसऱ्या नोंदणीकृत व्यक्तीचा नोंदणी क्रमांक वापरून कोणतेही बीजक किंवा दस्तऐवज देईल ;

(वीस) कोणत्याही महत्त्वाच्या पुराव्यात किंवा कागदपत्रांत फेरफार करील किंवा तो नष्ट करील ;

(एकवीस) या अधिनियमान्वये अडकवून ठेवलेल्या, ताब्यात घेतलेल्या, किंवा जप्त केलेल्या कोणत्याही वस्तूची विल्हेवाट लावील किंवा त्यात अनधिकृतपणे फेरफार करील,

अशी व्यक्ती, दहा हजार रुपये इतक्या किंवा चुकविलेल्या कराच्या रकमेइतक्या किंवा कलम ५१ अन्वये वजात न केलेल्या किंवा कमी प्रमाणात वजात केलेल्या किंवा वजात केलेल्या परंतु शासनाकडे न भरलेल्या कराच्या रकमेइतक्या किंवा कलम ५२ अन्वये गोळा न केलेल्या किंवा कमी गोळा केलेल्या किंवा गोळा केलेल्या परंतु शासनाकडे न भरलेल्या कराच्या किंवा नियमबाह्यपणे घेतलेल्या किंवा अग्रेषित केलेल्या किंवा वितरित केलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेच्या किंवा, यथास्थिति, लबाडीने मागणी केलेल्या परताव्याची रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल इतक्या रकमेएवढ्या शास्तीस पात्र असेल.

(२) कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती जी कोणतीही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करते आणि ज्यावर कोणत्याही कराचा भरणा करण्यात आला नसेल किंवा कमी भरणा करण्यात आला असेल किंवा चुकीच्या पद्धतीने परतावा प्रदान करण्यात आला असेल किंवा निविष्टी कराची जमा रक्कम चुकीच्या पद्धतीने घेतलेली किंवा वापरलेली असेल, तिने—

(क) लबाडीने किंवा कोणतेही हेतुपूरस्सर असत्य कथन करून किंवा वस्तुस्थिती दडपण्याच्या कारणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणाने कर चुकविल्यास, अशी व्यक्ती रुपये दहा हजार किंवा अशा व्यक्तीकडून देय असलेल्या कराच्या १०% रक्कम यापैकी जी अधिक असेल, तितक्या रकमेच्या शास्तीसाठी दायी असेल.

(ख) लबाडीने किंवा कोणतेही हेतुपूरस्सर असत्य कथन करून किंवा वस्तुस्थिती दडपण्याच्या कारणाने कर चुकविल्यास, अशी व्यक्ती रुपये दहा हजार किंवा अशा व्यक्तीकडून देय असलेल्या कराची रक्कम यापैकी जी अधिक असेल तितक्या रकमेच्या शास्तीसाठी दायी असेल.

(३) जी कोणतीही व्यक्ती,–

(क) उपरोक्त पोट-कलम (१) च्या खंड (एक) ते (एकवीस) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अपराधात सहाय्य करील किंवा त्यास अपप्रेरणा देईल ;

(ख) ज्या कोणत्याही वस्तू, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये सरकारजमा करण्यास पात्र आहेत हे तिला ज्ञात असेल किंवा तसे मानण्यास कारण असेल, अशा कोणत्याही वस्तूंचा ताबा मिळविल किंवा अशा कोणत्याही वस्तूंची वाहतूक करणे, त्या हलविणे, जमा करणे, बाळगणे, लपविणे, त्यांचा पुरवठा करणे, किंवा त्यांची खरेदी करणे यांत स्वतः कोणत्याही प्रकारे संबंधित असेल किंवा इतर कोणत्याही प्रकारे अशा वस्तूंचा व्यवहार करील ;

(ग) ज्या कोणत्याही सेवांच्या पुरवठ्यात या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे तिला माहित असेल किंवा तसे मानण्यास कारण असेल, अशा कोणत्याही सेवा घेईल किंवा अशा कोणत्याही सेवा देण्यात कोणत्याही प्रकारे ती संबंधित असेल, किंवा इतर कोणत्याही रीतीने अशा सेवा देण्याचा ती व्यवहार करील ;

(घ) चौकशी करताना पुरावा देण्याकरिता किंवा कागदपत्रे सादर करण्याकरिता उपस्थित राहण्यासाठी समन्स बजावण्यात आले असता राज्य कर अधिकाऱ्यापुढे उपस्थित राहण्यात कसूर करील ;

(ङ) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार बीजक देण्यास किंवा अशा बीजकाचा हिशेब त्याच्या लेखा पुस्तकात ठेवण्यास कसूर करील ;

ती व्यक्ती पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या शास्तीस दायी असेल.

**१२३.** कलम १५० अन्वये माहिती विवरण दाखल करणे ज्याला आवश्यक आहे अशा व्यक्तीने त्याच्या पोट-कलम (३) अन्वये काढलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत असे करण्यास कसूर केल्यास, अशी व्यक्ती, ज्या कालावधीमध्ये असे विवरण दाखल करण्यात कसूर करणे चालू ठेवील त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपयांची शास्ती चुकती करण्यास दायी असेल, असा निदेश समुचित अधिकाऱ्यास देता येईल : माहिती विवरण दाखल करण्यात कसूर केल्यास, शास्ती.

परंतु, या कलमान्वये लादण्यात आलेली शास्ती पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल.

आकडेवारी सादर करण्यात कसूर केल्याबद्दल दंड.

**१२४.** ज्याला कलम १५१ अन्वये कोणतीही माहिती किंवा विवरण दाखल करणे आवश्यक आहे, अशा व्यक्तीने,—

(क) वाजवी कारणाशिवाय, त्या कलमान्वये आवश्यक असेल अशी माहिती किंवा विवरण दाखल करण्यात कसूर केल्यास, किंवा

(ख) चुकीचे आहे असे माहित असून त्याने कोणतीही माहिती किंवा विवरण हेतुपुरस्सर दाखल केल्यास किंवा दाखल करण्याची व्यवस्था केल्यास,

तो, दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या आणि अपराध करणे चालू ठेवल्यास, पंचवीस हजार रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, अपराध करणे ज्या दिवसापासून चालू ठेवले त्या पहिल्या दिवसानंतर प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

सर्वसाधारण शास्ती.

**१२५.** या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, अशा उल्लंघनासाठी या अधिनियमात यासाठी कोणतीही स्वतंत्र तरतूद नसेल तर, पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या शास्तीस पात्र असेल.

शास्तीशी संबंधित सर्वसाधारण अनुशासन.

**१२६.** (१) या कलमान्वये कोणताही अधिकारी, कर विनियमानांच्या किंवा कार्यपद्धतीविषयक आवश्यकतांच्या किरकोळ भंग करण्यासाठी आणि विशेषतः लेखबद्ध करण्यातील, जी सहजपणे दुरुस्त करता येण्याजोगी आहे आणि कोणतीही लबाडी करण्याचा हेतू नसलेली किंवा अक्षम्य निष्काळजीपणामुळे न केलेल्या अशी कोणतीही वगळणूक किंवा चूक यांसाठी कोणतीही शास्ती लादणार नाही.

**स्पष्टीकरण :** या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) करामध्ये अंतर्भूत असलेली रक्कम पाच हजार रुपयांपेक्षा कमी असेल तर, सदर भंग हा, " किरकोळ भंग " असल्याचे मानण्यात येईल.

(ख) लेखबद्ध करण्यामधील वगळणूक किंवा चूक, जर अभिलेखावरील उघड दोष ठरत असेल तर, अशी वगळणूक किंवा चूक दुरुस्त करण्यायोग्य असल्याचे मानण्यात येईल.

(२) लादलेली शास्ती, प्रत्येक प्रकरणाची तथ्ये व परिस्थिती यांवर अवलंबून असेल आणि ती भंगाचे प्रमाण व तीव्रता याच्याशी अनुरूप असेल.

(३) कोणत्याही व्यक्तीवर, त्या व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज, कोणतीही शास्ती लादली जाणार नाही.

(४) ज्यावेळी, कायद्यांचा, विनियमनांचा किंवा कार्यपद्धतीविषयक आवश्यकतांचा, भंग केल्यामुळे शास्ती लादण्यात येते त्यावेळी कर प्राधिकारी, भंगाचे स्वरूप आणि ज्याखाली भंगासाठीची शास्तीची रक्कम विनिर्दिष्ट केलेली आहे, तो लागू असलेला कायदा, विनियमन किंवा कार्यपद्धती विनिर्दिष्ट करील.

(५) जेव्हा नियमांचा भंग झाल्याबाबत कर प्राधिकाऱ्याला आढळून येण्यापूर्वी एखाद्या व्यक्तीने, स्वेच्छेने कर कायदे, विनियम किंवा कार्यपद्धतीविषयक अटी यांच्या भंगाबाबतच्या परिस्थितीचे कर प्राधिकाऱ्याकडे प्रगटीकरण केले असेल तेव्हा, समुचित अधिकाऱ्यास, त्या व्यक्तीवरील शास्ती निश्चित करताना ती कमी करण्याचा संभाव्य घटक म्हणून ही वस्तुस्थिती विचारात घेता येईल.

(६) या कलमाच्या तरतुदी, जेथे या अधिनियमाअन्वये विहित केलेली शास्ती एकतर निश्चित केलेली रक्कम असेल किंवा निश्चित टक्केवारी म्हणून दर्शविण्यात आलेली असेल तेथे लागू होणार नाहीत.

**१२७.** समुचित प्राधिकाऱ्याचे, एखादी व्यक्ती शास्तीस दायी आहे आणि त्या शास्तीचा, कलम ६२ किंवा कलम ६३ किंवा कलम ६४ किंवा कलम ७३ किंवा कलम ७४ किंवा कलम १२९ किंवा कलम १३० खालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये समावेश केला नाही, असे मत असल्यास, अशा व्यक्तीला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर अशी शास्ती लादण्याबाबत त्याला आदेश देता येईल. विवक्षित प्रकरणांमध्ये शास्ती लादण्याचा अधिकार.

**१२८.** शासनास, अधिसूचनेद्वारे कलम १२२ किंवा कलम १२३, कलम १२५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शास्तीचा काही भाग किंवा संपूर्ण शास्ती किंवा कलम ४७ मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही विलंब शुल्क, यांचा परिषदेच्या शिफारशीवरून त्यामध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा वर्गातल्या करदात्यांसाठी आणि अशा शामक परिस्थितीनुसार अधित्याग करता येईल. शास्ती किंवा फी किंवा दोन्हींचा अधित्याग करण्याचा अधिकार.

**१२९.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाच्या तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन करून कोणत्याही वस्तूंची वाहतूक केल्यास किंवा मार्गस्थ असताना कोणत्याही वस्तूंची साठवणूक केल्यास अशा सर्व वस्तू आणि उक्त वस्तूंची वाहतूक करण्याचे साधन म्हणून वापरण्यात आलेले वाहन आणि अशा वस्तूशी आणि वाहनाशी संबंधित दस्तऐवज या अटकाव किंवा जप्त करण्यास पात्र असतील आणि अटकाव किंवा जप्त केल्यानंतर,—

(क) असा कर व शास्ती भरण्यासाठी पुढे येणाऱ्या वस्तूच्या मालकाने, लागू असलेल्या कराचा आणि देय असलेल्या कराच्या शंभर टक्के इतक्या समतूल्य शास्तीचा भरणा केल्यावर आणि करमाफ वस्तूंच्या प्रकरणी अशा वस्तूंच्या मूल्याचा दोन टक्के इतक्या समतूल्य रकमेचा किंवा रुपये पंचवीस हजार, यापैकी जी कमी असेल त्या रकमेचा भरणा केल्यावर ; मार्गस्थ वस्तू व वाहने अटकाव करणे, ती जप्त करणे व सोडून देणे.

(ख) असा कर किंवा शास्ती भरण्यास पुढे न येणाऱ्या मालकाने, वस्तूच्या असलेल्या कराचा आणि भरणा केलेल्या कराची रक्कम वजा करून मूल्याच्या पन्नास टक्के इतक्या समतूल्य रकमेचा भरणा केल्यावर आणि करमाफ वस्तूच्या प्रकरणी अशा वस्तूंच्या मूल्याच्या पाच टक्के किंवा रुपये पंचवीस हजार यांपैकी जी कमी असेल त्या रकमेचा भरणा केल्यावर ;

(ग) खंड (क) किंवा खंड (ख) अन्वये, विहित करण्यात येईल अशा स्वरूपात किंवा अशा रीतीने, देय रकमेच्या समतूल्य प्रतिभूती सादर केल्यावर ;

सोडून देण्यात येतील :

परंतु, वस्तूंची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीवर अटकाव केल्याचा किंवा जप्त केल्याचा आदेश बजावल्याखेरीज, अशा वस्तू किंवा वाहन यांस अटकाव करता येणार नाही किंवा त्या जप्त करता येणार नाहीत.

(२) कलम ६७ च्या पोट-कलम (६) च्या तरतुदी, जप्त वस्तू व वाहने यांस अटकाव आणि जप्त करण्यासाठी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

(३) वस्तू व वाहने यांस अटकाव करणारा किंवा ते जप्त करणारा समुचित प्राधिकारी देय असणारा कर व शास्ती विनिर्दिष्ट करणारी नोटीस देईल आणि त्यानंतर, खंड (क) किंवा खंड (ख) किंवा खंड (ग) अन्वये कर व शास्तीचा भरणा करण्याचा आदेश देईल.

(४) संबंधित व्यक्तीला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज पोट-कलम (३) अन्वये कोणताही कर, त्यावरील व्याज किंवा शास्ती याची रक्कम निश्चित करण्यात येणार नाही.

(५) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रकमेचा भरणा केल्यावर, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नोटीशीबाबतची संपूर्ण कार्यवाही समाप्त झाल्याचे मानण्यात येईल.

(६) कोणत्याही वस्तूची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीने किंवा वस्तूच्या मालकाने, अशा वस्तू किंवा वाहन यांस अटकाव किंवा त्या जप्त केल्याच्या सात दिवसांच्या आत पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे कराच्या व शास्तीच्या रकमेचा भरणा करण्यात कसूर केल्यास, कलम १३० नुसार पुढील कार्यवाही सुरू करण्यात येईल :

परंतु, जेव्हा अटकाव केलेल्या किंवा जप्त केलेल्या वस्तू या नाशवंत किंवा धोकादायक स्वरूपाच्या असतील किंवा वेळ गेल्यामुळे त्यांची किंमत कमी होण्याची शक्यता असेल तर, उक्त सात दिवासांचा कालावधी समुचित अधिकाऱ्यामार्फत कमी करण्यात येईल.

**१३०.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी जर एखादी व्यक्ती,— वस्तू किंवा वाहन सरकारजमा करणे आणि शास्ती लादणे.

(एक) कराचे प्रदान चुकविण्याच्या हेतूने या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करून, कोणत्याही वस्तूंचा पुरवठा करीत असेल किंवा प्राप्त करीत असेल; किंवा

(दोन) या अधिनियमान्वये ज्या कोणत्याही वस्तूंवर कर देण्यास तो दायी असेल त्या कोणत्याही वस्तूंचा हिशेब ठेवत नसेल ; किंवा

(तीन) नोंदणीसाठी अर्ज न करता, या अधिनियमान्वये करपात्र असलेल्या कोणत्याही वस्तूंचा पुरवठा करीत असेल ; किंवा

(चार) कराचे प्रदान चुकविण्याच्या हेतूने या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करीत असेल ; किंवा

(पाच) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करून, करपात्र वस्तू वाहून नेण्यासाठी वाहतुकीचे साधन म्हणून कोणत्याही वाहनाचा वापर करण्यात आला असेल आणि, अशा प्रकारे केलेला वाहनाचा वापर हा स्वतः वाहनाच्या मालकाला, त्याच्या एजन्टला, कोणताही असल्यास, आणि वाहनाचा ताबा ज्या व्यक्तीकडे असेल त्या व्यक्तीला ज्ञात नसताना किंवा त्याकडे काना डोळा न करता करण्यात आला होता, असे वाहन मालकाने सिद्ध केले नसेल तर,

अशा सर्व वस्तू किंवा वाहने सरकारजमा करण्यास पात्र असतील आणि ती व्यक्ती, कलम १२२ अन्वये शास्तीस दायी असेल.

(२) कोणतीही वस्तू अथवा वाहन सरकारजमा करण्याचा जेव्हा जेव्हा या अधिनियमान्वये प्राधिकार देण्यात येईल तेव्हा त्याबाबत वाहन मालकास किंवा वाहनाचा ताबा ज्या व्यक्तीकडे असेल त्या व्यक्तीस अशा वस्तू सरकारजमा करण्याऐवजी उक्त न्यायनिर्णय अधिकारी, त्यास योग्य वाटेल असा दंड भरण्याबाबत विकल्प देईल :

परंतु, असा दंड हा, सरकारजमा केलेल्या वस्तुच्या, त्यावर आकराणीयोग्य असलेला कर कमी करून आलेल्या बाजार मूल्याहून अधिक असणार नाही :

परंतु, आणखी असे की, असा दंड व लादण्यायोग्य शास्ती यांची एकूण रक्कम कलम १२९ च्या पोट-कलम (१) अन्वये लादण्यायोग्य असलेल्या शास्तीच्या रकमेपेक्षा कमी असणार नाही :

परंतु, तसेच, जेथे वस्तू वाहून नेण्यासाठी किंवा प्रवासी भाड्यासाठी कोणतेही असे वाहन वापरण्यात आले असेल तर, वाहन मालकाला, वाहन सरकारजमा करण्याऐवजी त्यातून वाहून नेण्यात येत असलेल्या वस्तुवर देय असलेल्या कराच्या रकमेइतका दंड भरण्याचा विकल्प देण्यात येईल.

(३) जेथे पोट-कलम (२) अन्वये वस्तू सरकारजमा करण्याऐवजी कोणताही दंड लादण्यात आला असेल तेथे, अशा वस्तूचा किंवा वाहनाचा मालक किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती, अशा वस्तूंच्या किंवा वाहनाच्या बाबतीत, उक्त दंडाव्यतिरिक्त देय असलेला कोणताही कर, शास्ती व आकार भरण्यास दायी असेल.

(४) त्या व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेण्याची तिला संधी दिल्याखेरीज, वस्तू किंवा वाहन सरकारजमा करण्याचा किंवा शास्ती लादण्याचा आदेश निर्गमित केला जाणार नाही.

(५) जेथे या अधिनियमान्वये कोणत्याही वस्तू किंवा वाहन सरकारजमा करण्यात आले असेल तेथे, अशा वस्तूंचा किंवा वाहनाचा मालकीहक्क त्यानंतर शासनाकडे निहित असेल.

(६) सरकारजमा करण्याचा न्यायनिर्णय देणारा समुचित अधिकारी, सरकारजमा केलेल्या गोष्टींचा ताबा घेईल व धारण करील आणि प्रत्येक पोलीस अधिकारी, अशा समुचित अधिकाऱ्यास त्याच्या विनंतीवरून, असा ताबा घेण्यासाठी व तो धारण करण्यासाठी त्यास सहाय्य करील.

(७) समुचित अधिकाऱ्यास, सरकारजमा केलेल्या वस्तू किंवा वाहन या अधिनियमाखालील इतर कोणत्याही कार्यवाहीमध्ये आवश्यक नाही अशी त्याची स्वतःची खात्री पटल्यानंतर आणि अशा वस्तू किंवा वाहन सरकारजमा करण्याऐवजी दंडाची रक्कम भरण्यासाठी तीन महिन्यांहून अधिक नसेल इतकी वाजवी मुदत दिल्यानंतर, अशा वस्तू किंवा वाहनाची विल्हेवाट लावता येईल आणि त्याच्या विक्रीतून आलेल्या उत्पन्नाची रक्कम सरकाराकडे जमा करता येईल.

सरकारजमा करणे किंवा शास्ती लादणे हे अन्य शिक्षांच्या आड न येणे.

**१३१.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींना बाध येऊ न देता या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये सरकारजमा झाल्याने किंवा लादलेल्या शास्तीने, या अधिनियमाच्या तरतुदीखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही अन्य कायद्याखाली जी व्यक्ती अन्य कोणतीही शिक्षा लादण्यासाठी पात्र ठरणार असेल त्यास यामुळे प्रतिबंध होणार नाही. १९७४ चा २.

विवक्षित अपराधांसाठी शिक्षा.

**१३२.** (१) जी कोणतीही व्यक्ती पुढीलपैकी कोणतेही अपराध करील,—

(क) हेतुपुरस्सर कर चुकविण्यासाठी, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग करून कोणतेही बीजक न देता कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करील ;

(ख) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग करून वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा न करता कोणतेही बीजक किंवा देयक देईल, ज्यातून निविष्टी कराच्या जमा रकमेचा दोषपूर्ण रीतीने लाभ घेतला जाईल किंवा वापर केला जाईल किंवा कराचा परतावा घेतला जाईल ;

(ग) खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बीजकाचा किंवा देयकांचा वापर करून निविष्टी कराच्या जमा रकमेचा लाभ घेईल ;

(घ) कर म्हणून एखादी रक्कम गोळा करील परंतु ज्या दिनांकास ती देय असेल त्या दिनांकापासून  तीन महिन्यांच्या कालावधीनंतर शासनाच्या खात्यात ते भरण्यात कसूर करील ;

(ङ) खंड (क) ते (घ) खाली समाविष्ट नसलेले अपराध करून कर चुकवील, लबाडीने निविष्टी कराच्या जमा रकमेचा लाभ घेईल किंवा लबाडीने परतावा मिळवील ;

(च) या अधिनियमाखाली देय असणाऱ्या कराचा भरणा टाळण्याच्या हेतूने बनावट वित्तीय अभिलेख तयार करील किंवा बदली वित्तीय अभिलेखांचा वापर करील किंवा खोटे लेखे किंवा कागदपत्रे सादर करील किंवा खोटी माहिती किंवा विवरण दाखल करील ;

(छ) कोणत्याही अधिकाऱ्यास या अधिनियमाखालील त्याची कर्तव्ये पार पाडण्यास अडथळा निर्माण करील किंवा त्याला अटकाव करील ;

(ज) ज्या कोणत्याही वस्तू या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये, सरकारजमा करण्यास पात्र आहेत हे तिला ज्ञात असेल किंवा असे तिला मानण्यास कारण असेल, अशा कोणत्याही वस्तुंचा ताबा मिळवील किंवा अशा कोणत्याही वस्तूंची वाहतूक करणे, त्या हलवणे, जमा करणे, बाळगणे, लपविणे, त्यांचा पुरवठा करणे किंवा त्यांची खरेदी करणे यात स्वतः कोणत्याही प्रकारे संबंधित असेल किंवा इतर कोणत्याही प्रकारे अशा वस्तुंचा व्यवहार करील ;

(झ) अशा कोणत्याही सेवांच्या पुरवठ्यात या अधिनियमांच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे तिला माहित असेल किंवा तसे मानण्यास कारण असेल अशा कोणत्याही सेवा किंवा अशा कोणत्याही सेवा देण्यात कोणत्याही प्रकारे ती संबंधित असेल किंवा इतर कोणत्याही रीतीने असा सेवा देण्याचा ती व्यवहार करील ;

(ञ) कोणत्याही महत्त्वाच्या पुराव्यात किंवा दस्ताऐवजीत फेरफार करील किंवा तो नष्ट करील ;

(ट) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये जी कोणतीही माहिती देणे आवश्यक असेल अशी कोणतीही माहिती देण्यात कसूर करील किंवा (त्याने दिलेली माहिती ही खरीखुरी माहिती आहे असे शाबीत करण्याचा भार त्याच्यावर आहे, हे माहीत असताना वाजवी कारणाशिवाय) खोटी माहिती सादर करील; किंवा

(ठ) या कलमाच्या खंड (क) ते (ट) मध्ये नमूद केलेला कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करील किंवा तशी कृती करण्यास अपप्रेरणा देईल,

तर, ती व्यक्ती पुढील शिक्षेस पात्र असेल ;

(एक) चुकविण्यात आलेल्या कराची रक्कम किंवा दोषपूर्ण रीतीने घेतलेली किंवा वापरलेली निविष्टी कराची जमा रक्कम किंवा दोषपूर्ण रीतीने घेतलेली परताव्याची रक्कम, रुपये पाचशे लाखांहून अधिक असेल अशा प्रकरणांत तिला, पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा ;

(दोन) चुकविण्यात आलेल्या कराची रक्कम किंवा दोषपूर्ण रीतीने घेतलेली किंवा वापरलेली निविष्टी कराची जमा रक्कम किंवा दोषपूर्ण रीताने घेतलेली परताव्याची रक्कम, दोनशे लाखांहून अधिक परंतु पाचशे लाखांहून अधिक नसेल अशा प्रकरणांत, तीन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा ;

(तीन) चुकविण्यात आलेल्या कराची रक्कम किंवा दोषपूर्ण रीताने घेतलेली किंवा वापरलेली निविष्टी कराची जमा रक्कम किंवा दोषपूर्ण रीताने घेतलेली परताव्याची रक्कम शंभर लाख रुपयांपेक्षा अधिक असेल परंतु दोनशे लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा प्रकरणांत, एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा ;

(चार) जर ती खंड (च) किंवा खंड (छ) किंवा खंड (ञ) मध्ये नमूद केलेला कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करील किंवा तशी कृती करण्यास अपप्रेरणा देईल, तर, ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) या कलमाखालील अपराध केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, जर या कलमाखालील अपराधाबद्दल पुन्हा सिद्धापराधी ठरवले असेल तर, ती अशा दुसऱ्या व नंतरच्या प्रत्येक अपराधाबद्दल, पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाच्या व द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(३) पोट-कलम (१) चे खंड (एक), (दोन) आणि (तीन) आणि पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेला कारावास, न्यायालयाच्या न्यायनिर्णयात नमूद करावयाच्या त्याविरुद्धच्या विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीचा असेल.

(४) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, पोट-कलम (५) मध्ये निर्देशिलेल्या अपराधाखेरीज या अधिनियमाखालील सर्व अपराध अदखलपात्र व जामिनपात्र असतील. १९७४ चा २.

(५) पोट-कलम १ च्या खंड (क) किंवा (ख) किंवा खंड (ग), किंवा खंड (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेले आणि त्या पोट-कलमाच्या खंड (एक) खालील शिक्षापात्र असलेले अपराध दखलपात्र व अजामिनपात्र असतील.

(६) आयुक्तांच्या पूर्व मंजुरीशिवाय या कलमाखालील कोणत्याही अपराधासंबंधी एखाद्या व्यक्तीवर खटला भरला जाणार नाही.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ, कर या संज्ञेत, हा अधिनियम, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम यांच्या तरतुदींन्वये चुकविण्यात आलेल्या कराची रक्कम किंवा दोषपूर्ण रीताने घेतलेली किंवा वापरलेली निविष्टी कराची जमा रक्कम किंवा दोषपूर्ण रीताने घेतलेला परतावा आणि वस्तू व सेवा कर (राज्यांना नुकसानभरपाई देणे) अधिनियमांन्वये आकारलेला उपकर याचा अंतर्भाव असेल.

अधिकारी व विवक्षित इतर व्यक्तींचे दायित्व.

**१३३.** (१) कलम १५१ अन्वये आकडेवारी गोळा करण्याविषयक त्याचे संकलन किंवा संगणकीकरण या कामाशी संबंधित असेल अशी कोणतीही व्यक्ती किंवा कलम १५० च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली माहिती ज्यास पाहता येईल तो कोणताही राज्य कर अधिकारी किंवा सामाईक पोर्टलच्या सेवेच्या तरतुदींसंबंधातील कामाशी संबंधीत असलेली कोणतीही व्यक्ती किंवा सामाईक पोर्टलचा एजंट, या अधिनियमाच्या उक्त कलमाखालील त्याची कर्तव्ये पार पाडताना किंवा या अधिनियमाखाली किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमाखालील अपराधाचा खटला दाखल करण्याच्या प्रयोजनार्थ, हेतुपुरस्सर, या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेल्या नियमाखाली, सादर केलेली कोणतीही माहिती किंवा कोणत्याही विवरणाचा आशय उघड करीत असेल तर, तो, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीवर,-

(क) जर ती शासकीय कर्मचारी असेल तर, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय, या कलमाखालील कोणत्याही अपराधाकरिता खटला भरण्यात येणार नाही ;

(ख) जर ती शासकीय कर्मचारी नसेल तर, आयुक्ताच्या पूर्वमान्यतेशिवाय, या कलमाखालील कोणत्याही अपराधाकरिता खटला भरण्यात येणार नाही.

अपराधांची दखल घेणे.

**१३४.** कोणतेही न्यायालय, आयुक्ताच्या पूर्वमंजुरीखेरीज या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाखाली कोणत्याही शिक्षापात्र असलेल्या अपराधाची दखल घेणार नाही आणि प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्यास दुय्यम असणारे कोणतेही न्यायालय अशा कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करणार नाही.

सदोष मानसिक स्थितीचे गृहितक.

**१३५.** या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधासाठीच्या खटल्यात आरोपीची मानसिक स्थिती सदोष असणे आवश्यक असेल, अशा या कलमाखालील अपराधासंबंधातील कोणत्याही कार्यवाहीत, न्यायालय अशी सदोष मानसिक स्थिती असल्याचे गृहित धरेल ; परंतु त्या कार्यवाहीमध्ये अपराधाचा आरोप केलेल्या कृतीच्या बाबतीत, आपली अशी मानसिक स्थिती नव्हती, ही वस्तुस्थिती सिद्ध करणे, हा आरोपीसाठी बचाव असू शकेल.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) " सदोष मानसिक स्थिती " यामध्ये उद्देश, हेतू किंवा वस्तुस्थितीचे ज्ञान किंवा त्याबाबतीत तिला विश्वास किंवा वस्तुस्थिती मानण्यास कारण, याचा अंतर्भाव होतो ;

(दोन) एखादी वस्तुस्थिती अस्तित्वात आहे याबाबत जेव्हा न्यायालयाची निःसंशय खात्री पटेल तेव्हाच फक्त ती वस्तुस्थिती सिद्ध झाल्याचे म्हटले जाते ; केवळ संभवनीयतेच्या प्राबल्याने तिचे अस्तित्व प्रस्थापित केल्याने ते अस्तित्व सिद्ध होत नाही.

विवक्षित परिस्थितींमधील तथ्यांची संबद्धता.

**१३६.** या अधिनियमाखाली कोणत्याही चौकशीत किंवा कार्यवाही करताना, कलम ७० अन्वये जारी केलेल्या कोणत्याही समन्सचे उत्तर म्हणून कोणत्याही व्यक्तीने, स्वाक्षरी केलेले निवेदन हे, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाच्या कोणत्याही खटल्यामधील पुढील बाबी अंतर्भूत असलेल्या तथ्यांची सत्यासत्यता शाबीत करण्याच्या प्रयोजनासाठी संबद्ध असेल ; जेव्हा त्यात,—

(क) असे निवेदन केलेल्या व्यक्तीचे निधन झाले आहे किंवा जीचा शोध लागू शकत नाही किंवा जी साक्ष देण्यास असमर्थ आहे किंवा जिला प्रतिपक्षाने चौकशीपासून दूर ठेवले आहे किंवा जिला समक्ष हजर करण्यास लागणारा विलंब व खर्च करणे त्या प्रकरणाच्या परिस्थितीत न्यायालयाला गैरवाजवी वाटते ; किंवा

(ख) असे निवेदन केलेल्या व्यक्तीची न्यायालयासमोर खटल्यातील साक्षीदार म्हणून तपासणी केलेली आहे आणि खटल्यातील परिस्थिती लक्षात घेता निवेदन, न्यायदानाचा पुरावा म्हणून दाखल करून घेण्यात यावा असे न्यायालयाचे मत आहे.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**१३७.** (१) या अधिनियमाखाली अपराध केलेली व्यक्ती कंपनी असेल तर, असा अपराध घडण्याच्या वेळी कंपनीचा धंदा चालविण्यासाठी कंपनीचा ताबा ज्या व्यक्तीकडे होता आणि कंपनी चालवण्यास जी व्यक्ती जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे कंपनी, त्या अपराधांबद्दल दोषी आहे, असे मानले जाईल आणि अशी व्यक्ती व कंपनी, त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास पात्र असतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि त्या कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूकसंमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे असा अपराध घडल्याचे सिद्ध करण्यात आले असेल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी देखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र असेल.

(३) या अधिनियमाखालील अपराध हा भागीदारी संस्थेने किंवा मर्यादित दायित्व असलेल्या भागीदारी संस्थेने किंवा एखाद्या अविभक्त हिंदू कुटुंबाने किंवा एखाद्या न्यासाने केला असेल तर, असा भागीदार किंवा कर्ता किंवा, यथास्थिति, विश्वस्त व्यवस्थापक त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र असेल आणि पोट-कलम (२) च्या तरतुदी अशा व्यक्तीस योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

(४) अशा व्यक्तीने असा अपराध आपल्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे ती या अधिनियमात तरतूद केलेल्या शिक्षेस पात्र होणार नाही :

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(१) " कंपनी " याचा अर्थ, निगम निकाय, असा आहे आणि त्यात भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या अन्य संघाचा समावेश होतो ; आणि

(२) भागीदारी संस्थेच्या संबंधात " संचालक " याचा अर्थ, भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे.

**१३८.** (१) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल एकतर खटला सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू झाल्यानंतर, अपराधांसंबंधात आरोपी असलेल्या व्यक्तीने विहित करण्यात येईल अशा रीतीने अशी आपसमेळाची रक्कम केंद्र सरकारला किंवा, यथास्थिति, राज्य शासनाला, प्रदान केल्यावर आयुक्तांकडून अपराध आपसात मिटविण्यात येईल : अपराध आपसात मिटवणे.

परंतु, या कलमात अंतर्भूत असणारी कोणतीही गोष्ट पुढील बाबतीत लागू होणार नाही :—

(क) कलम १३२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) ते (च) खाली विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अपराधाच्या बाबतीत ज्या व्यक्तीस अपराध आपसात मिटविण्यासाठी एकदा परवानगी देण्यात आली आहे आणि उक्त पोट-कलमाच्या खंड (क) ते (च) खाली विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाशी संबंधित असणारे खंड (ठ) खाली वर्णन केलेले अपराध ;

(ख) या अधिनियमान्वये किंवा एखाद्या राज्य वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या किंवा केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा संघ राज्यक्षेत्र वस्तू व सेवा कर किंवा एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या बाबतीत एक कोटी रुपयांपेक्षा अधिक मूल्याचा पुरवठा करण्यासंबंधातील, कोणताही अपराध खंड (क) मधील अपराधाखेरीज अन्य एकदा आपसात मिटविण्यासाठी ज्या व्यक्तीस परवानगी देण्यात आली आहे अशी व्यक्ती ;

(ग) या अधिनियमाखालील अपराध तसेच तोच अपराध त्या त्यावेळी अंमलात असणाऱ्या इतर कायद्यांखाली देखील केल्याचा आरोप ज्या व्यक्तीवर ठेवण्यात आला आहे अशी व्यक्ती ;

(घ) न्यायालयाकडून या अधिनियमाखालील अपराधाकरिता जिला सिद्धापराधी ठरविले आहे अशी कोणतीही व्यक्ती ;

(ङ) कलम १३२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (छ) किंवा खंड (ज) किंवा खंड (ट) मध्ये विनिर्दिष्ट केलेला अपराध केल्याचा आरोप ज्या व्यक्तीवर ठेवण्यात आला आहे अशी व्यक्ती ; आणि

(च) विहित करण्यात येईल अशा व्यक्तींचा किंवा अपराधांचा इतर कोणताही प्रवर्ग :

परंतु आणखी असे की, या कलमातील तरतुदींन्वये ज्यासाठी परवानगी दिलेली आहे असा कोणताही आपसमेळ यामुळे, इतर कोणत्याही कायद्यान्वये सुरू केलेल्या कार्यवाहीस कोणतीही असल्यास, बाधा पोहोचणार नाही :

परंतु तसेच, अशा अपराधात अंतर्भूत असणारा कर, व्याज व शास्ती यांचे प्रदान करण्यात आल्यानंतरच केवळ, आपसमेळ करण्यासाठी परवानगी देण्यात येईल.

(२) या कलमाखालील अपराधाची आपसमेळ रक्कम ही, दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल किंवा अंतर्भूत कराच्या पन्नास टक्के, यांपैकी जी अधिक असेल ती, या किमान रकमेच्या आणि तीस हजारांपेक्षा कमी नसेल किंवा कराच्या दीडशे टक्के, यापैकी जी अधिक असेल त्या कमाल रकमेस अधीन राहून, विहित करण्यात येईल, त्याप्रमाणे असेल.

(३) आयुक्ताने निश्चित केले असेल त्याप्रमाणे अशा आपसमेळ रकमेचे प्रदान करण्यात आल्यावर त्याच अपराधाच्या संबंधात, त्या आरोपी व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही आणि उक्त अपराधाच्या संबंधात यापूर्वी सुरू केलेली कार्यवाही, कोणतीही असल्यास, समाप्त होईल.

## प्रकरण वीस

## संक्रमणकालीन तरतुदी

विद्यमान करदात्यांचे स्थलांतर.

**१३९.** (१) नियत दिनांकाच्या रोजी व तेव्हापासून, कोणत्याही विद्यमान कायद्यान्वये नोंदणीकृत असलेल्या आणि वैध स्थायी लेखाक्रमांक असलेल्या अशा प्रत्येक व्यक्तीला, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन राहून आणि अशा नमुन्यात व अशा रीतीने तात्पुरत्या तत्त्वावर नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल आणि जर विहित करण्यात आलेल्या शर्तींचे पालन करण्यात आले नाही तर, त्याऐवजी पोट-कलम (२) खालील अंतिम नोंदणी प्रमाणपत्र मिळाले नाही तर, ते रद्द होण्यास पात्र असेल.

(२) अंतिम नोंदणी प्रमाणपत्र विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने आणि अशा शर्तींच्या अधीन राहून देण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये एखाद्या व्यक्तीला देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र, जर त्या व्यक्तीने कलम २२ किंवा कलम २४ अन्वये नोंदणी करण्यास ती पात्र नव्हती अशा आशयाच्या, दाखल केलेल्या अर्जाला अनुसरून रद्द करण्यात आले असेल तर, उक्त प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही, असे मानण्यात येईल.

**१४०.** (१) कलम १० अन्वये कर भरण्याचा विकल्प निवडलेल्या व्यक्तीव्यतिरिक्त अन्य नोंदणीकृत व्यक्ती, तिने विद्यमान कायद्यान्वये नियत दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवशी समाप्त होणाऱ्या कालावधीच्या संबंधात, विहित करण्यात येईल अशा रीतीने, दाखल केलेल्या विवरणामध्ये जी पुढे नेलेली आहे अशा मूल्यवर्धित कराची आणि प्रवेश कराची जमा रक्कम तिच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीमध्ये घेण्यास हक्कदार असेल : निविष्टी कराच्या जमा रकमेकरिता संक्रमणकालीन व्यवस्था.

परंतु, नोंदणीकृत व्यक्तीस पुढील परिस्थितीत जमा रक्कम घेण्यास मुभा देण्यात येणार नाही :—

(एक) उक्त जमेची रक्कम ही या अधिनियमान्वये निविष्टी कराची जमा रक्कम म्हणून अनुज्ञेय नसेल तर ; किंवा

(दोन) तिने नियत दिनांकाच्या लगतपूर्वीच्या सहा महिन्यांच्या कालावधीकरिता विद्यमान कायद्यान्वये आवश्यक असलेली सर्व विवरणे दाखल केलेली नसतील तर ; किंवा

(तीन) उक्त जमेची रक्कम ही, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ च्या नियम ७९ अन्वये वजावटीची मागणी करण्यास हक्कदार नसलेल्या युनिटांशी संबंधित असेल तर :

परंतु आणखी असे की, केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ याचे कलम ३, कलम ५ चे पोट-कलम (३), कलम ६, कलम **६क** किंवा कलम ८ चे पोट-कलम (८) यांच्या संबंधात केलेल्या केंद्रीय विक्रीकर (नोंदणी व उलाढाल) नियम, १९५७ यांच्या नियम १२ मध्ये विहित केलेल्या रीतीने व विहित कालावधीच्या आत जो साधार असल्याचे दाखवण्यात न आलेल्या कोणत्याही दाव्याबाबत, उक्त जमेची जेवढी रक्कम जमा करण्यायोग्य आहे तेवढी रक्कम इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीमध्ये जमा होण्यास पात्र असणार नाही :

१८७६ चा ७४.

परंतु तसेच, केंद्रीय विक्रीकर (नोंदणी व उलाढाल) नियम, १९५७ यांच्या नियम १२ मध्ये विहित केलेल्या रीतीने उक्त दावे साधार असल्याचे दाखवण्यात आले तर, दुसऱ्या परंतुकात विनिर्दिष्ट केलेल्या जमा रकमेच्या समतूल्य रक्कम विद्यमान कायद्यान्वये परत करण्यात येईल.

(२) कलम १० अन्वये कर भरण्याचा विकल्प निवडलेल्या व्यक्तीव्यतिरिक्त अन्य नोंदणीकृत व्यक्ती, तिने विद्यमान कायद्यान्वये, नियत दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवशी समाप्त होणाऱ्या कालावधीकरिता, विहित करण्यात येईल अशा रीतीने दाखल केलेल्या विवरणामध्ये जी पुढे नेलेली नाही अशा, भांडवली वस्तुंच्या बाबतीतील न घेतलेली निविष्टी कराची जमा रक्कम, तिच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीमध्ये घेण्यास हक्कदार असेल :

परंतु, नोंदणीकृत व्यक्तीस उक्त जमा ही विद्यमान कायद्यान्वये निविष्टी कराची जमा रक्कम म्हणून अनुज्ञेय नव्हती आणि या अधिनियमान्वये देखील निविष्ट कराची जमा रक्कम म्हणून अनुज्ञेय नसेल अशी ती जमा रक्कम म्हणून घेण्यास नोंदणीकृत व्यक्तीस मुभा असणार नाही.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनांसाठी, " न घेतलेली निविष्टी कराची जमा रक्कम " या शब्दप्रयोगाचा अर्थ, करपात्र व्यक्ती विद्यमान कायद्यान्वये भांडवली वस्तूंच्याबाबत जी रक्कम जमा होण्यास हक्कदार होती अशा निविष्टी कराच्या जमा रकमेच्या एकूण रकमेतून, उक्त व्यक्तीने विद्यमान कायद्यान्वये उक्त भांडवली वस्तूंच्या बाबतीत अगोदरच घेतलेली निविष्टी कराची जमा रक्कम वजा केल्यानंतर जी शिल्लक राहील ती रक्कम, असा आहे.

(३) विद्यमान कायद्यान्वये नोंदणी करण्यासाठी पात्र नसलेली किंवा करमाफी किंवा करमुक्त असलेल्या वस्तूंची-मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, वस्तूंची विक्री करत असलेली, अशी किंवा विद्यमान कायद्यानुसार राज्यात ज्याच्या प्रथम विक्रीवर कर भरावा लागत असेल व त्याची नंतरची विक्री यावर राज्याचा करआकारण्यात येत नसेल, मात्र या अधिनियमान्वये करपात्र नसलेल्या अशा वस्तूची विक्री करत असलेली अशी एखादी नोंदणीकृत व्यक्ती किंवा वस्तूच्या विक्रीच्या वेळी निविष्टी कराची रक्कम जमा होण्यास हक्कदार होती अशी व्यक्ती, कोणतीही असल्यास, पुढील शर्तींच्या अधीन राहून, नियत दिवशी त्याच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीत, साठ्यामध्ये असणाऱ्या निविष्टींच्या आणि साठ्यामध्ये असणाऱ्या अर्ध-तयार आणि तयार वस्तूमध्ये अंतर्भूत असलेल्या निविष्टींच्या संबंधातील, मूल्यवर्धित कराची आणि प्रवेश कराची रक्कम जमा होण्यास हक्कदार असेल, त्या शर्ती पुढीलप्रमाणे :—

(एक) या अधिनियमान्वये करपात्र पुरवठा करण्यासाठी, अशा निविष्टी किंवा वस्तूंचा वापर करीत आहे किंवा त्या वापरण्याचा उद्देश आहे ;

(दोन) उक्त नोंदणीकृत व्यक्ती, या अधिनियमान्वये अशा निविष्टींवर निविष्टी कराच्या जमा रकमेकरिता पात्र आहे ;

(तीन) उक्त नोंदणीकृत व्यक्तीकडे, अशा निविष्टीच्या संबंधात विद्यमान कायद्यान्वये कराचे प्रदान केल्याचे बीजक किंवा त्याच्या पुराव्यादाखलची इतर विहित कागदपत्रे आहेत ; आणि

(चार) अशी बीजके किंवा इतर विहित कागदपत्रे नियत दिनांकाच्या लगतपूर्वीच्या बारा महिन्यांच्या अगोदर देण्यात आलेली नाहीत :

परंतु, वस्तुनिर्माणक किंवा सेवांचा पुरवठादार यांव्यतिरिक्त जेव्हा एखाद्या नोंदणीकृत व्यक्तीकडे, निविष्टींच्या संबंधातील कराचे प्रदान केल्याच्या पुराव्यादाखलचे बीजक किंवा इतर कोणतीही कागदपत्रे नसतील तर, अशा नोंदणीकृत व्यक्तीस, उक्त करपात्र व्यक्ती, किंमती कमी करून त्याद्वारे अशा जमेचा लाभ प्राप्तकर्त्याला करून देईल, यासह विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या, मर्यादांच्या आणि मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून, विहित करण्यात येईल अशा दराने व अशा रीतीने, जमा रक्कम घेण्याची मुभा देण्यात येईल.

(४) एखादी नोंदणीकृत व्यक्ती विद्यमान कायद्यांन्वये करपात्र वस्तू तसेच करमाफी असलेल्या वस्तूंची किंवा करमुक्त वस्तूंची—मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, विक्री करत होती, परंतु त्या वस्तू या अधिनियमान्वये करपात्र असतील तर, ती तिच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीत,—

(क) पोट-कलम (१) च्या तरतुदीनुसार त्याने विद्यमान कायद्यान्वये दाखल केलेल्या विवरणात पुढे नेलेली मूल्यवर्धित कराची आणि प्रवेश कराची जमा रक्कम, कोणतीही असल्यास ; आणि

(ख) पोट-कलम (३) च्या तरतुदीनुसार, अशा करमाफी असलेल्या वस्तूंच्या किंवा करमुक्त वस्तूंच्या संबंधात,—मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, नियत दिनांकास, साठ्यात असलेल्या निविष्टींच्या संबंधातील किंवा साठ्यात असलेल्या अर्ध तयार किंवा तयार वस्तूमध्ये अंतर्भूत असलेल्या निविष्टींच्या संबंधातील, मूल्यवर्धित कराची आणि प्रवेश कराची जमा रक्कम, कोणतीही असल्यास, घेण्यास,वहक्कदार असेल.

(५) नोंदणीकृत व्यक्ती, नियत दिवशी किंवा त्यानंतर मिळालेल्या निविष्टींच्या संबंधातील परंतु नियत दिवसापासून तीस दिवसांच्या कालावधीत अशा व्यक्तींच्या लेखा पुस्तकांमध्ये बीजकाची किंवा कर भरणाऱ्या इतर कोणत्याही कागदपत्राची नोंद केली होती या शर्तीस अधीन राहून ज्या निविष्टींच्या संबंधातील कर पुरवठादाराकडून विद्यमान कायद्यान्वये प्रदान करण्यात आला आहे असा मूल्यवर्धित कर व प्रवेश कर हा, त्याच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीत जमा करून घेण्यास हक्कदार असेल :

परंतु, पुरेसे कारण दर्शविल्यानंतर, तीस दिवसांचा कालावधी हा, तीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या आणखी कालावधीकरिता, आयुक्ताकडून वाढवून देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, उक्त नोंदणीकृत व्यक्ती, या पोट-कलमाखाली घेण्यात येणाऱ्या जमा रकमेच्या बाबतीत, विहित करण्यात येईल अशा रीतीने, विवरणपत्र सादर करील.

(६) जी विद्यमान कायद्यान्वये एकतर निश्चित दराने कर भरत होती किंवा कराऐवजी निश्चित रक्कम भरत होती अशी नोंदणीकृत व्यक्ती, पुढे दिलेल्या शर्तींच्या अधीन राहून, नियत दिवशी साठ्यामध्ये असलेल्या निविष्टींच्या आणि साठ्यामध्ये असलेल्या अर्ध-तयार वस्तूंमध्ये किंवा तयार वस्तूंमध्ये अंतर्भूत असलेल्या निविष्टीच्या बाबतीत, तिच्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीमध्ये मूल्यवर्धित कराची जमा रक्कम घेण्यास हक्कदार असेल :—

(एक) अशा निविष्टी किंवा वस्तू, या अधिनियमान्वये करपात्र पुरवठा करण्यासाठी वापरल्या जात असाव्यात किंवा वापरण्याचा उद्देश असावा ;

(दोन) उक्त नोंदणीकृत व्यक्ती कलम १० अन्वये कर भरत नसावी ;

(तीन) उक्त नोंदणीकृत व्यक्ती या अधिनियमान्वये अशा निविष्टीबाबतची निविष्टी कराची जमा रक्कम घेण्यास पात्र असावी ;

(चार) उक्त नोंदणीकृत व्यक्तीकडे, निविष्टीच्या बाबतीत विद्यमान कायद्यान्वये कर भरल्याचा पुरावा असलेले बीजक किंवा इतर विहित दस्तऐवज असावेत ; आणि

(पाच) असे बीजक किंवा इतर विहित दस्तऐवज हे, नियत दिवसाच्या लगतपूर्वीच्या बारा महिन्यांच्या अगोदर नसेल अशा कालावधीत देण्यात आलेले असावेत.

(७) पोट-कलमे (३), (४) व (६) खालील जमेची रक्कम विहित करण्यात येईल अशा रीतीने परिगणित करण्यात येईल.

उक्ते कामाशी (जॉब वर्क) संबंधित संक्रमणकालीन तरतुदी.

**१४१.** (१) धंद्याच्या ठिकाणी प्राप्त झालेली कोणतीही निविष्टी ही, निविष्टी म्हणून पाठवण्यात आली होती किंवा अंशतः प्रक्रिया करण्यात आल्यानंतर उक्ते कामगाराकडे (जॉब वर्कर) पुढील प्रक्रियेसाठी, चाचणीसाठी, दुरुस्तीसाठी, पुनःनवीकरणासाठी (रिकंडीशनिंग) किंवा विद्यमान कायद्याच्या तरतुदींना अनुसरून अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी नियत दिवसाच्या अगोदर पाठवण्यात आली होती आणि अशी निविष्टी उक्त ठिकाणी नियत दिवशी किंवा त्यानंतर परत आलेली असेल अशा बाबतीत, जर अशी निविष्टी उक्ते काम पूर्ण झाल्यानंतर किंवा अन्यथा, नियत दिवसापासून सहा महिन्यांच्या आत उक्त ठिकाणी परत आली असेल तर, कोणताही कर देय असणार नाही :

परंतु, पुरेसे कारण दर्शविल्यानंतर सहा महिन्यांचा कालावधी हा, दोन महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या आणखी कालावधीकरीता आयुक्तांकडून वाढवून देता देईल :

परंतु आणखी असे की, असा निविष्टी नियत दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत किंवा नियत दिनांकापासून आणखी वाढवून दिलेल्या कालावधीत परत केलेल्या नसल्यास, कलम १४२ च्या पोट-कलम (८) च्या खंड (क) च्या तरतुदींनुसार, निविष्टी कराची जमा रक्कम वसूल करण्यासाठी पात्र असतील.

(२) नियत दिवसापूर्वी विद्यमान कायद्याच्या तरतुदीनुसार अर्ध-तयार वस्तू धंद्याच्या ठिकाणाहून इतर कोणत्याही जागी विवक्षित प्रक्रिया करण्यासाठी पाठविल्या असतील, [illegible] “ उक्त वस्तू ” असा करण्यात आला आहे) उक्त ठिकाणी नियत दिवशी किंवा नंतर परत आणल्या असतील तर, उक्त वस्तू निर्मितीप्रक्रियेतून गेल्यानंतर किंवा अन्यथा, नियत दिवसापासून सहा महिन्यांत उक्त ठिकाणी परत आणल्या गेल्या असतील तर कोणताही कर देय असणार नाही :

परंतु, पुरेसे कारण दर्शविल्यानंतर सहा महिन्यांचा कालावधी, हा दोन महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या आणखी कालावधीकरीता आयुक्तांकडून वाढवून देता येईल :

परंतु आणखी असे की, उक्त वस्तू या पोट-कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत परत केलेल्या नसल्यास, कलम १४२ च्या पोट-कलम (८) च्या खंड (क) च्या तरतुदींनुसार निविष्टी कराची जमा रक्कम वसूल करण्यासाठी पात्र असतील :

परंतु तसेच, विद्यमान कायद्याच्या तरतुदींनुसार वस्तुंची पोचवणी करणाऱ्या व्यक्तीस, कराचे प्रदान केल्यावर कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीच्या जागेत तेथून भारतात किंवा कराचे प्रदान न करता निर्यात करण्यासाठी, या पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत पुरवठा करण्याच्या प्रयोजनार्थ उक्त वस्तू स्थानांतरित करता येतील.

(३) जेव्हा कोणत्याही वस्तू, नियत दिनांकापूर्वी विद्यमान अधिनियमाच्या तरतुदींनुसार चाचण्या किंवा कोणतीही अन्य प्रक्रिया पार पाडण्याकरिता कराचे प्रदान केल्याखेरीज, धंद्याच्या एका ठिकाणामधून अन्य कोणत्याही ठिकाणी पाठविण्यात आल्या असतील– मग ते ठिकाण नोंदणीकृत केलेले असो किंवा नसो–आणि अशा वस्तू नियत दिनांकास किंवा त्यानंतर धंद्याच्या उक्त ठिकाणी परत करण्यात आल्या असतील आणि करण्यात येणाऱ्या चाचण्या किंवा अन्य कोणतीही प्रक्रिया केल्यानंतर जर उक्त वस्तू नियत दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत अशा ठिकाणी परत करण्यात आल्या असतील तर, कोणताही कर प्रदेय असणार नाही :

परंतु, पुरेसे कारण दर्शविल्यानंतर सहा महिन्यांचा कालावधी हा दोन महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या आणखी कालावधीसाठी आयुक्ताकडून वाढवून देता येईल :

परंतु आणखी असे की, जर उक्त वस्तू या पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत परत केलेल्या नसल्यास, कलम १४२ च्या पोट-कलम (८) च्या खंड (क) च्या तरतुदींनुसार निविष्टी कराची जमा रक्कम, वसूल करण्यासाठी पात्र असतील :

परंतु तसेच, विद्यमान कायद्याच्या तरतुदींनुसार वस्तुंची पोचवणी करणाऱ्या व्यक्तीस, कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीच्या जागेत तेथून कराचे प्रदान केल्यावर भारतात

किंवा कराचे प्रदान न करता निर्यात करण्यासाठी, या पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत पुरवठा करण्याच्या प्रयोजनार्थ उक्त वस्तू स्थानांतरित करता येतील.

(४) जर वस्तूंची पोचवणी करणारी व्यक्ती आणि उक्त कामगार यांनी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने आणि अशा कालावधीत, नियत दिवशी उक्त व्यक्तीच्या वतीने उक्ते कामगाराने साठ्यात ठेवलेल्या निविष्टी व वस्तू यांचा तपशील घोषित केला असेल तरच केवळ पोट-कलमे (१), (२) व (३) अन्वये कर प्रदेय असणार नाही.

संकीर्ण संक्रमणकालीन तरतुदी.

**१४२.** (१) जेव्हा अशा कोणत्याही वस्तुंवर नियत दिवसापूर्वी सहा महिन्याच्या अगोदर नसेल इतक्या कालावधीत त्याच्या विक्रीच्या वेळी विद्यमान कायद्यान्वये कोणताही कर प्रदान करण्यात आला असेल, त्या वस्तू, नियत दिवशी किंवा त्यानंतर धंद्याच्या कोणत्याही ठिकाणी परत करण्यात आल्या असतील तर, नोंदणीकृत व्यक्ती, जेव्हा अशा वस्तू नोंदणीकृत व्यक्तीखेरीज इतर व्यक्तींनी नियत दिवसापासून सहा महिन्यांच्या कालावधींच्या आत धंद्याच्या उक्त ठिकाणी परत केल्या असतील आणि अशा वस्तू समुचित अधिकाऱ्याची खात्री होईल अशा प्रकारे ओळख पटण्यायोग्य असतील, तर विद्यमान कायद्यान्वये प्रदान केलेल्या कराच्या परताव्यासाठी पात्र असेल :

परंतु, जर अशा वस्तू नोंदणीकृत व्यक्तीने परत केल्या असतील तर, अशा वस्तू परत करणे हे त्या वस्तूंचा पुरवठा असल्याचे मानण्यात येईल.

(२) (क) जेव्हा, नियत दिवसा पूर्वी केलेल्या संविदेनुसार, नियत दिवशी किंवा त्यानंतर कोणत्याही वस्तुंच्या किंमती त्यात सुधारणा केल्याने वाढल्या असतील तर, ज्या नोंदणीकृत व्यक्तीने अशा वस्तू विकल्या असतील ती व्यक्ती अशी सुधारणा करण्यात आल्यानंतरच्या तीस दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल असा तपशील अंतर्भूत असेलेले पूरक बीजक किंवा नावेपत्र प्राप्तकर्त्याला देईल आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ असे पूरक बीजक किंवा नावेपत्र हे, या अधिनियमान्वये केलेल्या जावक पुरवठ्याच्या संबंधात दिले असल्याचे मानण्यात येईल.

(ख) जेव्हा नियत दिवसापूर्वी केलेल्या संविदेनुसार, नियत दिवशी किंवा त्यानंतर कोणत्याही वस्तूंच्या किंमती त्यात सुधारणा केल्याने कमी झाल्या असतील, तर ज्या नोंदणीकृत व्यक्तीने अशा वस्तू विकल्या असतील ती व्यक्ती, अशी सुधारणा करण्यात आल्यानंतरच्या तीस दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल असा तपशील अंतर्भूत असलेले जमापत्र प्राप्तकर्त्याला देईल आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ असे जमापत्र हे, या अधिनियमान्वये केलेल्या जावक पुरवठ्याच्या संबंधात दिले असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, जर जमापत्र प्राप्तकर्त्याने अशा कर दायित्व कमी करण्याच्या संबंधात त्याची निविष्टी कराची जमा रक्कम कमी केली असेल तरच केवळ नोंदणीकृत व्यक्तींला, जमापत्र दिल्यामुळे त्याचे करदायित्व कमी करण्याची मुभा देण्यात येईल.

(३) विद्यमान कायद्यान्वये कोणत्याही निविष्टी कराची जमा रक्कम, विद्यमान कायद्यान्वये भरलेला कर, व्याज किंवा अन्य कोणतीही रक्कम यांच्या परताव्यासाठी नियत दिवसापूर्वी, नियत दिवशी किंवा त्यानंतर कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या परताव्यासाठीचा प्रत्येक दावा विद्यमान कायद्याच्या तरतुदींनुसार निकालात काढण्यात येईल आणि परिणामस्वरूप त्याला द्यावयाची कोणतीही उपार्जित रक्कम उक्त कायद्याच्या तरतुदींनुसार रोख स्वरूपात त्याला परत करण्यात येईल :

परंतु, जेव्हा निविष्टी कराच्या जमा रकमेच्या परताव्याचा कोणताही दावा पूर्णपणे किंवा अंशतः नाकारण्यात आला असेल तर अशी नाकारण्यात आलेली रक्कम व्यपगत होईल :

परंतु आणखी असे की, जेव्हा नियत दिवशी असेल अशी उक्त उर्वरित रक्कम या अधिनियमान्वये पुढे नेण्यात आली असेल तर, कोणत्याही निविष्टी कराच्या जमा रकमेचा कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

(४) नियत दिवसापूर्वी किंवा त्यानंतर निर्यात केलेल्या वस्तुंबाबत विद्यमान कायद्यान्वये भरलेल्या कोणताही कराच्या परताव्यासाठी नियत दिवसानंतर दाखल केलेला परताव्याचा प्रत्येक दावा विद्यमान कायद्याच्या तरतुदींनुसार निकालात काढण्यात येईल :

परंतु, जेव्हा निविष्टी कराच्या जमा रकमेच्या परताव्याचा कोणताही दावा पूर्णपणे किंवा अंशतः नाकारण्यात आला असेल तर अशी नाकारण्यात आलेली रक्कम व्यपगत होईल :

परंतु आणखी असे की, जेव्हा नियत दिवसास असेल अशी उक्त उर्वरित रक्कम या अधिनियमान्वये पुढे नेण्यात आली असेल तर, कोणत्याही निविष्टी कराच्या जमा रकमेचा कोणता परतावा देण्यात येणार नाही.

(५) या अधिनियमात एतद्विरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, नियत दिवसापूर्वी फिरविण्यात (रिव्हर्सड्) आलेली कोणतीही निविष्टी कराची जमा रक्कम ही, या अधिनियमान्वये निविष्टी कराची जमा रक्कम म्हणून अनुज्ञेय असणार नाही.

(६) (क) विद्यमान कायद्यान्वये निविष्टी कराच्या जमा रकमेसाठी एखाद्या दाव्यासंबंधातील अपील, पुनर्विलोकन, पुनरीक्षण किंवा निर्देश यांची सुरू केलेली प्रत्येक कार्यवाही, मग ती नियत दिवसापूर्वी, नियत दिवशी किंवा त्यानंतर कधीही केलेली असो, विद्यमान कायद्याच्या तरतुदींनुसार निकालात काढण्यात येईल, आणि जमेची कोणतीही रक्कम दावेदारास अनुज्ञेय असल्याचे आढळून आल्यास विद्यमान कायद्याच्या तरतुदींनुसार रोख रकमेत त्याला परत करण्यात येईल, आणि जर अशी कोणतीही रक्कम नाकारण्यात

आली असेल, तर ती, या अधिनियमान्वये निविष्टी कराची जमा रक्कम म्हणून अनुज्ञेय असणार नाही :

परंतु, जेव्हा नियत दिनांकास असेल अशी उक्त उर्वरित रक्कम या अधिनियमान्वये पुढे नेण्यात आली असेल तर, कोणत्याही निविष्टी कराच्या जमा रकमेचा कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

(ख) विद्यमान कायद्यान्वये, निविष्टी कराच्या जमा रकमेच्या वसुलीसंबंधात अपील, पुनरीक्षण, पुनर्विलोकन किंवा निर्देश यांची सुरू केलेली प्रत्येक कार्यवाही, मग ती नियत दिवसापूर्वी, नियत दिवशी किंवा त्यानंतर कधीही केलेली असो—विद्यमान कायद्याच्या तरतुदींनुसार निकालात काढण्यात येईल, आणि असे अपील, पुनरीक्षण, पुनर्विलोकन किंवा निर्देश याच्या परिणामी, जर जमेची कोणतीही रक्कम वसुलीयोग्य असल्यास विद्यमान कायद्यान्वये ती वसूल झाली नसेल, या अधिनियमान्वये कराची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल, आणि अशी वसूल केलेली रक्कम या अधिनियमान्वये निविष्टी कराची जमा रक्कम म्हणून अनुज्ञेय असणार नाही.

(७) (क) विद्यमान कायद्यान्वये, कोणत्याही उद्दिष्टी कर दायित्वाच्या संबंधातील अपील, पुनरीक्षण, पुनर्विलोकन किंवा निर्देश याची प्रत्येक सुरू केलेली कार्यवाही, मग ती नियत दिवसापूर्वी, नियत दिवशी किंवा त्यानंतर कधीही केलेली असो—विद्यमान कायद्याच्या तरतुदींनुसार निकालात काढण्यात येईल, आणि असे अपील, पुनरीक्षण, पुनर्विलोकन किंवा निर्देश याच्या परिणामी, जर कोणतीही रक्कम वसुलीयोग्य असल्यास, विद्यमान कायद्यान्वये ती वसूल झाली नसेल तर या अधिनियमान्वये कराची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल आणि अशी वसूल केलेली रक्कम या अधिनियमान्वये निविष्टी कराची जमा रक्कम अनुज्ञेय असणार नाही.

(ख) कोणत्याही उद्दिष्टी कर दायित्वाच्या संबंधातील अपील, पुनरिक्षण, पुनर्विलोकन किंवा निर्देश यांवरील प्रत्येक सुरू केलेली कार्यवाही—मग ती विद्यमान कायद्यान्वये नियत दिनांकापूर्वी, त्या दिवशी अथवा त्या दिवसानंतर कधीही केलेली असो—विद्यमान कायद्याच्या तरतुदींनुसार निकालात काढण्यात येईल आणि कोणतीही रक्कम दावाकारास अनुज्ञेय असल्याचे आढळून आल्यास विद्यमान कायद्याच्या तरतुदींनुसार ती त्याला रोखीने परत करण्यात येईल आणि अशी कोणतीही रक्कम नाकारल्यास या अधिनियमान्वये निविष्टी कराची जमा रक्कम म्हणून अनुज्ञेय असणार नाही.

(८) (क) विद्यमान कायद्यान्वये नियत दिवसापूर्वी, त्या दिवशी किंवा त्या दिवसानंतर निर्धारण किंवा अभिनिर्णय प्रक्रिया सुरू करण्यात आली असेल तर एखाद्या व्यक्तीकडून वसुलीयोग्य असलेली कराची रक्कम, व्याज, शास्ती किंवा दंड यांची रक्कम ही विद्यमान कायद्यान्वये वसूल झाली नसेल तर या अधिनियमाअन्वये कराची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल आणि अशी वसूल केलेली रक्कम या अधिनियमान्वये निविष्टी कराची जमा रक्कम म्हणून अनुज्ञेय असणार नाही.

(ख) विद्यमान कायद्यान्वये नियत दिनांकापूर्वी, त्यादिवशी किंवा त्या दिवसानंतर निर्धारण किंवा अभिनिर्णय प्रक्रिया सुरू करण्यात आली असेल तर एखाद्या करपात्र व्यक्तीला कर, व्याज, शास्ती किंवा दंडाची रक्कम परतावायोग्य असल्यास, या रकमेचा उक्त कायद्यान्वये त्याला रोखीने परतावा करण्यात येईल आणि अशी कोणतीही रक्कम नाकारण्यात आली असल्यास, या अधिनियमान्वये निविष्टी कराची जमा रक्कम म्हणून अनुज्ञेय असणार नाही.

२००५ चा ९. (९) (क) विद्यमान कायद्यान्वये दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही विवरणात नियत दिनांकानंतर सुधारणा करण्यात आली असल्यास व अशा सुधारणेनुसार कोणतीही रक्कम वसुलीयोग्य असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा निविष्टी कराची कोणतीही जमा रक्कम अनुज्ञेय नसल्याचे आढळून आल्यास त्या रकमेची विद्यमान कायद्यान्वये वसुली झाली नसेल तर, ती या अधिनियमान्वये कराची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल आणि अशा रीतीने वसूल करण्यात आलेली रक्कम या अधिनियमान्वये नसल्याचे आढळून आल्यास निविष्टी कराची जमा रक्कम म्हणून अनुज्ञेय असणार नाही.

(ख) विद्यमान कायद्यान्वये दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही विवरणात नियत दिनांकानंतर मात्र विद्यमान कायद्यान्वये अशा सुधारणेकरिता विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेच्या आत त्यात सुधारणा करण्यात आल्यास, आणि अशा सुधारणेनुसार परतावायोग्य रक्कम किंवा निविष्टी कराची कोणतीही जमा रक्कम अनुज्ञेय असल्याचे आढळून आल्यास, ती विद्यमान कायद्यान्वये त्याला रोखीने देण्यात येईल, आणि अशी कोणतीही रक्कम नाकारण्यात आली असल्यास, या कायद्यान्वये निविष्टी कराची जमा रक्कम म्हणून ती अनुज्ञेय असणार नाही.

(१०) या प्रकरणात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त नियत दिनांकापूर्वी केलेल्या संविदेनुसार नियत दिनांकास किंवा त्यानंतर पुरविलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही या अधिनियमाच्या तरतुदींखाली करपात्र असतील.

(११) (क) कलम १२ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या अधिनियमान्वये महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ अन्वये उक्त वस्तूंवर ज्या मर्यादेपर्यंत कर आकारणीयोग्य होती त्या मर्यादेपर्यंत या अधिनियमान्वये वस्तूंवर कोणताही कर प्रदेय असणार नाही.

१९९४ चा ३२. (ख) कलम १३ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, वित्त अधिनियम, १९९४ च्या प्रकरण पाच खाली उक्त सेवांवर ज्या मर्यादेपर्यंत कर आकारणीयोग्य होता तितक्या कर मर्यादेपर्यंत या अधिनियमान्वये सेवांवर कोणताही कर प्रदेय असणार नाही.

(ग) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ अन्वये आणि वित्त अधिनियम, १९९४ चा ३२. १९९४ च्या प्रकरण पाच खाली या दोन्हीं अन्वये कोणत्याही पुरवठ्यावर कर प्रदान करण्यात आलेला असेल तर, या अधिनियमान्वये कर आकारणीयोग्य असेल आणि करपात्र व्यक्ती ही नियत दिनांकानंतर केलेल्या पुरवठ्याच्या मर्यादेपर्यंत विद्यमान कायद्यान्वये भरलेल्या मूल्यवर्धित कर किंवा सेवा कर यांची रक्कम जमा करून घेण्यास हक्कदार असेल आणि अशा जमा रकमा विहित करण्यात येईल अशा रीतीने परिगणित करण्यात येतील.

(१२) नियत दिवसापूर्वी सहा महिने अगोदर नसेल अशा कालावधीत, मान्यता घेण्याच्या तत्त्वावर पाठवण्यात आलेली कोणतीही वस्तू, खरेदीदाराकडून नाकारण्यात आल्यास किंवा तिला मान्यता देण्यात न आल्यास, आणि ती विक्रेत्यास नियत दिवसास किंवा त्यानंतर परत करण्यात आल्यास, त्यावर, जर अशा वस्तू नियत दिवसापासून सहा महिन्यांच्या आत परत करण्यात आल्या असतील तर कोणताही कर प्रदेय असणार नाही :

परंतु, पुरेसे कारण दर्शविल्यानंतर सहा महिन्यांचा उक्त कालावधी, हा, दोन महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या पुढील कालावधीसाठी आयुक्ताकडून वाढवून देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, या अधिनियमाखाली अशा वस्तू करपात्र असतील तर आणि या पोट-कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीनंतर त्या परत करण्यात आल्या असल्यास अशा वस्तू परत करणाऱ्या व्यक्तीकडून कर प्रदेय असेल :

परंतु तसेच, या अधिनियमांन्वये करपात्र असतील अशा वस्तू ज्या व्यक्तीने मान्यता घेण्याच्या तत्त्वावर पाठविल्या असतील आणि त्या या पोट-कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत त्या परत करण्यात आल्या नसतील तर त्या व्यक्तीकडून कर प्रदेय असेल.

(१३) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ अन्वये पुरवठादाराने केलेल्या कोणत्याही वस्तूंच्या विक्रीवरील कर मूळ स्त्रोतातून वजा करणे आवश्यक असेल तर आणि नियत दिनांकाच्या अगोदर त्याचे बीजक देखील देण्यात आले असेल तर, जर उक्त पुरवठादारास नियत दिनांकास किंवा त्यानंतर रक्कम प्रदान केली असेल तर वजातदाराकडून कलम ५१ अन्वये मूळ स्त्रोतातून कोणतीही कर वजात केली जाणार नाही.

(१४) प्रकर्त्याच्या कोणत्याही वस्तू किंवा भांडवली वस्तू या नियत दिवशी अभिकर्त्याच्या जागेत असतील तर, अभिकर्ता, पुढील शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, अशा वस्तूंवर किंवा भांडवली वस्तूंवर भरलेल्या कराची जमा रक्कम घेण्यास हक्कदार असेल :—

(एक) अभिकर्ता हा या अधिनियमान्वये नोंदणीकृत करपात्र व्यक्ती आहे ;

(दोन) प्रकर्ता आणि अभिकर्ता दोघेही, याबाबतीत विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने आणि अशा कालावधीत, नियत दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवशी, अशा अभिकर्त्याकडे असणाऱ्या वस्तूंचा किंवा भांडवली वस्तूंचा तपशील घोषित करतील ;

(तीन) अशा वस्तूंची किंवा भांडवली वस्तूंची बीजके नियत दिवसाच्या लगतपूर्वी बारा महिन्यांच्या अगोदर देण्यात आलेली नव्हती; आणि

(चार) प्रकर्त्याने एकतर, पुढील बाबतीत निविष्टी कराची जमा रक्कम परत (रिव्हर्सड) केली आहे किंवा घेतलेली नाही,—

(क) अशा वस्तूंच्या संबंधात; किंवा

(ख) अशा भांडवली वस्तूंच्या संबंधात, किंवा अशी घेतलेली जमा रक्कम त्याने घेतलेल्या, उक्त जमा रक्कमेच्या मर्यादेपर्यंत परत (रिव्हर्स्ड) केली असेल,

निविष्टी कराची जमा रक्कम परत केलेली आहे किंवा लाभ घेतलेला नाही.

**स्पष्टीकरण.—**या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ, " भांडवली वस्तू " या शब्दप्रयोगाला महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ मध्ये, जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

प्रकरण एकवीस

## संकीर्ण तरतुदी

**१४३.** (१) नोंदणीकृत व्यक्तीस (यात यापुढे या कलमात जिचा निर्देश " प्रकर्ता " असा करण्यात आला आहे), विहित करण्यात येईल अशी माहिती देऊन आणि अशा शर्तींना अधीन राहून, कर न भरता, उक्त्या कामासाठी कोणत्याही निविष्टी किंवा भांडवली वस्तू, एखाद्या उक्ते कामगाराकडे पाठविता येतील, आणि त्यानंतर तेथून त्या, आणखी दुसऱ्या उक्ते कामगारांकडे आणि तशाचप्रकारे पाठविता येतील, आणि तो,— उक्त्या कामाची कार्यपद्धती.

(क) ते उक्ते काम पूर्ण झाल्यानंतर किंवा अन्यथा, साचे आणि दाबसाचे, चाळण्या व खिळण्या किंवा हत्यारे यांव्यतिरिक्त त्या निविष्टी किंवा भांडवली वस्तू, त्यांची पाठवणी करण्यात आल्यापासून अनुक्रमे एका वर्षाच्या किंवा तीन वर्षांच्या आत, कर न भरता, तेथून त्याच्या धंद्याच्या कोणत्याही ठिकाणी परत आणील ;

(ख) उक्ते काम पूर्ण झाल्यानंतर किंवा अन्यथा, साचे आणि दाबसाचे, चाळण्या व खिळण्या किंवा हत्यारे यांव्यतिरिक्त, अशा निविष्टींचा किंवा भांडवली वस्तूंचा, त्यांची पाठवणी करण्यात आल्यापासून, अनुक्रमे एका वर्षाच्या किंवा तीन वर्षांच्या आत, कर भरल्यावर भारतात किंवा, यथास्थिति, निर्यातीबद्दल, कर भरून, अथवा कर न भरता, उक्ते कामगाराच्या धंद्याच्या ठिकाणाहून पुरवठा करील :

परंतु, प्रकर्ता—

(एक) जेथे कलम २५ अन्वये उक्ते कामगार नोंदणीकृत असेल तेथे ; किंवा

(दोन) जेथे प्रकर्ता, आयुक्ताकडून याबाबतीत अधिसूचित करण्यात येईल अशा वस्तूंच्या पुरवठा करीत असेल तेथे,

हे अपवाद वगळता, जर उक्त प्रकर्त्याने उक्ते कामगाराच्या धंद्याच्या ठिकाणास आपल्या धंद्याचे अतिरिक्त ठिकाण म्हणून घोषित केलेले नसेल तर, तो प्रकर्ता या खंडाच्या तरतुदींनुसार त्या उक्ते कामगाराच्या धंद्याच्या ठिकाणाहून वस्तूंचा पुरवठा करणार नाही.

(२) निविष्टींचे किंवा भांडवली वस्तूंचे उचित लेखे ठेवण्याची जबाबदारी प्रकर्त्यावर असेल.

(३) जेथे उक्ते कामासाठी पाठविलेल्या निविष्टी, त्या पाठविण्यात आल्यापासून एका वर्षाच्या आत, पोट-कलम (१) च्या खंड (क) च्या तरतुदींनुसार उक्ते काम पूर्ण झाल्यानंतर किंवा अन्यथा, प्रकर्त्याला परत मिळाल्या नसतील, किंवा पोट-कलम (१) च्या खंड (ख) च्या तरतुदींनुसार उक्ते कामगाराच्या धंद्याच्या ठिकाणाहून त्या निविष्टींचा पुरवठा करण्यात आला नसेल त्याबाबतीत, तेथे ज्या दिवशी उक्त निविष्टी पाठविण्यात आल्या होत्या, त्या दिवशी प्रकर्त्याकडून अशा निविष्टींचा उक्ते कामगाराला पुरवठा करण्यात आला होता, असे मानण्यात येईल.

(४) जेथे साचे व दाबसाचे, चाळण्या व खिळण्या किंवा हत्यारे यांव्यतिरिक्त उक्ते कामासाठी पाठविलेल्या भांडवली वस्तू, त्या पाठविण्यात आल्यापासून तीन वर्षांच्या आत, पोट-कलम (१) च्या खंड (क) च्या तरतुदींनुसार " प्रकर्त्याला " परत मिळालेल्या नसतील किंवा पोट-कलम (१) च्या खंड (ख) च्या तरतुदींनुसार उक्ते कामगाराला धंद्याच्या ठिकाणाहून त्यांचा पुरवठा करण्यात आला नसेल, त्याबाबतीत, तेथे ज्या दिवशी उक्त भांडवली वस्तू पाठविण्यात आल्या होत्या, त्या दिवशी प्रकर्त्याकडून अशा भांडवली वस्तूंचा उक्ते कामगाराला पुरवठा करण्यात आला होता, असे मानण्यात येईल.

(५) पोट-कलमे (१) व (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्ते काम करताना त्यातून निर्माण झालेल्या कोणत्याही टाकाऊ आणि निरुपयोगी वस्तूंचा पुरवठा हा असा उक्ते कामगार नोंदणीकृत असल्यास, थेट त्याच्या धंद्याच्या ठिकाणाहून कर भरून करण्यात येईल, किंवा जर उक्ते कामगार नोंदणीकृत नसल्यास प्रकर्त्याकडून करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**उक्त्या कामाच्या प्रयोजनांसाठी, निविष्टी यामध्ये, प्रकर्त्याकडून किंवा उक्ते कामगाराकडून निविष्टींवर केलेल्या कोणत्याही संस्करणामधून किंवा प्रक्रियेमधून निर्माण होणाऱ्या मध्यम तयार वस्तूंचा समावेश होतो.

**१४४.** जेव्हा कोणताही दस्तऐवज,— विवक्षित प्रकरणातील दस्तऐवजासंबंधी गृहीतक.

(एक) या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही व्यक्तीने सादर केला असेल, किंवा

(दोन) या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही व्यक्तीच्या अभिरक्षेमधून किंवा नियंत्रणामधून जप्त करण्यात आला असेल, किंवा

(तीन) या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या कोणत्याही कार्यवाहीच्या ओघात भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून मिळालेला असेल,

आणि असा दस्तऐवज ज्या व्यक्तीविरुद्ध किंवा ज्याच्या बरोबर त्याची संयुक्तपणे न्यायचौकशी करण्यात येत आहे अशा एखाद्या व्यक्तीविरुद्धच्या कार्यवाहीत साक्षीपुरावा म्हणून दिलेला असेल तर, न्यायालय,

(क) अशा व्यक्तीने एतद्‌विरुद्ध काहीही शाबित केले नसेल तर,—

(एक) अशा दस्तऐवजाच्या आशयात तथ्य आहे असे गृहीत धरेल ;

(दोन) अशा दस्तऐवजावरील स्वाक्षरी व इतर प्रत्येक भाग जो त्या एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या हस्ताक्षरातच आहे असे गृहीत धरेल किंवा ज्यावर त्या व्यक्तीची स्वाक्षरी असायला हवी होती किंवा जे त्या विशिष्ट व्यक्तीच्या हस्ताक्षरात असायला हवे होते, ते त्या कोणत्याही विशिष्ट व्यक्तीने स्वाक्षरी केलेले व त्याच्या हस्ताक्षरात आहे असे मानण्यास वाजवी कारण असेल तर, तसे गृहीत धरेल किंवा निष्पादित किंवा साक्षांकित केलेल्या दस्तऐवजांच्या बाबतीत, ते ज्या व्यक्तीकडून निष्पादित किंवा साक्षांकित करण्यात यायला हवे ते त्या व्यक्तीने निष्पादित व साक्षांकित केले असल्याचे गृहीत धरेल.

(ख) जर असे दस्तऐवज अन्यथा पुरावा म्हणून स्वीकार्य वाटत असेल तर, जरी ते यथोचितरीत्या मुद्रांकित केलेले नसले तरी, पुराव्यातील दस्तऐवज म्हणून स्वीकार करेल.

**१४५.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी,— दस्तऐवज म्हणून आणि पुरावा म्हणून दस्तऐवजांचे सूक्ष्मपट, प्रतिरूप प्रती व संगणकीय मुद्रित प्रती यांची स्वीकार्यता.

(क) दस्तऐवजाचा सूक्ष्मपट किंवा अशा सूक्ष्मपटामध्ये (मग तो परिवर्धित केलेला असो वा नसो) संनिविष्ट केलेली प्रतिमा किंवा प्रतिमांची पुनर्निर्मिती ; किंवा

(ख) दस्तऐवजाची प्रतिरूप प्रत ; किंवा

(ग) विहित करण्यात येईल अशा शर्तींना अधीन राहून, दस्तऐवजामध्ये अंतर्भूत असलेले आणि संगणकाद्वारे तयार केलेल्या मुद्रित साहित्यात समाविष्ट असलेले निवेदन ; किंवा

(घ) कोणत्याही यंत्रणेमध्ये किंवा माध्यमामध्ये इलेक्ट्रॉनिकरीत्या साठविण्यात आलेली कोणतीही माहिती अशा माहितीच्या कोणत्याही मुद्रित प्रतीसह ,

या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या प्रयोजनार्थ, एक दस्तऐवज म्हणून मानण्यात येईल आणि, त्याखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये, ज्याचा प्रत्यक्ष पुरावा ग्राह्य धरता येऊ शकेल अशा, मूळ दस्तऐवजातील कोणत्याही आशयाचा किंवा त्यामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही वस्तुस्थितीचा, पुरावा म्हणून आणखी पुरावा न देता किंवा मूळ दस्तऐवज सादर न करता, साक्षीपुरावा म्हणून ग्राह्य धरता येईल.

(२) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम याअन्वये कोणत्याही कार्यवाहीमध्ये, या कलमाच्या आधारे साक्षीपुराव्यात एखादे निवेदन देण्याची इच्छा असल्यास,—

(क) निवेदनाचा अंतर्भाव असणारा दस्तऐवज निश्चित करणारे व ज्या रीतीने तो निर्माण केला होता त्या रीतीचे वर्णन करणारे प्रमाणपत्र ;

(ख) संगणकाद्वारे दस्तऐवज निर्माण करण्यात आला होता हे दर्शविण्याच्या प्रयोजनासाठी यथोचित असेल त्याप्रमाणे दस्तऐवज निर्मितीमध्ये अंतर्भूत असणाऱ्या कोणत्याही साधनाचे असे तपशील देणारे प्रमाणपत्र,

त्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही बाबींचा साक्षीपुरावा असेल आणि या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी ती बाब नमूद करणाऱ्या व्यक्तीने त्याच्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे नमूद करावयाच्या बाबींसाठी असे प्रमाणपत्र पुरेसे असेल.

सामाईक पोर्टल.

**१४६.** शासनास, परिषदेच्या शिफारशींवरून, नोंदणी करणे, कराचा भरणा करणे, विवरणपत्र सादर करणे, एकात्मिक कराची गणना व संव्यवस्था करणे व इलेक्ट्रॉनिक मार्ग बीजक (वे बिल) तयार करणे सुकर व्हावे म्हणून तसेच विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडण्याकरिता आणि अशा प्रयोजनांकरिता सामाईक वस्तू व सेवा कर इलेक्ट्रॉनिक पोर्टल अधिसूचित करता येईल.

मानीव निर्यात.

**१४७.** शासनास, परिषदेच्या शिफारशीवरून जेव्हा पुरवठा केलेल्या वस्तू भारतात निर्माण झाल्या असतील आणि त्या भारताबाहेर जात नसतील आणि अशा पुरवठ्यासाठीचे प्रदान एकतर भारतीय रुपयात प्राप्त होत असेल किंवा रूपांतरित होणाऱ्या विदेशी चलनात प्राप्त होत असेल तेव्हा वस्तूचा असा विवक्षित पुरवठा " मानीव निर्यात " म्हणून अधिसूचित करता येईल.

विवक्षित प्रक्रियांसाठी विशेष कार्यपद्धती.

**१४८.** शासनास, परिषदेच्या शिफारशीवरून, आणि विहित करण्यात येईल त्याप्रमाणे अशा शर्तींना व संरक्षक उपाययोजनांस अधीन राहून, नोंदणीकृत व्यक्तींचा विवक्षित वर्ग आणि नोंदणी करणे, विवरणपत्र सादर करणे, कराचा भरणा करणे आणि अशा व्यक्तींचे प्रशासन करणे या बाबींसह अशा व्यक्तींनी अनुसरावयाची विशेष कार्यपद्धती अधिसूचित करता येईल.

**१४९.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींस अनुसरून, प्रत्येक नोंदणीकृत व्यक्तीस, त्याच्या अनुपालन अभिलेख्याच्या आधारे शासनाकडून वस्तू व सेवा कर अनुपालन श्रेणी गुणांकन देण्यात येईल. वस्तू व सेवा कर अनुपालन श्रेणी.

(२) विहित करण्यात येईल अशा मापदंडाच्या आधारे वस्तू व सेवा कर अनुपालन श्रेणी गुणांकन निश्चित करता येईल.

(३) वस्तू व सेवा कर अनुपालन श्रेणी गुणांकन ठरावीक कालांतराने अद्ययावत करता येईल व नोंदणीकृत व्यक्तीला कळविता येईल आणि तसेच विहित करण्यात येईल अशा पद्धतीने सार्वजनिक क्षेत्राधीन करता येईल.

**१५०.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली, नोंदणी अभिलेख किंवा लेखा विवरणपत्रे किंवा कोणतेही नियतकालिक विवरण किंवा कराचा भरणा केल्याचा तपशील अंतर्भूत असणारा दस्तऐवज आणि वस्तू किंवा सेवा अथवा दोन्हींच्या व्यवहाराचा इतर तपशील किंवा बँक खात्याशी संबंधित व्यवहार किंवा विजेचा वापर किंवा मालमत्ता किंवा वस्तूची खरेदी, विक्री अथवा विनिमय किंवा मालमत्तेतील हक्क अथवा हितसंबंध यासाठी जबाबदार असलेली, माहिती विवरणपत्र सादर करणे बंधनकारक असणे.

(क) करपात्र व्यक्ती ; किंवा

(ख) स्थानिक प्राधिकरण किंवा इतर सार्वजनिक संस्था अथवा संघ ; किंवा

(ग) मूल्यवर्धित कर किंवा विक्री कर किंवा राज्य उत्पादन शुल्क वसूल करण्यासाठी जबाबदार असलेले राज्य शासनाचे कोणतेही प्राधिकरण किंवा उत्पादन शुल्क किंवा सीमा शुल्क वसूल करण्यासाठी जबाबदार असलेले केंद्र सरकारचे प्राधिकरण ; किंवा

१९६१ चा ४३. (घ) आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींअन्वये नियुक्त करण्यात आलेला आयकर प्राधिकारी ; किंवा

१९३४ चा २. (ङ) भारताची रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ याच्या कलम ४५क च्या खंड (क) च्या अर्थांतर्गत बँकींग कंपनी ; किंवा

२००३ चा ३६. (च) राज्य विद्युत मंडळ किंवा वीज अधिनियम, २००३ खालील वीज वितरण किंवा पारेषण लायसनधारक किंवा केंद्र सरकारने अथवा राज्य शासनाने अशी कार्ये जिच्याकडे सोपवली आहेत अशी इतर कोणतीही संस्था ; किंवा

१९०८ चा १६. (छ) नोंदणी अधिनियम, १९०८ च्या कलम ६ अन्वये नियुक्त केलेला निबंधक किंवा उप निबंधक ; किंवा

(ज) कंपनी अधिनियम, २०१३ च्या अर्थांतर्गत निबंधक ; किंवा

२०१३ चा १८. (झ) मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये मोटार वाहनांची नोंदणी करण्यासाठी अधिकार प्रदान केलेला नोंदणी प्राधिकारी ; किंवा

(ञ) भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित नुकसानभरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ याच्या कलम ३ च्या खंड (ग) मध्ये निर्दिष्ट केलेला जिल्हाधिकारी; किंवा २०१३ चा ३०.

(ट) प्रतिभूति संविदा (विनियमन) अधिनियम, १९५६ याच्या कलम २ च्या खंड(च) मध्ये निर्दिष्ट केलेले मान्यताप्राप्त शेअर बाजार ; किंवा १९५६ चा ४२.

(ठ) निक्षेपग्राहींसाठी अधिनियम, १९९६ याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ङ) मध्ये निर्दिष्ट केलेला निक्षेपग्राही ; किंवा १९९६ चा २२.

(ड) भारताची रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ याच्या कलम ३ अन्वये घटित केल्याप्रमाणे भारताच्या रिझर्व्ह बँकेचा अधिकारी ; किंवा १९३४ चा २.

(ढ) कंपनी अधिनियम, २०१३ अन्वये नोंदणीकृत वस्तू व सेवा कर जाळे कंपनी ; किंवा २०१३ चा १८.

(ण) कलम २५ च्या पोट-कलम (९) अन्वये ज्या व्यक्तीस विशिष्ट ओळख क्रमांक देण्यात आला आहे ती व्यक्ती ; किंवा

(त) परिषदेच्या शिफारशींवरून, शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी अन्य कोणतीही व्यक्ती,—

अशी कोणतीही व्यक्ती अशा माहितीचे विवरण विहित करण्यात येईल अशा कालावधीच्या संबंधात अशा मुदतीत, अशा नमुन्यात व रीतीने आणि अशा प्राधिकाऱ्याकडे किंवा अभिकर्त्याकडे सादर करील.

(२) जेव्हा आयुक्त किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती यांस, माहिती विवरणात सादर केलेली माहिती सदोष आहे असे वाटत असेल तर, त्यास ज्याने असे माहिती विवरण सादर केले आहे त्या व्यक्तीला दोष कळविता येतील आणि त्याबाबत अशी सूचना दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीमध्ये किंवा याबाबतीत केलेल्या अर्जावर उक्त प्राधिकाऱ्यास परवानगी देता येईल अशा पुढील कालावधीमध्ये दोष सुधारण्याची संधी देता येईल आणि तीस दिवसांच्या उक्त कालावधीमध्ये किंवा अशा परवानगी दिलेल्या पुढील कालावधीमध्ये दोष सुधारण्यात आले नाहीत तर, तद्नंतर या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, असे माहिती विवरण सादर केले नसल्याचे समजण्यात येईल आणि या अधिनियमाच्या तरतुदी लागू होतील.

(३) ज्या व्यक्तीने माहिती विवरण सादर करणे आवश्यक आहे, त्या एखाद्या व्यक्तीने पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत ते विवरण सादर केले नसेल, तर उक्त प्राधिकाऱ्यास, त्याच्यावर नोटीस बजावता येईल व नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीमध्ये असे माहिती विवरण सादर करण्याबाबत फर्माविता येईल आणि अशी व्यक्ती माहिती विवरण सादर करील.

**१५१.** (१) आयुक्ताला तसे करणे आवश्यक आहे असे वाटले तर, त्याला अधिसूचना काढून या अधिनियमाद्वारे किंवा त्या संबंधात हाताळण्यात येईल अशा कोणत्याही बाबीसंबंधी आकडेवारी गोळा करण्यात यावी, असा निदेश देता येईल. आकडेवारी गोळा करण्याचा अधिकार.

(२) अशी अधिसूचना काढण्यात आल्यावर, आयुक्ताला, किंवा याबाबत आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, ज्या संबंधी आकडेवारी गोळा करावयाची असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी, त्यात विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने अशी माहिती किंवा विवरण सादर करण्यास संबंधित व्यक्तींना फर्माविता येईल.

**१५२.** (१) कलम १५० किंवा कलम १५१ च्या प्रयोजनासाठी, देण्यात आलेल्या कोणत्याही बाबीच्यासंबंधातील कोणत्याही व्यक्तिगत विवरणात किंवा त्याच्या भागात दिलेली कोणतीही माहिती, संबंधित व्यक्तीच्या किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधींच्या लेखी पूर्वसंमतीशिवाय, त्यातील कोणताही तपशील एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या संदर्भातील आहे, असे ओळखणे शक्य होईल अशा रीतीने प्रसिद्ध करण्यात येणार नाही आणि अशी कोणतीही माहिती या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनासाठी वापरता येणार नाही. माहिती उघड करण्यास रोध.

(२) या अधिनियमाखालील किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमाखालील खटल्याच्या प्रयोजनांसाठी असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये आकडेवारी गोळा करण्याचे किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी तिचे संकलन किंवा संगणकीकरण करण्याचे काम जी व्यक्ती करीत नसेल, अशा कोणत्याही व्यक्तीस, कलम १५१ मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही माहिती किंवा कोणतेही वैयक्तिक विवरण पाहण्याची किंवा उपलब्धतेची परवानगी असणार नाही.

(३) अशी माहिती प्रसिद्ध करणे लोकहितार्थ इष्ट आहे, असे आयुक्ताचे मत असेल तर, एखाद्या करपात्र व्यक्तींच्या वर्गासंबंधीची किंवा व्यवहारांच्या वर्गासंबंधीची कोणतीही माहिती प्रसिद्ध करण्याबाबत या कलमातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

**१५३.** सहायक आयुक्ताच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, प्रकरणाचे स्वरूप व जटीलता लक्षात घेऊन आणि महसुलाच्या दृष्टीने, छाननीच्या, चौकशीच्या, अन्वेषणाच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा त्याच्या समोरील कोणत्याही अन्य कार्यवाही संबंधात तज्ज्ञाचे साहाय्य घेता येईल. तज्ज्ञाकडून साहाय्य घेणे.

**१५४.** आयुक्तास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या एखाद्या अधिकाऱ्यास जेथे त्याला आवश्यक वाटेल तेथे, कोणत्याही करपात्र व्यक्तीच्या ताब्यातून वस्तूंचे नमुने घेता येतील आणि अशा प्रकारे घेतलेल्या कोणत्याही नमुन्यांसाठी पावती देता येईल. नमुने घेण्याचा अधिकार.

**१५५.** जर कोणतीही व्यक्ती, ती या अधिनियमान्वये निविष्टी कर जमा रकमेसाठी पात्र आहे असा दावा करत असल्यास, अशा दाव्याच्या शाबीतीचा भार अशा व्यक्तीवर असेल. शाबितीचा भार.

व्यक्ती या लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**१५६.** या अधिनियमान्वये कार्ये पार पाडणाऱ्या सर्व व्यक्ती भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १९६० चा ४५.

या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

**१५७.** (१) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांन्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी अपील न्यायाधिकरणाचे अध्यक्ष, राज्य अध्यक्ष, सदस्य, अधिकारी अथवा इतर कर्मचारी किंवा उक्त अपील न्यायाधिकरणाद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही अन्य व्यक्ती यांच्या विरोधात कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार नाही.

(२) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांन्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या विरोधात कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार नाही.

लोकसेवकाने माहिती उघड करणे.

**१५८.** (१) या अधिनियमानुसार दिलेले कोणतेही विवरणपत्र, दाखल केलले विवरण किंवा सादर केलेले लेखे किंवा कागदपत्रे किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी दिलेल्या पुराव्याचे कोणतेही अभिलेख यांमध्ये (फौजदारी न्यायालयापुढील कार्यवाही व्यतिरिक्त) किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या कोणत्याही अभिलेखात अंतर्भूत असलेले सर्व तपशील, पोट-कलम (३) मध्ये तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त उघड करण्यात येणार नाही.

(२) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही न्यायालयास, पोट-कलम (३) मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला तपशील त्याच्यासमोर सादर करण्यास किंवा त्याबाबतीत त्याच्यासमोर साक्षीपुरावा देण्यास भाग पाडणार नाही. १८७२ चा १.

(३) या कलमातील कोणतीही गोष्ट,—

(क) भारतीय दंड संहिता किंवा भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये, किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये, कोणताही खटला भरण्याच्या प्रयोजनासाठी असे कोणतेही विवरणपत्र, विवरण, लेखे, कागदपत्रे, साक्षीपुरावा, प्रतिज्ञापत्र किंवा जबानी यांच्याबाबतचा असा कोणताही तपशील उघड करणे ; किंवा १८६० चा ४५. १९८८ चा ४९.

(ख) या अधिनियमाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या प्रयोजनांसाठी केंद्र सरकारकडे किंवा राज्य शासनाकडे किंवा या अधिनियमाच्या अंमलबजावणीचे काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडे असा कोणताही तपशील उघड करणे ; किंवा

(ग) कोणतीही नोटीस बजावण्यासाठीची किंवा कोणतीही मागणी वसूल करण्यासाठीची कोणतीही प्रक्रिया या अधिनियमान्वये कायदेशीर रीतीने बजावताना असा तपशील उघड करावा लागत असेल तर, असा तपशील उघड करणे ; किंवा

(घ) या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये, त्याखालील कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास प्राधिकृत केलेल्या अशा कोणत्याही प्राधिकाऱ्याने, कोणत्याही कार्यवाहीतून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही प्रकरणाशी संबंधित असणाऱ्या ज्या कोणत्याही दाव्यात शासन किंवा या अधिनियमान्वये कोणताही प्राधिकारी पक्षकार असेल, त्या कोणत्याही दिवाणी न्यायालयासमोरील दाव्यात किंवा कार्यवाहीमध्ये असा कोणताही तपशील उघड करणे ; किंवा

(ङ) या अधिनियमान्वये लादण्यात आलेल्या कराच्या प्राप्त रकमांची किंवा परताव्याच्या रकमांची लेखापरीक्षा करण्याच्या प्रयोजनाकरिता नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास असा कोणताही तपशील उघड करणे ; किंवा

(च) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती किंवा कोणत्याही व्यक्ती यांस, या अधिनियमान्वये नियुक्त किंवा प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या वर्तणुकीसंबंधी करावयाच्या कोणत्याही चौकशीच्या प्रयोजनांसाठी संबंधित असलेला असा कोणताही तपशील उघड करणे ; किंवा

(छ) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याकडे, कोणताही कर किंवा शुल्क आकारणे किंवा वसूल करणे त्या शासनाला शक्य होण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक वाटेल असे कोणतेही तपशील उघड करणे.

(ज) लोकसेवकाने किंवा इतर कोणत्याही सांविधिक प्राधिकाऱ्याने त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्यान्वये त्याच्या किंवा त्यांच्या अधिकारांचा वापर करताना जे तपशील उघड करणे हे कायदेशीर आहे असे कोणतेही तपशील उघड करणे ; किंवा

(झ) विधि व्यवसायी, परिव्यय लेखापाल, सनदी लेखापाल किंवा कंपनी सचिव यांच्याविरुद्ध या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात गैरवर्तणुकीच्या आरोपाच्या कोणत्याही चौकशीच्या संबंधात असलेले जे तपशील, विधि व्यवसायी, कर व्यवसायी, परिव्यय लेखापाल, सनदी लेखापाल किंवा यथास्थिति, कंपनी सचिव

म्हणून व्यवसाय करणाऱ्या सदस्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास उघड करता येईल, असा कोणताही तपशील उघड करणे ; किंवा

(ञ) कोणत्याही स्वयंचलित यंत्रणेवर माहिती नोंदविण्याच्या प्रयोजनार्थ किंवा कोणतीही स्वयंचलित यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या, तिची दर्जावाढ करण्याच्या किंवा तिचे परिरक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ, जेथे असे अभिकरण हे, उपरोक्त प्रयोजनांखेरीज अशा तपशिलांचा वापर न करण्यासाठी किंवा असे तपशील उघड न करण्यासाठी कराराद्वारे बांधील असेल तेथे नियुक्त केलेल्या कोणत्याही अभिकरणाकडे कोणतेही तपशील उघड करणे.

(ट) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या प्रयोजनार्थ, आवश्यक असेल त्याप्रमाणे अशा शासनाच्या अधिकाऱ्यास कोणतेही असे तपशील उघड करणे ; आणि

(ठ) अशी माहिती प्रसिद्ध करणे लोकहितार्थ इष्ट आहे, असे आयुक्ताचे मत असेल तर, एखाद्या करपात्र व्यक्तीच्या वर्गासंबंधीची किंवा व्यवहाराच्या वर्गासंबंधीची कोणतीही माहिती उघड करणे, यांसाठी लागू असणार नाही.

विवक्षित प्रकरणांत, व्यक्तींच्या संबंधातील माहिती प्रसिद्ध करणे.

**१५९.** (१) जर आयुक्ताच्या किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याच्या मते, या अधिनियमान्वये कोणत्याही कार्यवाहीशी किंवा खटल्यांशी संबंधित कोणत्याही व्यक्तींचे नाव आणि कोणतेही अन्य तपशील प्रसिद्ध करणे हे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट असेल तर, अशा व्यक्तीच्या बाबतीत, त्याला योग्य वाटेल अशा रीतीने असे नाव आणि असे तपशील प्रसिद्ध करून घेता येईल.

(२) कलम १०७ अन्वये अपील प्राधिकाऱ्याकडे अपील सादर करण्याची मुदत पूर्ण होईपर्यंत अपील सादर करण्यात आले नसेल तर किंवा अपील सादर करण्यात आले असेल तर, ते निकालात काढण्यात येईपर्यंत, या अधिनियमान्वये लादण्यात आलेल्या शास्तीच्या संबंधात या कलमाखाली काहीही प्रसिद्ध करण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.—**भागीदारी संस्था, कंपनी किंवा व्यक्तींचा इतर संघ यांच्या बाबतीत, भागीदारी संस्थेच्या भागीदारांची, कंपनीच्या संचालकांची, व्यवस्थापकीय अभिकर्त्यांची, सचिवांची व कोषाध्यक्षांची किंवा व्यवस्थापकांची किंवा, यथास्थिति, संघाच्या सदस्यांची नावे ही जर आयुक्ताच्या किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याच्या मते प्रकरणाच्या परिस्थितीनुरूप नावे देखील प्रसिद्ध करणे समर्थनीय ठरत असेल तर प्रसिद्ध करता येतील.

निर्धारणांची कार्यवाही, इत्यादी विवक्षित कारणांमुळे विधिअग्राह्य न ठरणे.

**१६०.** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीला अनुसरून पूर्ण केलेले, स्वीकारलेले, केलेले, दिलेले, सुरुवात केलेले किंवा पूर्ण केल्याचे, स्वीकारल्याचे, केल्याचे, दिल्याचे, सुरुवात केल्याचे अभिप्रेत असलेले कोणतेही निर्धारण, पुनर्निर्धारण, अभिनिर्णय, पुनर्विलोकन, पुनरीक्षण, अपील, दुरुस्ती, नोटीस, समन्स किंवा अन्य कार्यवाही यांचा आशय आणि प्रभाव हा, या अधिनियमाच्या किंवा विद्यमान कायद्याच्या उद्देशाशी, प्रयोजनाशी आणि

आवश्यक्तांशी सुसंगत किंवा त्यानुसार असेल तर, केवळ असे निर्धारण, पुनर्निर्धारण, अभिनिर्णय, पुनर्विलोकन, पुनरीक्षण, अपील, दुरुस्ती, नोटीस, समन्स किंवा अन्य कार्यवाही यातील कोणतीही चूक, दोष किंवा कसूर याच कारणामुळे विधिअग्राह्य ठरणार नाही किंवा विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही.

(२) जर कोणतीही नोटीस, आदेश किंवा, यथास्थिति, पत्रव्यवहार ज्याला पाठविण्यात आला असेल, त्या व्यक्तीने आधीच त्यावर कारवाई केली असेल तर किंवा ज्याच्या बजावणीस अशी नोटीस, आदेश किंवा पत्रव्यवहार यानुसार अगोदर सुरू झालेल्या, चालू असलेल्या किंवा पूर्ण झालेल्या कार्यवाहीमध्ये अथवा कार्यवाहीच्या बाबतीत आक्षेप घेण्यात आला नसेल तर, कोणत्याही नोटिशीच्या, आदेशाच्या किंवा पत्रव्यवहाराच्या बजावणीस आक्षेप घेण्यात येणार नाही.

अभिलेखावरून उघड होणाऱ्या चुका दुरुस्त करणे.

**१६१.** कलम १६० च्या तरतुदींना बाध न आणता, आणि या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही निर्णय किंवा आदेश देणाऱ्या किंवा नोटीस बजावणाऱ्या किंवा प्रमाणपत्र किंवा कोणतेही अन्य कागदपत्र निर्गमित करणाऱ्या कोणत्याही प्राधिकाऱ्याला, असा निर्णय किंवा आदेश किंवा नोटीस किंवा प्रमाणपत्र किंवा कोणतेही अन्य कागदपत्र यामधील अभिलेखावरून उघड दिसून येणारी कोणतीही चूक एकतर स्वत:हून किंवा जेथे अशी चूक या अधिनियमाखाली नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने किंवा केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमाखाली नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने किंवा बाधित झालेल्या व्यक्तीने असा निर्णय किंवा आदेश किंवा नोटीस किंवा प्रमाणपत्र किंवा, यथास्थिति, अन्य कागदपत्र निर्गमित केल्याच्या दिनांकापासून तीन महिने इतक्या कालावधीच्या आत निदर्शनास आणली असेल तेथे ती कोणतीही चूक दुरुस्त करता येईल :

परंतु, असा निर्णय किंवा आदेश किंवा नोटीस किंवा प्रमाणपत्र किंवा अन्य कोणतेही कागदपत्र निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीनंतर अशी कोणतीही दुरुस्ती केली जाणार नाही :

परंतु आणखी असे की, उक्त सहा महिन्यांचा कालावधी, जेथे दुरुस्ती ही, निव्वळ लेखनाच्या अचूकतेच्या स्वरूपातील असेल किंवा कोणत्याही अनवधानाने झालेल्या चुकीमुळे किंवा वगळण्यामुळे होणारी गणितीय चूक असेल अशा बाबतीत, लागू होणार नाही :

परंतु तसेच, जर कोणतीही व्यक्ती, अशी दुरुस्ती केल्यामुळे प्रतिकूलरीत्या बाधित होत असेल तर, अशी दुरुस्ती अंमलात आणण्यासाठी प्राधिकाऱ्याकडून नैसर्गिक न्यायाचे तत्त्व अनुसरण्यात येईल.

दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेस रोध.

**१६२.** कलमे ११७ व ११८ मध्ये तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, कोणत्याही, दिवाणी न्यायालयाकडे या अधिनियमान्वये केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीमधून किंवा त्याबाबत कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, त्यासंबंधीची कार्यवाही करण्याची किंवा निर्णय घेण्याची कोणतीही अधिकारिता असणार नाही.

फी आकारणे.

**१६३.** जेव्हा जेव्हा कोणत्याही आदेशाची किंवा कागदपत्राची प्रत, अर्ज करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला त्या प्रयोजनार्थ पुरवावयाची असेल तेव्हा तेव्हा, विहित करण्यात येईल अशी फी भरण्यात येईल.

नियम करण्याचा शासनाचा अधिकार.

**१६४.** (१) शासनाला परिषदेच्या शिफारशींवरून, अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, शासनास, या अधिनियमाद्वारे, सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता विहित करणे आवश्यक असतील किंवा विहित करण्यात येतील किंवा ज्या नियमांद्वारे तरतुदी करावयाच्या आहेत किंवा करण्यात येतील असे नियम करता येतील.

(३) या कलमान्वये प्रदान केलेल्या नियम करण्याच्या अधिकारात, नियमांना किंवा त्यापैकी कोणत्याही नियमास, या अधिनियमाच्या तरतुदी ज्या दिनांकास अंमलात आल्या असतील त्या दिनांकाच्या अगोदरच्या नसलेल्या दिनांकापासून भूतलक्षी प्रभाव देण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांत, त्याचे उल्लंघन झाल्यास दहा हजार रुपयांहून अधिक नसेल एवढ्या शास्तीसाठी पात्र असेल अशी तरतूद करता येईल.

विनियम करण्याचा अधिकार.

**१६५.** शासनास, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाशी व त्याखाली केलेल्या नियमांशी सुसंगत असतील असे विनियम करता येतील.

नियम, विनियम व अधिसूचना मांडणे.

**१६६.** शासनाने, या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, विनियम आणि काढलेली प्रत्येक अधिसूचना, अशा प्रकारे ते करण्यात आल्यानंतर किंवा ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येतील आणि ज्या अधिवेशनात ते अशा रीतीने ठेवण्यात येतील ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, अशा नियमांपैकी कोणत्याही नियमात किंवा विनियमात किंवा अधिसूचनेत राज्य विधानमंडळाने कोणताही फेरबदल केला तर किंवा असा कोणताही नियम, विनियम करण्यात येऊ नये किंवा अधिसूचना काढण्यात येऊ नये याबाबत त्याची सहमती झाली तर, असे नियम, विनियम किंवा, यथास्थिति, अधिसूचना त्यानंतर अशा फेरबदल केलेल्या, स्वरूपातच अंमलात येतील किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाहीत. तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे नियमाखाली, विनियमाखाली किंवा, यथास्थिति, अधिसूचनेखाली पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**१६७.** आयुक्तास, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केले असेल त्याप्रमाणे अशा शर्तींच्या अधीन, कोणत्याही असल्यास, या अधिनियमान्वये कोणत्याही प्राधिकऱ्याकडून किंवा अधिकाऱ्याकडून वापरण्याजोगा कोणताही अधिकार अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केले असेल त्याप्रमाणे दुसऱ्या प्राधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने देखील वापरण्याजोगा असेल असा निदेश अधिसूचनेद्वारे देता येईल. अधिकारांचे प्रत्यायोजन.

**१६८.** आयुक्तास, अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये एकरूपता आणण्याच्या प्रयोजनासाठी असे करणे आवश्यक आहे किंवा इष्ट आहे असे त्यास वाटत असेल तर, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे राज्य कर अधिकाऱ्यास असे आदेश, सूचना किंवा निदेश काढता येतील आणि या अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये सेवानियुक्त केलेले असे सर्व अधिकारी व सर्व इतर व्यक्ती अशा आदेशांचे, सूचनांचे व निदेशांचे अनुसरण व अनुपालन करतील. सूचना व निदेश देण्याचा अधिकार.

**१६९.** (१) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये कोणताही निर्णय, आदेश, समन्स, नोटीस किंवा इतर पत्रव्यवहार पुढील पद्धतींपैकी कोणत्याही एका पद्धतीने बजावण्यात येईल :– विवक्षित परिस्थितीत नोटीस बजावणे.

(क) प्रेषितीला किंवा करपात्र व्यक्तीला किंवा त्याच्या व्यवस्थापकाला किंवा प्राधिकृत प्रतिनिधीला किंवा करपात्र व्यक्तीच्या वतीने कार्यवाहीच्या वेळी उपस्थित राहण्यासाठी प्राधिकार धारण करणाऱ्या अधिवक्त्याला किंवा कर व्यावसायिकाला किंवा धंद्याच्या संबंधात त्याने नियमितपणे नियुक्त केलेल्या व्यक्तीला किंवा करपात्र व्यक्तीबरोबर राहणाऱ्या कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला कुरिअरसह संदेश वाहकाद्वारे किंवा प्रत्यक्ष देऊन किंवा देऊ करून ; किंवा

(ख) ज्या व्यक्तीला द्यायचा उद्देश आहे त्या व्यक्तीला किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीला, कोणताही असल्यास, त्याच्या शेवटी माहीत असलेल्या धंद्याच्या ठिकाणी किंवा निवासस्थानी पोच देय नोंदणीकृत डाकेने किंवा शिघ्र डाकेने किंवा कुरिअरने ; किंवा

(ग) नोंदणीच्या वेळी त्याने दिलेल्या किंवा वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे त्याच्या ई-मेल पत्त्यावर पत्रव्यवहार करून ; किंवा

(घ) सामाईक पोर्टलवर उपलब्ध करून देऊन ; किंवा

(ङ) करपात्र व्यक्ती किंवा जिला द्यावयाचे आहे ती व्यक्ती, ज्या शेवटी माहीत असलेल्या पत्त्यावर राहत होती, धंदा करीत होती किंवा लाभासाठी व्यक्तिशः कार्य करत होती तेथील स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धी देऊन ; किंवा

(च) जर वरीलपैकी कोणतीही पद्धत व्यवहार्य नसेल तर, तिच्या शेवटी माहीत असलेल्या धंद्याच्या किंवा निवासाच्या ठिकाणी ठळक जागी चिकटवून आणि कोणत्याही कारणास्तव जर अशी व्यवहार्य नसेल तर, जो किंवा जेथून असा निर्णय किंवा आदेश दिला जातो किंवा समन्स किंवा नोटीस काढली जाते त्या संबंधित अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या नोटीस फलकावर.

(२) प्रत्येक निर्णय, आदेश, समन्स, नोटीस किंवा कोणताही पत्रव्यवहार हा तो पोट-कलम (१) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने ज्या दिनांकास केला असेल किंवा प्रसिद्ध झाला असेल किंवा त्याची प्रत चिकटविण्यात आली असेल त्या दिनांकास बजावण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) जेव्हा असा निर्णय, आदेश, समन्स, नोटीस किंवा कोणताही पत्रव्यवहार नोंदणीकृत डाकेने किंवा शिघ्र डाकेने पाठविण्यात आला असेल तर, तद्विरुद्ध सिद्ध झाले नसेल तर असे टपाल पोहोचण्यासाठी साधारणपणे जेवढा वेळ लागतो तो कालावधी समाप्त झाल्याच्या वेळी प्रेषितीला तो मिळाला असल्याचे मानण्यात येईल.

कर, इत्यादी रक्कम पूर्णांकात करणे.

**१७०.** या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये कर, व्याज, शास्ती, दंड किंवा प्रदेय असलेली कोणतीही अन्य रक्कम आणि परताव्याची रक्कम किंवा देय असलेली इतर रक्कम लगतच्या पूर्ण रुपयात करण्यात येईल आणि या प्रयोजनासाठी जेथे अशा रकमेमध्ये रुपयातील पैशाचा भाग अंतर्भूत असेल तेव्हा, जर असा भाग पन्नास पैसे किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर तो एक रुपयापर्यंत वाढविण्यात येईल आणि असा भाग पन्नास पैशांपेक्षा कमी असेल तेव्हा तो विचारात घेतला जाणार नाही.

नफेखोरीविरोधी उपाय.

**१७१.** (१) कोणत्याही वस्तूंच्या किंवा सेवांच्या पुरवठ्यावरील कराच्या दरातील कोणतीही घट किंवा निविष्टी कर जमा रकमेवरील लाभ हे, किंमतीमध्ये अनुरूप घट करून पुढे प्राप्तकर्त्याला देण्यात येतील.

(२) केंद्र सरकारला, परिषदेच्या शिफारशींवरून, कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीने घेतलेली निविष्टी कराची जमा रक्कम किंवा कराच्या दरातील घट याचा त्याने पुरविलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या किंमतीमध्ये प्रत्यक्षात अनुरूप घट होते किंवा कसे याची तपासणी करण्याकरिता अधिसूचनेद्वारे प्राधिकरण घटित करता येईल किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेल्या विद्यमान प्राधिकरणाकडे अधिकार प्रदान करता येतील.

(३) पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेले प्राधिकरण विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असे अधिकार वापरील आणि अशी कार्ये पार पाडील.

**१७२.** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, शासनास, परिषदेच्या शिफारशींवरून, **राजपत्रात** सर्वसाधारण किंवा विशेष आदेश प्रसिद्ध करून उक्त अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा इष्ट असेल त्याप्रमाणे या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या किंवा विनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करता येतील : अडचणी दूर करणे.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर कोणताही असा आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल.

**१७३.** (१) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व त्या दिनांकापासून पुढील कायदे याद्वारे निरसित करण्यात आले आहेत (यानंतर ज्यांचा निर्देश निरसित अधिनियम असा करण्यात आला आहे) :— निरसन.

१९२५ चा ६. (क) मुंबई पणकर अधिनियम, १९२५.

१९६२ चा महा. ९. (ख) महाराष्ट्र ऊस खरेदीवरील कर अधिनियम, १९६२.

१९६७ चा महा. १८. (ग) महाराष्ट्र जाहिरातींवरील कर अधिनियम, १९६७.

१९८३ चा महा. २२. (घ) महाराष्ट्र वनविकास (शासनाकडून अथवा वनविकास महामंडळाकडून होणाऱ्या वनोत्पादनाच्या विक्रीवरील कर (चालू राहणे) अधिनियम, १९८३.

१९८७ चा महा. ४१. (ङ) महाराष्ट्र ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७.

१९८७ चा महा. ४२. (च) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांमध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७.

२००३ चा महा. ४. (छ) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशांवरील कर अधिनियम, २००२.

२००६ चा महा. ४३. (ज) महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर अधिनियम, २००६.

(२) निरसित करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमांन्वये किंवा, अशा निरसित करण्यात आलेल्या तरतुदीन्वये देण्यात आलेले प्रत्येक नोंदणी प्रमाणपत्र, लायसन किंवा यथास्थिति, परवानगी नियत केलेल्या दिवसापासून रद्द होईल.

**१७४.** (१) उक्त अधिनियमाचे कलम १७३ मध्ये विनिर्दिष्ट केलेले निरसन,— व्यावृत्ती.

(क) अशा निरसनाच्या वेळी अंमलात नसलेले किंवा अस्तित्त्वात नसलेले काहीही पुनरुज्जीवित होणार नाही ; किंवा

(ख) अशा निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमितीच्या किंवा त्याच्या भागाच्या पूर्व प्रवर्तनावर आणि त्याखालील आदेश किंवा यथोचितरीत्या करण्यात आलेल्या किंवा बाधित झालेल्या कोणत्याही बाबीवर परिणाम होणार नाही ; किंवा

(ग) निरसित कलेल्या अधिनियान्वये किंवा निरसित केलेल्या अधिनियमांखालील आदेशान्वये कोणताही अधिकार, विशेषाधिकार, आबंधने किंवा संपादित केलेले, उपार्जित केलेले किंवा दायित्व यांवर काहीही परिणाम होणार नाही ; किंवा

(घ) निरसित केलेल्या अधिनियमांच्या तरतुदींन्वये देय असलेला किंवा देय होईल असा कोणताही कर, अधिभार, शास्ती, व्याज, शुल्क किंवा दंड किंवा निरसित केलेल्या अधिनियमांच्या तरतुदींविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाबाबत किंवा भंगाबाबत केलेले समपहरण किंवा लादलेली शास्ती यांवर परिणाम होणार नाही ; किंवा

(ङ) पूर्वी म्हटल्याप्रमाणे कोणतेही अन्वेषण, चौकशी, लेखापरीक्षा, निर्धारित कर, पुनर्निर्धारण, परतावा, निर्धारण, आगाऊ अधिनिर्णय आणि कोणताही असा कर, अधिभार, शास्ती, व्याज, शुल्क, द्रव्यदंड, अधिकार, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व किंवा समपहरण किंवा दंड याबाबतीतील कोणतीही कायदेशीर कार्यवाही किंवा थकबाकीची वसुली किंवा त्याबाबतचे उपाय यांवर परिणाम होणार नाही आणि पूर्वी म्हटल्याप्रमाणे, कोणतेही असे अन्वेषण, चौकशी, लेखापरीक्षा, निर्धारित कर, पुनर्निर्धारण, परतावा, निर्धारण, आगाऊ अधिनिर्णय, परिशोधन, आणि असा कोणताही कर, अधिभार, शास्ती, व्याज, शुल्क, व्याज, अधिकार, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व, समपहरण किंवा दंड यांबाबतची कोणतीही इतर कायदेशीर कार्यवाही किंवा थकबाकीची वसुली किंवा त्याबाबतचे उपाय सुरू करता येतील, पुढे चालू ठेवता येतील किंवा लागू करता येतील, आणि असा कोणताही कर, अधिभार, शास्ती, व्याज, शुल्क, द्रव्यदंड, समपहरण किंवा दंड हे अधिनियम अशा प्रकारे निरसित करण्यात आले नव्हते असे समजून वसूल करण्यात येतील किंवा आकारण्यात येतील ; किंवा

(च) उक्त निरसित केलेल्या अधिनियमांन्वये किंवा निरसित केलेल्या तरतुदींन्वये नियत दिवसापूर्वी, त्या दिवसास किंवा त्यानंतर दाखल केलेले अपील, पुनरीक्षण, पुनर्विलोकन किंवा संदर्भ यासंबंधित कोणत्याही कार्यवाहीवर परिणाम होणार नाही, आणि अशी कार्यवाही, उक्त निरसित केलेल्या अधिनियमान्वये किंवा निरसित केलेल्या तरतुदींन्वये, हा अधिनियम अंमलात आला नव्हता असे समजून, चालू ठेवण्यात येईल.

(छ) कोणताही कर बसविण्याच्या, त्याच्या विवरणाच्या, आकारणीच्या, फेरआकारणीच्या, अपिलाच्या, निर्धारणाच्या, पुनरीक्षणाच्या, दुरुस्तीच्या, निर्देशाच्या, मुदत, हिशेब व कागदपत्रे प्रस्तुत करण्याच्या आणि त्याच्या तपासणीच्या, जागेची झडती घेण्याच्या, कार्यवाही हस्तांतरण करण्याच्या, आणि कराच्या प्रदानाच्या आणि वसुलीच्या, लाभांच्या एकत्रित ठरीव प्रमाणाच्या परिगणनेच्या, कर प्रदानातून सूट देण्याच्या व कर

प्रदानांचा देय दिनांक लांबणीवर टाकण्याच्या, हक्कविषयक प्रमाणपत्र रद्द करण्याच्या, मूळ स्रोतातून कर वसुलीच्या, किंवा वजातीच्या, कोणत्याही कर परताव्याच्या किंवा वजावटीच्या, कोणताही परतावा रोखून ठेवण्याच्या, कर प्रदानातून सूट देण्याच्या, आकडेवारी गोळा करण्याच्या, नियम करण्याच्या अधिकाराच्या, कोणतीही शास्ती लादण्याच्या किंवा व्याज आकारण्याच्या किंवा कोणत्याही रकमेचे समपहरण करण्याच्या प्रयोजनासाठी, जेथे असा कर बसवण्याचा, विवरणाचा, आकारणी करण्याचा, फेरआकारणी करण्याचा, अपिलांचा, निर्धारणाचा, पुनरीक्षणाचा, दुरुस्तीचा, निर्देशाचा, मुदतमर्यादेचा, प्रदानाचा व वसुलीचा, लाभांच्या एकत्रित ठरीव प्रमाणाच्या परिगणनेचा, कर प्रदानातून सूट देण्याच्या व कर प्रदानांचा देय दिनांक लांबणीवर टाकण्याच्या, हक्कविषयक प्रमाणपत्र रद्द करण्याच्या, वसुली करण्याच्या, मूळ स्रोतातून कर वजातीच्या, परताव्याच्या किंवा वजावटीच्या, कोणताही परतावा रोखून ठेवण्याच्या, कर भरण्यापासून सूट देण्याच्या, आकडेवारी गोळा करण्याच्या, नियम करण्याच्या अधिकाराचा, मुदतमर्यादेचा, हिशेब आणि दस्तऐवज प्रस्तुत करण्याचा आणि त्यांच्या तपासणीचा आणि जागेची झडती घेण्याचा, कार्यवाही हस्तांतरणांचा, कोणतीही शास्ती लादण्याचा किंवा व्याज आकारण्याचा किंवा कोणत्या रकमेचे समपहरण करण्याचा संबंध नियत दिवसापूर्वीच संपलेल्या कोणत्याही कालावधीशी असेल, तेथे त्या प्रयोजनासाठी किंवा उपरोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाशी संबंध असलेल्या किंवा त्यास आनुषंगिक असलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी, ते कायदे (त्यांच्या कोणत्याही तरतुदींन्वये अंमलात असलेल्या कोणत्याही पूर्वीच्या कायद्यासह) आणि त्या कायद्यान्वये केलेले व नियत दिवसाच्या लगतपूर्वी, अंमलात असलेले सर्व नियम, विनियम, आदेश, अधिसूचना, नमुने, प्रमाणपत्रे आणि नोटिशी, नेमणुका आणि अधिकार सोपवणे ह्या बाबींकरिता या अधिनियमाच्या इतर तरतुदी लागू होतील तितपत त्यांना अधीन राहून, अंमलात असण्याचे चालू राहतील- मग अशा कार्यवाहीच्या संबंधातील कर, शास्ती, व्याज समपहृत रक्कम, किंवा मूळ स्रोतातून केलेली कर वजात, कोणतीही असल्यास, नियत दिवसात किंवा त्यापूर्वी भरण्यात आली असो वा नसो ;

(२) पूर्ववर्ती पोट-कलमांतील तरतुदींना बाध न येता, महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमाची कलमे ७ आणि २५ ही, या कलमांमध्ये उल्लेखिलेल्या कायद्यांपैकी कोणत्याही कायद्याने निरसन करण्याच्या संबंधात, जणू काही अशा रीतीने निरसन केलेला कायदा हा उक्त अधिनियमाच्या कलम ७च्या अर्थांतर्गत अधिनियमित करण्यात आला होता असे समजून, लागू होतील.

## अनुसूची एक

[कलम ७ पहा]

### मोबदला न घेताही व्यवहार केला असल्यास त्यास पुरवठा म्हणून समजणे

**१.** जेथे धंद्याच्या मत्तांवर निविष्टी कराची जमा रक्कम घेतली असेल अशा मत्तांचे कायमस्वरूपी हस्तांतरण किंवा त्याची विल्हेवाट.

**२.** कलम २५ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे संबंधित व्यक्तींमध्ये किंवा भिन्न व्यक्तींमध्ये वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा, जेव्हा असा पुरवठा धंदयाच्या ओघात किंवा धंद्याच्या अभिवृद्धीसाठी केलेला असेल :

परंतु, नियोक्त्याने कर्मचाऱ्याला दिलेली एका वित्तीय वर्षामध्ये पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतके मूल्य असलेली बक्षिसी, वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा म्हणून समजण्यात येणार नाही.

**३. वस्तूंचा पुरवठा—**

(क) प्रकर्त्याच्या वतीने अशा वस्तूंचा पुरवठा करण्याची जबाबदारी जेव्हा अभिकर्ता घेईल तेव्हा अशा प्रकर्त्याने त्याच्या अभिकर्त्याला केलेला वस्तूंचा पुरवठा ; किंवा

(ख) प्रकर्त्याच्या वतीने अशा वस्तू प्राप्त करण्याची जबाबदारी जेव्हा अभिकर्ता घेईल तेव्हा अशा अभिकर्त्याने त्याच्या प्रकर्त्याला केलेला वस्तूंचा पुरवठा.

**४.** धंद्याच्या ओघात किंवा धंद्याच्या अभिवृद्धीसाठी एखाद्या करपात्र व्यक्तीने त्याच्याशी संबंधित व्यक्तीकडून किंवा भारताबाहेरील त्याच्या कोणत्याही अन्य आस्थापनांकडून सेवांची केलेली आयात.

## अनुसूची दोन

[कलम ७ पहा]

### वस्तूंचा पुरवठा किंवा सेवांचा पुरवठा समजावयाचे व्यवहार

**१. हस्तांतरण.—**(क) वस्तूंमधील मालकी हक्कांचे कोणतेही हस्तांतरण हे वस्तूंचा पुरवठा आहे ;

(ख) वस्तूंमधील मालकी हक्काचे हस्तांतरण न करता, वस्तूंमधील कोणत्याही हक्कांचे किंवा त्या वस्तूंमधील अविभाजित हिश्शाचे कोणतेही हस्तांतरण हे सेवांचा पुरवठा आहे ;

(ग) ज्या करारान्वये मान्य केल्याप्रमाणे संपूर्ण मोबदल्याचे प्रदान केल्यावर भावी दिनांकास वस्तूंमधील स्वामित्व संक्रामित होईल अशा कोणत्याही कराराखालील वस्तूमधील मालकी हक्काचे कोणतेही हस्तांतरण हे, वस्तूंचा पुरवठा आहे.

२. **जमीन व इमारत**

(क) जमिनीच्या भोगवट्यासाठी कोणताही भाडेपट्टा, कुळवहिवाट, सुविधाधिकार, लायसन हा सेवांचा पुरवठा आहे.

(ख) व्यवसाय किंवा वाणिज्य यासाठी वाणिज्यिक, औद्योगिक अथवा निवासी संकुलासह इमारतीचा कोणताही भाडेपट्टा किंवा तो भाड्याने देणे—मग ते पूर्णपणे असो वा अंशतः असो, हा सेवांचा पुरवठा आहे.

३. **संस्करण किंवा प्रक्रिया.**—अन्य व्यक्तीच्या वस्तूंवर केले जाईल असे कोणतेही संस्करण किंवा प्रक्रिया ही सेवांचा पुरवठा आहे.

४. **धंद्याच्या मत्तांचे हस्तांतरण.**—(क) जेथे एखाद्या धंद्याच्या मत्तांचा भाग असणाऱ्या ज्या वस्तू त्या मत्तांचा भाग राहिलेल्या नसतील अशा वस्तू, तो धंदा चालवणाऱ्या व्यक्तीच्या निदेशांद्वारे किंवा त्याअन्वये हस्तांतरित केलेल्या असतील किंवा त्यांची विल्हेवाट लावलेली असेल—मग त्यांचा मोबदला घेतलेला असो किंवा नसो, तेथे त्या व्यक्तीकडून होणारे असे हस्तांतरण किंवा विल्हेवाट ही, वस्तूंचा पुरवठा आहे ;

(ख) जेथे एखाद्या धंद्याच्या प्रयोजनासाठी धारण केलेल्या किंवा त्याच्या वापरासाठी असलेल्या वस्तू, तो धंदा चालवणाऱ्या व्यक्तीच्या निदेशांद्वारे किंवा त्याअन्वये कोणत्याही खाजगी वापरासाठी अभिहस्तांकित केलेल्या असतील किंवा त्या वापरलेल्या असतील, किंवा त्या धंद्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी, वापरण्याकरिता कोणत्याही व्यक्तीला त्या वस्तू उपलब्ध करून दिलेल्या असतील—मग त्यांचा मोबदला घेतलेला असो किंवा नसो, तेथे अशा वस्तूंचा वापर किंवा अशा वस्तू उपलब्ध करून देणे हा, सेवांचा पुरवठा आहे ;

(ग) जेथे कोणतीही व्यक्ती ही करपात्र व्यक्ती असल्याचे बंद होईल तेथे, ती चालवीत असलेल्या कोणत्याही धंद्याच्या मत्तांचा भाग असणाऱ्या कोणत्याही वस्तूंचा, ती करपात्र व्यक्ती असण्याचे बंद होण्याच्या लगतपूर्वी, तिच्या धंद्याच्या ओघात किंवा त्याच्या अभिवृद्धीसाठी, तिने वस्तूंचा पुरवठा केला आहे, असे मानण्यात येईल, मात्र,—

(एक) तो धंदा एक किफायतशीर धंदा म्हणून दुसऱ्या व्यक्तीला हस्तांतरित केलेला असेल ; किंवा

(दोन) जिला एक करपात्र व्यक्ती मानता येईल अशा वैयक्तिक प्रतिनिधीकडून तो धंदा चालविला जात असेल, तर ती बाब अलहिदा.

५. **सेवांचा पुरवठा.**—पुढील बाबींना सेवांचा पुरवठा समजण्यातं येईल, त्या बाबी अशा,—

(क) स्थावर मालमत्ता भाड्याने देणे ;

(ख) जेथे आवश्यक असेल तेथे सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे पूर्तता प्रमाणपत्र दिल्यानंतर किंवा पहिल्या भोगवट्यानंतर यांपैकी जे आधी घडेल त्यानंतर संपूर्ण मोबदला प्राप्त करण्यात आला असेल ते, खेरीज करून, खरेदीदाराला विक्री करण्याचा उद्देश असलेल्या संकुलासह किंवा इमारतीसह, संकुल, इमारत, नागरी बांधकाम किंवा त्याचा भाग यांचे बांधकाम करणे.

**स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनार्थ,—

(१) " सक्षम प्राधिकारी " या शब्दप्रयोगाचा अर्थ, शासन किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये पूर्तता प्रमाणपत्र देण्यासाठी त्याने प्राधिकृत केलेला कोणताही प्राधिकारी, असा आहे आणि अशा प्राधिकाऱ्याकडून अशा प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याच्या बाबतीत, पुढीलपैकी कोणत्याही व्यक्तीकडील प्रमाणपत्र लागेल, त्या व्यक्ती अशा,—

(एक) वास्तुशास्त्रज्ञ अधिनियम, १९७२ याअन्वये घटित केलेल्या वास्तुशास्त्र परिषदेचा नोंदणीकृत वास्तुशास्त्रज्ञ ; किंवा

(दोन) (भारतीय) अभियंता संस्थेकडे नोंदणी केलेला सनदी अभियंता ; किंवा

(तीन) शहर किंवा नगर किंवा ग्राम किंवा विकास किंवा नियोजन प्राधिकरण यांच्याशी संबंधित असलेल्या स्थानिक संस्थेचा लायसनधारी सर्वेक्षक :

(२) " बांधकाम " या शब्दप्रयोगामध्ये, कोणत्याही विद्यमान नागरी संरचनेमध्ये भर घालणे, फेरफार करणे तिची प्रतिस्थापना किंवा पुर्नरचना करणे यांचा समावेश असेल ;

(ग) कोणत्याही बौद्धिक संपदा हक्काचे तात्पुरते हस्तांतरण किंवा त्याच्या वापराची किंवा उपभोगाची परवानगी ;

(घ) माहिती तंत्रज्ञान संगणक प्रणालीचा विकास, संकल्पन, संगणक प्रणालीचे कार्यक्रम, रीत, रुपांतर, अद्ययावतीकरण, गुणवत्तावाढ, कार्यान्वयन ;

(ङ) रोख रक्कम, विलंबित प्रदान किंवा अन्य मौल्यवान मोबदला यासाठी कोणत्याही प्रयोजनाकरिता (मग ते विनिर्दिष्ट कालावधीसाठी असो वा नसो) कोणत्याही वस्तूंचा उपयोग करण्यासाठीच्या अधिकाराचे हस्तांतरण.

(च) अशी कृती करण्यापासून वंचित राहणे किंवा एखादी कृती किंवा परिस्थिती सहन करणे किंवा कोणतीही कृती करणे याबाबतच्या बंधनकारकतेला संमती देणे ;

**६. संयुक्त पुरवठा.—**पुढील संयुक्त पुरवठा हा, सेवांचा पुरवठा असल्याचे समजण्यात येईल, तो पुरवठा असा :—

(क) कलम २ च्या खंड (११९) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कार्य कंत्राट ; आणि

(ख) जेथे असा पुरवठा किंवा सेवा हा रोख रक्कम, विलंबित प्रदान किंवा अन्य मौल्यवान मोबदला या स्वरूपात केलेला असेल तेथे, मानवी सेवनासाठी असणारे अन्न किंवा कोणतेही अन्य पदार्थ किंवा कोणतेही पेय (मानवी सेवनासाठी मद्यार्क युक्त मद्य याखेरीज) अशा वस्तूंचा कोणत्याही सेवेच्या स्वरूपात किंवा त्याचा भाग म्हणून किंवा कोणत्याही अन्य रीतीने केलेला पुरवठा.

७. **वस्तूंचा पुरवठा.**—पुढील बाबी वस्तूंचा पुरवठा असल्याचे मानण्यात येईल, त्या बाबी अशा :—

कोणत्याही अविधिसंस्थापित संघाने किंवा व्यक्तींच्या मंडळाने त्याच्या सदस्यांना रोख रक्कम विलंबित प्रदान किंवा अन्य मौल्यवान मोबदला यासाठी केलेला वस्तूंचा पुरवठा.

## अनुसूची तीन

[कलम ७ पहा]

## वस्तूंचा पुरवठा किंवा सेवांचा पुरवठा ठरणार नाहीत असे व्यवहार किंवा संव्यवहार

१. कर्मचाऱ्याने आपल्या नोकरीच्या ओघात किंवा त्या संबंधात नियोक्त्याला दिलेल्या सेवा.

२. त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये स्थापित केलेल्या कोणत्याही न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या सेवा.

३. (क) संसद सदस्यांनी, राज्य विधानमंडळ सदस्यांनी, पंचायत सदस्यांनी, नगरपालिका सदस्यांनी आणि अन्य स्थानिक प्राधिकरणाच्या सदस्यांनी पार पाडलेली कार्ये ;

(ख) संविधानाच्या तरतुदींनुसार कोणतेही पद धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्या पदाच्या नात्याने पार पाडलेली कर्तव्ये ; किंवा

(ग) केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने घटित केलेल्या एखाद्या मंडळाचा अध्यक्ष किंवा सदस्य किंवा संचालक म्हणून आणि या खंडाच्या प्रारंभापूर्वी जिला कर्मचारी मानण्यात आले नसेल अशा कोणत्याही व्यक्तीने पार पाडलेली कर्तव्ये.

४. शव वाहून नेण्यासह अंत्यसंस्कार, दफन, स्मशानभूमी किंवा शवागृहाच्या सेवा.

५. जमिनीची विक्री आणि अनुसूची दोनच्या परिच्छेद ५ च्या खंड (ख) ला अधीन राहून, इमारतीची विक्री.

६. लॉटरी, सट्टेबाजी व जुगार याखेरीज कार्यवाहीयोग्य दावे.

**स्पष्टीकरण.**—परिच्छेद २च्या प्रयोजनार्थ “ न्यायालय ” या संज्ञेमध्ये, जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांचा समावेश होतो.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई